डा० रानडे यांचा दवाखाना सोलापूर.

# भिषग्विलास.

# BHISHAGVILASA.

वैद्यकसंबंधी अनेक विषयांचें सुबोध भाषेंत
मासिक पुस्तक.

A Monthly Magazine in Marathi
to popularise Medicine.

**आयुःकामयमानेन धर्मार्थसुखसाधनं ॥**
**आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः ॥ १ ॥**

धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थांस साधनीभूत असें दीर्घ आयुष्य ज्यांस पाहिजे असेल त्यांनीं वैद्यशास्त्रप्रतिपादित गोष्टी जाणण्याविषयीं व त्याप्रमाणें वागण्याविषयीं फार उत्सुकतेनें झटावें ( सार्थ वाग्भट. )

**पुस्तक ४. एप्रिल १८९९ अंक १**

**विषयानुक्रम. पान.**


| | |
|---|---|
| शरीररचना .... .... .... .... .... | १ |
| उपयुक्त औषधिसंग्रह–कोयनेलचे उपयोग.... | ५ |
| वैद्यशास्त्र आणि योगशास्त्र .... .... .... | १९ |
| पाश्चिमात्य वैद्यकाची व तींत धंदा करणाऱ्या लोकांची पूर्वीची, सांप्रतची व पुढील स्थिति | १७ |
| स्फुट लेख .... .... .... .... | २० |


**सोलापूर**

आनंदवृत्त छापखान्यांत छापिला.

# भिषग्विलासास आज चवथें वर्ष लागलें

१. ह्याबद्दल आह्मांला जसा आनंद होत आहे तसाच आमच्या
य व गुणज्ञ वाचकांनाही झाल्यावांचून राहणार नाहीं. प्रथमारंभीं
णतेंही काम सहज करूं असें वाटतें, पण पुढें पुढें जसा त्यासंबंधानें
नुभव येत जातो तसें तें काम कठिन वाटूं लागतें. व त्याचीं कारणेंही
अनेक आहेत- एक तर त्या विषयाचें खरें महत्व ध्यानांत येतें; दुसरें
शारीरिक व मानसिक स्वास्थ्याच्या स्वाधीन अशा प्रकारचीं कामें
अव्याहत व चांगलीं चालणें, किती अवलंबून आहे हें अनुभवास येऊन
मोठी नाउमेदही होते. नुसतें शारीरिक स्वास्थ्य ह्मणजे स्वतःस आरो-
ग्यता असूनही उपयोग नाहीं. त्याबरोबर मनही स्वस्थ पाहिजे. पण
तें स्वस्थ किंवा शांत राहणें अनेक गोष्टींवर अवलंबून असल्यामुळें
मनाला पूर्ण स्वस्थता अथवा शांति मिळणें पुष्कळदां अगदीं दूरापा-
स्तच होतें. गृहस्थाश्रमच असा कांहीं विलक्षण आहे कीं, तो अनेक
मानसिक विवंचनांचें अगरच असल्यासारखें आहे. आज काय कुटुंब
आजारी पडून निवर्तलें, उद्यां काय तिचा शेष राहिलेला मुलगा उदर
होऊन परलोकवासी झाला, अशीं अनेक संकटें दत्त ह्मणून उभींच
असतात. इतर सर्व संकटांना मनुष्य तोंड देऊं शकतें; कारण, त्याला
कांहीं तरी तोड काढतां येते.पण मरणाची गोष्ट तशी नाहीं.ती बिनतोड
बाजू असल्यामुळें मनुष्य तिच्या खालीं अगदीं चूर होऊन जातो,अर्थात्
मानसिक स्वास्थ्याचा त्यामुळें अभाव होऊन त्याच्याकडून अशा समयीं
मानसिक उद्योगही यथास्थित होण्यास मोठी आडकाठी येते. अशी
अवस्था आज दोन वर्षें आमची झाली. तथापि ' जें काम आरंभिलें तें
होईल तितकें करून शेंवटास नेलें पाहिजे ' असें जाणून आम्हीं [illegible]
ला क्रम मध्यें खंड न पडतां किंवा उशीरही न होऊं देतां [illegible]
ठेविला व त्याप्रमाणें आज तीन वर्षें पार पडून चौथे वर्षास आरंभ
झाला ही केवळ परमेश्वरकृपाच होय.

२. गेल्या वर्षांत आमच्या वाचकांची जी कांहीं आम्हीं बरी वाईट
सेवा केली तिचा सर्व पाढा पुनः वाचण्याची जरूर नाहीं. कारण, ती
[illegible]कांच्या स्मरणांतन अजून [illegible]

दा.क्र. 14814 050
वाई जि. सातारा

# भिषग्विलास.

## पुस्तक ४

### वर्णानुवार अनुक्रमणिका.


अ. पृष्ठ

अकरादि चूर्ण .... .... ९७

अकरा वर्षांच्या आंतील मुलांस मूत्र होणें. .... १८०

अंगुष्ठदीर्घशाखा ( लांग-सॉफीनस. .... .... ७९

र्धशिशीवर कोयनेलचा पयोग .... .... १२

ोष्ठ स्नायु .... १५७

ु ( सब्क्लेव्हियन ) ९९

ोजत्रु शिरा ( सब्क्लेव्हियन न ) .... .... १३२

छरा .... १३३।१३४

न्लामिनेटा ) ९८

.... .... १६७

ंकस ) .... १४४

ा .... ४७।६१

योग ) .... ८९

ा ( आपल्या ) .... .... ९१

ती .... २०

ापासून विषारी .... .... १९२

पृष्ठ.

अष्टम युग्म ( ऑडिटरी ) ४४

आ.

आगष्ट महिन्यांतील सोलापूरचें आरोग्य .... .... ११५

आंतील इंद्रियांच्या जागेचा बदल ... .... १५२

आफ्रिकेंतील निद्रारोग १५१

आमराक्षसी .... .... ९६

आमवातांत कोयनेलचा उप. १२

आंतांच्या दाहांत अफूचा उपयोग .... .... ६५

इ.

इसबावर सोपा व खात्रीचा उपाय .... .... ९६

उ.

उचकीवर उपाय .... १८०

उत्तानशिरा.... .... १३१

उपयुक्त औषधी संग्रह ५।४७।६१।१४८।१६६

उर्वीशिरा .... .... १३३

ऊ.

ऊर्ध्वजत्रु स्नायु .... १५९

पृष्ठ

ऊर्ध्व महाच्छिरा .... १३२

ए.

एक प्रकारच्या अग्निमांद्यांत अफूचा उपयोग .... १४

एकादश युग्म ( स्पायनल ऑक्सेसरी ) .... ४९

औ.

औदर महाधमनी ( ॲब्डामिनलएओरटा ) .... १००

औरस महाधमनी ( थोऱ्यासिकएओरटा ) .... "

अं.

अंतःचरणशाखा ( इंटरनल-क्युटेनिअस ) .... .... ३

अंतर्जानुशाखा ( इंटरनल पॉप्लिटिअल ) .... .... ८१

अंतर्ग्रैवेयक [ इंटरनल-करांटेड ] .... .... ९९

अंतःप्रकोष्ठधमनी ( अलनर आरटरी ) .... .... १००

अंतःश्रोणीधमनी ( इंटरनल ईलियाक ) .... .... १०१

अंतराधिस्नायु .... १७०

क.

कटितंतु [ लंबरनर्व्हज ].... ७८

कटितंतुसंघात [सेक्रलप्लेक्सस] ,,

कडू दोडक्याचे गुण .... १२७

पृष्ठ

कडू वृंदावनाचे गुण .... १४९

कर्णस्नायु .... .... १५४

कर्णेंद्रिय ( आरगन आफ हिअरिंग ) .... .... १

कपोलस्नायु .... .... १७९

कक्षाधमनी ( ॲक्सिलरी आरटरी ) .... .... ९९

कक्षाशिरा ( आग्झिलरी-व्हेन ) .... .... १३१

कंठनाडी ( ट्रकिया ) १४४

काकडीचे गुण .... १४९

कुडा .... .... १६६

कोयनेलचे उपयोग .... ९

कोयनेल स्वस्तें मिळण्याची सोय .... .... .... २०

काष्ठशिरा .... .... १३४

ख.

खरबुजाचे गुण. .... १५०

खोकल्यावर अफूचा उपयोग. .... .... ११

ग.

गोरोचन. .... .... १२८

ग्रहणीकपाटरस. .... ९१

ग्रैवेयक धमनी ( कामन-करांटेड. ) .... .... ९८

च.

चतुर्थ युग्म. .... .... ४१

पृष्ठ

चरणबहि:शिरा ( एक्सटरनल सॅफिनस.) .... १३३

चरणांत:शिरा ( इंटरनल सॅफीनस. ) .... ,,

ज.

ज्वर. .... १३७।१४४।१५८।१६१।१७३

जळवा.... .... .... १६२

जीर्णक्षयांतील खोकल्यावर अफूचा उपयोग. .... ६१

झ.

झोंपेची अवश्यकता. .... ८३

झोंपेपासून फायदे. ...., ८४

झोंप किती घ्यावी. .... १०३

झोंप घेण्याची वेळ. .... १०४

ट.

टांग्या खोकल्यावर अफूचा उपयोग. .... ७१

टिकेमालीचे गुण. .... ९०

डोकें दुखण्यावर उपाय... ५६

त.

तीन महिन्यांच्या आंतील मुलासुद्धां जंतांचा उपद्रव होतो. .... .... ११३

तीन वर्षांपासून विटाळ येणें.... .... .... १८०

तीव्र आमवातांत अफूचा उपयोग. .... .... ७१

पृष्ठ

त्रिकूतंतु ( सेक्रलनर्व्हज. ) ७९

त्रिकू प्राक् शाखा ( ॲंटीरिअर सेक्रलनर्व्ह. ) ७९

त्रिकूतंतु संघात ( सेक्रलप्लेक्सस. ) .... .... ८०

त्रितीययुग्म ( मोटोरिस ऑक्युलेरै. ).... .... ४२

द.

दक्षिणरसवाहिनी ( डक्टसलिंफ्यॅटिकस डेक्टर ). १४१

दम्यावर अफूचा उपयोग. ७१

दशमयुग्म ( न्यूमोग्यास्ट्रीक ) .... .... ४४

दांतांच्या ठणक्यावर अफूचा उपयोग .... ६१

दांत काढल्यावर रक्त वाहतें त्यावर उपाय.... १४०

दांत किडण्याचीं कारणें. १७९

दुग्धवटी. .... .... ९६

द्वादशयुग्म ( हायपोग्लासल. ). .... .... ४५

द्वितीययुग्म ( आप्टिक नर्व्ह. ) .... .... ४२

द्विपदास्थि ( मेलिअस. ) २

ध.

धमनीविचार .... .... ९७

| न. | पृष्ठ |
|---|---|
| नवमयुग्म ( ग्लासोफॉरिं. जिअल... .... .... | ४४ |
| नाडी ( पल्स ).... | १३५।१३६ |
| नासिकास्नायु..... .... | १५६ |
| निद्रा..... | ७४।८३।१०२।११७ |
| निद्रा कशानें येते. .... | ७६ |
| नूतन किंवा जुनाट हगवणींत अफूचा उपयोग... | ६३ |
| नेत्रस्नायु. .... .... | १५९ |

**प.**

| | पृष्ठ |
|---|---|
| पथ्यापथ्य विचार. .... | २६।४९ |
| पश्चाज्जंघधमनी ( पोस्टीरिअर टीबिअल ) .... | १०२ |
| पाणी स्वच्छ करण्याचें औषध .... .... | ११२ |
| पादतलांतः शाखा ( इंटरनल प्लॅन्टर ) .... | ८१ |
| पादतलबहिःशाखा ( एक्सटरनलप्लॅन्टर ) .... | ,, |
| पाश्चिमात्य वैद्यकांची व तींत धंदा करणाऱ्या लोकांची पूर्वीची, सांप्रतची व पुढील स्थिति | १७।३३ |
| पोक्त स्त्रियाही मुलांस पाजूं शकतात. .... .... | १७९ |
| पंचमयुग्म ( ट्रायफेशल... | ४२ |
| प्रकोष्ठमध्यशाखा ( मीडिअन ) .... .... | ९९ |
| प्रकोष्ठांतःशाखा ( अलनरनर्व्ह ) .... .... | ६० |
| प्रकोष्ठबहिःशाखा ( रेडिगलनर्व्ह ) .... .... | ,, |
| प्रकोष्ठदक्षिणशिरा ( रेडिअल व्हेन ) .... | १३१ |
| प्रकोष्ठमध्यशिरा ( मीडियन व्हेन ) .... .... | १३२ |
| प्रकोष्ठोत्तर शिरा ( ॲन्टारिअर अलनर ) .... | ,, |
| प्रत्यक्जांघशाखा ( पोस्टिरिअर टीबिअल ) .... | ८१ |
| प्रथमयुग्म ( ऑलफॉक्टरी) | ४१ |
| प्राक्जांघशाखा ( ऑन्टीरिअरटीबिअल. ) .... | ८२ |
| प्राक्जंघधमनी ( ऑन्टीरिअरटीबिअल ) .... | १०१ |
| प्राक्शाखा ( इंटरनल कासल. .... .... | ७७ |
| प्रागूरुशाखा ( ऑन्टीरिअर कुरल ) .... | १७८ |
| प्राणवाहिनीविचार. .... | १४३ |
| पृष्ठतंतु ( डार्सलनर्व्ह ).... | ७७ |
| पृष्ठवंशतंतु ( स्पायनलनर्व्हज. ) .... .... | ९७ |


**ब.**

| | पृष्ठ |
|---|---|
| बहिःश्रवण ( एक्सटरनल ईअर ).... .... | १ |
| बहिर्नाुशाखा ( एक्सटरनल पापलीटिअल ) | ८२ |
| बहिश्चरणशाखा ( एक्स्टरनल क्युटेनिअस ) .... | ,, |
| बहिर्ग्रैवेयक ( एक्सटरनल करॉटिड ) .... | ९९ |
| बहिःप्रकोष्ठधमनी ( रेडिअल. .... .... | १०० |
| बहिःश्रोणीधमनी ( एक्सटरनल इलियक ) .... | १०१ |
| बहिःश्रोणीशिरा ( एक्सटरनल इलियाक. .... | १३३ |
| बाभळीचे गुण. .... | १५० |
| बालरोगचिकित्सा. .... | २२।५१ |
| ब्रह्मीचे गुण. .... .... | १४८ |

भ.

| | |
|---|---|
| भुजतंतुसंघात ( ब्रेकिअल प्लेक्सस.... .... | ५९ |
| भुजधमनी ( ब्रेकिअल. ) | ९९ |
| भुजोत्तरशिरा ( बॉसिलिक व्हेन ) .... .... | १३२ |

म.

| | |
|---|---|
| मुखस्नायु. .... | १५४।१५६ |
| मदात्ययामध्यें अफूचा उपयोग. .... .... | ६६ |
| मध्यश्रवण ( मिडल ईअर ) | १ |
| मधुमेहांत अफूचा उपयोग. | ६६ |
| मधुमेहावर उपाय. .... | ९७ |
| मधुमेहांत पेटके येणें. .... | १२६ |
| मध्यपटलस्नायु ( डायफ्रम ) .... .... | १७१ |
| मस्तकशिरा. .... .... | १२० |
| महःमारीवर उपाय..... | ५६ |
| महामारीवर क्वायनेलचा उपयोग .... .... | ११४ |
| महामारीच्या जंतूंविषयीं कांहीं माहिती. .... | १२९ |
| महानितंबशाखा ( ग्रेटर इच्छिआटिक. ) .... | ८० |
| महाधमनी ( एओरटा ).. | ९७ |
| मादकपदार्थ—तंबाकू व गांजा. .... .... | १११ |
| मुद्रास्थि ( स्टेपीज ) .... | १ |
| मुळव्याधीचे मोडावर अफूचा उपयोग. .... | ६६ |

य.

| | |
|---|---|
| यकृत्छिरा ( हिप्याटिक व्हेन. ) .... .... | १३५ |
| यात्रा व आरोग्य. .... | १०७ |

र.

| | |
|---|---|
| रक्तवाहिनीविचार. .... | ९७ |
| रदास्थि ( इंकस ) .... | १ |

पृष्ठ

रसवाहिनीविचार ( लिंफ्याटिक्व्हेसल्स ) .... १४१
रसनेंद्रिय ( आरगन आफ टेस्ट. ) .... .... ३
रुई. .... .... .... १६७

ल.

लेप्रसी ( महारोग ) कमिशनचा ठराव. .... ३८

व.

वक्षस्नायु. .... .... १७०
वातवाहिनीविचार (नर्व्हज) ४१
वांतीवर ( गरभारपणाचा ) कोयनेल. .... .... १३
वामरसवाहिनी ( थोरासिकडक्ट ) .... .... १४२
विंचवावर उपाय. .... १४९
वैद्यशास्त्र आणि योगशास्त्र. .... .... १५

श.

शरीररचना १।२१।४१।५७।७७ ९७।१४१।१५३।१७९
शिराविचार ( व्हेनस ) १२९
शीर्षस्नायु .... .... १५४

पृष्ठ

शंभुनाथरस .... .... ९७
श्रोणीधमनी ( कामन इलियाक) .... .... १०१
श्रोणीशिरा .... .... १३४
श्लेष्मलत्वचा ( म्यूकसमेंब्रेन ) २१

ष.

षठयुग्म (ऑब्ड्यूसेंटीज) ४३

स.

सक्थिधमनी (फेमोरलआरटरी) १०१
सर्दीवर अफूचा उपयोग.... ७२
सन्निपातज्वरांत अफूचा उपयोग .... .... .... ६४
सप्तम युग्म ( फेशल ) .... ४२
स्टशनावरील गाळणी ....१२७
स्पर्शेंद्रिय (आरगन आफ टच) २१
स्नायुत्वक्शाख [ मस्क्युलोक्युटेनिअस ] .... .... ८२
स्नायुविचार ( मसल्स ] १५३

ह.

हस्तशिरा .... .... १३१
हिवज्वरावर प्रतिबंधक .... १
हेंप (गांजा) कमिशनचा रिपोर्ट ५५
हृद्रोग व मुष्टिमैथुन .... १७९

# भिषग्विलास.

वर्ष ४ एप्रिल १८९५ अंक १

## शरीररचना.

( लेखक— डा. कृष्णराव गडबोले. )

( पुस्तक ३ अं. १२ व. पुढें चालू. )

### कर्णेंद्रिय ( आरगन् ऑफ हिअरिंग. )

१. कर्णेंद्रिय ह्मणजे कान हें इंद्रिय नानाप्रकारचे जे बाहेर ध्वनि होतात त्यांचें ज्ञान आत्म्यास करून देणारें एक साधन आहे. याची अंतर रचना फार चमत्कारिक आहे. वर्णनाच्या सोईकरितां कर्णेंद्रियाचे तीन विभाग केले आहेत ते येणेंप्रमाणें:— बहि:श्रवण, मध्यश्रवण, आणि अंत:श्रवण. आतां या तिहींचें वर्णन पुढें क्रमानें केलें आहे.

२. **बहि:श्रवण** ( एक्स्टर्नेल इअर )— बहि:श्रवणाचे पुन: दोन विभाग आहेत ते असे.- कर्णेंद्रियाच्या द्वारासभोंवतीं जें एक लवचीक पटल असतें त्यास कर्णशष्कुली ( पिन्ना ) ह्मणजे कानाची पाळ ह्मणतात. हिचा आकार कांहीं अंशीं करंजीसारखा असतो, ह्मणून हिला कर्णशष्कुली असें नांव पडलें आहे. कर्णशष्कुली कोमल तरुणास्थि व चर्म यांच्या योगानें बनलेली असते. ही बाहेर होणारे ध्वनि गोळा करून कर्णद्वाराकडे पोंचविण्याच्या कामीं उपयोगीं पडते. बहि:श्रवणाचा हा एक भाग झाला. आतां दुसऱ्या भागास कर्णोलूखल ( मिएटस ऑडिटोरिअस ) असें ह्मणतात. कर्णोलूखल हें कर्णद्वारापासून सुरू होऊन, कानांत सुमारें एक इंचावर एक पडदा असतो तेथपर्यंत असतें. कर्णोलूखलांतील मार्ग किंचित् वांकडा असतो. कांहीं कांहीं लोकांच्या कर्णोलूखलाच्या त्वचेवर केंस येतात. या त्वचेपासून एक प्रकारचा मल उत्पन्न होतो, त्यास कर्णमल असें ह्मणतात.

३. **मध्यश्रवण** ( मिड्ल इअर )— बहिःश्रवणाच्या आंतल्या अंगास कर्णास्थीमध्यें एक लहानसा अवकाश असतो त्यास मध्यश्रवण ( टिंपॉनम् ) असें ह्मणतात. हें कर्णपटल चर्माचें असून अर्धवट पारदर्शक असतें. हें लंबवर्तुल असतें. हें कर्णोलूखलाच्या तळाशीं तिरकस बसविलेलें असतें; ह्मणजे याचा वरील कांठ किंचित् पुढें चिकटलेला असून खालचा कांठ आंतल्या अंगास चिकटलेला असतो. कर्णपटलाची बाहेरील बाजू खोलगट असते व आंतील बाजू फुगीर असते. या पटलाच्या अंतररचनेंत तीन पदर असतात. बाहेरील पदर त्वचेचा असतो, मधला पदर तंतुमय असतो व आंतील पदर श्लेष्मल त्वचेचा असतो. कर्णपटलास फोड वगैरे होऊन कधीं कधीं छिद्रें पडतात अगर व्रण होऊन तो पडदा अगदींच सडून जातो, त्यामुळें मनुष्य बाहेरट होतो.आणि त्यास कानांत वारा शिरल्यासारखा भास होतो. मध्यश्रवणांत तीन सूक्ष्म हाडें असतात. तीं एकमेकांशीं सांधलेलीं असतात त्यामुळें त्यांची एक सांखळीच बनलेली असते. त्या तीन हाडांपैकीं एकाचें नांव द्विपदास्थि, दुसऱ्याचें रदास्थि व तिसऱ्याचें मुद्रास्थि असें आहे.

४. **द्विपदास्थि** ( मेलियस )— या हाडास पायासारखीं दोन टोंकें असतात व एक डोक्यासारखा भाग असतो. त्या दोन टोंकांपैकीं एक लांबट असतें त्यास कर्णपटलास शिथिल करणाऱ्या स्नायूंचे तंतु चिकटतात. व आंखूड टोंकास कर्णपटलाकुंचक स्नायूंचे तंतु चिकटतात. द्विपदास्थीचें डोकें रदास्थीशीं जोडलेलें असतें. व मधला भाग कर्णपटलास आंतल्या बाजूस चिकटलेला असतो.

५. **रदास्थि** ( इंकस )— या हाडाचा आकार द्विमूलदंतासारखा दिसतो ह्मणून यास रदास्थि असें नांव दिलें आहे. या अस्थीलाही दोन टोंकें असतात; त्यांपैकीं एक लांबट असतें त्याच्या शेवटास एक गठ्ठू असतो, त्या ठिकाणीं मुद्रास्थीचा सांधि होतो.

६. **मुद्रास्थि** ( स्टेपीझ )— हें हाड रिकिबीच्या आकृतीचें असतें. याचा अरुंद भाग रदास्थीच्या गठ्ठूशीं जुळतो व रुंद भाग अंतःश्रवणाच्या एका छिद्राशीं जुळतो. मध्यकर्णांतून एक नलिका सुरू

होऊन नाकांत जाऊन मिळते. तिला कर्णनलिका ( यस्टेचियनट्यूब ) असें ह्मणतात. ही नलिका कानाजवळ सूक्ष्म असत व पुढें जसजशी नाकाकडे उतरत जाते तसतशी किंचित् मोठी होत जाते. यामुळें या नलिकेचें कानाकडील द्वार लहान असतें व नाकांतील मोठें असतें. या नलिकेच्या योगानें नाकांतील हवा मध्यश्रवणांत शिरते.

७. **अंतःश्रवण** ( इंटर्नल इअर )—कर्णेंद्रियाच्या सर्व रचनेमध्यें अंतःश्रवण हा भाग फार महत्वाचा आहे. कारण, येथेंच ज्ञानतंतूचा विस्तार असतो. याची रचना फार घोटाळ्याची आहे यामुळें ती प्रत्यक्ष पाहिल्यास चांगली ध्यानांत येण्यासारखी आहे. तथापि त्याचें वर्णन संक्षिप्त रीतीनें येथें करितों. मध्यश्रवणास लागूनच अंतःश्रवण असतो. यांत मुख्यत्वेंकरून दोन अवकाश असतात त्यांपैकीं एक अस्थिमय असतो व एक चर्माच्या योगानें बनलेला असतो. अस्थिमय अवकाश हाडांच्या अर्धवर्तुल नलिकांत असतो व गोगलगाईच्या घरासारखें एक हाड असतें त्यांत असतो. यास शंखास्थि ( कॉक्लिया ) असें ह्मणतात. या हाडांतून कर्णेंद्रियाचे तंतु फिरविलेले असतात.

८. दुसरा जो अवकाश चर्माच्या योगानें बनलेला असतो त्यांत एक प्रकारचा द्रव भरलेला असतो. व त्या चर्माच्या श्लेष्मल त्वचेंत कर्णतंतूच्या सूक्ष्म शाखा पसरलेल्या असतात.

९. आतां बाहेरील ध्वनि मस्तकांत कसा जाऊन पोंचतो याचा विचार करूं. प्रथम बाहेरील ध्वनीचा आघात कानांतील पडद्यावर होतो. मग पडद्याच्या आंतल्या बाजूस सूक्ष्म अस्थीच्या साखळीचें एक शेंवट लागलेलें असतें व दुसरें शेंवट अंतःश्रवणाच्या एका छिद्रास जोडलेलें असतें त्यामुळें तो आवाज अंतःश्रवणांत जाऊन पोंचतो. व तेथेंच कर्णेंद्रियाचे ज्ञानतंतु पसरलेले असतात त्यांच्या द्वारें मस्तकांत जातो व तेणेंकरून मनुष्यास बाहेरील ध्वनीचें ज्ञान तात्काळ होतें.

## रसनेंद्रिय ( ऑर्गन ऑफ टेस्ट ).

१. रसनेंद्रिय ह्मणजे जीभ ही मधुरादि रसांचें ज्ञान करून देणारी

आहे, म्हणून हिला रसनेंद्रिय किंवा रसज्ञा असें म्हणतात. ही दिसण्या-सारखी आहे, करितां हिचें बाह्य स्वरूप स्थूलमानानें सर्वांस माहीत आहेच. करितां हिच्या अंतररचनेचा विचार करूं. प्रथम हिला आधार कशाचा आहे हें पाहूं. जिभेचें मूळ मागल्या अंगानें अर्धचंद्रास्थीला स्नायुतंतूंच्या योगेंकरून गुंतविलेलें असतें व पुढल्या अंगानें त्यांतील कांहीं स्नायुतंतु उभे गेलेले असतात व कांहीं आडवे असतात. अंतर्जिव्हेस ( एपिग्लाटिसास ) श्लेष्मक त्वचेनें गुंतविलेली असते. हिची अंतररचना स्नायुतंतूंच्या योगानें झालेली असते. जिभेच्या मध्यभागीं एक उभी सूक्ष्म शिवण असते तिला जिव्हासीवनी असें म्हणतात. हिच्या योगानें जिभेचे दक्षिणोत्तर असे दोन निरनिराळे विभाग असल्यासारखे दिसतात. जिभेच्या दक्षिणोत्तर बाजू श्लेष्मल त्वचेनें हन्वस्थीस गुंतविलेल्या असतात. व जिभेच्या शेंड्याच्या खालच्या बाजूस एक बंधन असतें. त्यास जिव्हाप्रबंधन ( फ्रीनॅलिंग्वी ) असें म्हणतात. जिभेवर तीन प्रकारचे सूक्ष्म व मृदु असे कंटक असतात, त्या कंटकांतून रसज्ञ तंतूंच्या शाखा शिरलेल्या असतात, त्यांच्या योगानें या मृदु कंटकांच्या अंगीं गोड, अंबट, खारट, इत्यादिक रस ओळखण्याचें ज्ञान प्राप्त होतें. ताप वगैरे आला असतां किंवा आणखी कोणत्याही कारणानें जीभ कोरडी पडली असतां हे मृदु कंटक, बोटानें स्पर्श करून पाहिलें असतां, स्पष्ट रीतीनें हातास लागतात. जिभेच्या त्वचेच्या अंगीं स्पर्शेंद्रियाची शक्तिही फारच विलक्षण असते, त्यामुळें जेवतांना घासांत एखादा केंस चुकून गेला तर तो ती लागलींच शोधून काढते. जिभेच्या गड्ड्यावरील त्वचेंत कांहीं श्लेष्मापिंड असतात. जिभेच्या खालच्या बाजूस लालापिंडांच्या सूक्ष्मवाहिन्यांचीं मुखें येऊन मिळालीं आहेत त्यांचीं सूक्ष्म छिद्रें असतात, त्यांतून लाळेचा स्राव तोंडांत वारंवार होत असतो. याखेरीज जिभेच्या अंगीं जी दुसरी एक शक्ति आहे ती कंठांतून निघणाऱ्या स्वरापासून वर्णोच्चार उत्पन्न करणें ही होय. जीभ तोंडांत निरनिराळ्या स्थानीं लागून ( क, च, ट, त, प, ) इत्यादिक अक्षरांचा उच्चार व्यक्ततेस येतो. ही गोष्ट

सर्वांस माहीत आहेच. जिभेमध्यें वाग्वाही ज्ञानतंतु, रसज्ञतंतु, व स्पर्शज्ञतंतु अशा तिहींचा विस्तार झालेला असतो व रक्तवाहिन्यांचाही विस्तार असतो. ( पुढें चालू. )

---

## उपयुक्त औषधीसंग्रह.

---

### कोयनेलचे उपयोग.

१. पाश्चिमात्य देशांतली कोयनेल ही एक अमोल्य औषधि आहे. ती पाश्चिमात्य लोकांबरोबर आपल्याकडे आली. क्वीनाईन हें खरें इंग्रजी नांव असून कोयनेल हा त्याचा अपभ्रंश मराठींत झाला आहे. ज्या झाडाच्या सालीपासून कोयनेल तयार करितात त्यास **सिंकोना** असें ह्मणतात. हीं झाडें महाबळेश्वर, नीलगिरि व कलकत्यानजीकच्या सरकारी बागेंत आहेत. व हल्लीं ह्यांपासून आपल्या इकडे कोयनेलही तयार करितात. सिंकोनाच्या सालीची नुसती वस्त्रगाळ पूडही मोठी गुणकारी आहे. ह्या सालीपासून कोयनेल, किनाडीन सल्फस, सिंकोनिडीन, इत्यादि अनेक पदार्थ तयार होतात.

२. ह्या सालींत अथवा तिच्यापासून होणाऱ्या दुसऱ्या कोयनेल वगैरे पदार्थांत टॅनीन ( मायफळ, हिरडे, इत्यादिकांत विपुल असणारा पदार्थ ज्यास तुरट सत्व ह्मणतां येईल ) हा पदार्थ पुष्कळ असतो. अर्थात् टॅनीनचे गुणधर्मही तिच्या अंगीं असतात ही गोष्ट तिचा उपयोग करितांना ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. सिंकोनाची बारीक पूड ही घाणेरड्या अथवा सडलेल्या क्षतावर टाकली असतां तें स्वच्छ होऊन बरें होतें; पू फार होऊं लागलेल्या जागेवर ही पूड टाकली असतां तो कमी होतो; तसेंच हिरड्यांतून पुष्कळ रसकी वाहूं लागल्यास तीही ह्या पुडीनें बंद होते; घाटसर्पांत ( डिफ्थीरिया ) कोयनेलचें मिश्रण घशांत लाविल्यानें चांगला उपयोग होतो; कोयनेल एक ड्राम घेऊन तेवीस अंस मद्यार्कांत ( आलकोहोल ) मिश्र करून तें मिश्रण

फार घाम येणाऱ्या त्वचेस लावलें तर घाम येईनासा होतो. सारांश, वरीलप्रमाणें सिंकोनाची साल किंवा तिच्यापासून होणारे दुसरे पदार्थ यांचा बाह्योपचारांचे कामीं पुष्कळ उपयोग होतो.

३. सिंकोना, कोयनेल व सिंकोनिडीन इत्यादि पदार्थांची नुसती पूडच पोटांत घेतल्यास ती जठरांतील पाचक रसांत आपेआप विद्रुत होते, ह्मणून फक्त ती विद्रुत होण्यासाठींच गंधकाचे वगैरे आम्लद्रवाबरोबर देण्याची जरूरी नाहीं. कोयनेल वगैरे मोठ्या प्रमाणानें देतांना तें फक्त दुधांत अथवा पाण्यांत नुसतें टाकून दिलें असतां आम्लद्रवानें विद्रुत करून दिल्यापेक्षां पुष्कळ कमी कडू लागतें. कोयनेलाबरोबर तितकीच सुंठीची पूड मिश्र केली असतां तें फारसें कडू लागत नाहीं. थोड्या आल्याच्या रसांत कोयनेल दिल्यानेंही तितकें कडू लागत नाहीं. लिंबाचे रसांत कोयनेल मिसळल्यानें तें विद्रुत होऊन कमी कडू लागतें. दुधानेंही कोयनेलचा कडूपणा कमी लागतो. मोठ्या प्रमाणांत कोयनेल देणें झाल्यास तें गोळीच्या रूपानें द्यावें, ह्मणजे त्यापासून मळमळ किंवा वांती होत नाहीं.

४. ज्वरापासून किंवा दुसऱ्या कारणापासून अशक्तता आलेल्या स्थितींत कोयनेल सूक्ष्म प्रमाणानें दिल्यास त्यापासून क्षुद्बोध होऊन पचनक्रियाही वाढते असा अनुभव आहे. हीं औषधें पुष्कळ दिवस दिल्यानें जठर बिघडतें आणि पोटांत उष्णता व जडपणा वाढून क्षुधा मंद होते, मळमळ सुटते, वांती होते किंवा हगवणही लागते. विषारी ह्मणजे फारच मोठ्या प्रमाणांत ती पोंचली तर अत्यंत तृषा लागते, आणि पोटांत आग पडून वांती होते.

५. कोयनेलापासून पित्ताच्या उत्पत्तीवर कांहींएक परिणाम होत नाहीं. ह्मणजे तें अधिक उत्पन्न होत नाहीं किंवा कमीही होत नाहीं. कोयनेलापासून जंतांवरही उपयोग होतो. ह्मणजे त्यांची उत्पत्ती कमी होते. पुष्कळ प्रमाणानें कोयनेल पोटांत घेतल्यास त्याचा बराच भाग मलाबरोबर बाहेर पडतो. कोयनेल लागलींच रक्तांत मिसळतें. कोयनेल घेतलेल्या रोग्याच्या मूत्रांत अथवा घामांत तें जसेंच्या तसेंच

सांपडतें, अर्थात् त्याचें शरीरांत फारसें रूपांतर होत नाहीं असें दिसतें. पोटांत घेतलेलें बहुतेक कोयनेल सहा तासांचे आंतच मूत्रावाटें बाहेर पडतें.

६. मोठ्या प्रमाणानें कोयनेल घेतल्यास विशेषत: कानांवर व डोळ्यांवर त्याचा वाईट परिणाम होतो. कानांत घंटा वाजल्यासारखा आवाज होतो आणि ऐकूं येईनासें होतें. क्वचित् एखादा मनुष्य जन्माचाही बहिरा होतो. तथापि हमेषा थोड्याच दिवसांत वरील लक्षणें जाऊन रोग्यास चांगलें ऐकूं येऊं लागतें. त्याचप्रमाणें दृष्टि मंद होते किंवा कांहीं वेळ मुळींच दिसेनासें होतें. मात्र कायमचा मनुष्य अंधळा झाला असें क्वचित् आढळतें. केव्हां केव्हां एकाच डोळयास बिकार होतो किंवा आरंभीं एक डोळा बिघडून नंतर दुसऱ्या डोळ्यानेंही दिसेनासें होतें. मोठ्या प्रमाणानें कोयनेल घेतल्यास वरील लक्षणांशिवाय अतिशय कपाळ दुखणें व सुया टोंचल्याप्रमाणें डोक्यांत दुःसह वेदना होणें हीं लक्षणें होतात. अशा स्थितींत तोंड व डोळे लाल होतात आणि चेहरा सुस्त व म्लान होतो. कांहीं प्रकृतीच्या लोकांना कोयनेल थोड्या प्रमाणानेंही दिल्यास तें त्यांस न सोसून त्यांना वरील लक्षणें होतात. कांहीं लोकांना कोयनेल थोडया प्रमाणानेंही दिल्यास त्यांच्या अंगभर तांबूस पुरळ येतो. कित्येकांच्या अंगावर पित्तासारखे लाल चकंदळे उठून अंग वितावितल्यासारखें होतें, पोटांत बिघडून वांती होते आणि त्यांची नाडीही जलद चालते. कोयनेलच्या कारखान्यांतील मजुरांस वरच्यासारखे त्वग्रोग नेहमीं होतात किंवा त्यांच्या सर्वांगाला फार खाज सुटते. सारांश, कोयनेलचा उपयोग करीत असतांना वरील लक्षणें झाल्यास त्या रोग्यास कोयनेल मानत नाहीं असें समजावें.

७. कोयनेलापासून रक्तांतील तांबडे परमाणु कमी होऊन पांढरे परमाणु अंशत: वाढतात असा समज आहे, हिंवज्वरापासून वाढलेली पानथरी नुसत्या कोयनेलापासून बरी होते असा पुष्कळांचा अनुभव आहे. हरएक प्रकारच्या हिंवज्वरावर सिंकोना किंवा कोयनेल

वस्ताद औषध आहे व ही गोष्ट आतां सर्वत्र प्रसिद्ध आहे. कोयनेलानें हिंवज्वर बरे होतात ते त्याचा जो परिणाम पाणथरीवर होतो त्यापासूनच होतात, असा कांहींचा समज आहे. पण बहुमतानें असेंच ठरतें कीं, ज्या विषारी जंतूवर (मायक्रोब) हिंवज्वर हे अवलंबून आहेत ते जंतु कोयनेलानें नाश पाऊन ज्वर नाहींसा होतो. कोयनेलापासून हिंवज्वर एकदम बंद होतात हें खरें, पण एखादे वेळीं असें होतें कीं, अंगाची उष्णता पूर्ववत् राहून म्हणजे कोयनेल घेण्यापूर्वीच्या दिवसाप्रमाणें किंवा कांहीं कमी अंगांत ज्वर येऊन फक्त हुडहुडी भरणें,घाम येणें व नाडी जलद चालणें हीं लक्षणें मात्र बंद होतात.कोयनेल न घेतांना सुद्धां नुसत्या विश्रांतीनें हीं लक्षणें होत नाहींत. यासाठीं तीं बंद झालीं म्हणून हिंवाची पाळी टळली असें समजून उपयोगीं नाहीं. जोंपर्यंत ज्वर भरण्याचें राहत नाहीं तोंपर्यंत वरील लक्षणें पुनः केव्हां होतील ह्याचा नेम नाहीं. सबब कोयनेलचा उपयोग नुसता ज्वर भरण्याचा सुद्धां राहीपर्यंत केला पाहिजे व तोंपर्यंत रोग्यास रोजचा कामधंदा करण्यास किंवा बाहेर जाण्यास मोकळीक देऊं नये. ही एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे कीं, कोयनेलापासून थंडी भरणें, ज्वर येणें, घाम सुटणें, इत्यादि लक्षणें जरी बंद झालीं तथापि केव्हां केव्हां पुढें कांहीं दिवस रोजच्या पाळी येण्याच्या वेळीं मूत्रसंबंधी लक्षणें म्हणजे मूत्र पुष्कळ होणें व त्यांत यूरीयाचा (एक मूत्राचा घटकावयव) अंश पुष्कळ असणें हीं लक्षणें पूर्वीप्रमाणें होतातच.

८. एकदां थंडी वाजण्यास सुरवात झाल्यावर कोयनेल दिल्यानें पुढें होणारीं लक्षणें बंद होत नाहींत. यासाठीं कोयनेल देणें तें हिंवाच्या पाळीच्या तास दोन तास तरी आगोदर पोंचेल अशा बेतानें द्यावें. हिंव सुरू झाल्यावर कोयनेल दिल्यास जरी त्या पाळीस त्याचा उपयोग होत नाहीं तथापि त्यापासून कांहीं अपाय न होतां पुढील पाळी बंद होण्यास उपयोग होतो. थोडी थंडी वाजूं लागतांच म्हणजे हिंवाचें पूर्व स्वरूप सुरू होतांच कोयनेलची त्वचेखालीं

पिचकारी दिल्यानें पुढील लक्षणें बंद होतात. आमचा प्रघात असा आहे कीं, सुमारें दहा ग्रेन कोयनेलचे तीन भाग करून त्यांपैकीं एक भाग हिंव येण्याचे आगोदर सहा कलाक देण्यास सुरुवात करावयाची; ह्मणजे बारा वाजतां हिंव येत असल्यास सहा वाजतां एक भाग, पुढें आठ वाजतां दुसरा भाग, व दहा वाजतां तिसरा भाग, ह्याप्रमाणें द्यावयाचें. अशा रीतीनें कोयनेल देऊन स्नान वगैरे न करितां किंवा कांहीं थंड उपचार न करितां ह्मणजे कुपथ्य न करितां वागल्यास एक दोन पाळ्यांचे आंत कसलेंही हिंव–रोज येणारें, एक दिवसाआड येणारें किंवा चौरे हिंव सुद्धां– असलें तरी बंद झाल्यावांचून राहतच नाहीं, असा आमचा पक्का अनुभव आहे. कोयनेलापेक्षां नुसत्या सिंकोनाच्या सालीच्या भुकटीचा अधिक चांगला उपयोग होतो किंवा ती निदान कोयनेलपेक्षां अधिक पौष्टिक आहे असा कित्येकांचा अनुभव आहे. तथापि ही पूड पुष्कळ प्रमाणानें द्यावी लागते व तींत टॅनीनचा पुष्कळ अंश असल्यामुळें पचतही नाहीं.

९. कित्येकांचा कोयनेल थोड्या प्रमाणानें पण अधिक वेळां देण्याचा प्रघात असतो व कित्येक मोठ्या प्रमाणानें एकदांच देतात. दोन्ही पद्धतींचाही निरनिराळ्या स्थितींत उपयोग चांगला होतो. हिंवज्वर सौम्य असेल तर एक दोन ग्रेन कोयनेल दिवसांतून तीन चार वेळां देणें चांगलें. पण ज्वर मोठ्या कडाक्यानें येत असेल तर पांच किंवा दहा ग्रेन प्रमाणानें सुद्धां तापाचे आधीं एक दोन वेळां अगर दहा पंधरा किंवा वीस ग्रेन सुद्धां एकदम द्यावें लागतें, त्यावांचून तात्काळ अम्मल होऊन हिंव राहात नाहीं. हिंव येण्यास सुरुवात होतांच मोठ्या प्रमाणानें एकदम कोयनेल दिल्यास पाळी न टळतां ज्वर अधिक जोराचा येतो. घाम येऊन ताप निघून गेल्यावर लहान अथवा मोठ्या प्रमाणानें कोयनेल देण्यास हरकत नाहीं. मात्र प्रमाणाचे मानानें मध्यें अधिक काळ जाऊं द्यावा. ह्मणजे पुढील पाळी येण्यास जरी पुष्कळ अवधि असला तथापि ती येत नाहीं. कोयनेल देऊं लागल्यावर एखादे वेळीं अशी गम्मत होते कीं, रोग्यास ज्वर आला तरी तो त्यास

समजत नाहीं; ह्मणजे त्याचीं लक्षणें इतकीं सौम्य होतात कीं, तीं त्याचे ध्यानांत येत नाहींत. अर्थात् अशा वेळीं, थरमामेटर लाऊन ज्वर माप-ल्यावांचून, ज्वर आला हें समजण्यास दुसरा मार्गच नाहीं. पाळ्या एक दोन चुकल्या तथापि कोयनेल एकदम बंद करूं नये. कारण, ज्वर जबरीनें एकदम बंद झाला तथापि त्याचा अम्मल अंतर्यामीं राहण्याचा संभव असतो; किंवा ज्याला ज्वर नुकताच येऊन गेला आहे त्यास अगदीं क्षुल्लक कारणानें- अशक्तता, मनास धक्का किंवा एकदम सर्दीनें- ज्वर पुनः उद्भवण्याचा संभव असतो. यासाठीं पाळी टळल्यावर पुढें चार सहा दिवस कमी कमी प्रमाणानें कोयनेल देतच असावें. हिंवज्वर फार कडक असला तर तो कोयनेल मोठ्या प्रमाणानें दिल्याशिवाय जलद राहतच नाहीं. कोयनेल देणें तें ज्वर नसतांनाच दिलें पाहिजे. कांहीं गोष्ट कोयनेल देण्यास प्रतिकूळ असली तथापि कडक हिंव-ज्वरांत कोयनेलावांचून गत्यंतरच नाहीं, सबब तें दिलेंच पाहिजे. पचत नाहीं ह्मणून जर तें तोंडावाटें देतां येणार नाहीं तर गुदावाटें बस्तीच्या रूपानें अथवा त्वचेखालीं पिचकारीच्या द्वारें घातलें पाहिजे. त्वचेखालीं पिचकारी देणें ती माहितगार वैद्यानें दिली पाहिजे. कारण, पिचकारी-साठीं कोयनेलचें योग्य मिश्रण तयार करावें लागतें. त्वचेखालीं पिच-कारी दिल्यास कोयनेल एक दोन ग्रेनसुद्धां बस्स आहे. गुदावाटें पिचकारी देणें झाल्यास ताप नसतांना दिवसांतून एक दोन वेळा ५।१० ग्रेन कोयनेल थोड्या गंधकद्रावांत अथवा लिंबाचे रसांत विद्रुत करून त्यांत २॥ तोळे डिंकाचें पाणी घालून त्याचा बस्ती द्यावा. बस्ती दिल्यावर रोग्यास थोडा वेळ पडून राहण्यास सांगावें.

९. हिंवज्वराशिवाय दुष्ट हवेपासून ह्मणजे कर्दमोत्थ विषापासून ( म्यालेरियापासून ) उद्भवणाऱ्या **संतत** ज्वरांत जेव्हां ताप कमी असतो तेव्हां ह्मणजे बहुधा सकाळचे दहा अकरा वाजण्याचे आंत कोयनेल एक दोनदां ५ पासून १०।१५ ग्रेन पर्यंत द्यावें. हिंवज्वर किंवा संतत ज्वर जितका नूतन असेल तितका लौकर तो कोयनेलानें जातो. पुष्कळ दिवस राहिलेला ह्मणजे **जीर्णज्वर** कोयनेलानें एखादे वेळीं

राहत नाहीं, तेव्हां सोमलाचा अर्क अथवा भस्म दिल्यास फार चांगला गुण येतो. नूतन ज्वरांत जेव्हां एखादे वेळीं कोयनेल लागू पडत नाहीं तेव्हां प्रातःकाळीं प्रथम एखादें वमन देऊन नंतर कोयनेल दिल्यास तें लागू पडून ज्वर येत नाहीं. हिंवज्वराचा अम्मल फार असतो अशा दिवसांत रोज थोडें कोयनेल घेत गेल्यास ज्वराची बाधा होत नाहीं. ह्मणजे कोयनेल असें हिंवज्वर बरा करितें, तसें तो येऊंही देत नाहीं. अर्थात् **हिंवज्वरावर कोयनेल हें प्रतिबंधक औषधही आहे.** हैद्राबाद (निझाम) सारख्या ठिकाणीं ह्मणजे जेथें हिंवज्वराची बाधा बारा मासही होण्याचा संभव असतो, अशा ठिकाणीं मधून मधून थोडथोडें कोयनेल घेत गेल्यास तेथील हवा बाधण्याची भीति नाहीं.

१०. ही फारच चमत्कारिक व ध्यानांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे कीं, ज्यास एकवार मागें ( मग तो पुष्कळ वर्षांमागें कां असेना) हिंवज्वर येऊन गेला आहे त्यास दुसरा कांहीं आजार **आमवात, दमा, खोकला** वगैरे- झाला तर तोही हिंवज्वराप्रमाणें पाळीनें येतो. ह्मणजे कांहींवेळ मध्यें अगदीं बंद पडून एकदम पुनः येतो. अशा रोगांत म्हणजे हिंवज्वराप्रमाणें ज्यांचा क्रम येण्याचा व जाण्याचा आहे अशा रोगांत नुसतें कोयनेल दिल्यानें ते रोग बरे होतात. हिंवाचे पाळीप्रमाणें डोकें दुखण्याच्या पाळीचीही कित्येकांस संवय असते व त्याचें कारण म्यालेरियाच पुष्कळदां असतो. तेव्हां **डोकें दुखूं** लागण्यापूर्वी मोठ्या प्रमाणानें १०–१९ ग्रेनपर्यंत कोयनेल दिल्यास डोकें दुखत नाहीं. इतर कारणांमीं डोकें दुखतें त्यावरही कोयनेलचा उपयोग होतो. **अर्धशिशी**ही ती सुरू होण्यापूर्वी कोयनेल दिल्यानें राहते. साधारण कपाळ, भिवया, आंक, हीं दुखत असल्यास दहा दहा मिनिटांचे अंतरानें बोटाचे टोंकास चिकटेल येवढें कोयनेल घेत गेल्यास थोडक्याच वेळांत आराम पडतो.

११. **सन्निपातादि** इतर ज्वरांत किंवा ज्या रोगांत **तीव्र-क्षय, फुप्फुसदाह** ( न्युमोनिया ) **खोकला,** इत्यादिकांत- ज्वर पुष्कळ असतो, अशा रोगांत कोयनेल देण्याचा प्रघात आहे. पण

त्यापासून त्या रोगास फारसा उपयोग होतो किंवा सन्निपात ज्वर लौकर निघतो असें जरी नाहीं, तरी ज्वराचा जोर अंशतः कमी होतो, असा पुष्कळांचा समज आहे. सन्निपात ज्वरांत जेव्हां उष्णता १०५ अंश किंवा अधिक जाते तेव्हां रात्रौ उष्णता थोडी कमी होऊं लागतांच २०।३० ग्रेन कोयनेल एकदम देण्याचा **जर्मनींत** फार प्रसार आहे. त्यानें एवढें होतें कीं, दुसऱ्या दिवशीं सकाळीं आदल्या सकाळपेक्षां ज्वर पुष्कळ कमी होतो किंवा अगदीं कमी राहतो. अशा स्थितींत कोयनेल वरच्या सारख्या दांडग्या प्रमाणानें दिल्यास कांहींएक अपाय होत नाहीं, असा तिकडील लोकांचा अनुभव आहे. मोठें प्रमाण दिल्यापासून थोडक्या तासांनीं ज्वर कमी कमी होऊं लागून सहा पासून बारा तासांचे आंत तो पुष्कळ कमी होतो किंवा अगदीं निघतो. भयंकर ज्वरांत ( १०५°-१०६°-१०७° पर्यंत उष्णता असलेल्या ) थंड पाण्याचें स्नान घालतात त्याच्या जोडीला कोयनेलाचा दांडग्या प्रमाणानें उपयोग करणें बरें. पण असा कोयनेलाचा उपयोग किंवा थंड पाण्याचे स्नानाचा उपचार वैद्यानें समक्षच केला पाहिजे. अर्थात् इतरांनीं तें करणें प्रशस्त नाहीं.

१२. **आमवातांत** कोयनेल मोठ्या प्रमाणानें १० पासून ३० ग्रेनपर्यंत देण्याचा प्रघात आहे. कित्येक कोयनेल आमवाताच्या आरंभीं देतात व त्यापासून रोग लौकर बरा होतो असें ह्मणतात. कित्येक आमवाताच्या अखेरीस ह्मणजे त्याचा जोर कमी होऊन उतार पडूं लागल्यावर कोयनेल देतात, त्यापासून आमवाताच्या रोग्यास मागून जी अशक्तता येते ती येत नाहीं असें ह्मणतात. तथापि एकंदरींत आमवातांत कोयनेलाचा फारसा उपयोग होत नाहीं असाच अनुभव आहे. निदान आमवातांत इंग्रजी औषध **सॅलिसिलेट आफ सोडा** ह्यापेक्षां कोयनेल कमी दर्जाचें आहे यांत संशय नाहीं. **फुप्फुसदाहमध्यें** ( न्युमोनियांत ) नुसतें कोयनेल दोन तीन ग्रेन प्रत्येक दोन तीन तासांनीं देण्याचा कित्येकांचा प्रचार आहे. **जीर्ण ज्वरांत** जो रात्रीं घाम फार येतो तो कोयनेलानें राहतो. ह्यासाठीं दिवसांतून दोन तीन

वेळां थोडथोड्या प्रमाणानें अथवा रात्रौ एकदांच मोठ्या प्रमाणानें कोयनेल द्यावें.

१२. गर्भारपणीं होणारी **वांती** कोयनेलानें राहते. कोयनेल गर्भारपणीं मुळींच देऊं नये, दिलें असतां गर्भपात होतो,असा आजपर्यंत पुष्कळांचा समज होता. तथापि आलीकडे तो समज जात चालला आहे व आमचाही अनुभव कोयनेल बाळंतपणीं देण्यास हरकत नाहीं असाच आहे. आम्हीं पुष्कळदां सहा सात महिन्यांच्या किंवा आठ नऊ महिन्यांच्या स्त्रियांना हिंवज्वरासाठीं कोयनेल देऊन पाहिलें आहे. व त्यांना त्यापासून कांहीं एक अपाय झालेला नाहीं. कोयनेल देतांना मनुष्याची शक्ति व प्रकृति पाहून द्यावें. सशक्त तरुण स्त्रियांना प्रत्येक खेपेस पांच ग्रेन प्रमाणें दिवसांतून तीनदां किंवा चारदांसुद्धां कोयनेल देऊन पाहिलें आहे. मात्र एकदमच मोठ्या प्रमाणानें कोयनेल गर्भार स्त्रियांना पचत नाहीं हें खरें. कोयनेल, विचारपूर्वक इतर गोष्टी ध्यानांत आणून, दिल्यास गर्भपात होण्याची भीति नाहीं. गर्भार स्त्रीला हिंवज्वर येऊन कोयनेलासारखें औषध जर लागलींच दिलें नाहीं तर ज्वर-लांबून ती क्षीण होऊन तिचा जीव सर्वतोपरीनें धोक्यांत पडतो, असा अनुभव पुष्कळदां येतो. ह्यासाठीं गर्भार स्त्रियांना हिंवज्वर आला असतांना 'त्यांना औषध देऊं नये, त्यांत कोयनेल देऊंच नये, कारण ह्यापासून गर्भपात होईल;' असा वेडा समज बाजूस ठेऊन कोयनेल देऊन ज्वर ताबडतोब बंद केल्याबांचून राहूं नये.

१३. वरील रोगाशिवाय कोयनेलचा पुढील रोगांत- **अग्निमांद्य, अशक्तता, अशुद्ध रक्तस्राव, फार पू होणें, स्त्रियांना विटाळ फार जातो सांव, स्वप्नावस्था, स्त्रियांना दुग्धस्राव फार होऊं लागल्यास आणि कंबर दुखूं लागल्यास.** पुष्कळ उपयोग करितात. सारांश कोयनेल ही औषधी अनेक रोग बरे करणारी आहे ह्यांत मुळींच शंका नाहीं. फार अशक्त किंवा वृद्ध मनुष्यास कोयनेलापासून धकवा येतो, यासाठीं त्यास तें थोड्या प्रमाणानें, अन्नाचे थोडें आगोदर अथवा कांहीं उत्तेजक औषधाबरोबर द्यावें ह्मणजे झालें.

१४. कोयनेल देण्याचें सर्वसाधारण प्रमाण– १ ग्रेन ( अर्ध गुंज ) पासून १० ग्रेन ( पांच गुंजा ) पर्यंत आहे. कोयनेल घेतल्यानें पित्त होतें; कारण तें फार कडू आहे, असा सर्वसाधारण ग्रह आमच्या लोकांचा झालेला आहे व त्यामुळें पुष्कळ लोक कोयनेल घेण्यास नाकारितात. कडू औषधानें पित्त होतें हा समजही आगोदर मुळीं चुकीचा आहे. खुद्द आपल्या वैद्यकांतच असें लिहिलेलें आहे कीं, " कषायतिक्तमधुराः पित्तं घ्नंति ( वाग्भट सूत्रस्थान अध्याय १ श्लोक १६ ) " ह्मणजे पित्त तुरट, कडू व गोड या रसानें कमी होतें. ज्वरावरही कडू औषधी द्यावी अशाबद्दल आपलेंच वैद्यक ह्मणतें कीं, " लंघनं स्वेदनं कालो यवागूस्तिक्तकोरसः " ( वाग्भट चि. अ. ९ श्लोक १ ). सारांश, दोन्ही बाजूंनीं पाहतां कोयनेल ज्वरांत देण्यास मुळींच हरकत नाहीं असें आपल्याही वैद्यकावरून स्पष्ट होतें. आपल्या वैद्यकांत ज्वरावर कांढेचिराइत, लिंब, कुटकी व गुळवेल इत्यादिकांचा काढा देण्यास सांगितलें आहे, तीं सर्व कोयनेला सारखीं कडूच आहेत. सारांश, 'कोयनेल पित्त करितें' हा जो ग्रह झालेला आहे तो कोणा-सही स्वभावतः कडू पदार्थ खाण्याचा कंटाळा असतो एवढ्यावरूनच झालेला असावा असें दिसतें. कोयनेलपासून कानांत आवाज होणें, बहिरटपणा येणें, इत्यादि जीं लक्षणें होतात तीं कोयनेलचा अंमल झाल्याचीं दर्शक होत. तीं होऊं लागतांच कोयनेल देण्याचें बंद करावें किंवा प्रमाण कमी कमी करूं लागावें ह्मणजे झालें. कोयनेलचा उपयोग आपल्या देशांत सांप्रत फार होऊं लागला आहे. ह्मणजे कोयनेल डाक्तर लोकच वापरतात असें नाहीं, पण प्रत्येक देशी वैद्य किंवा प्रत्येक कुटुंब कोयनेलावांचून आढळावयाचें नाहीं. सारांश, कोयनेलचा शिरकाव देशी वैद्यांचे घरांत किंवा बायकांपर्यंत झाला आहे. ह्यावरूनच कोयनेल मोठें उपयोगी औषध आहे, असें स्पष्ट होतें. सुदैवानें तें आतां इकडे तयारही होऊं लागलें आहे सबब तें आतां विलायती किंवा परदेशी नसून स्वदेशीच आहे असें समजलें पाहिजे.

# वैद्यशास्त्र आणि योगशास्त्र.

१. ह्या दोघांचा अगदीं निकट संबंध दिसतो. पहा, वैद्यशास्त्राचें पूर्ण ज्ञान होण्यास ज्याप्रमाणें शारीर चांगलें समजलें पाहिजे, त्याप्रमाणेंच योगाभ्यासांत चांगली प्रवीणता येण्यास शरीरशास्त्राची चांगली माहिती पाहिजे. ह्मणजे दोन्ही शास्त्रांचा शारीर हाच पाया होय. आपले वैद्यकाचे ग्रंथांतून- विशेषतः सुश्रुतामध्यें- शरीररचना बरीच दिली आहे, पण त्यापेक्षां बारकाईनें योगावरील ग्रंथांत ती दिली असल्याचें आढळून येतें. कांहीं कांहीं भागांचें- मेंदु, नाड्या, प्राणवायु, स्रोतसें व षट्चक्रें इत्यादिकांचें- जें वर्णन योगावरील ग्रंथांत आहे तें इतकें बारीक आहे कीं, पाश्चिमात्य शरीरशास्त्राचे साह्यानें सुद्धां आज त्याचा उलगडा होत नाहीं. सारांश वैद्यकाचें एकहा पाऊल शरीरशास्त्रावांचून जसें टाकितां येत नाहीं, तसेंच योगाचेंही एक पाऊल टाकितां येत नाहीं व ही गोष्ट आमचे पूर्वज चांगलें जाणून होते. वैद्यक जसें आरोग्य राखण्यास उपयोगीं पडतें तसाच किंबहुना अधिकही योगाभ्यास उपयोगीं पडतो ह्याबद्दल निदान आमच्या लोकांना तरी शंका येण्याचें कारण नाहीं. केव्हां एखादा योगी दृष्टीस पडल्यास ह्याबद्दलची साक्षही चांगली मिळते. त्याची कांति किती तेजःपुंज, बांधा किती सुरेख व त्याच्या चेहऱ्यावर कशी टवटवी असते याचें चित्र पुष्कळांचे डोळ्यांपुढें उभें असेलच. सारांश, योगाभ्यासी इतरांपेक्षां अधिक निरोगी असतो ह्यांत संशय नाहीं. ज्याप्रमाणें योगानें आरोग्य राहतें त्याप्रमाणेंच योगानें रोगही होत नाहीं. ह्मणजे प्रतिबंधक औषधाचेंही तें काम करितें, असें ह्मणण्यास मुळींच हरकत नाहीं. योगाभ्यासी मनुष्यास रोग सहसा होतच नाहीं. रसायण घेऊन ज्याप्रमाणें आयुष्यवृद्धि होते, त्याप्रमाणें योगाभ्यासानेंही आयुष्यवृद्धि होते. पण ती फारच होते असें ह्मणावें लागतें. रसायनानें मनुष्य कडेलोट शंभरवर्षें जगूं शकेल, पण योगाभ्यासानें योगी शेंकडोंच्याशेंकडों वर्षेंही जगूं शकेल असें अनुमान काढणें अतिशयोक्ति नाहीं, असें आपल्यांतील अनेक ऋषींच्या

दीर्घायुष्यावरून ह्मणतां येईल.

२. ज्याप्रमाणें वैद्यशास्त्राचे साहाय्यानें आरोग्य व दीर्घायुष्य हीं प्राप्त होतात त्याप्रमाणेंच योगाभ्यासानें होऊन शिवाय औषधाप्रमाणें योगाभ्यासानें रोगही बरे होतात असें ह्मणणें कित्येकांना प्रथम खरें वाटणार नाहीं. तथापि योगाभ्यासानें रोग निवारण्याचेंही उत्तम कार्य होतें ह्याबद्दल मुळींच शंका नाहीं आज. आह्मी योगाभ्यासाचा उचकीवर उपाय सांगत आहों यावरून आमचे ह्मणण्याची सत्यता अंशतः वाचकांचे ध्यानांत येणार आहे. योगाभ्यासाचा 'श्री ग' जो प्राणायाम व ज्याचा आमच्या सायंप्रातःसंध्येमध्यें समावेश केलेला आहे त्यानेंच उचकी नाहींशी होते, असा आमचा व आमच्या एका मित्राचा अनुभव आहे. उचकी लागली असतांना रोग्यास आसनमांडी घालून बसण्यास सांगावें. व त्यास प्राणायाम करून होईल तितक्या जोरानें व होईल तितका वेळ पण सावकास आंत श्वास घेण्यास सांगावें. नंतर तो श्वास आंत घेतल्याप्रमाणेंच सावकाश बाहेर सोडावा. ह्मणजे लागलींच उचकी राहते. ह्याप्रमाणें पुनः उचकी आल्यास करावें. निर्वाणीची उचकी शिवाय करून कोणत्याही कारणानें लागलेली उचकी प्राणायामानें वर सांगितल्याप्रमाणें राहते. निर्वाणीचीही उचकी प्राणायामानें कांहींवेळ तरी राहील, पण इतक्या पंथास लागलेल्या रोग्याच्यानें प्राणायामाची यथास्थित क्रिया घडणें अशक्य असते. ह्याप्रमाणें योगाभ्यासानें पुष्कळ रोग बरे होण्याचा संभव आहे.

३. सारांश, योगाभ्यास जसा ज्ञानाचें एक मोठें साधन आहे तसेंच तो आरोग्याचें, आयुष्यवृद्धीचें व रोग निवारण्याचें मोठें साधन आहे. असें असून व योगशास्त्र वैद्यशास्त्रापेक्षांही आपल्या पूर्वजांनीं अधिक पूर्णतेस आणून सोडलेलें असून त्याचा दिवसेंदिवस लोप होत जावा व हल्लीं तर तो समूळच नाहींसा व्हावा हें आपल्या देशाचें मोठेंच दुर्दैव होय. आमची अशी खात्री आहे कीं, योगाभ्यासानें क्षय, दमा, इत्यादि दुस्तर व्याधिसुद्धां बरे होतील. मान-

सिक व्याधि तर बरे झाल्यावांचून राहावयाचेच नाहींत. छांछू करणारे पुष्कळ ऐकतों, पण योगी क्वचितच दृष्टीस पडतो. वैद्यकावर अनेक उपयुक्त ग्रंथ असून त्यांच्यापैकीं एकाचासुद्धां ज्यांना गंध नाहीं असेच वैद्यबोवा आलीकडे फार झाले आहेत. नुसत्या वाडावर वैद्यक्रिया करण्याचा आलीकडे आलीकडे तर मोठा सपाटाच उडून राहिला आहे. सारांश, खरें शास्त्र व खरें ज्ञान हीं दिवसेंदिवस लोपत जाऊन त्यांच्या अभावीं अज्ञान व वेडेपणा ह्यांनीं सर्वत्र व्यापून टाकिलें आहे. असो; शेवटीं ही गोष्ट अगदीं खरी आहे कीं, वैद्य वैद्यक यथाशास्त्र पढून जर योगाभ्यासाचाही अभ्यास करील तर तो 'धन्वंतरी' या नांवास योग्य असाच निपजेल. योगाभ्यास ही एक अमृतवल्लीच आहे, पण ती तर आह्मी सांप्रत गमावून बसलों आहों, हें एक आमच्या निकृष्ट अवस्थेचें मूर्तिमंत द्योतक आहे, येवढी गोष्ट खरी आहे.

---

## पाश्चिमात्य वैद्यकाची व तींत धंदा करणाऱ्या लोकांची पूर्वींची, सांप्रतची व पुढील स्थिति.

( डा. हार्वे यांचें भाषण. )

( मा. अं. व. पुढें चालू. )

१६. ह्याप्रमाणें वैद्यकामध्यें करावयाच्या मुख्य मुख्य सुधारणा आपणांपुढें मांडून मी आतां आरोग्यरक्षणासाठीं काय काय केलें पाहिजे तें सांगतों. आरोग्यरक्षणाचे कार्या मोठमोठ्या शहरांतून यत्न चालला असून तोही अद्यापि बाल्यावस्थेंतच आहे. लहान लहान शहरांतून ह्यासंबंधी कांहींच केलें जात नाहीं, असें म्हटलें तरी चालेल; व खेड्यापाड्यांतून तर ह्या गोष्टीचा गंधही नाहीं. गांवचे घाण पाण्याचा नीट निकाल काढून देणें, गांवांत स्वच्छता राखणें, पिण्याकरितां चांगल्या पाण्याचा पुरवठा करणें, व घरांतून हवा खेळती ठेवणें, इत्यादि गोष्टींकडे लोकांचें लक्ष अद्यापि पोंहोंचत नाहीं. मुलांना देवी बहुतेक जुलमानेंच काढाव्या लागतात. लोकांना जर

कांहीं सुधारणा सुचविल्या तर त्याकडे कोणी लक्ष देत नाहींत. सुधारणा करण्याची कोणाला इच्छा नाहीं, व त्या करण्यास पैसाही नाहीं. तेव्हां, ह्या आरोग्यरक्षणाच्या प्रश्नाचा उलगडा होण्याची आशा मुळींच नाहीं, असें ह्मटलें पाहिजे. परंतु उलगडा होणें तर फार जरूर आहे. पटकीच्या वाख्याचें उद्भवस्थान हिंदुस्थान देश आहे असें मानून युरोपांतील राष्ट्रें, हिंदुस्थानचे लोकांनीं तो रोग मुळांतच नाहींसा करून टाकण्याची तजवीज केली पाहिजे, असें ह्मणत आहेत. नायटिंगेल बाईसारख्या आरोग्यशास्त्रवेत्यांनीं हें कसें करावें ह्याविषयीं उपाय सुचविले आहेत. हिंदुस्थानामध्येंही, सरकार ह्या कामीं दुर्लक्ष करितें, अशी ओरड सुरू आहे; व जसें कांहीं सरकार निजलेंच आहे असें समजून लोक त्याला जागें करीत आहेत. मी आपणांला असें सांगतों कीं, आतांच व्हाइसराय साहेबांनीं ह्मणून दाखविल्याप्रमाणें हिंदुस्थान सरकार आपल्या हातून जेवढें होईल तेवढें करण्यास अगदीं खुषी व तयार आहे. परंतु ज्याप्रमाणें, पैशाच्या संबंधानें, तसेंच लोकांच्या अज्ञानामुळें,गैर समजुतीमुळें व हट्टी वर्तनामुळें ह्याकामीं फार अडचणी येतील, असें विचारी लोकांस वाटतें, त्याच प्रमाणें सरकारालाही वाटत आहे. बरें, कायदे करून लोकांना स्वच्छतेनें वागावयास लावूं ह्मटलें, तर तसें करितां येईल काय? येणार नाहीं. कायद्यानें लोकांकडून स्वच्छता ठेविली जाण्यास, त्यांच्या समजुती सुधारून, ह्या कामीं कायद्याची जरूर आहे असें त्यांना वाटूं लागलें पाहिजे. ज्या लोकांना स्वच्छतेपासून जास्त सुख कसें होतें हें समजतें, ते लोक स्वच्छता राखूं लागतात; मग त्यांचा कित्ता त्यांचे शेजारी उचलतात. स्वच्छता राखण्यासाठीं एक गोष्ट झाली कीं तिच्या मागून दुसरी होते, याप्रमाणें सुधारणा जास्त जास्त वाढत जाते, ज्ञानाचा प्रसार अधिक अधिक होतो, व एखादी मोठी सुधारणा करण्यास लोकमत तेव्हांच मिळतें. इंग्लंडमध्यें, जेव्हां तेथील लोकमत अशाच तऱ्हेनें बनलें, तेव्हांच आरोग्यरक्षणाच्या सर्व सुधारणा तेथें करितां आल्या. लोकमत अनुकूळ करून घेण्याचें काम तेथें सुद्धां

फार कठिन गेलें. हिंदुस्थानामध्यें तर तें अतिशयच कठिन आहे. कारण, येथील लोकांची जुन्या चाली रीतींवर फार फकि; त्यांच्यावर त्यांच्या जातीचें, त्यांच्या संवयींचें, कुलाचारांचें, व वाडवडिलांच्या वर्तनाचें फार प्राबल्य; ह्यामुळें नवी सांगितलेली गोष्ट त्यांना रुचतच नाहीं. शिवाय, देश अगदीं द्रव्यहीन असल्यामुळें, नवीन कर बसवून जर एखादें काम करूं ह्मटलें तर त्यास लोकांची संमति कशी मिळणार? देशांत आरोग्य कितपत आहे हें दाखविण्यासाठीं जनन मरणाचे आंकडे सरकार प्रसिद्ध करितें, परंतु ते समजण्यापुरतें तरी ज्ञान लोकांना असलें पाहिजे. आजार आणि लवकर मृत्यु ह्या दोहोंच्या योगानें फार सौख्यहानि होते, एवढी गोष्ट जर एकदां लोकांचे मनांत ठसली, तर ते, ह्या दोहोंचा प्रतिकार करण्यासाठीं उपाय योजण्यास लागेल तो खर्च देण्यास तयार होतील. हल्लीं लोकांचे डोळ्यापुढें खर्चाची बाब मात्र तेव्हांच उभी राहते, परंतु तो केल्यानें होणाऱ्या फायद्याची खात्री पोंहोचत नाहीं. लोकांच्या समजुती विलक्षण असल्यामुळें सरकाराला त्यांच्यांशीं मोठें जपून वागावें लागतें. सरकारचे कामदार मंडळीला लोकांचीं सर्व दुःखें माहीत आहेत, व तीं नाहींशीं करण्यास जेवढे उपाय अमलांत आणतां येतील तेवढे आणण्यास ती खुषीही आहे. परंतु मोठा प्रश्न ह्याच येतो कीं, लोकांकडून होणाऱ्या अडचणी जरी एकीकडे ठेविल्या, व सुधारणांचें महत्व जाणण्याइतके लोक शहाणे झाले आहेत, असें जरी मानलें, तरी सुधारणा करण्यास लागणारा पैसा कोठून आणावा? आरोग्य राखण्याविषयीं इंग्लंडमध्यें चाललेल्या सुधारणांबद्दल त्या देशाची येथील लोक नेहमीं फार स्तुति करितात, व ती योग्यच आहे. पण ह्या गोष्टी लक्षांत आणल्या पाहिजेत कीं, हिंदुस्थानाचे मानानें इंग्लंड देश अति लहान असून फार सधन आहे. हिंदुस्थान देश अति दरिद्री असून फारच विस्तृत व दाट वस्तीचा आहे. ग्रेटब्रिटन व आयर्लंड ह्या दोन्ही देशांत मिळून एकंदर वस्ती जवळ जवळ ३॥। कोटि आहे. आणि हिंदुस्थानामध्यें फक्त

ब्रिटिश अमलाखालीं २२। कोटींवर प्रजा आहे. ह्याशिवाय संस्थानांची ६।।। कोटि लोकसंख्या आहे ती निराळीच. इंग्लंडचें उत्पन्न ( तेथील स्थानिक राजकीय संस्थांचें उत्पन्न खेरीज करून ) ९,१०,००,००० पौंड आहे, व हिंदुस्थानसरकारचें उत्पन्न हल्लींच्या उतरलेल्या रुपयाच्या भावानें, ३,६०,००,००० पौंड ( ह्मणजे ६४,००,००,००० रुपये ) आहे. इंग्लंडमध्यें दरमाणशीं २ पौंड ८ शिलिंग उत्पन्न सरकाराला होतें व हिंदुस्थानांत अवघें ३ शिलिंग ३ पेन्स होतें. यावरून आपल्या लक्षांत येईल कीं, येथल्यापेक्षां सरकाराला दरमाणशीं १४ पटीनें जास्त उत्पन्न होतें. आरोग्यरक्षणासंबंधीं कामें इंग्लंडपेक्षां येथें जास्त खर्चाचीं आहेत. कारण, येथें मजुरी जरी स्वस्त आहे आणि कामें सुलभ रीतीनें करितां येतात, तरी त्या कामांवर नेमावयाच्या मुख्य माहितगार लोकांसंबंधीं खर्च येथें फार येतो, व कामांसाठीं लागणारें बहुतेक सामान परदेशांहून आणावें लागतें. ( पु. चा. )

## स्फुटलेख.

**कोयनेल स्वस्त मिळण्याची सोय.**— कोयनेल सरकार आलीकडे इकडे तयार करूं लागले आहे. त्याचाही खप व्हावा व गोरगरिबाचीही थोडक्यांत हिंवज्वरापासून बचाव व्हावा एतदर्थ सरकारानें पोस्ट आफिसामार्फत बंगाल वगैरे ठिकाणीं कोयनेल विक्रीची सुरवात केली. व ती दोहीं बाजूंनेंहि फायदेशीर वाटल्यावरून मुंबई इलाख्यांतही सांप्रत सुरू केली आहे. आतां प्रत्येक पोस्ट आफिसांत व सरकारी दवाखान्यांत एक पैशास ५ ग्रेन ( २।। गुंजा ) कोयनेलच्या पुड्या विकत मिळतील. सारांश, हिंवज्वर पैशा दोन पैशांत बरा होण्यासही श्रीमंतास व गोरगरिबास सारखी सोय झाली आहे. अशासमयीं कोयनेलचे साद्यंत गुणदोष सर्वत्रास कळल्यास पुष्कळ फायदा होणार आहे असें जाणून आजच्या अंकांत कोयनेलसंबंधीं साग्र माहिती दिली आहे ती वाचकांनीं लक्षपूर्वक वाचावी.

## कृष्णशास्त्री चिपळूणकर वैद्य मु॰ आंजर्ले ता॰ दापोली जि॰ रत्नागिरी, यांचीं जगत्प्रसिद्ध, सर्वोपयोगी, निर्दोष व रामबाण औषधें.

या जाहिरातीचे खालीं "विशेष सूचना" केली आहे ती वाचकांच्या अवश्य लक्ष्यांत असावी.

### १. वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साह- बुद्धि कांतिवर्धक व धातुपौष्टिक, सुवर्णमाक्षिक- मौक्तिक- कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका

१. शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें त्यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्व भागीं व त्यांच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, कोणत्याही कारणांनीं आलेली अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, उन्हाळे, छातींतील रोग, मस्तकशूळ, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूळव्याधि, भगंदर, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूळ, कटिवात, वातरोग, निद्रानाश, चक्कर, कफातिरेक, उपदंशसंबंधीं मुरलेले विकार, सूतिकारोग, व्रण, हात, पाय, मूत्रमार्ग व शरीर यांचा दाह, ठणका, ग्लानि, अरुचि, मूत्र इसरी व चित्तभ्रम इ॰ अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले, नवीन किंवा जुनाट असले तरी अगदीं खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचे त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति व बुद्धि हीं वाढतात. ज्यांस फिरण्याचे, अभ्यास करण्याचे लिहिण्याचे व शिकविण्याचे श्रम फार पडतात त्या सर्वांच्या अंगीं यांनीं

अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो व सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें. कोष्ठशुद्धि होते. कोष्ठांतील अनियमित व्यापारापासून होणारे दुष्ट परिणाम टळतात. या अप्रतिम गुटिका अत्यंत उपयुक्त शोधानें केल्या असून यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें आहेत, सबब जास्त वर्णन येथें करीत नाहीं. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस या अत्यंत उपयोगी आहेत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषध नाहींच असें स्पष्ट म्हणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात. यामुळें यांचा अतिशय खप सुरू आहे. हल्लीं या गोळयांत अंतर्वेदी, नेपाळ, काश्मीर इ० देशांतील अत्यंत शुद्ध, ताजे, महत्वाचे व मौल्यवान् असे अनेक पदार्थ आणखी घालून त्यांची विशेष सुधारणा केली आहे आणि लोकाग्रहावरून केवळ परोपकारार्थ ह्मणून गोळयांचा दर फारच स्वस्ता केला आहे. गोळया रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळया घेणारांस बंगीचा सर्व ट. खर्च माफ आहे. अनुपान ख० सोबत देऊं. एकदम १६ गोळयांस १ रु., ३६ गो० २ रु, ८० गो० ४ रु. व १३० गो० ६ रु.

## ३. थंडगार नेत्रांजन.

हें परम गुणकारक अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळयांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंडू, फूट, चिकटा, टणका, व लाली, इ. अनेक विकार तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यांस कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतानें कोणतीही इजा बिलकुल न होतां बरे होतात.

दृष्टि तीव्र व थंडगार राहते. शिवाय जागरण, उन्हांत फिरणें

अग्नीचा शेक, उपदंशविकार, अतिवाचन, अतिव्यायाम, अतिमैथुन, अतिमद्यपान, अत्युष्ण व विदाही पदार्थ भक्षण, इ० कारणांनीं ज्यांचे डोळे बिघडतात त्यांस याचा फारच मोठा उपयोग आहे. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार बिलकुल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगीं आहे. २ तो० ड० १॥ रु०

## ४. कर्णस्रावनाशक अप्रतिम तैल.

हें उत्तम तेल कानांत घातल्यानें कानांतून पू वाहणें, तत्संबंधीं ठणका, कंड, दाह, रक्तस्राव इ. विकार तत्काळ बरे होतात. कानांतील कोणत्याही प्रकारचे साधारण व्रण तर तत्काळच, परंतु कानाचा समूळ नाश करणारे जुनाट किंवा हाडीं खिळून बसलेले कितीही वयाचे मनुष्याचे व कोणत्याही कारणानें प्राप्त झालेले अनेक प्रकारचे असाध्य व्रण कोणतीही इजा किंवा आग वगैरे बिलकुल न होतां अगदीं खात्रीनें बरे होतात. बाटलीस रु० १. शिवाय प्या० ख० दोन आणे. रोखीनें किंवा व्हॉ. पे. पार्सलनें खालील पत्त्यावर मागविल्यास पाठवूं. अनुपानखर्डा बाटलीसोबत.

५. **पर्म्यावर अपूर्व मिश्रण.**—कोणत्याही प्रकारचा नवीन किंवा जुनाट पर्मा- तत्संबंधी दाह, तिडीक, मूत्राची विवर्णता, संकोच किंवा मूत्रातिरेक इ. विकारांसह या मिश्रणापासून इजा बिलकुल न होतां व पथ्यसेवनाची खटपट नसतां ताबडतोब बरा होतो. पर्म्यावर इतकें प्रतिज्ञेचें औषध दुसरें नाहींच. बा. १ रु.

६. **दंतरक्षक पूड.**— ही चोळिल्यानें दंतसंबंधी सर्व विकार हिरड्यांचा रक्तस्राव व व्रण, पू, कीड इ. फारच त्वरित व नाजूक रीतीनें बरे होऊन दात स्वच्छ व फार मजबूत होतात. ड. ६ आणे.

७. गजकर्ण, नायटे, खरूज इ. विकार ३ दिवसांत बरे होतात. ड. ६ आणे.

८. विंचवाचें विष हें औषध लावतांच उतरतें. ड. ८ आणे. इतकें औषध ४० मनुष्यांस पुरतें.

वरील औषधें अत्यंत खात्रीचीं आहेत. त्यांणीं हजारों लोकांस गुण आला व नित्य येत आहे. अनुभवानंतर पक्की खात्री होईलच. याशिवाय आमच्या येथें कस्तूरीच्या उत्तम कातगोळ्या, तमाखूच्या अर्काच्या कस्तुरीमिश्र गोळ्या, उत्तम सुगंधी अत्तरें व ग्रंथोक्त रसायनें, धातूंचीं भस्में, पाक, तैलें, चूर्णें, गोळ्या, घृतें, आसवें, द्राव, क्षार हेमगर्भादि रसायनें इ. औषधें माफक किमतीस मिळतील. पाहण्यासाठीं सर्व सामानाचा मोठा कॅटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. अनुपान पत्रक औषधासोबत पाठवूं पत्ता सुवाच्य.कोणीं प्रकृतिमान कळविल्यास रोगाचें निदान व योग्य चिकित्सा कळवूं. औषधें रोखीनें किंवा व्ही. पी.नें विकत मिळतील. टपालखर्च वेगळा पडेल.गरीब लोकांस स्वस्त दरानें औषधें देऊं. जाहिरातीच्या खालील किंवा वरील पत्यावर मिळतील. या औषधांत अपायकारक पदार्थ बिलकुल नसून त्यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटा मिळविल्या आहेत व नित्य मिळत आहेत.

**विशेष सूचनाः**— हालीकडे वर्तमानपत्रांतून आंजर्लें व नजीकच्या मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या नवीन बऱ्याच जाहिराती सुरू झाल्या आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींच्या खालीं किंवा वर ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या ग्राहकांस भासण्याचा संभव आहे,यामुळें कदाचित् ग्राहकांचा घोंटाळा होईल. तरी अशा लोकांशीं व त्यांच्या जाहिरातींशीं आमचा कोणत्याही प्रकारें अगदीं संबंध नाहीं हें ग्राहकांनीं अवश्य लक्षांत ठेऊन,आमचीं औषधें मागणें तीं "**कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य मु० आंजर्लें, ता० दापोली जि० रत्नागिरी**" या अगदीं बिनचूक सहीवर व पत्यावर मागवावीत.

**कृष्णशास्त्री बिवलकर.**

**पत्ता**— मु० आंजर्लें, ता० दापोली, जिल्हा रत्नागिरी.

प्रतिक्षोभ, बालरोग- दांत येणें, बालग्रह वगैरे, उपयुक्त औषधि संग्रह- बेलफळाचे उपयोग वगैरे, मेदोवृद्धि, रोग व रोगाभाव, वगैरे पुष्कळ विषयांचा गेल्या वर्षांत यथावकाश समावेश झाला असून दुसरेही अनेक विषय येऊन गेले आहेत. लेखकाच्या घरगुती अडचणीमुळें शरीररचनेचा विषय थोडा आला आहे; तथापि जो आला आहे त्यामध्यें पृष्ठवंशरज्जु, नेत्रेंद्रिय, घ्राणेंद्रिय, मस्तिष्क ( मेंदु ), इत्यादि महत्वाच्या अवयवांचा विचार अगदीं खुलासेवार झाला आहे. तोच क्रम पुढें चालू राहून शरीराचा राहिलेला भाग लौकरच संपविण्याचा डा. गडबोले यांचा मनोदय आहे. नुसती पचनक्रिया देऊन इंद्रियविज्ञान- शास्त्राचा विषय आम्हीं जो तसाच सोडला आहे त्याचें कारण हेंच कीं, शरीर जें त्याचा पाया तो पूर्ण झाल्यावर मग तो विषय लिहिला असतांना वाचकांना समजण्यास अधिक सोपें जाईल. आतां हळूं हळूं तो विषयही वाचकांना वाचण्यास मिळेल अशी उमेद आहे. सारांश, मूळचें धोरण कायम राहून अनेक चांगल्या चांगल्या विषयांचा समावेश चालू सालींही होईल, एवढेंच प्रस्तुतकालीं सांगणें पुरें आहे.

३. ही गोष्ट पुस्तकाच्या अंतःस्वरूपाची झाली. बाह्य स्वरूपांतही पूर्वीपेक्षां ह्मणजे निदान प्रथम वर्षापेक्षां तरी थोडीशी सुधारणा आहे. तथापि त्यांत जशी असावी तशी सुधारणा झालेली नाहीं हो गोष्ट अगदीं स्पष्ट आहे, असें, पुस्तक हातांत पडतांच कोणीही ह्मणेल. तथापि सोलापुरच्या मानानें आहे त्यांत व्यवस्था बरीच आहे असेंच ह्मणावें लागतें. चालू सालापासून काळजीपूर्वक व सुबक काम काढण्याचें छापखानेवाल्यांनीं आश्वासन दिलें. तें पूर्णपणें अमलांत कितपत येण्याचा संभव आहे याची साक्ष हाच अंक देत आहे.

हें शास्त्रीय विषयाचें पुस्तक कादंबऱ्यासारखें तात्काळ तल्लीन करणारें नसल्यामुळें त्याला असावा तसा आश्रय जरी नाहीं, तथापि तत्संबधी विशेष तक्रारीसही कारण नाहीं. कारण, पुस्तकासंबंधी व्य- वस्था अगदीं काटकसरीनें ठेवली जात असल्यामुळें कां होईना, तें आपल्या पायावर उभें आहे, ही गोष्टही कांहीं लहान नाहीं. कर्त्यानें निर्वाहासाठीं मुळींच या कामास हात घातलेला नाहीं. तेव्हां अर्थात् तो बोजाही पुस्तकावर नाहीं. डा. गडबोले, डा. भागवत, इत्यादि कांहीं

मंडळीही निरपेक्ष बुद्धीनेंच यथाशक्ति मदत करीत आहे व त्याबद्दल कर्ता त्यांचा फार ऋणी आहे. कर्ता त्याचप्रमाणें आपल्या आश्रयदात्यांचाही फार आभारी आहे. त्याची त्यांस भिषग्विलासाचा प्रसार होईल तितका करण्याविषयीं विनंति आहे. ह्मणजे जितकें हें पुस्तक अधिक लोकांच्या वाचण्यांत येईल तितकें त्याच्या श्रमाचें सार्थक झालें असें तो समजेल. शेवटीं जगन्नियंत्या परमेश्वरकृपेनें सर्व सुखांत श्रेष्ठ सुख जें **आरोग्य** तें सर्वांना मिळून चालू वर्ष आनंदांत जाऊन आपल्या वैद्यशास्त्राच्या उन्नतीस अंशतः तरी कारणीभूत होईल अशी दृढ आशा करून आपल्या हातीं घेतलेल्या कर्तव्यास तो आरंभ करीत आहे.

---

## सादर स्वीकार व अभिप्राय.

आर्यभिषक्कर्ते रा. रा. शंकरदाजी शास्त्री पदे यांनीं आह्मांकडे **हल्लींचा वीर्यनाश व त्यांवर उपाय** या विषयावर लिहिलेलें पुस्तक अभिप्रायाकरितां पाठविलें आहे, तें आह्मीं समग्र वाचून पाहिलें. पुस्तकांतील विषयासंबंधानें आपल्या वैद्यशास्त्रांतील अनेक आधार देऊन अव्यवस्थित रीतीनें वीर्यनाश करणें हें शरीराच्या क्षीणतेस किंबहुना अकालीं नाशास कारण किती आहे हें त्यांनीं स्पष्ट सिद्ध करून दाखविलें आहे. त्याचप्रमाणें ओज ह्मणजे काय व त्याचें संरक्षण करणें शरीरास किती श्रेयस्कर आहे याविषयींही विचार चांगला केला आहे. अव्यवस्थितपणें वीर्यनाश केल्यामुळें क्षीण झालेल्या लोकांनीं आपल्या प्रकृतीची सुधारणा कोणत्या उपायांनीं करून घ्यावी याविषयीं जें त्यांत दिग्दर्शन केलें आहे तेंही वाचण्याजोगें आहे. हल्लीं वर्तमानपत्रांतून जाहिरातींद्वारा झळकत असलेल्या ' कामोत्तेजक, आणि वीर्यस्तंभक ' गोळ्यांस भुलून व त्यांचा दुरुपयोग करून लोक विनाकारण आपल्या प्रकृतीचें व द्रव्याचें नुकसान कसें करून घेत आहेत याचें विवरणही यथार्थ केलें आहे. एकंदरींत या पुस्तकांतील विषय वारंवार वाचून त्यांत सांगितलेल्या उपदेशाप्रमाणें वर्तन करण्याविषयीं प्रयत्न केल्यास आपणांस व आपल्या संततीस व आपल्या देशास ऊर्जित दशा लौकर प्राप्त होईल. अर्थात् हें पुस्तक संग्रहणीय आहे असा आमचा अभिप्राय आहे.

डा॰ रानडे यांचा दवाखाना सोलापूर.

# भिषग्विलास.

BHISHAGVILASA.

वैद्यकसंबंधी अनेक विषयांचें सुबोध भाषेंत मासिक पुस्तक.

A Monthly Magazine in Marathi to popularise Medicine.

आयुःकामयमानेन धर्मार्थसुखसाधनं ॥
आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः ॥ १ ॥

धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चतुर्विध पुरुषार्थांस साधनीभूत असें दीर्घ आयुष्य ज्यांस पाहिजे असेल त्यांनीं वैद्यशास्त्रप्रतिपादित गोष्टी जाणण्याविषयीं व त्याप्रमाणें वागण्याविषयीं फार उत्सुकतेनें झटावें ( सार्थ वाग्भट. )

पुस्तक ४. मे १८९९ अंक २

विषयानुक्रम. पान.


| | |
|---|---|
| शरीररचना .... .... .... .... .... | २१ |
| बालरोगचिकित्सा .... .... .... .... | २२ |
| पथ्यापथ्यविचार .... .... .... .... .... | २६ |
| अशास्त्रसमजुती .... .... .... .... .... | ३० |
| पाश्चिमात्य वैद्यकाची व तींत धंदा करणाऱ्या लोकांची पूर्वीची, सांप्रतची व पुढील स्थिति | ३३ |
| स्फुट लेख .... .... .... .... | ३८ |


सोलापूर

आनंदवृत्त छापखान्यांत छापिला.

वर्षाची आगाऊ वर्गणी ट. ह. सह ३ रु.

# THE ORDER BOOK

### OF

# THE HOUSE OF COMMONS.

## 1895

## *NOTICE OF MOTION.*

Mr. Naoroji.— Civil Service ( India ) ( Simultaneous Open Competitive Examinations in England and India ).— That, in the opinion of this House, in order to preserve and maintain the stability of the British Power, the loyalty, confidence contentment, and gratitude of the people of British India, to improve their material and moral condition, and to increase largely commercial and industrial benefits to the people of the United Kingdom, it is expedient that the solemn pledges of the Act of 1833, of the Proclamation of 1858 after the Mutiny, of the Proclamation of 1877 on the assumption of the Imperial Title at the great Delhi Durbar, and of the further confirmation of these proclamations on the Jubilee by Her Most Gracious Majesty the Queen and Empress of India, should be fulfilled by, among other reforms, giving effect to the Resolution adopted by this House on 3rd June, 1893, viz.: That all open Competitive Examinations heretofore held in England alone for appointments to the Civil Services of India shall henceforth be held simultaneously both in India and England, such Examinations in both countries being indentical in their nature, and all who compete being finally classified in one list acording to merit.

---

## वर्गणीची पोंच.

**दुसरे व तिसरे वर्षाबद्दल.**

६ रा. सा. अनंत रघुनाथ मोडक.

६ रा. सा. सखाराम रामचंद्र किर्लोसकर.

६ रा. रा. हरी अमृत चाबुकस्वार.

६ रा. ब. श्रीराम भिकाजी जठार.

**तिसरे व चवथ्या वर्षाबद्दल.**

६ डा. जमनादास प्रेमचंद.

६ रा. सा. नारायण विनायक साठे.

**पाहिले, दुसरे व तिसरे वर्षाबद्दल.**

९ रा. रा. भाऊराव जिहुरकर.

९ रा. सा. केशव जनार्दन पाटणकर.

**तिसरे वर्षाबद्दल.**

३ रा. रा. गोविंद विष्णु रानडे.

३ रा. रा. हरीभाऊ मेहेंदळे.

३ रा. रा. केशवराव शेटफळकर.

# भिषग्विलास.

वर्ष ४ थें  अंक २  मे  १८९९.

## शरीररचना.

( लेखक— डा. कृष्णराव गडबोले. )

( मा. अं व. पुढें चालू. )

### स्पर्शेंद्रिय ( आर्गन ऑफ टच. )

१. शीत, उष्ण, मृदु, कठिन, इत्यादिक गुणांचें ज्ञान मनुष्यास ज्या इंद्रियाच्या द्वारानें होतें त्यास स्पर्शेंद्रिय असें ह्मणतात. शरीरास आच्छादन करणारी जी त्वचा ती या इंद्रियाचें स्थान आहे, ह्मणून यास त्वगिंद्रिय अशीही दुसरी संज्ञा आहे. त्वचेच्या अंगीं स्पर्शाचें ज्ञान करून देण्याची शक्ति आहे व याखेरीज शरीरांत असणाऱ्या कोमल धातूंस थंडी, वारा, उष्णता इत्यादिकांपासून उपद्रव होऊं न देतां पांघरुणाऐवजींही ती उपयोगी पडते. ही शरीराच्या बाहेरील अंगास जशी असते तशीच आंतील अंगासही असते. आंतील त्वचेस श्लेष्मल-त्वचा ( म्यूकसमेंब्रेन ) असें ह्मणतात. आतां या दोहों प्रकारच्या त्व-चेंची अंतररचना कशी असते याचा विचार करूं.

२. बाहेरील त्वचेचे सात पदर असतात असें प्राचीन ग्रंथकारांचें मत आहे, व त्या सात पदरांचीं नांवें निरनिराळीं आहेत तीं पुढें लि-हिल्याप्रमाणें आहेत. पहिल्या पदराचें नांव अवभासिनी, दुसऱ्याचें नांव लोहिता, तिसऱ्याचें श्वेता, चौथ्याचें ताम्रा, पांचव्याचें वेदिनी, सहाव्याचें रोहिणी, व सातव्याचें मांसधरा. या सात पदरांपैकीं वरील पदरांत स्पर्शज्ञानाची शक्ति विशेष असते, याचें कारण ज्ञानतंतूच्या अनेक सूक्ष्म शाखा यांत पसरलेल्या असतात. सर्व त्वचेपेक्षां हाताच्या बोटाच्या अग्रांच्या त्वचेस ही विशेष शक्ति असते आणि त्या-पेक्षांही जास्त शक्ति जिभेच्या त्वचेंत असते. याचा अनुभव मनुष्यास अनेक वेळां येतो. जेवतेवेळीं एखाद्या घासांतून चुकून केंस तोंडांत जातो, पण जिभेवरील त्वचा इतकी हुषार आहे कीं, ती तेव्हांच तो

केंस हुडकून काढते. पण इतकें तीव्र ज्ञान हाताच्या त्वचेस नाहीं. ही जी अति सूक्ष्म त्वचा हिला अवभासिनी ( एपिडार्मिस ) असें ह्मणतात. आतां या सात पदरांपैकीं वरील दोन पदरांच्या खालीं केंसाचें उत्पत्तिस्थान असतें आणि प्रत्येक केंसास त्याच्या मुळाशीं एक सूक्ष्म पिंड असतो, तोच केंसाचा गड्डा होय. अशा प्रकारचे पिंड त्वचेवर जितके केंस आहेत तितके असतात. केंसाच्या गड्ड्याजवळच दुसरा एक प्रकारचा पिंड असतो त्यापासून तेलासारखा स्निग्ध पदार्थ उत्पन्न होत असतो. त्याच्या योगानें केंसास व त्वचेस तुळतुळीतपणा राहतो. याखेरीज घाम उत्पन्न करणाऱ्या सूक्ष्मपिंडांची रचना याच स्थानीं केलेली असते. त्या पिंडांस घर्मपिंड ( स्वेटग्लांडस ) असें ह्मणतात. या घर्मपिंडांपासून सूक्ष्म नलिका त्वचेंतून वर येऊन सुटलेली असते त्या नलिकेच्या द्वारांतून घाम बाहेर येतो, व तेणेंकरून त्वचेची उष्णता बाहेरील उष्ण हवेमुळें वाढली असेल तर ती कमी होऊन बेतावर येते.

**श्लेष्मल त्वचा.**– श्लेष्मल त्वचा ही बाहेरील त्वचेपेक्षां नाजूक असून गुळगुळीत व तांबूस असते. हिच्या अंतररचनेंत कफ उत्पन्न करणारे सूक्ष्म पिंड असतात. तोंडांत, नाकांत, डोळ्यांत, फुप्फुसांत व कोष्ठांत वगैरे आंतल्या बाजूस याच त्वचेचें आस्तरण असतें. कफ उत्पन्न करण्याचा या त्वचेच्या अंगीं धर्म आहे, यामुळें वरें सांगितलेल्या सर्व भागांत कफाचा थोडासा तरी अंश नेहमीं असतोच. थंड पाणी फार प्याल्यानें अगर थंड हवेचा संबंध फार घडल्यामुळें पडसें येतें त्या वेळीं याच त्वचेस विकार फार होतो व त्यामुळें कफाचा स्राव बाहेर काढून टाकण्याविषयीं शरीर प्रयत्न करूं लागतें तेव्हां खोकला येतो, व शिंकाही येतात. ( पुढें चालू. )

## बालरोगचिकित्सा.

**लेखक**– डा. विष्णुपंत भागवत, एल. एम. आणि एस.

१. बालरोगाची परीक्षा करितांना प्रथम रोग्याची ( बाळाची )

नाडीपरीक्षा वगैरे करण्याचे भरीस न पडतां इतर माहिती प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं मिळवावी. चेहरा वगैरेंची स्थिति पूर्ण लक्षांत आणल्यानंतर छाती, पोट, नाडी व इतर इंद्रियें तपासावीं आणि छातींतील ध्वनि कानानें ऐकावेत ह्मणजे रोगाची परीक्षा सहसा चुकावयाची नाहीं. कोणताही विकार मुलांना झाला असतांना तीं स्वभावतःच मोठी घालमेल करितात, अस्वस्थ होतात, त्रासतात व दुसऱ्यास हात सुद्धां लावूं देत नाहींत, यामुळें रोगाची परीक्षा करण्यास मोठी पंचाईत पडते. यासाठीं लेंकरूं झोंपीं गेलें असतांना त्यास पाहण्याची संधि मिळाल्यास चांगलें. कारण, त्यावेळीं ह्याची नाडीपरीक्षा स्वस्थपणें करितां येते, त्याचे श्वासोच्छ्वास जलद किंवा मंद चालले आहेत हेंही चांगलें समजतें, त्याची निजण्याची रीत, अवयवांची स्थिति व त्वचेची स्थिति इत्यादि गोष्टीही नीटपणें पाहतां येतात.

२. असो, रोगग्रस्त मूल झोंपेंत असतांना खालील गोष्टींकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे- पहिली गोष्ट, त्याची संस्थिति स्वाभाविक आहे किंवा निराळी आहे; दुसरी, त्याच्या चेहऱ्याचा वर्ण लाल आहे किंवा निस्तेज आहे आणि ओंठ पांढरे किंवा काळे निळे आहेत; तिसरी, त्वचेची स्थिति, त्वचा कोरडी किंवा ओलसर आहे आणि तो ओलसरपणा सर्व अंगभर किंवा डोकें व कपाळावरच आहे; चवथी, मुद्रा स्वाभाविक किंवा दुःखदर्शक आहे, त्याच प्रमाणें मूल कण्हत आहे किंवा बिचकत आहे अथवा दांत चावीत आहे आणि हात पाय हिसकवीत आहे, वगैरे गोष्टीही लक्षपूर्वक पाहिल्या पाहिजेत; पांचवी, नाकपुड्या जोरानें हलत आहेत किंवा नाहींत; सहावी, पापण्या अर्धवट किंवा सगळ्या अथवा अगदीं घट्ट झांकल्या आहेत व त्याचप्रमाणें डोळे ताठरलेले आहेत किंवा नाहीं, डोळ्यांतील बाहुल्या आकुंचित किंवा विकासित आहेत व दृष्टी तिरवी केली आहे किंवा काय; सातवी, श्वासोच्छ्वास एका मिनिटांत किती होतात तें मोजले पाहिजे; आठवी, टाळू खोल किंवा भरलेली व उडत आहे; नववी, नाडीचे ठोके एका मिनिटांत किती होतात हें पाहिलें पाहिजे. दोन वर्षांच्या वयाच्या आंत ते ९० पासून १३०

पर्यंत होत असतात. पुढें बहुतकरून १०० वर भरत नाहींत. तथापि ठोके एका मिनिटांत किती होतात हें कांहीं अति महत्वाचें नाहीं; परंतु मध्यें मध्यें थांबणारी अति हळू नाडी हें भयप्रद परंतु वैद्यानें लक्षांत घेण्यासारखें महत्वाचें लक्षण होय. कारण, एखादें मूल कांहीं कारणानें ओकूं लागलें आहे व त्याला ताप आला आहे व त्याच्या नाडीचे मिनिटांत १२० ठोके होतात, परंतु दुसऱ्या मुलाला वरील लक्षणें होऊन नाडीचे ठोके मिनिटांत ४० होतात, तर दुसऱ्याचा रोग अति भयंकर व कष्टसाध्य असें समजावें; दहावा, डोक्याचा आकार मोठा आहे कीं काय, अशुद्ध रक्तवाहिन्या रक्तानें फुगल्या आहेत कीं काय, डोकें अती ऊन आहे किंवा नाहीं; इतक्या गोष्टी पाहिल्यावर मुलास जागें करावें आणि जागें होतांना त्याची वृत्ति पहावी. तें कपाळास आठ्या घालतें किंवा हंसतें, तें त्रासिक किंवा ग्लान आहे, संतप्त किंवा ग्लान आहे, डोळ्यांसभोंवतीं काळी रेघ आहे किंवा नाहीं, नाक चोंदलें आहे कीं काय वगैरे गोष्टी पाहिल्या पाहिजेत.

३. मुलाच्या झोंपेसंबंधी शोध करावा. निरोगी तान्हें मूल दिवसाच्या २४ तासांतून २० तास निजलें पाहिजे. मुलाच्या आजाराला प्रारंभ होऊन किती काळ गेला हेंही समजून घेतलें पाहिजे.

४. पुढें मुलाच्या अंगावरचें पांघरूण, व दुसरीं वस्त्रें काढून त्वचा साफ आहे किंवा नाहीं, अंगांत नेहमीं ऊब आहे किंवा नाहीं, त्वचा ओलसर आहे किंवा कोरडी आहे, ह्या गोष्टी चांगल्या पाहव्यात. लेंकराचे हात पाय चांगले हालत असले पाहिजेत. सांधे सुजलेले, मोठे, किंवा लहान आहेत हेंही पाहावें. अंगावर व मुख्यत्वें गुदस्थानीं कांहीं पुरळ आहे किंवा नाहीं हेंही लक्षांत आणावें. मूल रडत असतांना मुलाची जीभ पाहतां येते, किंवा आपण त्याचे ओंठाला हात लावावा ह्मणजे तें जीभ बाहेर काढतें त्यावेळेस ती पहावी. मूल सात आठ महिन्यांचे असल्यास मधले दोन दांत आलेले पाहिजेत. वर्षाचें असल्यास त्याशिवाय एकेक टोंकटला दांत ( दाढा ) व दीड वर्षाचें असल्यास मधल्या दोन दांतांच्या बाजूनें दांत आले असले पाहिजेत.

व दोन वर्षांच असल्यास दुसरा एकेक शेवटला दांत आलेला पाहिजे. हिरड्यांस हात लावून त्या ऊन, सुजलेल्या वगैरे आहेत किंवा नाहींत हें पाहावें. मुलाला दोन महिने झाल्याशिवाय डोकें उचलतां सावरतां येत नाहीं व चार पांच महिने झाल्याशिवाय नीट बसतां येत नाहीं हेंही लक्षांत धरलें पाहिजे.

५. तहान्या मुलाचे एका मिनिटांत श्वासोच्छ्वास ३० पासून ५० पर्यंत होतात. बाल्यावस्थेंत एक वर्षपर्यंत सरासरीचें मान ३९ आहे. एकापासून ३ वर्षेपर्यंत तें ३० पर्यंत असतें. हे श्वासोच्छ्वास चालत असतांना पोट सहज वर खालीं होत असतें पण छाती खालीं वर होतां कामा नये. तशी होत असल्यास फुप्फुसांत हवा शिरण्यास कांहींतरी अडथळा झाला आहे असें समजावें. मुलें एखादे वेळेस एक-सारखीं टक लावून पहात असलीं ह्मणजे किंवा एकदम त्यांच्या दृष्टी-आड एखादी वस्तु आली ह्मणजे श्वासोच्छ्वास एकदम बंद करितात मग पुढें कांहीं वेळ जलद व अनियमित असे ते चालूं लागतात. मुलाची छाती तपासावयाची असल्यास प्रथम पाठ तपासावी, तेथें कांहीं रोग नसला तर पुढच्या बाजूस बहुतकरून नसतोच.

६. मुलाच्या एकंदर चर्येवरून कांहीं कांहीं रोग ओळखतां येतात—चेहऱ्याच्या वरल्या भागावरून ह्मणजे भिवयांस आठ्या, कपाळास आठ्या असल्या, मूल डोळे गरगर फिरवीत असलें किंवा उगीच डोळे घटारत पहात असलें तर त्यावरून कांहीं तरी मेंदूचा आजार झाला आहे असें समजावें. चेहऱ्याच्या मधल्या भागावरून म्हणजे डोळ्याच्या खालीं काळीं वर्तुळें, नाक फुगलेलें किंवा नाकपुड्या उडत असल्या-वरून हृदयाचा किंवा फुप्फुसाचा रोग आहे असें समजावें. चेहऱ्याच्या खालील भागावरून ह्मणजे गालाचा रंग बदलल्यावरून किंवा गालफडे बसून तोंड रडवें, ओंठ निस्तेज असे झाल्यावरून पोटांतील रोग झाला आहे असें समजावें.

७. मुलाच्या हातापायांच्या चलनवलनावरून कांहीं रोग साधारणपणें ओळखितां येतात. मेंदूच्या आजारांत मुलें आपले हात

डोक्याला वारंवार लावितात, केंस ओढतात किंवा डोकीवरील टोपी किंवा पांघरूण काढून टाकितात, डोकें इकडे तिकडे फिरवितात, किंवा हवेंत एकसारखे हात झाडतात. मेंदूच्या आच्छादनाचे रोग झाले असतां मुळें एका कुशीवर निजून हातपाय पोटाशीं धरतात पोटांतील रोगांत मुलें आपले पाय वर घेतात, चेहरा कोमेजतांना लेला,असतो व आपले कपडे ओढूं लागतात. श्वासोच्छ्वास गुदमरला असमुळें आपला गळा ओरबडतात किंवा आपल्या तोंडांत हात घालितात. फुप्फुसदाह झाला असतां रडण्याचा आवाज बदलतो. तो आवाज त्रासिक असून आपण दुरून ऐकतों कीं काय असें वाटतें. कंठरोगांत तो घोगरा व खणखणीत असतो. मेंदूच्या रोगांत किंकाळीसारखा असतो. पोटांतील आंतड्याच्या आच्छादनाचा दाह झाला असतां कण्हण्यासारखा असतो. मूल पुष्कळ वेळ एकसारखें रडत असलें ह्मणजे त्याचा कान दुखतो किंवा त्यास भूक लागली असें समजावें. परसाकडे होण्याच्या पूर्वी वळून वळून आळेपिळे देऊन मूळ रडूं लागलें तर आंतड्यांतील रोग आहे असें समजावें.

८. मुलास तीन चार महिने झाल्यावांचून त्याच्या डोळ्यांतून अश्रु व तोंडांतून लाळ गळत नाहीं ही गोष्ट रोगपरीक्षा करितांना ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. ( पुढें चालू. )

---

## पथ्यापथ्यविचार,

लेखक.— कृष्णराव गडबोले.

१. शरीरास व मनास आरोग्यकारक जे आहार आणि विहार ( व्यापार ) त्यांस पथ्य असें ह्मणतात. व रोगोत्पादक जे आहारविहार त्यांस अपथ्य ह्मणतात. मनुष्यास निरंतर अशी इच्छा आहेच कीं, आपणांस कांहीं रोग होऊं नयेत व झालेच तर ते लौकर बरे व्हावे. अशी जर इच्छा आहे तर शरीरास हितकारक गोष्टी कोणत्या व अहितकारक गोष्टी कोणत्या यांचें ज्ञान करून घेणें हें मनुष्याचें अवश्यक

कर्तव्य आहे. मनुष्यानें आहाराविहारामध्यें पथ्यापथ्याचा विचार नेहमींच ठेविला पाहिजे आणि रोगीस्थितींत तर विशेषेंकरून ठेविला पाहिजे. आतां हा विचार निरनिराळ्या प्रकृतीच्या भेदाप्रमाणें व निरनिराळ्या रोगांप्रमाणें भिन्न भिन्न प्रकारचा आहे. हल्लीं जनरूढींत वैद्यानें पथ्य करण्यास सांगितलें ह्मणजे 'तेल, तिखट, अंबट' वर्ज्य करून बाकीचे पदार्थ खावयास देण्याची वहिवाट आहे, पण हा नियम सर्वच रोगांस लागू नसून कांहीं कांहीं रोगांत मान्य आहे. पण या गोष्टीचा विचार अशिक्षित लोकांत बरोबर होत नसल्यामुळें विनाकारण रोग्यास खाण्याजेवण्यांत फारच अडचण करितात, व तेणेंकरून रोग्याची शक्ति दिवसानुदिवस कमी होत जाते व त्यामुळें रोगाची वृद्धि होते. याकरितां कोणकोणत्या रोगावर कोणकोणते जिन्नस खातां येतील व कोणकोणते वर्ज्य केलेच पाहिजेत याजबद्दलची माहिती वैद्यास विचारून तदनुसार वर्तन ठेवावें. आतां ही गोष्ट प्रत्येक रोग्यास वैद्यानें सांगत बसणें ह्मणजे तेंही कांहीं प्रसंगीं अशक्य होतें. याकरितां पथ्यापथ्यविचार साधारणपणें लोकांस विदित असावा या हेतूनें त्याची माहिती थोडक्यांत या पुस्तकांत देण्याची सुरुवात केली आहे. शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें पथ्य संभाळलें असतां त्याजपासून किती फायदा आहे व न संभाळल्यानें किती तोटा आहे याजबद्दल एका ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे.—

॥ श्लोक ॥ पथ्येसति गदार्तस्य किमौषधनिषेवणं ॥
पथ्येऽसति गदार्तस्य किमौषधनिषेवणं ॥

याचें तात्पर्य असें आहे कीं, मनुष्यानें पथ्य जर चांगलें संभाळलें तर त्याजपुढें औषधाची मातब्बरी काय आहे? तर ही गोष्ट अगदीं खरी आहे कीं, पुष्कळसे रोग औषध कांहीं एक न घेतां फक्त पथ्यानें वागलें असतां जातात. पण तें पथ्य माहीत नसतें, त्यामुळें वैद्याकडे जाणें भाग पडतें. तेव्हां जर मनुष्यास सामान्यतः तरी पथ्याचें ज्ञान असलें व त्याप्रमाणें वागणूक ठेविली तर पडसें, खोकला, ताप इत्यादिक रोग पूर्व रूपांतच कमी होतात किंबहुना ते निखालसही

जातात. आतां पथ्य केलें नाहीं व अपथ्य पदार्थ खात गेलें, आणि औषधें मात्र घेण्याचा जरी अगदीं झपाटा चालविला तरी त्यापासून उपयोग होत नाहीं व रोग वाढूं लागतो. याकरितां अवश्यक पथ्यापथ्य कोणतें आहे याचा विचार औषध घेणारानें करून त्याप्रमाणें वागणूक ठेवणें फारच जरूरीचें आहे. आतां अवश्यक पथ्यापथ्य कोणतें याजबद्दलचीं कांहीं उदाहरणें सांगतों म्हणजे वरील म्हणणें चांगलें लक्षांत येईल. एखाद्या मनुष्यास हगवणीचा आजार झाला आहे व त्याकरितां औषध चालू आहे पण गव्हाचें व हरभऱ्याचें अन्न म्हणजे पोळ्या, लाडू वगैरे जड पदार्थ खाण्याचें तो जर सोडीत नाहीं तर त्या औषधांस गुण कसा येणार! वरील उदाहरण आहारसंबंधी झालें. आतां विहाराच्यासंबंधानें एक उदाहरण सांगतों- एका मनुष्यास अव्यवस्थितपणानें धातुनाश केल्यामुळें क्षयरोग झाला आहे व त्याजकरितां पुष्टीचीं औषधें चालू ठेविलीं आहेत;परंतु अव्यवस्थित रीतीनें धातुनाश करण्याचा प्रकार जर बंद ठेविला नाहीं तर औषधास गुण कशानें येणार? असो. वर सांगि- तलें आहे कीं, शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें पथ्यापथ्याचा विचार ठेवावा, पण कित्येक लोकांत अशी स्थिति झाली आहे कीं, पथ्य संभा- ळण्याची मर्यादा अतिशय व भलत्याच रीतीची वाढली आहे त्यामुळें कधीं कधीं रोग्याची अशी स्थिति करून टाकतात कीं, त्याचा प्राण जाऊं लागला तरी दूध, पाणी, हवा, मीठ वगैरे अत्यंत अवश्यक पदार्थ भीतीमुळें रोग्यास देतच नाहींत व तशा प्रकारच्या पथ्यापासून रोगी क्षीण होऊन प्राणास मुकतो. याकरितां प्रत्येक रोगावरील पथ्यापथ्याचा विचार पुढें दिला आहे. सर्व रोगांमध्यें ज्वर रोग म्हणजे ताप हा फार महत्वाचा आहे,याकरितां त्याचें पथ्यापथ्य प्रथम सांगतों.

२. कोणताही ज्वर आला असतां प्रथम असा विचार केला पाहिजे कीं, हा ज्वर मुख्यत्वेंकरून आहे कीं गौणत्वानें आहे म्हणजे केवळ ज्वर हाच मुख्य रोग आहे किंवा दुसऱ्या एखाद्या रोगाच्या तो अंगभूत आहे? यास उदाहरण शरीरांत कोठें तरी एखादा नारू अगर गळू वगैरे झालें असल्यामुळें ताप आला असेल तर तो आगंतुक

ज्वर समजला पाहिजे. तेव्हां आगंतुक ज्वर असेल तर त्याच्या पथ्यापथ्याचा विचार त्या त्या रोगांवरच अवलंबून राहतो. आतां वर सांगितल्याप्रमाणें दुसरे कांहीं रोग शरीरांत नसून फक्त तापच येत असेल तर त्याजबद्दल पथ्यापथ्य कसें ठेवावें याचा विचार करूं. कोणताही रोग लवकर बरा व्हावा अशी इच्छा असेल तर, प्रथम त्या रोगाचें कारण काय आहे याचा बारकाईनें विचार करून तें कारण हल्लीं पुनः पुनः घडत असण्याचा संभव असेल तर तें बंद करावें. थंडीपासून उत्पन्न झालेल्या तापास कमी करण्याकरितां रोग्यास निवाऱ्याचे जाग्यांत ठेवणें, ऊन पाणी प्यावयास देणें, हें फार हितकारक होतें. तथापि रोग्याची अंगांतील थंडी कमी होऊन घाम वगैरे येऊन गेल्यावर कांहीं वेळपर्यंत त्यास खुली हवा असलेल्या जाग्यांत ठेवून त्यास थोडी हुषारी येऊं देणें हेंही जरूरीचें आहे. अतिशय कोंडलेल्या जाग्यांत अहोरात्र ठेवल्यानें रोगी बराच अस्वस्थ होतो. ताप उतरल्यावेळीं जुन्या तांदुळांचा भात मृदु करून द्यावा, भात न खाववल्यास जोंधळ्याच्या अगर साळीच्या लाह्यांच्या पिठाची लापशी करून उन्हुनीत प्यावयास द्यावी. मूग किंवा कुळथे हे भाजून त्यांचा काढा करून द्यावा. भाजीपैकीं वांगें, घेवड्याची शेंग, कारलें, पडवळ, मुळा, वगैरे ह्मणजे ज्या कडू व उष्ण स्वभावाच्या भाज्या असतील अशा पाहून द्याव्या. ताप नुक्ताच आला असून फार जोरदार आहे व शीतापासून झाला आहे तर तूप दूध देऊं नये; असें जरी आहे, तरी रोग्याची स्थिति पाहून वैद्यानें परवानगी दिल्यास प्रसंगविशेषीं तापविलेलें दूध देण्यास कांहीं हरकत नाहीं. मात्र दूध तापवितांना त्यांत एक दोन पिंपळ्या चेंचून घालाव्या आणि दूध चांगलें तापवून वरील साय काढून टाकून द्यावें. खारीक, मनुका, गोडें डाळिंब, जरदाळू, अशीं कांहीं फळें द्यावीं. तापाचा जोर फार असेल तर स्नान घालूं नये. तथापि केव्हां केव्हां ज्वरामध्यें त्वचा अतिशयच रुक्ष होते व अंगांत तापाची उष्णता फारच वाढल्यामुळें रोगी हवालदील झाला तर कडूलिंबाच्या पाल्याचा काढा करून निववून त्या काढ्याच्या बोळ्यानें अंग पुसावें. ह्मणजे

दाह कमी होऊन रोग्यास हुषारी वाटते. अंबट, तुरट, असे पदार्थ वर्ज्य करावे. अतिश्रम, दिवसा निजणें, स्त्रीसमागम, इत्यादि गोष्टी वर्ज्य कराव्या. वरील सर्व विचार शीतज्वराविषयीं झाले. देवी, गोंवर, वाऱ्या-फोड्या, वगैरेंपासून होणारे जे ताप आहेत त्यांस विस्फोटकज्वर असें ह्मणतात. तर या विस्फोटक ज्वरांमध्यें मात्र उष्ण उपचार करूं नये. या ज्वरांत स्नानाचाही निषेध करूं नये. स्वच्छता जितकी ठेववेल तितकी ठेवावी. विशेष विचार त्या त्या रोगांच्या पथ्यापथ्यांत येईल. मनाला अतिशय संताप झाला असतां त्यामुळें पित्तप्रकोप होऊन ज्वर येतो, तर अशा प्रकारच्या ज्वरास ह्मणजे पित्तज्वरास शीत उपचार हितकारक होतात. सबब अशा तापकऱ्यास ऊन्ह पाणी देण्याचें कारण नाहीं. त्यास ताजें पाणी दिलें असतां कांहीं हरकत नाहीं. उष्ण देशांतून बदलून थंड हवेंत अगर बागेंत ठेवणें असे कांहीं उपचार करावे, ह्मणजे जेणेंकरून रोग्याच्या मनास उल्हास वाटेल असें करावें. जीर्ण ज्वरामध्यें गाईचें अगर शेळीचें दूध थोडथोडें सोसेल त्या मानानें देत जाणें हें फार हितकारक आहे. उष्णोदकस्नान घालावें. स्नान फार दिवसपर्यंत घातलें नाहीं तर अग्नि मंद होतो व रोग्यास हुषारी लवकर येत नाहीं; व तसेंच एकंदर पथ्यापथ्य थोडथोडें क्रमानें सोडवीत जावें. शक्ति चांगली येईपर्यंत एकदम फार आयास होतील असें काम करूं देऊं नये.

३. याप्रमाणें ज्वराविषयीं संक्षेपानें पथ्यापथ्यविचार सांगितला आहे. तापाचे सूक्ष्म सूक्ष्म भेद अनेक आहेत व त्या त्या मानानें वर सांगितलेल्या पथ्यापथ्यांतही थोडथोडा फेरफार प्रसंगविशेषीं करावा लागेल, तर तो बुद्धिमान वैद्याच्या उपदेशानुरूप करावा.

---

## अशास्त्र समजुती.

### नंबर १.

१. वैद्यशास्त्राचा यथासांग अभ्यास बंद पडल्यामुळें अनेक गोष्टींसंबंधी शास्त्राची काय आज्ञा आहे ती मुळींच लोकांचे पुढें मांडली जात नाहीं. यामुळें अनेक वेडगळ समजुती आपल्यामध्यें चालत आल्या

आहेत व त्या आपले मोठमोठ्या नुकसानास कारणीभूत होत आहेत. ह्याचें प्रत्यक्ष प्रमाण आमच्या गर्भार व बाळंतीण बायकांसंबंधी ज्या अनेक वेडगळ समजुती आमच्यामध्यें प्रचारांत आहेत त्या होत. त्या समजुतींपैकीं ' गर्भार स्त्रियांना कांहीं जरी आजार झाला तथापि औषध म्हणून मुळींच देऊं नये, कारण ह्यापासून गर्भास धोका पोंचतो ' ही एक अडाणी समजूत होय. बहुतेक सर्व लोकांची- त्यांत स्त्रियांची- अशी समजूत दृढ झाल्यामुळें पुढें मोठे अनर्थ होतात- व्याधी जेंवर नूतन असतो तोंवर तो थोड्या उपायांनीं व थोडक्या काळांत बरा होतो; एकदां तो लांबला म्हणजे लौकर आवरत नाहीं; अर्थात् त्यामुळें आणखी जोडविकारही उद्भवतात; आजार लांबला कीं, क्षीणता वाढते; गर्भाचें चांगलें पोषण होत नाहीं; व बाळंत होण्याची वेळ निर्भय पार न पडतां उभयतां बाळ बाळंतिणींचा जीव धोक्यांत पडतो; नशिबानें बाळंतीण सुखानें झाली तरी पुढें तिच्यानें लेंकराची जोपा होत नाहीं; सारांश, हळूं हळूं उभयतां रोगग्रस्त होऊन मृत्यूच्या तोंडांत पडण्याचा समय येतो; असा अनुभव रोजचा आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. सारांश, मूळारंभींच्या एवढ्याशा चुकीनें ' एका चुकीनें घोडा गेला ' ह्या गोष्टीसारखें होतें.

२. गर्भारपणीं स्त्रियांनीं योग्य वर्तन ठेविल्यास त्यांना आजार होणार नाहीं. यासाठीं तसें वर्तन ठेवण्याची त्यांनीं व त्यांच्या घरच्या माणसांनीं खबरदारी घेणें चांगलें. पण इतकेंही करून किंवा अपरिहार्य कारणांनीं आजार झाल्यास त्याची उपेक्षा न करितां त्यावर योग्य उपचार केलाच पाहिजे व असें आपलें वैद्यकही सांगतें—

**व्याधींश्चास्या मृदुसुखैरतीक्ष्णैरौषधैर्जयेत् ।**

( वाग्भट, शरीरस्थान, अ. १ )

**अर्थ.**—गर्भार स्त्रियांना आजार झाला असतांना त्यावर सौम्य, सुखकारक आणि जीं जालीम नाहींत अशीं औषधें देऊन तो व्याधी बरा करावा.

३. सारांश, लोकांची ही चालत आलेली समजूत सर्वथैव अशास्त्र आहे. ही समजूत होण्याचें कारण असें दिसतें कीं, वैद्यक्रिया करणारे अडाणी व अशिक्षित लोक फार झाल्यामुळें त्यांचे हातून

दा. क्र. 14814
0.50

वरच्या श्लोकाचे विरुद्ध उपचार मिळून गर्भार स्त्रियेस किंवा गर्भास इजा होऊन पुष्कळ प्राणहानि झालेली लोकांच्या नजरेस येऊन तेव्हांपासून अशा प्रकारची सर्वसाधारण लोकांची समजूत होत आली असावी. जो ह्मणून वैद्यशास्त्र पढला आहे व जो आपलें कर्तव्य आणि जबाबदारी चांगली जाणतो त्या मनुष्यासच प्रत्येक वेळीं कोणासही कोणतेंही औषध देतांना किती सावध असावें लागतें ह्याची कल्पना होणार आहे. त्यांत गर्भार स्त्रियांना औषध देतांना त्यावर मोटीच जबाबदारी असते; अर्थात् ह्यासाठीं त्यांना उपचारही मोठ्या सावधपणानें करावे लागतात. त्यांत जरा हगगय झाल्यास त्याचें प्रायश्चित्त गर्भार स्त्रियेस व गर्भास भोगावें लागतें ह्यांत मात्र संशय नाहीं. पण ह्यावरून गर्भार स्त्रियांना मुळींच औषध देऊं नये असें मात्र होत नाहीं.

४. गर्भार स्त्रियांना औषध द्यावयाचें तें वरच्या श्लोकांत दिलेल्या तत्वास अनुसरूनच दिलें पाहिजे. विषारी किंवा जाज्वल्य औषधें त्यांना सहसा देऊं नयेत. तसेंच औषधाचें दांडगेंही प्रमाण त्यांना देऊं नये. त्यांना सुखकारक ह्मणजे आवडणारें अथवा मानेल असेंच औषध दिलें पाहिजे. गर्भार स्त्रियांना फार दर्प येणारें, मळमळ उत्पन्न करणारें किंवा वाईट लागणारें सुद्धां औषध देऊं नये. इंग्रजी बऱ्याच औषधांत हे दोष असल्यामुळें व शिवाय तीं प्रवाही असल्यामुळें आमच्या पुष्कळ गर्भार बायकांना तीं मानवत नाहींत. सारांश, सौम्य व रुचिकर अशींच औषधें बेताचे प्रमाणानें द्यावींत. ज्या औषधांचा गर्भाशयावर परिणाम घडतो- सागरगोटा, इंग्रजी आलोज, एरगाट, वगैरे- मात्र मुळींच देऊं नयेत. त्यांना सारक औषधें देणें झाल्यास सर्वांत उत्तम औषध एरंडेल होय. किंवा त्रिफळा, इंग्रजी ऱ्हीयासीडलीज पावडर, इत्यादि सौम्य औषधें द्यावींत. दांडग्या ढाळकांचा कधींही उपयोग करूं नये. अडाणी मनुष्याकडून अशा नाजूक रोग्यास कधींही औषध देऊं नये. कारण, एखाद्या व्याधीवर त्यास रामबाण औषध कदाचित् ठाऊक असल्यास सुद्धां त्या औषधाचा दूरचा अथवा गर्भाशयावर होणारा परिणाम त्यास मुळींच ठाऊक नस-

तो. त्यामुळं पुष्कळदां अपघातही होतात. तसेंच गुप्त ( पेटंट ) औषधांचाही गर्भार स्त्रियांचे रोगावर उपयोग करूं नये. कारण, बहुतेक गुप्त औषधांत सोमल, बचनाग, पारा, कुचला, अफू, इत्यादि तीक्ष्ण व विषारीं औषधें असतात. शिवाय त्यांचीं द्रव्यें व त्यांचीं प्रमाणें हीं देखील सर्व गुप्त असल्यामुळें अशीं औषधें देणें चोहोंकडून धोक्याचें आहे. पेटंट औषधें घेऊन गर्भपात, रक्तस्राव, आमांश, हगवण, इत्यादि विकार जडल्याचें पुष्कळदा अनुभवास येतें. एकंदरींत वरीलप्रमाणें सर्व सावधगिरी ठेविल्यास गर्भार स्त्रियांस कोणत्याही महिन्यांत झालेल्या विकारावर औषध उपचार करण्यास वैद्यशास्त्राची- आपल्या व पाश्चिमात्य- पूर्ण संमति आहे, ही गोष्ट सर्वांनीं ध्यानांत ठेविली पाहिजे.

## पाश्चिमात्य वैद्यकाची व तींत धंदा करणाऱ्या लोकांची पूर्वींची, सांप्रतची व पुढील स्थिति.

( डा. हार्वे यांचें भाषण. )

( मा. अं. व. पुढें चालू. )

इंग्लंडमध्यें आरोग्यरक्षणाचे कामीं प्रतिवर्षी ९०,८०,००० पौंड ( ह्म. हल्लींच्या भावानें ४,२९,००,००० रु. ) खर्च होतो असें ह्मणतात. ह्या आंकड्याला कोठें आधार आढळत नाहीं, तथापि तो जवळ जवळ खरा असावा. आरोग्यरक्षणाचे कामीं इंग्लंडमध्यें आज कित्येक वर्षे एकसारखा खर्च चालला आहे. आणि तेथील मोठमोठ्या कामांमध्यें कोट्यावधी पैसा गुंतुन राहिला आहे, आणि त्याचें जणू काय व्याजच तेथील लोक, आरोग्यवृद्धीच्या रूपानें व आजार आणि मृत्यु यांच्या उच्चाटनरूपानें, भोगीत आहेत. हिंदुस्थानामध्यें अशा तऱ्हेनें पैसा अजून गुंतावयाचा आहे. व येथें आरोग्यरक्षणासाठीं जास्त गोष्टी करावयाच्या असल्यामुळें तो जास्तच गुंतला पाहिजे. किती जास्त गुंतला पाहिजे आहे ह्मणाल तर आरोग्यामध्यें इंग्लंडची बरोबरी करण्यास प्रतिवर्षी येथें सुमारें ५,३०,००,००० पौंड ( ह्म. २९,१९,

००,०००रु. ) खर्च झाला पाहिजे. ह्मणजे देशाचे उत्पन्नाहूनही कितीतरी अधिक ! यावरून असें स्पष्ट दिसून येईल कीं, आरोग्यरक्षणासाठीं सुधारणा जरी लोकांना हव्या असल्या तरी खर्चाच्यासंबंधानें इतक्या अडचणी आहेत कीं,सरकाराला आपल्या उत्पन्नांतून या कामीं पुरेसा खर्च करितां येत नाहीं.हिंदुस्थानामध्यें लोकांना असें वाटतें कीं,देशामध्यें कोणतीही सुधारणा करण्यास सरकार अगदीं तयार आहे.परंतु ही फार वेडी समजूत आहे. वाटेल ती गोष्ट करण्यास सरकाराजवळ कांहीं जादू नाहीं.

१७. एकंदरीनें असें दिसून येतें कीं, लोक सुधारणा करण्यास नाखुष आहेत व सरकारास त्या करण्याची ऐपत नाहीं. तर मग, आपण निराश होऊन हात जोडून स्वस्थ बसावयाचें कीं काय? कित्येक लोक मोठ्या निराशेचे उद्गार काढतात व त्यांना आमचीं मतें स्वप्नवत् व आमचे सर्व प्रयत्न व्यर्थ भासतात. सभ्य गृहस्थहो, ह्या कामीं अडचणी पुष्कळ आहेत हें मला कबूल आहे, तथापि सुधारणा होणार नाहींत असें मात्र मला वाटत नाहीं. केव्हांही निराश होऊन स्वस्थ बसणें हें मनुष्यास योग्य नाहीं. व संकट काय आहे हें माहीत असतांही, तें टाळण्याविषयीं प्रयत्न न करणें, ह्मणजे तें संकट आणल्याबद्दल जबाबदार होणें होय. मेहनतीवांचून सुधारणा होणें शक्य नाहीं. याकरितां आरोग्यरक्षणाच्या सर्व तजविजींनीं युक्त असा हिंदुस्थान देश कसा असावा हें चित्र डोळ्यापुढें बाळगून तद्विषयीं एकसारखा प्रयत्न केला पाहिजे. लोकांचे दुराग्रह व आणखी इतर अडचणी दूर करण्याविषयीं प्रयत्न करितां करितां हिंदुस्थानच्या भावी उत्तम स्थितीचीं चिन्हें आपल्यास दिसूं लागतील. जार्ज हर्बर्टसाहेबांनीं असें ह्मटलें आहे कीं, जो आपल्या बंदुकीचा आकाशावर नेम धरितो, तो झाडावर नेम धरणाऱ्यांपेक्षां जास्त उंच गोळी मारतो. तद्वतच आपल्या प्रयत्नांचें होय. सुधारणा कितपत झाली आहे हें सांगण्यासाठीं ज्या गोष्टी व जे आंकडे मीं सांगितले त्यांवरून ह्याहीपेक्षां सुधारणा पुष्कळ होतील अशी आशा मजमध्यें तरी उत्पन्न झाली आहे. आणि ज्या उपायांनीं आरोग्यरक्षणासंबंधी सुधारणा हळू हळू करतां येतील असें

मला वाटतें, ते उपाय मी आतां सुचवितों.

१८. कोणतीही गोष्ट घडून येण्यास जी अवधी लावी लागते ती गेलीच पाहिजे. आरोग्यरक्षणाचे कामीं सुधारणा करण्याचे प्रयत्न हळू हळूच चालविले पाहिजेत. लोकांच्या शेंकडो वर्षांच्या चालीरीति व समजुती एका दिवसांत पालटतां येणार नाहींत. शिक्षणाचा प्रसार जसजसा जास्त होत जाईल तसतसा लोकांच्या समजुतींत फरक पडणार आहे; व ह्याप्रमाणें पडत चाललेला फरक दिसूनही येत आहे. आरोग्यशास्त्राचीं तत्वें शाळांतून चोहोंकडे शिकविलीं जात आहेत, व कित्येक मुलांच्या मनावर तीं उमटलींही जात आहेत. मात्र, जर ह्या विषयासंबंधाचीं पुस्तकें मनोवेधक भाषेंत लिहिलीं जातील, तर मोठा फायदा होईल. कलकत्ता येथील आरोग्यसंवर्धक मंडळी ( Health Society ) सारख्या मंडळी, लहान लहान लेख वाटून व व्याख्यानें देऊन, एतद्विषयक ज्ञान लोकांमध्यें पसरीत आहेत. आपल्या ह्या सभेस आलेले आपले मित्र हार्टसाहेब हे इंग्लंडच्या आरोग्यसंवर्धक मंडळीच्या शाखा इकडे मोठमोठ्या शहरांतून स्थापण्याची योजना आपल्यापुढें मांडणार आहेत. आह्मांला वेडावण दाखविणारे कित्येकजण ह्मणतील कीं, " बडबड पुरे, हातानें कांहीं करून दाखवा. " परंतु मीं आपणांस दर्शविलेंच आहे कीं, लोकांचें मन ह्या गोष्टींकडे ओढल्याशिवाय सुधारणा करून दाखवितां येणार नाहींत; व तें ओढलें जाण्यास लोकांची बरीच मनधरणी झाली पाहिजे. माझ्या मतें एक उत्तम सूचना पुढें आणावयाची आहे, ती ही कीं, प्रत्येक जिल्ह्यामध्यें एक एक हुशार हेल्थ आफिसर ( आरोग्यरक्षक कामदार ) नेमिला जावा; व त्याच्याकडे येणेंप्रमाणें कामें नेमिलीं जावींत:— स्वच्छतेसंबंधीं सुधारणा करण्यास तयार असलेल्या लोकांस, काय काय केलें पाहिजे तें दाखविणें, देवी काढण्याचे कामावर देखरेख ठेवणें, शहरांचा पाणी पुरवठा, त्यांतील स्वच्छता व गटारें यांची व्यवस्था पाहणें, जनन मरणाचे आंकडे खरे खरे मिळविणें, व स्यानिटरी कमिशनरच्या सल्यानें त्याच्या हाताखालीं एकंदर जिल्ह्याचें आरोग्य नीट राखणें. हल्लीं

हीं सर्व नानातऱ्हेचीं कामें सिव्हिल सर्जन ( जिल्ह्यावरील मुख्य सरकारी डाक्टर ) करतो, अशी कल्पना आहे. सिव्हिल सर्जनाची वास्तविक स्थिति पाहतां ती अशी आहे कीं, त्याला नेहमींच्या डाक्टरी कामाशिवाय, जिल्ह्यांतील खून, आत्महत्या,इत्यादि गोष्टींत ते कसे झाले आहेत ह्याविषयीं सरकारची खात्री करण्याची जबाबदारी त्याच्यावरच असते. ह्याशिवाय, तुरुंगांतील कैद्यांना औषधोपचार करणें व जिल्ह्यांतील दवाखान्यांची तपासणी करणें हीं कामें त्याच्याकडेसच असतात. सिव्हिल सर्जनाइतके दुसऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यांना काम पडत नाहीं. आरोग्यरक्षणाचीं आणि देवी काढण्याचीं कामें उत्तम होण्यास त्यांच्यावर एकसारखी बारीक देखरेख ठेवणें हेंच मुख्य साधन होय. ह्या कामीं जशी असावी तशी देखरेख न राहिल्यास कागदोपत्रीं मात्र उत्तम सुधारणा दाखविली जाते, परंतु त्यांतील खरें शोधूं लागल्यास मुळींच कांहीं पत्ता लागत नाहीं. सिव्हिल सर्जनाच्या देखरेखीचा प्रकार पाहिला तर, ते लोक मोठ्याशा रस्त्यावरील एखाद्या दवाखान्याला टांग्यांतून घरघर जातात, तेथें देवी काढलेलीं कांहीं मुलें आणलेलीं असतात तीं पाहतात व लगेंच परत येतात. असल्या प्रकारची त्यांची देखरेख. जिल्ह्यांतील आडभागांत जाण्यास त्यांना तंबू वगैरे फिरण्याचें सामान दिलेलें नसतें, व तें जरी दिलें, तरी कलेक्टर व त्याहूनही तुरुंगावरील इन्स्पेक्टर जनरल हे लोक सिव्हिल सर्जनांना जिल्ह्याचें ठिकाण सोडून तीन चार दिवसांपेक्षां जास्त बाहेर मुळींच राहूं देणार नाहींत.व ह्मणून मी ह्मणतों कीं,प्रत्येक जिल्ह्याला एक स्वतंत्र हेल्थ आफिसर असावा.परंतु हे लोक कोठून आणावयाचे?व त्यांचा पगार कसा भागवावयाचा? इतकाच विचार आपल्यापुढें मांडून मी जर गप्प राहिलों तर बरें दिसणार नाहीं,व ह्मणून मी ह्यासंबंधानें एक तोड आपल्यास सुचवितों. सुधारणा करण्याचे कामीं अडचणी येण्याचीं कारणें देश फार मोठा व लोकवस्ती अतिशय, हीं होत; परंतु ह्या अडचणींवरूनच त्या करण्याचा एक उपाय सुचतो. निव्वळ इंग्रजी अमलाखालीं हिंदुस्थानामध्यें २२¼ कोटींवर प्रजा आहे. आणि जर दर माणशीं एक एक आणा

घेऊन देशाचे आरोग्य रक्षणासाठीं एक फंड काढला तर १,४०,०० ००० रुपये जमतील; व यांतून प्रत्येक जिल्ह्याच्या हेल्थ आफिसराचा खर्च भागून बरीच रकम आरोग्यरक्षणाचीं कामें करण्यास शिल्लक राहील. आरोग्यरक्षणाची खरी किंमत लोकांना समजली कीं, ते हा एक आणा व आणखीही पैसे तेव्हांच देतील, आणि आरोग्यशास्त्राचें ज्ञान चोहोंकडे पसरण्यास हे हेल्थ आफिसरच आपल्या पुष्कळ उपयोगीं पडतील. आपल्या येथें तयार होणाऱ्या विद्वान डाक्टर मंडळीना उदयास आणण्यासाठीं ह्या जागा त्यांना द्यावयाला उपयोगीं पडतील. आरोग्यरक्षणाचे कामीं लक्ष घालणाऱ्या लोकांकडून उभारलेल्या फंडांतून ह्यांचा पगार भागला जावा. सरकार ठोकळ ठोकळ गोष्टींसंबंधानें देखरेख ठेवील; व अधिकाऱ्यांच्या नेमणुकांसंबंधाच्या वगैरे प्रश्नांचा निकाल करील. परंतु एकंदरीनें सर्व व्यवस्था गांवोगांवचे, त्यांच्या मदतीप्रमाणें, लोक निवडून त्यांची एक सभा स्थापून तिच्या मार्फत केली जाईल. असें झाल्यानें, लोकांना आपल्याला हव्या त्या गोष्टी स्वतः करून घेतां येतील; व त्यांना दिलेल्या स्थानिक स्वराज्याच्या संस्था टिकण्याचा संभव जास्त वाटून, त्यांना अधिक खरें स्वरूप येईल. मला खरोखर ह्याचेंच आश्चर्य वाटतें कीं, ज्याप्रमाणें लहान मुलें प्रत्येक गोष्ट आपल्या आईला मागतात, त्याप्रमाणें येथील विद्वान मंडळी प्रत्येक गोष्ट सरकाराला कशी मागत असते! आरोग्यरक्षणार्थ कामांचा व दवाखान्यांचा खर्च इतर देशांतून सरकारावर मुळींच पडत नाहीं. हिंदुस्थान सरकाराला तो करतां येणार नाहीं हें मीं आपल्याला सिद्ध करून दाखविलेंच आहे. ह्मणून मी ह्मणतों कीं, म्युनिसिपालिट्यांना, त्यांचे हद्दींतील लोकांनीं, स्वतःचा व सर्वत्रांचा फायदा व्हावा ह्मणून, असलीं कामें करण्यासाठीं कर द्यावा, व श्रीमंतांनीं मोठमोठ्या देणग्या देऊन मदत करावी. ह्याप्रमाणें लोकांकडून बरीच मदत झालीही आहे, परंतु एकंदर लागणाऱ्या खर्चाच्या मानानें ती कांहींच नाहीं. हिंदुस्थानमध्यें जे कित्येक उदार व श्रीमंत गृहस्थ आहेत त्यांनीं गरीब लोकांना औषधपाणी मिळण्याच्या सोयी कराव्यात अशी माझी त्यांना

विनंति आहे. कित्येक लक्ष रुपये मी ह्या कामीं मोठ्या उपयुक्त रीतीनें खर्च करून दाखवीन. फक्त एक नवें मेडिकल कालेज स्थापण्यालाच दहा लक्ष रुपये पाहिजेत; आणि सरकारचे तिजोरींतून ते काढण्याचें काठिन काम व्हाईसराय साहेबांचें जर कोणी वाचवील तर त्याचे ते फार आभारी होतील.

१९. सभ्य गृहस्थहो, हिंदुस्थानामध्यें आरोग्यरक्षणासाठीं काय काय केलें पाहिजे हें मीं आपल्यापुढें मांडलें आहे. जर माझे विचार निवळ कल्पनातरंगाप्रमाणें आपल्याला भासत असतील तर आणखी एकवार मला येवढेंच सांगावयाचें आहे कीं, कांहीं काळानें त्याप्रमाणें गोष्टी घडून येतील. व गेल्या थोडक्या वर्षांत जी सुधारणा दिसूं लागली आहे ती- हळू हळूं कां होईना- पण वाढत वाढत जाईल, अशी मला खात्री आहे. ह्या सभेस आलेल्या सर्व सभासदांना माझी एवढी विनंति आहे कीं, त्यांनीं धीर मात्र सोडूं नये. आपण प्रत्येकजण सुधारणा वाढविण्याचे कामीं कांहींतरी करूं शकूं, आणि लोकांचें अज्ञान व त्यापासून उद्भवणारीं संकटें हीं नाहींशीं करण्याचे प्रयत्नांत आपण ढिलाई करणें आपल्याला बरें दिसणार नाहीं. जरी कांहींवेळ पर्यंत यश न आलें तरी प्रयत्न हा चालविलाच पाहिजे. आपल्या श्रमाचें फळ आपल्या दृष्टीस जरी न पडलें तरी तें आपल्या अनुयायांच्या दृष्टीस खास पडेल. ( समाप्त. )

## स्फुटलेख.

**लेप्रसी ( महारोग ) कमिशनचा ठराव.**— महारोगासंबंधी चौकशी करण्याकरितां जें एक कमिशन सरकारानें नेमिलें होतें त्या कमिशनचें म्हणणें असें आहे कीं— ( १ ) महारोग हा एक स्वतंत्र रोग आहे, गर्मीच्या रोगाचा किंवा क्षयरोगाचा तो एक प्रकार नाहीं, परंतु क्षयरोगाशीं त्याचें बरेंच साम्य आहे; ( २ ) महारोग हा वंशपरंपरेनें होणारा नाहीं व ह्या व्याधीनें त्रस्त झालेल्यास मुलेंही क्वचित् होतात, ह्या दोन्ही कारणांवरून हा रोग

आपोआप कमी कमी होईल असें दिसतें; ( ३ ) रोगांच्या शास्त्रीय-रीत्या केलेल्या वर्गीकरणांत महारोग जरी सांसर्गिक ह्या सदरांत येतो व तो जरी देवीप्रमाणें त्याच्या लशीचा रक्तांत प्रवेश झाल्यास दुसऱ्यास उद्भवतो, तरी ह्या दोन्ही मार्गांनीं होणारा त्याचा प्रसार फारच अल्प आहे; ( ४ ) कांहीं विवक्षित प्रकारच्या अन्नानेंच तो रोग प्रत्यक्ष होतो असें नाहीं; तसेंच कांहीं विशेष हवापाण्यानें तो होतो अथवा भोंवतालच्या घाणीपासून होतो आणि तो विशेषतः अमुक जातीच्या अथवा देशाच्या लोकांना होतो असेंहि ह्मणतां येत नाहीं; ( ५ ) तथापि दारिद्र्य, वाईट अन्न, शुद्ध हवेची कमतरता, घाण पाणी वाहून नेणाऱ्या अपुऱ्या सोई, इत्यादि आरोग्यास प्रतिकूळ गोष्टींपासून प्रकृति विकृत होऊन महारोग होण्यास ती अनुकूल बनते; ( ६ ) महारोग हा व्याधि बहुधा रिपोर्टांत खुलासेवार दाखविल्याप्रमाणें अनेक कारणें एकत्र होऊन किंवा त्यांचा एकवट परिणाम घडून उद्भवतो, पण त्या कारणा वगैरेसंबंधी सांप्रतची उपलब्ध माहिती फार अपुरी आहे. ह्यावरून कमिशननें असा आपला अभिप्राय दिला आहे कीं, ज्याअर्थी क्षयरोग्यास समाजांत मिसळूं दिल्यानें समाजाचे आरोग्यास जितकी भीति आहे तितकीच भीति महारोग्यापासून आहे, त्याअर्थी कायदा करून सर्व महारोगाचे रोग्यांना समाजापासून अलग राहण्यास भाग पाडण्याची जरूरी नाहीं. कमिशनच्या एकंदर रिपोर्टावरून कमिशन बसण्याच्या पूर्वी जितकी ह्या रोगासंबंधी माहिती होती त्यापेक्षां कमिशन नेमल्यानें कांहीं अधिक माहिती मिळाली असें नाहीं. एतावता कमिशन नेमून न नेमून सारखेंच झालें.

**ह्या रोगासंबंधी कमिशननें सुचविलेले उपाय.**—( १ ) खाण्यापिण्याचे पदार्थ महारोग्यास विकूं देऊं नये; अशा स्त्रियांना वेश्येचा धंदा करूं देऊं नये; तसेंच महारोग्यांनीं न्हावी, परीट, इत्यादि समाजाशीं फार दळणवळण व संबंध असणारे धंदे करूं नयेत; ( २ ) कमिट्यांनीं पोट नियम करून ह्या लोकांना रस्त्यांत भिक्षा मागूं देऊं नये किंवा सार्वजनिक ठिकाणीं हिंडूं देऊं नये किंवा सार्वजनिक

बाहनांतून त्यांस बसूं देऊं नये; ( ३ ) ज्या शहरानजीक अशा लोकांना राहण्याच्या स्वतंत्र सोई नाहींत तेथें त्या कराव्यात व अशा ठिकाणीं रस्त्यांतून भटकणाऱ्या व्याधिग्रस्त लोकांस राहण्याचें भाग पाडण्याचा अथवा आपल्या घरीं त्यांना घालविण्याचा अधिकार तेथील अंमलदारास असावा; ( ४ ) असें करितांना योग्य अशा वैद्यशास्त्रज्ञ मनुष्याचा सल्ला आगोदर त्यांनीं घ्यावा. ह्याकरितां स्वतंत्र कायदा न करितां कमिट्यांनीं आपल्या पोट नियमांत वरील नियमांचा समावेश करावा.

**कमिशनच्या रिपोर्टावर विलायतेंतील सिलेक्ट कमिटीचा शेरा.**— कमिशनचे वरचे सहा मुद्दे कलमवार दिले आहेत, त्यांपैकीं कलम ३ व ६ ह्यांतील मुद्दे शिवायकरून बाकींचे कमिशनचे मुद्दे सिलेक्ट कमिटीस पसंत आहेत. हिंदुस्थानांत महारोगाचे सर्व रोग्यांना समाजापासून अगदीं अलग ठेवणें ही गोष्ट अशक्य व जरूरीची नाहीं असा जो कमिशनचा अभिप्राय पडला तोही सिलेक्ट कमिटीस पसंत नाहीं. तिचें असें ह्मणणें आहे कीं, सरकारानें कमिशनच्या सूचनेकडे लक्ष न देतां महारोगग्रस्त रोग्यांना निराळें ठेवण्याची योग्य तजवीज करावी. डाक्टर कारटर यांचेंही ह्मणणें कमिटीच्या ह्मणण्यास अनुकूल असेंच आहे.

**ह्यावर सरकारचा ठराव.**—हिंदुस्थानसरकारास, कामिशनचें ह्मणणें कीं संसर्गानें ह्या रोगाचा फारच थोडा प्रसार होत आहे, ही गोष्ट कबूल असून ह्या रोग्यांना समाजापासून कायद्यानें निराळें राहणें भाग पाडण्याची अवश्यकता नाहीं असेंच सरकारचेंही मत आहे. जेथें ह्या लोकांकरितां स्वतंत्र आश्रम आहेत अशा शहरांत, यात्रांच्या ठिकाणीं वगैरे, म्युनिसिपालिट्यांनीं पोट नियम करून महारोग्यांना समाजांत मिसळूं देऊं नये, अथवा त्यांना विकण्याचा, धुण्याचा वगैरे, धदा करूं देऊं नये. परंतु अशी मनाई कमिट्यांनीं आपल्या पोट नियमानें सुद्धां महारोगी वेश्यांना करूं नये असें सरकारचें मत आहे. सारांश, एवढी गोष्ट शिवायकरून कमिशनचा रिपोर्ट सरकारास मान्य आहे. परंतु सिलेक्ट कमेटीच्या सूचनेप्रमाणें सरकार स्वतंत्र कायदा करण्यास तयार नाहीं.

३ प्रोफेसर आरते, बडोदा.
३ रा. सा. गोविंद रघुनाथ पेषकार.
३ रा. सा. बळवंत सीताराम नाईक.
३ रा. रा. दिगांबर रघुनाथ वैद्य.
३ रा. रा. विठ्ठल श्रीपाद जळदकर.
३ रा. रा. हिरालाल मूळजी.
३ रा. रा. माधवराव अबदुलपूरकर.
३ रा. रा. कडवेकर सेक्रेटरी मळा लायब्ररी.
५ डा. मि. जे. बिसेल. एम्. डी. ( २ रु. अधिक चौथे वर्षाबद्दल. )
३ रा. सा. गणपतराव पटवर्धन.
३ रा. रा. बळवंतराव गोखले.

**चारी वर्षांबद्दल.**

१२८४ श्री. भयासाहेब चांगण.
१२८६ रा. रा. कृष्णाजी बाबुराम पेंडसे. ( दुसऱ्या प्रतीबद्दल. )

**चौथ्या वर्षाबद्दल.**

३ रा. रा. भागे सेक्रेटरी मोडर्कि-बा लायब्ररी.


११००

**वर डब्या खपल्या.**

या औषधानें हजारो लोकांचे डोळ्यांस गुण येऊन शेंकडों सर्टिफिकिटें आलीं आहेत. व आज ७ वर्षें ४० जिल्ह्यांत यांचा सारखा खप होत आहे. औषध महासुखकारक असून तान्ह्या मुलापासून वृद्धापर्यंत सारखा गुण करितें.

**फारच उत्तम डोळ्यांचें औषध.**

१ डबीची किंमत १ रुपया. टपाल खर्च ८६. व्ह्याल्युपेबलनेंही पाठवूं. पूर्ण माहिती औषधासोबत. ज्यास्त घेतल्यास ६ डब्यांचे ५ रुपये, १३ डब्यांचे १० रुपये, ट. खर्च माफ.

रघुनाथ बापूजी वैद्य,
( लागवणकर ) माजी बुकडेपोकीपर,
मुक्काम पुणें, पेठ सदाशिव, घर नंबर ६७०

## जी. बी. नाईक कंपनीच्या

### विजेच्या आंगठ्या, कडी, लेखण्या व गळपट्टे.

प्रत्येक वस्तूवर G. B. N. मार्क पाहून घेत जा.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

### रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे.




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग, अशक्तपणा, संधिवायु, शिरोगतवायु, पोटांत वायु भरणें, कंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे गळितरोग वगैरे, काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धशिशी, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें, गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मूळव्याधी, पाठींतील अशक्तता, निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा- लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळें निर्विघ्नपणानें निघतात. लेखणी- हातास कांपरें व स्मरणशक्ति. अशा ह्या उत्तम गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

### विजेच्या वस्तूंची किंमत

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस कि. रु. १॥ | पि. पुतळीस कि. रु. १। | धातूचें कड्यास कि. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस कि. रु. ३ | चां. पुतळीस कि. रु. २ | धातूचे लेखणीस कि. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस कि. रु. २० | सो. पुतळीस कि. रु. २२ | रेशमी गळपट्टा कि. रु. १॥ |

कमरपट्टा किंमत रु० ६.

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही.पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठीकरितां बोटाचें माप पाठवीत असावें. पत्ता स्पष्ट असावा. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे. बंगी करणावळ माफ.

**जी. बी. नाईक आणि कंपनी.**

मुंबई, भायखळा, जुन्या दावणीसमोर; व पुणें, बुधवारपेठ.

डा० रानडे यांचा दवाखाना सोलापूर.

# भिषग्विलास.

BHISHAGVILASA.

वैद्यकसंबंधी अनेक विषयांचें सुबोध भाषेंत
मासिक पुस्तक.

A Monthly Magazine in Marathi
to popularise Medicine.

आयुःकामयमानेन धर्मार्थसुखसाधनं ॥
आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः ॥ १ ॥

पुस्तक ४. जून १८९९ अंक २

विषयानुक्रम. पान.


| विषय | पान |
|---|---|
| शरीररचना .... .... .... .... .... | ४१ |
| पथ्यापथ्यविचार .... .... .... .... .... | ४५ |
| उपयुक्त औषधीसंग्रह. अफूचे उपयोग .... | ४७ |
| बालरोगचिकित्सा .... .... .... .... | ५ |
| स्फुट लेख .... ...., .... .... | ५५ |


सोलापूर
आनंदवृत्त छापखान्यांत छापिला.

वर्षाची आगाऊ वर्गणी ट. ह. सह ३ रु.

# THE ORDER BOOK
## OF
# THE HOUSE OF COMMONS.
## 1895
## *NOTICE OF MOTION.*

Mr. Naoroji.— Civil Service ( India ) ( Simultaneous Open Competitive Examinations in England and India ).— That, in the opinion of this House, in order to preserve and maintain the stability of the British Power, the loyalty, confidence contentment, and gratitude of the people of British India, to improve their material and moral condition, and to ncrease largelyi commercial and industrial benefits to the people of the United Kingdom, it is expedient that the solemn pledges of the Act of 1833, of the Proclamation of 1858 after the Mutiny, of the Proclamation of 1877 on the assumption of the Imperial Title at the great Delhi Durbar, and of the further confirmation of these proclamations on the Jubilee by Her Most Gracious Majesty the Queen and Empress of India, should be fulfilled by, among other reforms, giving effect to the Resolution adopted by this House on 3rd June, 1893, viz.: That all open Competitive Examinations heretofore held in England alone for appointments to the Civil Services of India shall henceforth be held simultaneously both in India and England, such Examinations in both countries being indentical in their nature, and all who compete being finally classif ied in one list acording to merit.


## मासिक मौज.
## फायद्याचा अर्धा भाग निराश्रीत विद्यार्थ्यांकरितां द्यावयाचा.

ता० १५ जानेवारीपासून सुरू. सद्यस्थितिदर्शक **सुंदर चित्र** लेख भारदस्त असून हिंदीपंचाच्या ( गुजराथी ) धर्तीवर. वाचकांची चित्तवृत्ति तटस्थ करून त्यांस वेध लावणारे, रडतोंड्याचें मुख प्रफुल्लित करणारे, पुनः पुनः वाचण्याची इच्छा उत्पन्न करविणारे, सुबोध, सरळ आणि शान्दार लेख यांत प्रसिद्ध होणार. वा. व. फक्त ८ आणे. ट. हा. ३ आणे. तीही वर्गणीदारांच्या सवडीप्रमाणें सहामाही किंवा तिमाहीही घेऊं. **मात्र आगाऊच.** ८ किंवा अधिक प्रति मागविणारांस ट. हां. माफ. १० व २५ वर्गणीदार मिळविणारांस अनुक्रमें ४ व १२ आण्यांचीं पुस्तकें **बक्षीस.** स्वार्थ साधून अनायासें परमार्थ साधन. ग्राहकांनीं आपले सुवाच्य पत्ते व वर्गणी कृपा **करून** खालील पत्यावर पाठविण्याची त्वरा करावी.

म्यानेजर " **मासिक मौज.** "

**पत्ता.**— " सुबोधप्रकाश " प्रेस, **गिरगांव, मुंबई.**

# भिषग्विलास.

वर्ष ४ थें — अंक ३ — जून १८९५.


## शरीररचना.

( लेखक— डा. कृष्णराव गडबोले. )

( मा. अं व. पुढें चालू. )

### वातवाहिनीं विचार ( नर्व्हज्ञ. )

१. शरीरांतील नानाप्रकारचे व्यापार घडण्यास ज्या तंतूंच्या द्वारानें आत्म्याचे हुकूम त्या त्या इंद्रियांस आणि अवयवांस येऊन पोंचतात, व बाहेरील खबरा ज्या तारांच्या द्वारानें आत्म्यास पोंचतात, त्यांस वातवाहिन्या ( नर्व्हज्ञ ) असें ह्मणतात. या वातवाहिन्या पांढऱ्या रंगाच्या असून तारेसारख्या भरीव दिसतात. पण यांजबद्दल कित्येकांचें असें मत आहे कीं, यांसही आंतून सूक्ष्म छिद्र असतें. या वातवाहिन्यांसच मज्जातंतु व ज्ञानतंतु अशींही दुसरीं नांवें आहेत. या तंतूंपैकीं कांहीं तंतु मस्तकांतून उगम पावले आहेत, ह्मणून यांस शीर्षतंतु ( क्रेनियल नर्व्हज्ञ ) असें ह्मणतात व कांहीं तंतु पृष्ठवंशरज्जूपासून उगम पावतात ह्मणून त्यांस पृष्ठतंतु ( स्पायनल नर्व्हज्ञ ) असें ह्मणतात. या तंतूंपैकीं कांहीं तंतूंच्या योगानें शद्ब, स्पर्श, रूप, रस, गंध, इत्यादि विषयांचें ज्ञान होतें ह्मणून त्यांस बोधकतंतु ( सेन्सरी नर्व्हज्ञ ) असें ह्मणतात. व कांहींच्या योगानें चलनक्रिया घडते ह्मणून त्यांस चालकतंतु ( मोटरनर्व्हज्ञ ) असें ह्मणतात. व कांहींच्या अंगीं वरील दोहों प्रकारचीही शक्ति असते ह्मणून त्यांस मिश्रतंतु असें ह्मणतात. पूर्वीं सांगितलेल्या दोन ठिकाणच्या तंतूंपैकीं प्रथम शीर्षतंतूविषयीं विचार करूं. शीर्षतंतूंचीं एकंदर बारा युग्में ह्मणजे जोड्या आहेत. त्यांचें वर्णन पुढें क्रमानें केलें आहे.—

२. **प्रथम युग्म.**—या तंतूंच्या अंगीं गंध वाहण्याची शक्ति आहे

ह्मणून यांस गंधवहतंतु ( ऑलफॅक्टरी ) असें ह्मणतात. हे तंतु दोन असतात. हे मस्तिष्काच्या पूर्व विभागाच्या खालच्या बाजूपासून उत्पन्न होऊन मस्तकांतील चालन्यस्थीच्या छिद्रांतून खालीं उतरून नाकांत शिरून नाकांतील श्लेष्मलत्वचेंत फैलावतात.

३. द्वितीय युग्म.—या तंतूंच्या योगानें दृगिंद्रिय शक्ति उत्पन्न होते, ह्मणजे पांढरे, तांबडे इत्यादि रंग व आकार समजतात, ह्मणून यांस आलोचक ( ऑप्टिकनर्व्ह ) असें ह्मणतात. हे तंतु मस्तिष्कांतील दृक्-तंतुकेंद्रापासून उत्पन्न होऊन मस्तिष्काच्या खालच्या बाजूस येऊन एकमेकांशीं संगम पावतात व नंतर पुनः वेगळे होऊन मस्तकांतून नेत्रबिलाच्या आंतील कोनामधील छिद्रांतून बाहेर पडून नेत्रगोलकांत मागल्या अंगानें शिरतात. नंतर नेत्रांतील स्फटिकाच्या मागल्या बाजूस फैलावतात.

४ तृतीय युग्म.—( मोटोरिस ऑक्युलोरं ) याचे तंतु मस्तिष्काच्या खालच्या बाजूपासून निघून नेत्रबिलाच्या पाठीमागच्या बाजूंत जी चीर असते त्या चिरेंतून बाहेर पडतात. प्रत्येक तंतूच्या प्रथम दोन दोन शाखा होतात. त्यांपैकीं वरील एक शाखा नेत्रगोलकाच्या ऊर्ध्व स्नायूस व पक्ष्मपटल स्नायूस जाऊन मिळून त्यांस चालक शक्ति देते, व दुसरी शाखा लांब असते ती नेत्रगोलकाच्या तिर्यक् स्नायूंत शिरून त्यास चलनशक्ति देते.

५ चतुर्थ युग्म.—या तंतूंची उत्पत्ति मस्तिष्कांतील चतुर्थ चिदाकाशांत एक अंडाकृति सूक्ष्म पिंड आहे त्याच्या जवळच्या भागांतून होते. हे तंतु मस्तकांतील सर्व तंतूंमध्यें लहान असतात. याचे तंतु नेत्रबिलांत जातात त्यापूर्वी हे प्रथम तृतीय युग्माच्या खालीं असतात, व पुढें पुनः तृतीय युग्माच्या वर येतात. नेत्रबिलांतील चिरींतून बाहेर पडून पुढें हे नेत्रगोलकाच्या वरच्या तिर्यक् स्नायूंत जाऊन पसरतात व त्या स्नायूंस चलनशक्ति उत्पन्न करितात.

६. पंचम युग्म.—( ट्रायफेशल ) या युग्मांतील तंतु मिश्र आहेत. म्हणजे याच्या कांहीं शाखा चालक आहेत व कांहीं बोधक

आहेत. मस्तकापासून निघणाऱ्या तंतूंच्या ज्या बारा जोड्या आहेत त्या सर्वांत या पांचव्या युग्माचे तंतु फार मोठे असतात. या युग्मांपैकीं प्रत्येक तंतूचे पुढें मोठे तीन विभाग होतात. पहिल्या विभागाचें नांव चाक्षुष ( ऑफ्थॉल्मिक ), दुसऱ्याचें नांव ऊर्ध्व दंतशाखा ( सुपारियर माक्झिलरी ) व तिसऱ्याचें नांव कपोलशाखा ( इन्फीरियर मॅक्झिलरी ) असें आहे. चाक्षुषशाखेचे पुनः तीन फाटे होतात. त्यांपैकीं एक फाटा कपाळाकडील भागाच्या त्वचेंत पसरतो, दुसरा बाष्पोत्पादक पिंडांत पसरतो, व तिसरा फाटा नाकांतील श्लेष्मलत्वचेंत पसरतो. या शाखेस ऊर्ध्व दंतशाखा असें नांव पडण्याचें कारण हिचे तंतु ऊर्ध्वदंतास्थीच्या एका छिद्रांतून त्या हाडांत शिरून वरील सर्व दांतांच्या मुळांतून शिरून त्यांस शीतोष्ण, अगर आम्ल वगैरे पदार्थ जाणण्याचें ज्ञान देते. कपोलशाखा ( इन्फीरियर मॅक्झिलरी ) या शाखेचे कांहीं तंतु चालक व कांहीं बोधक आहेत. हिच्या मोठ्या दोन शाखा होतात. एक प्राक्‌शाखा व एक प्रत्यक्‌शाखा. प्राक्‌शाखा ही चालक आहे. गालांतील व शंखस्थानांतील व्रणंज कपाळाच्या बाजूंतील भागांत जे स्नायु आहेत त्यांत हिचे फाटे पसरतात. प्रत्यक्‌शाखेचे तीन फाटे होतात, त्यांपैकीं एक फाटा कानाच्या पुढल्या बाजूपासून वर चढून डोक्याच्या बाजूस पसरतो. दुसऱ्या फाट्याचें नांव अधोदंतशाखा. ही वर सांगितलेल्या तीन फाट्यांमध्यें मोठी असून ही हन्वस्थीच्या छिद्रांतून हन्वस्थींत शिरून खालच्या सर्व दांतांच्या मुळांस एकेक सूक्ष्म शाखा देते व तिच्यायोगानें दांतांच्या अंगीं स्पर्श जाणण्याची शक्ति येते. तिसऱ्या फाट्याचें नांव रसज्ञतंतु असें आहे. कारण, हा तंतु जिभेच्या श्लेष्मलत्वचेंत पसरला आहे, व त्याच्यायोगानें जिभेच्या अंगीं मधुरादिक षड्रस जाणण्याची शक्ति येते.

७. षष्ठ युग्म.—( ॲबड्यूसेंटीझ ) या युग्माचे तंतु भ्रमरगुंफेपासून व चतुर्थचिदाकाशांतील करड्या रंगाच्या पदार्थापासून उत्पन्न होतात व पुढें नेत्रबिलांच्या मागील चिरींतून बाहेर पडून डोळ्यांच्या ऊर्ध्वस्नायूंत पसरून त्यांस चलनशक्ति देतात.

८. **सप्तम युग्म.**— ( फेशल ) याचे तंतु वेणीस्थानापासून व भ्रमरगुंफेपासून उत्पन्न होऊन प्रथम शद्बवह तंतूबरोबर कर्णेंद्रियांत शिरतात, मग कर्णास्थीच्या एका छिद्रांतून बाहेर पडून कानाच्या पाळीच्या खालच्या बाजूनें गालांत येतात व तेथें त्यांच्या मुख्य दोन शाखा होतात; एक हन्वटीकडील भागांत पसरते व दुसरी गालांतील स्नायूंत पसरते. गालांत जी पसरते तिच्या असंख्य सूक्ष्म शाखा झालेल्या असतात.

९. **अष्टम युग्म.**—( ऑडिटरी ) यास शद्बवहतंतु असें दुसरें नांव आहे. याचे तंतु मस्तिष्कांतील चतुर्थचिदाकाशापासून उगम पावून कर्णेंद्रियांत शिरतात व अंतःश्रवणांत त्याचे अनेक सूक्ष्म फाटे होऊन पसरलेले असतात. या तंतूंच्या योगानें शद्बश्रवणाची शक्ति कर्णेंद्रियांत येते.

१०. **नवम युग्म:**—( ग्लॉसोफारिंजियल ) याचे तंतु कांहीं चालक व कांहीं बोधक आहेत. कांहीं तंतु सप्तपथांतील स्नायूंत शिरून त्यांस चलनशक्ति देतात, कांहीं तंतु जिभेच्या त्वचेंत पसरतात. व कांहीं मध्यकर्णांत शिरतात.

११. **दशम युग्म:**— ( न्यूमोग्यास्ट्रिक ) या तंतूंस प्राणतंतु असें दुसरें नांव आहे. याचे तंतु वेणीस्थानापासून उत्पन्न होऊन प्रत्यगस्थींतील महारंध्राच्या बाजूस एक लहान छिद्र असतें त्यांतून बाहेर पडून मानेंत उतरतात, ते ग्रैवेयक धमनी व शीर यांच्यामधून खालीं येऊन वक्षःस्थळांत शिरतात व तेथून खालीं आमाशयांत जाऊन पसरतात. याच्या पासून ज्या शाखा निघतात त्या छातींतील व पोटांतील महत्वाच्या अवयवांस चलनशक्ति व ज्ञानशक्ति देणाऱ्या आहेत, ह्मणून हा तंतु फारच महत्वाचा आहे. प्राणवायूची गति याजवर अवलंबून असते, ह्मणून यास प्राणतंतु ह्मणतात. याची एक शाखा श्वासनलिकेंत पसरते, एक अन्ननलिकेंत, दोन फुप्फुसांत एक, सप्तपथांत एक, हृदयांत एक, एक आमाशयांत व एक कानाच्या पाळींत पसरते. उजव्या बाजूकडील [illegible] आमाशयाच्या मागल्या बाजूवर पसरतो व डावीकडील तंतु

आमाशयाच्या पुढल्या बाजूवर पसरतो.

१२. **एकादश युग्मः**— ( स्पायनल आक्सेसरी ) याचे तंतु चतुर्थ चिदाकाशापासून उत्पन्न होऊन खालीं उतरून मानेंतील स्नायूंत पसरतात व त्यांस चलनशक्ति देतात.

१३. **द्वादश युग्मः**—(हायपोग्लासल) याचे तंतु वेणीस्थाना पासून उत्पन्न होऊन प्रत्यगस्थीच्या एका छिद्रांतून बाहेर पडून अंतर्ग्रैवेयक धमनी व शीर यांच्या मागें प्रथम उतरतात, मग दोहोंच्या मध्यें येतात व पुढें मानेंतून खालीं उतरत उतरत हन्वस्थीच्या खालून तोंडांत शिरतात व जिभेच्या स्नायूंत पसरून त्यांच्या अंगीं आकुंचनप्रसारणादि शक्ति उत्पन्न करितात. ( पुढें चालू. )

---

## पथ्यापथ्यविचार.

( मा. अं. व. पुढें चालू. )

४. पूर्वीच्या अंकांत तापाविषयीं संक्षिप्त रीतीनें आहारविहारांबद्दलचा विचार सांगितला आहे. आतां पुढें हगवण इत्यादिक रोगांविषयीं विचार करूं.

५. मनुष्यास हगवणीचा विकार बहुतकरून आरंभीं अजीर्णापासून होतो व अजीर्ण हें बहुधा अधाशीपणाच्या खाण्यापिण्यापासून होतें, व केव्हां केव्हां अवेळीं जेवणें, विरोधी अन्न खाणें, जागरण, इत्यादि कारणांनीं होतें. अजीर्णामुळें पोटांत अन्नाचे अंश नित्यापेक्षां जास्त कालपर्यंत न पचतां राहिले ह्मणजे ते बिघडतात व कोठ्यांत इजा करूं लागतात. तेव्हां तें दूषित अन्न बाहेर काढून टाकण्याचा क्रम सुरू होतो, त्यामुळें वारंवार मलविसर्जन होऊं लागतें. तर अशा प्रसंगीं अफू, जायफळ, पत्री, इत्यादिक स्तंभक पदार्थ प्रथमच देऊं नयेत. कोठ्यांतील दूषित अन्न उलटीनें अगर जुलाबानें बाहेर पडून जाणें हेंच रोग्यास श्रेयस्कर असतें. याकरितां कांहीं वेळपर्यंत झाडा होऊं द्यावा व अशा वेळीं खाण्याबद्दल आग्रह करूं नये. झाडा बराच

झाल्यानंतर रोगी फार व्याकुळ झाल्यास तांदुळांच्या कण्या करून खावयास द्याव्या. तांदुळांच्या कण्या तयार करण्यापूर्वी त्या कण्या तुपावर खरपूस भाजून नंतर त्यांत अधण पाणी घालून चांगल्या शिजवून मऊ मोकळ्या कराव्या. तयार झाल्यानंतर तूप, दूध, साखर, वगैरे घालून थोडथोड्या खावयास द्याव्या. अथवा साबुदाण्याची खीर करून द्यावी.पाणी प्यावयास देण्याचें तें फार बेतानें द्यावें.या आजारांत पाणी फार थंड देऊं नये व फार कढतही देऊं नये,वाळा घालून मध्यम प्रकारचें द्यावें.दुधाचा स्वभाव सारक आहे, याकरितां तें नुसतें प्यावयास देऊं नये. साबूदाण्याच्या खिरींतून, तवखिलाबरोबर अगर दुसरे अन्नाशीं थोडथोडें पचेल त्या मानानें तें द्यावें.गोड ताक अगर दहीं व भात द्यावा. मुगाचें वरण थोडें द्यावें. व्यायाम व जागरण करूं नये. गव्हाचे पदार्थ, हरभरा, वाटाणा, पावटा, उडीद, वगैरे वातळ व जड पदार्थ वर्ज्य करावे. चाकवत, अळू,वगैरे सारक पालेभाजी देऊं नये. मुळा, लसूण, मोहरी, हिंग, वगैरे तीक्ष्ण पदार्थ अपथ्यकारक आहेत. द्राक्षें, आवळे, बोरें, नारळ, वगैरे सारक व अंबट फळें वर्ज्य करावीं. डाळिंब, जांभूळ, पिकलेला मधुर आंबा, बकुळीचें फळ,कवट, साखरलिंबू, जरदाळू,वगैरे स्तंभक फळें पथ्यकारक आहेत. केळफूल, भेंडी, पडवळ, वगैरे फळभाजी हितकारक आहे. दोडक्याची भाजी देऊं नये. सामान्यतः तुरट व गोड असे जिन्नस द्यावे. सारक, रुक्ष, पोटांत टोचण्यासारखे कठिण पदार्थ ह्मणजे पोहे, थालीपीठ, कडबोळीं, लाह्या, असे पदार्थ देऊं नयेत. ऊंस अगर उसाचा रस सारक आहे,करितां देऊं नये.

६.अन्य रोगांपासून जी हगवण होते तिजवर त्या त्या रोगांस जें जें पथ्यापथ्य असेल त्या त्या प्रमाणें तजवीज करावी. उदाहरणार्थ पोटांत जंत झाले असले तर जंतांपासूनही हगवणीचा विकार होतो. तर अशा प्रसंगीं जंतांवरचेंच पथ्यापथ्य संभाळलें पाहिजे. कधीं कधीं शोक, भीति, चिंता, इत्यादिकानें मनास धक्का बसल्यामुळें हगवणीचा विकार होतो,तशा प्रसंगीं रोग्याची भीति दूर करण्याचे उपाय करावे. शोकामुळें असेल तर त्यास शोककारक गोष्टीचा विसर पडेल असें

करावें. चिंतेमुळें असेल तर चिंता दूर करण्याची तजवीज करावी. अतिसार व संग्रहणी या दोन्हीं रोगांचें पथ्यापथ्य बहुतकरून सारखेंच आहे. याकारितां दोन्ही रोगांवरचे पथ्यापथ्य एकाच स्थळीं संक्षेपानें सांगितलें आहे.

## उपयुक्त औषधीसंग्रह.

### अफूचे उपयोग.

१. 'अफू व तिचें व्यसन' 'अफू व दारूची तुलना' इत्यादि विषय विस्तारानें आम्हीं मागेंच वाचकांचेपुढें मांडले आहेत. आज अफूचा औषधोपचारासंबंधी जो अतिशय उपयोग होतो तत्संबंधी माहिती खालीं दिली आहे. ती सर्व लक्षपूर्वक वाचली असतां वाचकांची अशी पक्की खात्री होईल कीं, अफू ही वल्ली अनेक रोगांत-विशेषतः आमांश, हगवण, वेदना, निद्राभंग- मोठी अप्रतिम आहे

२. अफूपासून मानव जातीस झोंप लौकर येते, पण त्याप्रमाणें खालच्या वर्गास- कुत्रे, मांजरें, ससे, इत्यादिकांस झोंप येण्यास अफूचें मोठें प्रमाण द्यावें लागतें. निरनिराळ्या देशांच्या लोकांवर अफूचे निरनिराळे परिणाम होतात ही गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. **जावा** व **म्याले** येथील लोक अफूनें थोडा वेळ वेडेच होतात. युरोपियन लोकांत सुद्धां निरनिराळ्या मनुष्यांवर अफूचे निरनिराळे परिणाम होतात. कांहीं लोक- विशेषतः बायका- अफूनें तेव्हांच चंचल होतात व त्यांस तिजपासून चांगली झोंप येत नाहीं. तिजपासून कांहींना उल्हास वाटतो व कांहीं अगदीं नाउमेद होतात. कांहींना तिच्यापासून झोंप न आल्यास नुसती स्वस्थता तरी वाटून मन आनंदी विचारांत तरंगूं लागतें. कांहींना अफूपासून फारच असमाधान व मनाची अस्थिरता उत्पन्न होते, अथवा ते अफूनें बडबडूं लागतात आणि बेफाम होतात.

**३. त्वचा जरी साफ असली, ह्मणजे ती कोठेंही फुटलेली नसली.**

तथापि तीव्र अफूचें तेल चोळलें अथवा अफूमिश्रित पोटिसें वर लावली तरी अफूचें शोषण त्वचेंतून रक्तांत होतें. त्यामुळें बाह्योपचाराचे रूपानें अफूचा पुष्कळ उपयोग करितां येतो. दाह अथवा सूज खोल असो वा अगदीं त्वचेजवळ असो, त्या ठिकाणीं अफूमिश्रित पोटिसें लावल्यानें आंतील वेदना नाहींशा होतात. एवढेंच, नव्हे पण झोंप येण्यापुरती सुद्धां अफू ह्या मार्गानें रक्तांत शोषिली जाऊन गाढ निद्रा येते. चोळण्यापासून अफू जलद शरीरांत शोषला जातो, ह्मणून अफूमिश्रित तेल चांगलें चोळून चोळून लाविलें तर डोकें दुखणें व दुसरे वातापासून दुखणें, ठसण, वगैरे बरी होते. त्वचा चिरलेली असली तर अफू अधिक लौकर शोषली जाते. ह्मणून जखम व दुसरीं वेदनायुक्त क्षतें ह्यांवर अफूमिश्रित औषधें लावल्यानें वेदना लागलींच शमतात.

४. अफूचें मुख्य सत्व जें मारफिया ( Morphia ) ह्याची त्वचेखालीं पिचकारी मारण्याची युक्ति डा. **अलेक्झांडर वुड** ह्यानीं काढली. व तिचा उपयोग सांप्रत जारी होत आहे. तिच्या पासून कसल्याही असह्य वेदना तात्काळ शमतात, निद्रा येते व आंचके बंद होतात. तोंडानें अफूचा उपयोग करण्यापेक्षां पुष्कळदां तिची त्वचेखालीं पिचकारी देणेंच अधिक सोईचें व फायद्याचें होतें. कारण, तिचा अंमल जलद होतो, झालेला अंमल अधिक काळ टिकतो, आणि तीपासून भूक न मंदावतां शौचाचाही अवरोध होत नाहीं. आरंभीं $\frac{1}{6}$ ग्रेनपेक्षां अधिक मारफियाचा सहसा पिचकारीसाठीं उपयोग करूं नये. कारण, अधिक प्रमाणानें केव्हां केव्हां भयंकर लक्षणें होतात. मारफियाच्या पिचकारीपासून केव्हां केव्हां रोगी चंचल होतो, त्याचें डोकें फिरतें, त्याला कैफ चढतो, अतिशय मळमळतें, व वरचेवर वांती होते आणि तो थकून जातो. पिचकारी दिल्यानें दिवसभर मनुष्य पडून राहून त्याचे हातुन कामधंदा होत नाहीं. पिचकारी दिल्यावर बरेच तास रोग्यास निजून राहण्यास सांगितल्यास सहसा वरील लक्षणें न होऊन रोग्यास त्रास होत नाहीं.

५. पिचकारी प्रत्यक्ष एखाद्या शिरेंत ( Vein ) मारली गे-

ह्यास तीपासून तोंड लाल होतें, दाढा मिटतात, दम लागतो, हातां पायांस आचके येतात, आणि नाडी जलद चालते. हीं लक्षणें सुमारें पांच मिनिटें राहून मागाहून रोग्यास दरदरून घाम सुटतो. नेहमीं पिचकारी घेत गेल्यानें रोग्यास अफूची संवय होते, अर्थात् त्यामुळें मार्फियाचें प्रमाण वाढवावें लागतें. संवय लागल्यावर पिचकारी देण्याचें बंद केल्यास रोग्याची अफूबाजाप्रमाणें स्थिति होऊन त्याचे हातपाय गळून जातात. वेदना सोसणें पुरवलें पण ही स्थिति नको, असें रोग्यास वाटतें. ह्यासाठीं रोग्यास पिचकारीची संवय न लागावी ह्मणून ती अगदीं जरूरीचे वेळीं तेवढी द्यावी. पिचकारी कोठेंही मारण्यास हरकत नाहीं, पण त्वचा जेथें ढिली असते तेथें मारणें अधिक सोईचें होय. त्वचेची घडी चिमटीनें घट्ट धरून पिचकारीच्या सुईचें बारीक टोंक त्वचेखालीं घालावें आणि नंतर पिचकारी मारावी. रोग्यानें आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर आपल्या हातानें मारफियाची पिचकारी न घेतां ती हुषार वैद्याकडूनच घ्यावी.

६. कमरेंतील जुना वात, व माथेशूळ एखादे वेळीं एकदांच माराफेयाची पिचकारी घेतल्यानें नाहींसा होतो. तथापि बहुतकरून मारफियानें तूर्तातूर्तच बरें वाटतें, यामुळें पिचकारीचा उपयोग वेळोवेळीं करावा लागतो. वरीलसारखे विकार मारफियाची पिचकारी पुष्कळ दिवस घेतल्यानें कायमचे बरे होतात. पिचकारी हळूं हळूं रोज घेण्याचें सोडून एक दिवसाआड किंवा आठवड्यांतून दोनदां घेतली असतां वेदना कमी होऊन तिची कायमची संवय लागत नाहीं. कमरेंतील वात मारफियाचे पिचकारीनें एकदम नाहींसा होतो. असह्य पोटदुखींत किंवा रेतीचे अथवा पित्ताचे कण खालीं उतरतांना जी दुःसह पीडा होते तींत मारफियाच्या पिचकारीसारखा तात्काळ सुख देणारा दुसरा उपायच नाहीं. दांत फार दुखूं लागल्यासही मारफियाच्या पिचकारीनें आराम वाटतो. झोंप येण्यासाठीं मारफियाची पिचकारी देतात.

७. हृद्रोगामध्यें दम लागतो तेव्हां मारफियाची पिचकारी दिल्यानें रोग्यास बरें वाटतें. हृद्रोगानें जेव्हां छातीमध्यें एकदम कळ

उठते तेव्हांही मारफियाच्या पिचकारीशिवाय रोग्याच्या जिवास समाधान वाटण्यास दुसरें साधन नाहीं. जलद चाललेला दम कमी होऊन मारफियानें रोग्यास झोंप येऊन त्याचे अंगांत हुषारी येते. मारफियानें हृदयाचे अंगीं शक्ति येऊन फुप्फुसांतील झालेला रक्तसंचय कमी होतो. हृद्-रोगापासून होणाऱ्या श्वासामध्यें रोग्यास सुख देणारा मारफियाच्या पिच-कारीसारखा दुसरा उपायच नाहीं. ती देतांच, रोग्यास जी अगदीं मुळींच झोंप मिळत नाहीं ती मिळते. झोंप मिळाल्यामुळें रोगी हुषार उठतो व दम पुढें बराच वेळ कमी राहतो. सारांश, अशा स्थितींत रोग्याची पीडा कमी होऊन जवळचें मरण टळण्यास ह्यासारखा खा-त्रीचा उपायच नाहीं. हृद्रोगांत मारफियाची पिचकारी देण्यास पुष्कळ लोक भितात, पण तसें भिण्याचें मुळींच कारण नाहीं. कारण, त्यापासून कांहींएक अपाय न होतां फायदाच होतो.

८. गर्भारपणची अनिवार्य उलटी किंवा दुसऱ्या कारणापासून उद्भवणारी अनिवार्य उचकी देखील मारफियाचे पिचकारीनें राहते. महामा-रीच्या तिसऱ्या अवस्थेंत सुद्धां मारफियाची पिचकारी दिल्यानें पेटके व उलटी हीं बंद होतात, रोग्यास झोंप येऊन अंगांत उबारा येतो व नाडी चालूं लागते असा कांहीं डाक्तरांचा अनुभव आहे. खोकल्या-बरोबर छातींतून रक्त पडतें तेंही मारफियाच्या पिचकारीनें बंद होतें. मनुष्य वेडा झाला असतांना त्यास मारफियापासून निद्रा येते, जागा झाल्यावर त्याचे अंगीं हुषारी येते व त्याचा भ्रम जातो. तथापि त्याला मारफियाची अदत पडून तो त्याच्या स्वाधीन होतो, ही गोष्ट खरी आहे.

९. गळवें, चाळपुळी इत्यादिकांवर व भोंवताळीं आरंभींच अफूच्या घट्ट अर्काचा ( चरस ) दाट लेप दिवसांतून तीन चार वेळा लावावा ह्मणजे तीं दबतात. नच दबलीं तर तीं फार न वाढतां त्यांची पीडा कमी होते.

( पुढें चालू. )

# बाळरोगचिकित्सा.

( मागील अं. व. पुढें चालू. )

लेखक डा. विष्णुपंत भागवत एल. एम. ऍन्ड, एस.

९. नुसत्या जिभेच्या स्थितीवरून लेंकराचे कांहीं रोग ओळखतां येतात-

१. सर्व जीभ पांढरी झाली असतां ह्मणजे तीवर एक प्रकारचा पांढरा बुर्सा आला असतां अजीर्णांश व आंतड्यांत विकृति झाली आहे असें समजावें.

२. जीभ तांबडी, कोरडी व ऊन अशी असली तर मुखाचा दाह, व तसेंच जठराचाही दाह झाला आहे असें समजावें.

३. तोंड आलें असतां ह्मणजे तांबडे बारीक फोड किंवा सूक्ष्म व्रण तोंडांत व जिभेवर झाले असतां उपासमार किंवा दुसरी खाण्या-पिण्याची हयगय झाली असें समजावें.

४. जीभ निस्तेज व लबलबीत असून दोहों बाजूंस दांताच्या खुणा तीवर उमटल्या असतील तर रोग्याचे अंगीं अति अशक्तता आली आहे असें समजावें.

५.जिभेवर पांढरा बुरा आला असतां अंगांत ताप आहे असें समजावें.

६. जिभेवर पिंवळट बुरा आला असतां यकृत् व जठर हीं पुष्कळ दिवसांपासून विकृत झालीं आहेत असें समजावें.

७. जिभेवर तपकिरी रंगाचा बुरा आला असतां सन्निपात झाला आहे असें समजतें.

१०. याशिवाय जिभेच्या स्थितीचे दुसरे कांहीं प्रकार आहेत, पण ते ओळखण्यास जरा कठिण पडतें.

११. निरोगी तान्ह्या मुलाचा मल नारिंगी पिंवळसर किंवा हिरवट पिंवळा असा असावा आणि तो दुर्गंधयुक्त नसून त्यास नास-लेल्या दुधासारखा वास असावा. लहान मुलांना दिवसांतून ४।५ दां मल झाला पाहिजे. आणि तो अंड्यांतील पिंवळ्या मगजाइतका

साधारण रीतीनें घट्ट असावा.

१२. मूल जन्मताच एक दिवस त्याची उष्णता सुमारें १००° डिग्री असते, पुढें कमी कमी होत तिसरे दिवशीं ९८.६ होते. पुढें कांहीं दिवसांनीं ती ९९ होत असते,परंतु ती १००पेक्षां अधिक व ९७ पेक्षां कमी झाली कीं, कांहीं विकृति झाली आहे असें समजावें. याकरितां थर्मामेटर ह्मणजे उष्णतामापक यंत्र प्रत्येक मनुष्यानें- निदान कुटुंबीयानें- बाळगलें पाहिजे. त्याच्या योगानें सन्निपात, स्कार्लेट नांवाचा ज्वर, फुप्फुसदाह वगैरे रोगांची चिकित्सा करण्यास सोपें जातें.

१३. अगदीं लहान मुलांस थंडी वाजून ताप येत नाहीं हें प्रत्येकानें लक्षांत ठेविलें पाहिजे. परंतु मोठ्या माणसांना जशी थंडी वाजते तसे लहान मुलांस झटके येतात; किंवा मोठ्या माणसांचें जसें डोकें दुखतें तसें लहान मुलांना बेशुद्धपणा प्राप्त होतो. ह्मणजे मोठ्या माणसांच्या व लहान मुलांच्या अशा प्रकारच्या लक्षणांत एक प्रकारचें साम्य आहे असें ह्मटलें असतां चालेल. लहान मुलांत नाडीपेक्षां त्यांच्या अंगांतील उष्णतेपासून रोगांचा अधिक बोध होऊं शकतो.

१४. डा. फिनलेसन यानें लहान मुलांच्या उष्णतेसंबंधानें बरेच अनुभव घेतले आहेत ते असेः—

१. संध्याकाळीं लहान मुलांच्या अंगांतील उष्णता एक दोन अंश कमी होऊं शकते.

२. हें कमी उष्णतेचें मान झोंपेपूर्वीही होऊं शकतें.

३. ही उष्णता रात्रीं ७ पासून ९ पर्यंत अधिक असते व रात्रीं बारा वाजल्यावर अगदीं कमी होऊन दोहोंच्या पुढें हळू हळू वाढत जाते.

४. एकदम एका दिवसांतच १०४–१०५ उष्णता झाली तर तो सन्निपात ज्वर नाहीं असें समजावें. कारण, सन्निपातांत पहिले चार दिवस हळू हळू उष्णता वाढत जाते व सकाळीं कमी होते.

५. क्षयरोगांत संध्याकाळची उष्णता सकाळापेक्षां जरा जास्तच असते.

६. हळू हळू संध्याकाळीं उष्णतेचें मान कमी होणें हें संतत ज्वरांत व दुसऱ्या कित्येक ज्वरांत चांगलें लक्षण आहे असें समजावें. परंतु उष्णता कमी होऊन नाडी व बाकीचीं लक्षणें जास्त झालीं ह्मणजे शक्तिपात होऊन रोग दुःसाध्य असें समजावें. अशा वेळेस उत्तेजक अशींच औषधें दिलीं असतां मृत्यु केव्हां केव्हां टळतो. बहुतकरून मरणापूर्वी उष्णता एकदम कमी होते.

७. ताप १०२° पर्यंत असला तर तो साधारण ताप आहे असें समजावें. १०४°-१०५ पर्यंत झाला म्हणजे ज्वर कडक असून थोडीशी भयंकर स्थिति आहे असें म्हटलें असतां चालेल. १०६°-१०८° उष्णता झाली असतां मूल अत्यवस्थेंत आहे असें समजावें; तथापि म्हणजे मूल मृत्युमुखीं पडेल असेंच केवळ नाहीं.

१५. एखाद्या शीघ्रपरिणामी रोगांत मुलाची तिरवी दृष्टि झाली असतां रोग दुःसाध्य असें समजावें.

१६. मज्जाच्छादनाच्या रोगांत अशी दृष्टि झाली तर रोगी खात्रीनें मरतो असें समजावें.

१७. मेंदूंत रक्त सांखळलें असतां, तसेंच अफूचा विषप्रयोग झाला असतां, व झोंपेंत डोळ्यांतील बाहुल्या आकुंचन पावतात. तसेंच एखाद्या रोगांत त्या जर प्रसरण पावलेल्या असून प्रकाशाचा परिणाम त्यांवर कांहींही होत नाहीं अशी स्थिति असेल, तर ती भयंकर व हानिकारक आहे असें समजावें. एक बाहुली लहान व दुसरी मोठी अशी असेल तरीही वाईट; परंतु जंत झाले असतांना अशी स्थिति केव्हां केव्हां होते हें ध्यानांत ठेवावें.

१८. लहान मुलांच्या वयाप्रमाणें नाडीचे ठोके कमी जास्त असतात. ७ वर्षांपासून पुढें मुलांपेक्षां मुलींच्या नाडीचे ठोके जरा जास्त व जलद असतात. परंतु दोघांमध्येंही झोंपेंत नाडीचे ठोके सारखेच असतात. नाडी अगदीं मंद चालत असली म्हणजे मज्जेचा एखादा रोग झाला आहे असें समजावें.

१९. जन्मतांच एका मिनिटांत १३०–१४० नाडीचे ठोके

होत असतात. पहिले वर्षी १२०–१३०, दुसरे वर्षी १०५–११०, तिसरे वर्षी १००–१०५, चवथे वर्षी ९७—१००, पांचेव वर्षी ९०–९५, सहावे वर्षी ८८ पासून ९० व पुढें ७८ पासून ८०. पर्यंत नाडीचे ठोके भरतात.

२०. तान्ह्या मुलात रोग व त्याचीं लक्षणें यांमध्यें भारीसा संबंध नसतो. ह्मणजे रोग भयंकर नसून लक्षणें भयंकर होतात. तसेंच रोग भीतिप्रद असून लक्षणें वाईट नसतात. अति ताप, घालमेल, रडणें, आंचके, हीं लक्षणें जरी भयंकर आहेत तरी तीं एका दिवसांत अगदीं नाहींशीं होऊं शकतात.

२१. तान्ह्या मुलांना अति घाम कधींच येत नाहीं. फक्त अंग चिकट ओलसर असें मात्र होतें.

२२. तान्ह्या मुलांच्या शीघ्रपरिणामी रोगांत ताप पुष्कळदां कमी जास्त होतो.

२३. त्यांच्या पुष्कळ दिवसांच्या आजारांत ताप केव्हां केव्हां अगदीं कमीही होतो.

२४. ज्या वेळेस मुलें निजलेलीं असतात त्या वेळेस त्यांच्या नाडीचे ठोके १५।२० पर्यंत कमी भरतात. आणि खोकल्याच्या, रडण्याच्या वगैरे श्रमानें १५।४० पर्यंत ते अधिक होऊं शकतात.

२५. लहानपणीं रोग झाले असतां पुढें वाढ लवकर लवकर होऊं लागते.

२६. मूल पहिल्या महिन्या दोन महिन्यांत अति जलद वाढतें. वर्षाच्या अखेरीस सुमारें अर्धा फूट जास्त वाढलें पाहिजे. चौथ्या वर्षापासून १६ व्या वर्षापर्यंत दर वर्षी २ इंच प्रमाणें वाढलें पाहिजे. पुढें एक वर्ष १॥-२ इंच वाढून पुढें तीन वर्षें एकेक इंच प्रमाणें वाढलें पाहिजे. अस्थीचे रोग, गंडमाळा, वगैरे रोगांत वाढ चांगली होत नाहीं.

२७. मूल वर्षाचें झालें कीं,त्याला चालतां आलें पाहिजे. आणि चांगलें चालतां न येतां लंगडूं लागलें व पाय गुडघ्यांत दुखूं लागले तर मांडीच्या सांध्याचा रोग झाला आहे असें समजतें. ( पुढें चालू. )

# स्फुटलेख.

**हॅंप (गांजा) कमिशनचा रिपोर्ट.**– हा बाहेर पडून बरेच दिवस झाले. कमिशननें आपल्या रिपोर्टांत खालील गोष्टी सिद्ध करून दाखविल्या आहेत— बंगाल्यांत २०० मनुष्यांत १ मनुष्य गांजाचा उपयोग करितो आणि त्यांतील २० पैकीं एकच कायतो गांजाचा अतिरेक करणारा आढळतो. सरासरी एक मण गांजा १५००० बंगाली मनुष्यांना एक वर्षभर पुरतो. नार्थवेस्टर्न प्रांतांत तितकाच गांजा १०,००० माणसांना लागतो. मध्यप्रांतांत ११० मनुष्यांपैकीं १ मनुष्य गांजाचा उपयोग करितो, मद्रासेंत ९०० पैकीं एकजण व मुंबई इलाख्यांत २२० पैकीं १ जण गांजा ओढतो. एकंदरींत गांजाचा उपयोग फार होत चालला आहे असें कमिशनचें मत नाहीं व तीच गोष्ट सरकारासही कबूल आहे. ( कां नसावी? ) गांजाचें दुसरें रूप भांग. ती तर कित्येक लोकांत धर्मसंबंधी कृत्यांत अवश्य अशी मानली आहे. अर्थात् त्यांत हात घालणें म्हणजे मोठा जुलूम करणें असें कमिशनरांस व सरकारास वाटतें. गांजा ओढणें आणि भांग पिणें ह्यांचे नीतीसंबंधी होणाऱ्या परिणामाबद्दल कमिशनचें मत ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. गांजाचा उपयोग केल्यापासून त्या मनुष्याचा अथवा समाजाचा ह्मणण्याजोगा तोटा होत नाहीं, भांग तर अगदीं निरुपद्रविक पण हुषारी आणणारें पेय आहे. व अशासाठीं विशेषतः उन्हाळ्यांत पुष्कळ एकदेशी चांगले लोक तिचा जारीनें उपयोग करितात. गांजाचा अथवा चरसाचा उपयोग केल्यानें शरीरावर होणारे परिणामासंबंधी कमिशनचें ह्मणणें असें आहे कीं, माफक उपयोग केल्यानें त्यापासून समजण्याजोगें नुकसान होत नाहीं. ह्या पदार्थापासून मनुष्यें वेडीं होण्याचा फार संभव असतो, हेंही ह्मणणें कमिशनरांस पसंत नाहीं. कदाचित् थोडे लोक वेडे होतात असें गृहीत धरलें तरी तें वेड थोडावेळ टिकतें, असें सरकारचें ह्मणणें आहे. कमिशनपुढें झालेल्या ७०० साक्षीदारांपैकीं ६०० लोकांचें

ह्मणणें आहे कीं, ' गांजा माफक ओढणाऱ्या लोकांपासून शेजाऱ्यांस त्रास होत नाहीं. ' गांजापासून गुन्हे फार होतात ह्या ओरडींतही ह्मणण्याजोगा अर्थ नाहीं, असेंच उभयतांचें मत आहे. सरकार ह्मणतें कीं, गांजाचा उपयोग बंद करावा तर सुरा व दुसरे मादक पदार्थांचाही कां करूं नये असा प्रश्न साहाजिकच उद्भवतो. सारांश रयतेवर जुलूम करण्यास सरकार तयार नाहीं. केवढें आमचें न्यायी सरकार!

**इसबावर सोपा व खात्रीचा उपायः**— इसब हा व्याधि फार त्रासदायक व पुष्कळ दिवस राहणारा असून त्यावर पुष्कळदां उपचारांची मात्रा चालत नाहीं. हा व्याधि खालील उपायानें बरा होतो असें पुष्कळांच्या अनुभवास आलेलें आहे. मांदाराचीं ( पांढऱ्या फुलाची रुई ) पानें ऊन पाण्यांत गरम करून तीं पोटिसाप्रमाणें इसब झालेल्या जाग्यावर रोज एकदां बांधीत जावीं. ह्याप्रमाणें एक आठवडाभर केल्यानें इसम बरें होतें. अथवा आपल्या वैद्यकांत सांगितलेलें **अर्क तेल** तयार करून तें इसबावर लावावें. तें करण्याची कृति— तिळांचें तेल ४ शेर, रुईच्या पानांचा रस १६ शेर, हळदीची वस्त्रगाळ पूड १ शेर, हीं सर्व एकत्र करून रीतीप्रमाणें कढवून तेल तयार करावें.

**डोकें दुखण्यावर उपायः**— मांदाराचीं पानें विस्तवावर गरम करून डोक्यास बांधावीं, किंवा रुईचा चीक डोक्यास लावावा. चिकानें बारीक पुरळ येतो. चीक डोळ्यांत जाऊं देऊं नये व त्यासाठीं तो लावण्याचे आगोदर डोळ्यांस एरंडेल तेल लावावें ह्मणजे चिकानें डोळ्यांस इजा होत नाहीं.

**महामारीवर उपायः**— मांदाराचीं फुलें, मिरे व पांदेलोण हीं समभाग घेऊन त्यांचा खल करून वाटाण्याएवढ्या गोळ्या कराव्यात. मोठ्या मनुष्यास दोन गोळ्या प्रत्येक दोन दोन तासांनीं देत जाव्यात. ह्यापासून जुलाब व वांती लौकर कमी होऊन रोग्यास आराम पडतो. आरंभींच ह्या गोळ्यांचा उपयोग केल्यास रोगी सहसा जाया होतच नाहीं.

## कृष्णशास्त्री विवलकर वैद्य मु॰ आंजर्ले ता॰ दापोली जि॰ रत्नागिरी यांचीं जगत्प्रसिद्ध, सर्वोपयोगी, निर्दोष व रामबाण औषधें.

या जाहिरातीचे खालीं " विशेष सूचना " केली आहे ती वाचकांच्या अवश्य लक्ष्यांत असावी.

### १. वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साह-बुद्धि कांतिवर्धक व धातुपोष्टिक, सुवर्णमाक्षिक-मौक्तिक-कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१ शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें त्यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्व भागीं व त्याच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, कोणत्याही कारणांनीं आलेली अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, उन्हाळे, छातींतील रोग, मस्तकशूळ, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूळव्याधि, भगंदर, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूळ, कटिवात, वातरोग, निद्रानाश, चक्कर, कफातिरेक, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, सूतिकारोग, व्रण, हात, पाय, मूत्रमार्ग व शरीर यांचा दाह, ठणका, ग्लानि, अरुचि, मूत्राश्मरी व चित्तभ्रम इत्यादि अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले, नवीन किंवा जुनाट असले तरी अगदीं खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति, व बुद्धि हीं वाढतात. ज्यांस फिरण्याचे, अभ्यास करण्याचे लिहिण्याचे व शिकविण्याचे श्रम फार पडतात त्या सर्वांच्या अंगीं यांणीं

अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो व सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें. कोष्ठशुद्धि होते. कोष्ठांतील अनियमित व्यापारांपासून होणारे दुष्ट परिणाम टळतात. या अप्रतिम गुटिका अत्यंत उपयुक्त शोधानें केल्या असून यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें आहेत, सबब जास्त वर्णन येथें करीत नाहीं. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस या अत्यंत उपयोगी आहेत वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषध नाहींच असें स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात, यामुळें यांचा अतिशय खप सुरू आहे. हल्लीं या गोळ्यांत अंतर्वेदी, नेपाळ, काश्मीर इ० देशांतील अत्यंत शुद्ध, ताजे, महत्वाचे व मौल्यवान असे अनेक पदार्थ आणखी घालून त्यांची विशेष सुधारणा केली आहे आणि लोकाग्रहावरून केवळ परोपकारार्थ ह्मणून गोळ्यांचा दर फारच स्वस्ता केला आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व ट. खर्च माफ आहे. अनुपान ख० सोबत देऊं. एकदम १६ गोळ्यांस १ रु., ३६ गो० २ रु., ८० गो० ४ रु, व १३० गो० ६ रु.

## ३. थंडगार नेत्रांजन.

हें परम गुणकारक अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितो. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणार तिमिरांध्य, पडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भार, गळती, खाज्या, जळजळ, कंडू, फूट, चिकटा, ठणका, व लाली, इ. अनेक विकार तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यांस कोणत्याही कारणांनीं प्राप्त आलेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा बिलकूल न होतां बरे होतात.

दृष्टि तीव्र व थंडगार राहते. शिवाय जागरण, उन्हांत फिरणें

अग्नीचा शेक, उपदंशविकार, अतिवाचन, अतिव्यायाम, अतिमैथुन, अतिमद्यपान, अत्युष्ण व विदाही पदार्थ भक्षण, इ० कारणांनीं ज्यांचे डोळे बिघडतात त्यांस याचा फारच मोठा उपयोग आहे. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार बिलकुल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगीं आहे. २ तो० ड० १॥ रु०

## ४. कर्णस्त्रावनाशक अप्रतिम तेल.

हें उत्तम तेल कानांत घातल्यानें कानांतून पू वाहणें, तत्संबंधीं ठणका, कंडू, दाह रक्तस्राव, इ. विकार तत्काळ बरे होतात. कानांतील कोणत्याही प्रकारचे साधारण व्रण तर तत्कालच, परंतु कानाचा समूळ नाश करणारे जुनाट किंवा हाडीं खिळून बसलेले कितीही वयाचे मनुष्याचे व कोणत्याही कारणानें प्राप्त झालेले अनेक प्रकारचे असाध्य व्रण कोणतीही इजा किंवा आग वगैरे बिलकुल न होतां अगदीं खात्रीनें बरे होतात बाटलीस रु० १ शिवाय प्या० ख० दोन आणे. रोखीनें किंवा व्हॉ. पे. पार्सलनें खालील पत्यावर मागविल्यास पाठवूं. अनुपान खर्डा बाटलीसोबत.

५. **पर्म्यावर अपूर्व मिश्रण.**—कोणत्याही प्रकारचा नवीन किंवा जुनाट पर्मा, तत्संबंधी दाह, तिडीक, मूत्राची विवर्णता, संकोच किंवा मूत्रातिरेक इ. विकारांसह या मिश्रणापासून इजा बिलकुल न होतां व पथ्यसेवनाची खटपट नसतां ताबडतोब बरा होतो. पर्म्यावर इतकें प्रतिज्ञेचें औषध दुसरें नाहींच. बा. १ रु.

६. **दंतरक्षक पूड.**— ही चोळिल्यानें दंतसंबंधी सर्व विकार हिर्ड्यांचा रक्तस्राव व व्रण, पू, कीड इ. फारच त्वरित व नाजूक रीतीनें बरे होऊन दांत स्वच्छ व फार मजबूत होतात. ड. ६ आणे.

७. गजकर्ण, नायटे, खरूज इ. विकार ३ दिवसांत बरे होतात. ड. ६ आणे.

८. विंचवाचें विष हें औषध लावतांच उतरतें. ड. ८ आणे. इतकें औषध ४० मनुष्यांस पुरतें

वरील औषधें अत्यंत खात्रीचीं आहेत. त्यांणीं हजारों लोकांस गुण आला व नित्य येत आहे. अनुभवानंतर पक्की खात्री होईलच. याशिवाय आमच्या येथें कस्तूरीच्या उत्तम कातगोळ्या, तमाखूच्या अर्कांच्या कस्तूरीमिश्र गोळ्या, उत्तम सुगंधी अत्तरें व ग्रंथोक्त रसायनें, धातूंचीं भस्में, पाक, तैलें, चूर्णें, गोळ्या, घृतें, आसवें, द्राव, क्षार हेमगर्भादि रसायनें इ. औषधें माफक किंमतीस मिळतील. पाहाण्यासाठीं सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. अनुपान पत्रक औषधासोबत पाठवूं. पत्ता सुवाच्य. कोणीं प्रकृतिमान कळविल्यास रोगाचें निदान व योग्य चिकित्सा कळवूं. औषधें रेल्वेनें किंवा व्ही पी. नें विकत मिळतील. टपालखर्च वेगळा पडेल. गरीब लोकांस स्वस्त दरानें औषधें देऊं. जाहिरातीच्या खालील किंवा वरील पत्यावर मिळतील. या औषधांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून त्यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळविल्या आहेत व नित्य मिळत आहेत

**विशेष सूचना:—** आलीकडे वर्तमानपत्रांतून आंजलें व नजीकच्या मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या नवीन बऱ्याच जाहिराती सुरू झाल्या आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींच्या खालीं किंवा वर ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या ग्राहकांस भासण्याचा संभव आहे, यामुळें कदाचित् ग्राहकांचा घोंटाळा होईल. तरी अशा लोकांशीं व त्यांच्या जाहिरातींशीं आमचा कोणत्याही प्रकारें अगदीं संबंध नाहीं हें ग्राहकांनीं अवश्य लक्षांत ठेऊन, आमचीं औषधें मागणें तीं **“कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य मु० आंजलें ता० दापोली जि० रत्नागिरी”** या अगदीं बिनचूक सही व पत्यावर मागवावींत.

**कृष्णशास्त्री बिवलकर.**

**पत्ता—** मु० आंजलें, ता० दापोली, जिल्हा रत्नागिरी.

११००

## वर डब्या खपल्या.

या औषधानें हजारो लोकांचे डोळ्यांस गुण येऊन शेंकडों सर्टिफिकिटें आलीं आहेत. व आज ७ वर्षं ४० जिल्ह्यांत यांचा सारखा खप होत आहे. औषध महासुखकारक असून तान्ह्या मुलापासून वृद्धापर्यंत सारखा गुण करितें.

## फारच उत्तम डोळ्यांचें औषध.

१ डबीची किंमत १ रुपया. टपाल खर्च ८६. व्ह्याल्युपेबलनेंही पाठवूं. पूर्ण माहिती औषधासोबत. ज्यास्त घेतल्यास ६ डब्यांचे ५ रुपये, १२ डब्यांचे १० रुपये, ट. खर्च माफ.

रघुनाथ बापूजी वैद्य,
( लागवणकर ) माजी बुकडेपोकीपर,
मुक्काम पुणें, पेठ सदाशिव, घर नंबर
६७०

## महामारी.

हें प्रत्येक कुटुंबांत ठेवण्यायोग्य पुस्तक असून, विशेषतः जेथें चांगल्या वैद्याची मदत नाहीं अशा गांवांत सांथीचे दिवसांत तर फारच उपयोगी आहे. ह्यामधील उपाय अगदीं साधे व पाहिजे तेथें करतां येण्याजोगे आहेत. ह्या पुस्तकावर डा. भालचंद्र, डा. विश्राम, वगैरे विद्वान लोकांचे व वर्तमानपत्रकर्त्यांचे फार चांगले अभिप्राय आले आहेत. पुस्तकाची किंमत ८१० आहे. मुद्दाम टपालहंशील माफ केलें आहे.

म्यानेजर भिषग्विलास,
डा. रानडे यांचा दवाखाना, सोलापूर.

## जी. बी. नाईक कंपनीच्या

विजेच्या आंगठ्या, कडी, लेखण्या व गळपट्टे.


प्रत्येक वस्तूवर G. B. N. मार्क पाहून घेत जा.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

**रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे.**




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग, अशक्तपणा, संधिवायु, शिरोगतवायु, पोटांत वायु धरणें, कंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे, काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धाशिर्शी, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दखणें; गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मूळव्याधी, पाठींतील अशक्तता, निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे गळपट्टा- लहान मुलांचे दंतोत्पत्तीसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात. लेखणीहातास कांपरें व स्मरणशक्ति. अशा ह्या उत्तम गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

### विजेच्या वस्तूंची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगटीस किं. रु. १॥ | पि. पुतळ्यास किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगटीस किं. रु. ३ | चां. पुतळ्यास किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगटीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपट्टा किं. रु. १॥ |

कमरपट्टा किंमत रु० ६.

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही.पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठीकरितां बोटाचें माप पाठवीत असावें. पत्ता स्पष्ट असावा. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे. वंगी करणावळ माफ.

**जी. बी. नाईक आणि कंपनी.**

मुंबई, भायखळा, जुन्या दावणीसमोर; व पुणें, बुधवारपेठ.

पत्ता.-डा० रानडे यांचा दवाखाना, सोलापूर.

# भिषग्विलास

BHISHAGVILASA.

वैद्यकसंबंधी अनेक विषयांचें सुबोध भाषेंत
मासिक पुस्तक.

A Monthly Magazine in Marathi
to popularise Medicine.

आयुःकामयमानेन धर्मार्थसुखसाधनं ॥
आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः ॥ १ ॥

पुस्तक ४.    जुलई १८९९    अंक ४

विषयानुक्रम.    पान.


| | |
|---|---|
| शरीररचना .... .... .... .... .... | ९७ |
| उपयुक्त औषधसंग्रह- अफूचे उपयोग .... | ६ |
| निद्रा .... .... .... .... .... | ७४ |


सोलापूर

आनंदवृत्त छापखान्यांत छापिला.

वर्षाची आगाऊ वर्गणी ट. ह. सह ३ रु.

**अभिप्राय**.-- **संसर्गजन्य व्याधि** अथवा **गर्मीचे विकार** हें छोटेखानी डेमी ४९ पृष्ठांचें पुस्तक त्याच्या कर्त्याकडून आम्हांकडे अभिप्रायार्थ आलें आहे, त्यांचा आम्ही आभारपूर्वक स्वीकार करितों. कर्त्यानें उपोद्घातांत म्हटल्याप्रमाणें ' अमुक रोगावर रामबाण औषध, हटकून गुण, पथ्य नको- पाणी नको, गुण तीनच दिवसांत, गुण न आल्यास दुप्पट पैसे परत ' अशा प्रकारच्या जाहिराती- औषधांचा तूर्त ऊतच आला आहे. व त्याचे ग्राहक संसर्गजन्य व्याधिग्रस्तच असतात. कारण, त्यांचें सर्वच काम गुपचिप असल्यामुळें उपचारही गुपचिप करण्यास वरील औषधी आयत्याच साधनीभूत होतात. पण त्यापासून दुहेरी तोटा होतो-एक तर- असला फसवणुकीचा धंदा करणाऱ्या मूढ मंडळीस उत्तेजन मिळतें, दुसरें त्यांचा विकार चांगला बरा न होतां पाऱ्यासारख्या औषधी अव्यवस्थितपणानें त्यांच्या पोटांत गेल्यामुळें त्यांच्या देहाचें मातेरें होतें. ग्रंथकर्त्यानें, रोगाचा इतिहास व कारणें, ह्या सदराखालीं दिलेली माहितीही ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. त्यावरून हा रोग आपल्या देशांतला नसून यूरोपांतून आपल्या देशांत आला आहे असें स्पष्ट होतें. व तीच गोष्ट बरोबर दिसते. पोर्तुगीज लोकांबरोबर हा व्याधि इकडे आला असावा असें दिसतें. ' रोगस्वरूप निर्देश ' या सदराखालीं दिलेली माहितीही बरी आहे. पुढें **प्रमेहरोगविचार**, **मृदु अथवा साधारण चट्टे** ( ज्यास इंग्रजीत प्रायमरी सिफलीस ह्मणतात ), **कठिन चट्टे** ( सेकंडरी सिफलीस ), इत्यादि सदरांखालील माहिती चांगली ध्यानांत ठेविल्यास रोग्यास पुष्कळ उपयोग होणार आहे. उपसंहारांत सुद्धां पुनः ग्रंथकर्त्यानें **कामोत्तेजक, वीर्योत्पादक, धातुपौष्टिक, वीर्यस्तंभक**, इत्यादि विशेषणभूषित जाहिराती औषधांचा व **सिद्धमंत्रौषधी, ताईत, दोरे,** वगैरेंचा उल्लेख करून त्यांच्या पासून न फसण्याबद्दल वाचकांस इषारा केला आहे, तो सर्वत्रांनीं विचार करण्याजोगा आहे. ग्रंथकर्ता जात्या वैद्यकाचा धंदा करणारा नसून त्यानें वैद्यक विषयावर हा ग्रंथ लिहिला आहे, व तो जरी अगदीं त्रोटक आहे तथापि साधारण जनसमुदायास

# भिषग्विलास.

वर्ष ४ थें | अंक ४ | जुलई १८९९.

## शरीररचना.

( लेखक— डा. कृष्णराव गडबोले. )

( मा. अं व. पुढें चालू. )

**पृष्ठवंशतंतु** ( स्पायनलनर्व्हझ )

१. जे तंतु पृष्ठवंशांतील रज्जूच्या दोहों बाजूंपासून उत्पन्न होऊन दोहों पृष्ठमण्यांच्या मधील छिद्रांतून बाहेर पडतात त्यांस पृष्ठवंशतंतु ह्मणतात. हे एकंदर एकतीस आहेत. स्थानभेदानें त्यांचे पांच विभाग कल्पितां येतात ते येणेंप्रमाणें:— मानेंतील पृष्ठमण्यांमधून जे तंतु निघतात ते ग्रैवेयक ( सर्व्हायकल ), पाठींतील मण्यांमधून निघणारे ते पृष्ठ्य ( डॉर्सल ), कटिमण्यांमधून निघणारे ते कटितंतु ( लंबर ), त्रिकास्थीच्या छिद्रांतून निघणारे ते त्रिकतंतु ( सेक्रल ), व गुदास्थीपासून निघणारा तो गुदास्थितंतु ( कॉक्सिजियल ). पृष्ठवंशाच्या डाव्या बाजूकडून व उजव्या बाजूकडून एकसारखेच हे तंतु निघतात ह्मणून एका बाजूच्या तंतूंचें वर्णन केलें असतां पुरें आहे.

२. पृष्ठवंशांतील सर्व मणके एकास एक जुळतेवेळीं प्रत्येक वरील मणक्याचें अर्ध छिद्र व खालील मणक्याचें अर्धें छिद्र एकास एक जुळून एक पूर्ण छिद्र बनतें. याप्रमाणें वरपासून खालपर्यंत एकंदर एकतीस छिद्रें होतात आणि त्या प्रत्येक छिद्रांतून एकेक तंतु बाहेर पडतो. हीं जीं छिद्रें बनतात ह्मणून सांगितलें त्यांपैकीं मानेंतील पहिलें छिद्र मात्र दोहों मणक्यांच्या मध्यें नसतें; तर तें वरच्या बाजूस प्रत्यगास्थि व खालच्या बाजूस पहिला मणका अशीं दोन हाडें जुळून झालेलें असतें. प्रत्येक तंतु पृष्ठवंशरज्जूपासून दोन मुळांनीं उत्पन्न होतो, पुढें दोन्ही मुळें मणक्याच्या छिद्रांतून बाहेर पडण्यापूर्वीच

एकमेकांत मिळतात व त्यांपासून एक दोरक बनून छिद्रांतून बाहेर पडतो. छिद्रांतून बाहेर निघतां निघतांच पुनः त्या तंतूच्या दोन शाखा होतात. जी शाखा पुढल्या बाजूकडे वळते ती प्राक्शाखा व जी मागच्या बाजूस वळते ती प्रत्यक्शाखा होय.

३. ग्रैवेयक तंतूंच्या आठ जोड्या आहेत. वरील चार ग्रैवेयक तंतूंच्या प्राक्शाखांचे तंतु एकत्र मिळून **ग्रैवेयकतंतुसंघात** ( सर्व्हायकल प्लेक्सस ) होतो. प्रत्यक्शाखांच्या तंतूंचा **प्रत्यक्ग्रैवेयक तंतुसंघात** होतो. खालील चार ग्रैवेयक तंतूंच्या प्राक्शाखांचे तंतु व प्रथम पृष्ठतंतु हे एकत्र मिळून **भुजतंतुसंघात** ( ब्रेकियल प्लेक्सस ) होतो.

४. ग्रैवेयकतंतुसंघातांतील तंतूंचे मुख्य दोन विभाग होतात-एक उत्तान व दुसरा निम्न. उत्तानाचे पुनः दोन विभाग होतात- एक ऊर्ध्वगामी व एक अधोगामी. ऊर्ध्वगामीच्या मुख्य शाखा तीन आहेत, त्या मानेंतून वर चढत जाऊन कानाच्या त्वचेंत आणि प्रत्यगस्थीवरील त्वचेंत पसरतात. अधोगामीच्याही मुख्य शाखा तीनच आहेत, त्या मानेंतून खालीं जत्रूवरील त्वचेंत आणि छातीवरील त्वचेंत पसरतात. निम्नविभागापासून अनेक शाखा निघतात, त्या मानेंतील स्नायूंत पसरतात. या शाखांमध्यें एक तंतु विशेषेंकरून लक्षांत ठेवण्यासारखा आहे, त्याचें नांव **मध्यपटलतंतु** ( फ्रेनिकनर्व्ह ) असें आहे. हा तंतु चौथा व पांचवा ग्रैवेयक तंतु, पंचम व षष्ठ ग्रैवेयक तंतूंच्या योगानें झालेला एक तंतु, आणि प्रत्यंगतंतु, ( सिंपाथेटिक ) यांपासून होतो. हा मध्यपटलतंतु मानेंतून खालीं छातींत उतरतांना अधोजत्रु धमनीच्या प्रथमविभागावरून जातो. नंतर फुप्फुसावरण व हृदावरण या दोहोंमधून खालीं उतरत जाऊन मध्यपटलांत पसरतो. डावा मध्यपटल तंतु उजव्यापेक्षां लांब असतो. कारण, डाव्या तंतूस हृदयावयवास वेढा देऊन खालीं मध्यपटलाकडे जावें लागतें. प्रत्यक्ग्रैवेयक तंतूंचे मुख्य दोन विभाग होतात- एक आंतील व दुसरा बाहेरील. आंतील शाखा पाठीच्या कण्यावरील त्वचेंत पसरतात. बाहेरील शाखा आंतल्यापेक्षां लहान असते. तिचे तंतु पाठीच्या कण्याच्या बाजूकडील स्नायूंत पसरतात.

५. **भुजतंतुसंघात** (ब्रेकियल प्लेक्सस).- पूर्वी सांगितलेंच आहे कीं, हा संघात मानेंतून निघणारे जे खालील चार तंतु त्यांच्या प्राक्शाखा व प्रथम पृष्ठतंतूची प्राक्शाखा मिळून होतो. हा संघात मानेपासून खालीं उतरतो तो जत्रूच्या खालून खाकेकडे वळतो व पुढें तसाच खाकेच्या खळगींत शिरतो. हा प्रथम कक्षधमनीच्या बाहेरल्या बाजूस असतो. नंतर तो विभागून त्या धमनीस वेष्टून टाकितो. या संघाताचे प्रथम मोठे तीन दोरक होतात. हे दोरक कोणकोणत्या तंतूंच्या योगानें होतात त्यांची व्यवस्था पुढें लिहिल्याप्रमाणें:— पंचम व षष्ठ ग्रैवेयक तंतु एकत्र मिळून प्रथम दोरक बनतो; सप्तम ग्रैवेयक तंतूचा एक दोरक होतो तो द्वितीय दोरक; अष्टम ग्रैवेयक तंतु व प्रथम पृष्ठतंतु एकत्र होऊन तृतीय दोरक होतो. मग या तिन्ही दोरकांच्या पुनः प्रत्येकीं दोन दोन शाखा होतात. ज्या पुढल्या अंगास वळतात त्या प्राक्शाखा व ज्या मागें वळतात त्या प्रत्यक्शाखा. यांच्या पुनः पुढें तीन शाखा बनतात त्या अशा- प्रथम दोरकाची व द्वितीय दोरकाची प्राक्शाखा एकत्र मिळून जो एक तंतु होतो त्याचें नांव कक्षाबहिर्दोरक ( औटरकॉर्ड ), तृतीय दोरकाच्या प्राक्शाखेचा जो तंतु तो कक्षांतर्दोरक ( इनरकॉर्ड ). प्रथम, द्वितीय व तृतीय दोरकाच्या तीन प्रत्यक्शाखा मिळून कक्षाप्रत्यक्दोरक बनतो ( पोस्टीरियर कार्ड ). या तीन दोरकांपासून पुढें अनेक शाखा निघतात, त्या हातांतील त्वचेंत व स्नायूंत पसरतात. त्यांपैकीं मुख्य तीन शाखांचें मात्र येथें वर्णन करितों. त्यांचीं नांवें येणप्रमाणें. **प्रकोष्ठ मध्यशाखा, प्रकोष्ठांतःशाखा व प्रकोष्ठबहिःशाखा.**

६. प्रकोष्ठ मध्यशाखा ( मीडियन ) ही शाखा कक्षांतर्दोरक व कक्षाबहिर्दोरक या दोहोंपासून निघणारे तंतु एकत्र मिळून होते. हे तंतु कक्षधमनीच्या दोहोंबाजूंकडून पुढें येऊन त्या धमनीस आलिंगून एकत्र होतात. मग अशा रीतीनें झालेली ही शाखा भुजांतून खालीं उतरते तेव्हां प्रथम भुजधमनीच्या बाहेरल्या बाजूस असते. परंतु पुढें पुढें त्या धमनीस वलांडून तिच्या आंतल्या अंगास येते.आणि पुढें अशीच

खालीं उतरत उतरत कोपराच्या पुढील खळगीच्या मध्यभागीं येते, व पुढें प्रकोष्ठाच्या मध्यभागांतून जाऊन मणगटांतून तळहाताच्या मध्यापर्यंत जाते व तेथें तिच्या पांच शाखा होतात–त्यांपैकीं पहिल्या दोन अंगुष्ठाच्या दोहों कांठांवरून टोंकापर्यंत पसरत जातात; तिसरी शाखा तर्जनीच्या एका बाजूस ह्मणजे अंगठ्याकडील बाजूंत पसरते; चौथी शाखा तर्जनी व मध्यमा यांच्यामधील बेचकापर्यंत येऊन दुभागते आणि त्या बेचकाच्या दोहों बाजूंस त्या बोटांच्या टोंकापर्यंत पसरते; पांचवी शाखा मध्यमा व अनामिका या दोहोंमधील बेचकापर्यंत येऊन चौथीप्रमाणेंच त्या त्या बोटाच्या शेवटापर्यंत पसरते.

७. **प्रकोष्ठांतःशाखा** ( अल्नरनर्व्ह ) ही कक्षांतर्दोरकापासून निघते. ही शाखा प्रकोष्टमध्यशाखेहून लहान असते. बाहूच्या आंतील बाजूकडून ही खालीं उतरत उतरत कोपराच्या आंतील टोंकावरून खालीं प्रकोष्ठांत येते. मग प्रकोष्ठाच्या आंतील कांठाकडून मणगटापर्यंत येऊन पुढें तळहातांत शिरते, तेथें तिच्या दोन शाखा होतात एक उत्तान-व एक निम्न. प्रकोष्टांतः शाखा कोंपराच्या आंतील टोंकावर फारच उथळ असते त्यामुळें कधीं कधीं कोपरास धक्का बसला असतां या शाखेस इजा पोंचते व त्यामुळें करंगळीपर्यंत हातास मुंग्या येतात, याचा अनुभव आपणांस नेहमीं येतो. उत्तानशाखा करभ प्रदेशाकडून जाते आणि बेचकाच्या जवळ आली ह्मणजे विभागते, तेव्हां तिच्या तीन शाखा होतात. एक शाखा करंगळीच्या आंतील बाजूकडून तिच्या शेवटापर्यंत जाते व दुसरी शाखा अनामिका व कनिष्ठिका यांच्या मधील बेचकापर्यंत येऊन दुभागून त्या त्या बोटांच्या कांठारून त्यांच्या शेवटापर्यंत जाते. तिसरी शाखा प्रकोष्ठ मध्यशाखेच्या एका तंतूस जाऊन मिळते. निम्न शाखा ही तळहातांत खोल उतरून करंगळीच्या स्नायूंस मिळते.

८. **प्रकोष्ठबाहिःशाखा**. ( रेडियलनर्व्ह ) ही कक्षा प्रत्यग्दोरकाच्या एका मोठ्या शाखेची ह्मणजे [ मस्क्युलोस्पायरलची ] एक शाखा आहे ही प्रकोष्ठाच्या पुढल्या बाजूनें बाहेरील कांठाकडून खालीं मण-

गटाकडे उतरत जाते आणि मणगटाच्या वरल्याबाजूस सुमारें दोन अंगुलांवर आली ह्मणजे तेथें तिच्या दोन शाखा होतात. एक बहिःशाखा व दुसरी अंतशाखा. बहिःशाखा अंगठ्याच्या बाहेरील बाजूकडून टोंकापर्यंत जाते. अंतःशाखेच्या आणखी पुष्कळ बारीक शाखा होतात त्या तर्जनी व मध्यमा यांच्या मागील बाजूस पसरतात. ( पुढें चालू. )

## उपयुक्त औषधीसंग्रह.

### अफूचे उपयोग.

( मा. अं. व. पुढें चालू. )

१०. अफूचा किंवा मार्फियाचा अर्क डोळ्यांत घातल्यास थोडा झोंबतो, डोळे लाल होतात, आणि त्यांचा थोडासा दाहही होतो. अफूनें किंवा अफूच्या अर्कानें कनीनिका ( बाहुल्या ) संकोच पावतात. किडलेला दांत दुखत असल्यास नुसती अफू किंवा दुसऱ्या औषधाशीं ती मिश्र करून तें मिश्रण दांताच्या खळग्यांत बसविल्यास **दांताचा ठणका** राहतो.

११. अफू मोठ्या प्रमाणानें पोटांत गेल्यास तोंड व घसा कोरडा पडतो. मार्फियाची पिचकारी घेतल्यानेंही तशीच स्थिति होते. जेव्हां **खोकला** क्षयादि रोगांमध्यें घशाचे स्थितीवर अवलंबून असतो ह्मणजे घसा लाल होऊन, किंवा त्याचा दाह होऊन, अथवा त्यांत क्षत पडून खोकला उद्भवतो, तेव्हां वरचेवर सारखी ढास लागून रात्रीं तर ती फारच त्रासदायक होते. अशा प्रकारच्या खोकल्यांत थोडा मार्फिया अथवा अफू, मधांत, पाकांत, लेहांत अथवा डिंकासारख्या चिकट पदार्थाशीं मिश्र करून, घशास लावल्यास खोकला नाहींसा होतो. हा उपचार पोटांत मार्फिया किंवा अफू घेण्यापेक्षां चांगला असा नेहमींचा अनुभव आहे. घशांत अफू किंवा मार्फिया मधासारख्या चिकट पदार्थाशीं मिश्र करून लावल्यानें त्याची श्लेष्मलत्वचा अंशतः सुंद होऊन खोकला नाहींसा होतो. **जीर्णक्षयांतील खोकल्यावर-**

ही हा उपाय चांगला आहे. प्रत्यक्ष **फुप्फुसरोगापासून खोकला** येत असला तरी वरीलप्रमाणें चिकट पदार्थाबरोबर अफू अथवा मार्फिया घशास लाऊन तो हळू हळूं विरघळून पोटांत जाऊं दिल्यास एकदम पोटांत अफूची गोळी किंवा अर्क देण्यापेक्षां अधिक चांगला उपयोग होतो. ह्याचें कारण हेंच कीं, औषधींच्या अंगीं असा विलक्षण गुण आहे कीं, ‘ ज्या इंद्रियावर त्यांचा परिणाम घडण्यास पाहिजे आहे त्या इंद्रियास जाणाऱ्या मार्गाच्या द्वारास फक्त त्या लाविल्यानें त्या आपला गुण लौकर करितात. ’

१२. **पडशांत** अथवा **खोकल्यांत** मार्फिया किंवा अफू देऊं नये असें कित्येकांचें म्हणणें आहे व तें म्हणणें कांहीं स्थितींत पुष्कळ अंशानें बरोबर आहे.ह्मणजे जेव्हां कफ पुष्कळ पडतो, आणि रक्तशुद्धीचा व्यापार नीट न चालल्यामुळें त्वचा काळवंडते, अशा स्थितींत अफू किंवा अफूसारखीं दुसरीं औषधें कीं, ज्यांपासून गाढ झोंप येते, तीं औषधें मोठ्या सावधगिरीनें दिलीं पाहिजेत; नाहींतर कफ फुप्फुसांत सांचून श्वास गुदमरून भयंकर परिणाम होण्याचा संभव आहे. पण कफ मोकळा सुटतो, घसा घुरघुरत नाहीं, आणि रक्ताची शुद्धि नीट होत आहे अशा स्थितींत जेव्हां खोकल्याची उबळ दांडगी व वरचेवर येते तेव्हां अफू किंवा अफूमिश्रित दुसरीं औषधें दिल्यानें ती कमी होऊन कफही कमी पडूं लागतो. कारण, वरचेवर खोकल्याची उबळ आल्यानें श्वासनलिकेच्या लहानसान शाखांची श्लेष्मलत्वचा उत्तेजन पावून तींतून कफाचा पुष्कळ जो स्राव उत्पन्न होतो तो खोकल्याची ऊबळ कमी झाल्यानें आयताच उत्पन्न होण्याचा बंद होऊन, कफ कमी पडूं लागतो.

१३. अफू पोटांत घेतली असतां जठरांत उत्पन्न होणारा **पाचकद्रव** ( ग्यास्ट्रिकज्यूस ) व जठराची पचनसंबंधी **हालचाल** हीं कमी होतात, अर्थात् त्यामुळें अन्नपचन चांगलें होत नाहीं. जेवणाचे आगोदर अफू दिली असली व जेवणानंतर चार सहा तासांनीं सुद्धां त्या मनुष्यास वांती झाली तर वांतींत अर्धवट पचलेलें अन्न पडतें.

यावरून अफूच्या योगानें पचनशक्ति किती मंद होते हें स्पष्ट दिसून येतें. त्वचेखालीं मारफियाची पिचकारी दिल्यानेंही असाच परिणाम होतो. ह्यावरून ही गोष्ट सिद्ध होते कीं, ' जेवणाचे अगदीं आगोदर अथवा मागून अफू अथवा अफूमिश्रित औषधें देऊं नयेत.' पण रोग्याची क्षुधाच कमी व्हावी आणि कोठ्याची हालचालही मंद पडावी असा हेतु असल्यास अफूचा उपयोग जेवणाचे आधीं अथवा मागोमाग करण्यास हरकत नाहीं.

१४. रात्रौ अफू घेऊन निजलें असतां कांहींना प्रातःकाळीं उठल्यावर मळमळ सुटते किंवा वांतीही होते. सबब त्यापासून भिण्याचें कारण नाहीं.

१५. जठराचे अनेक रोगांत होणारी **वांती** व **वेदना** कमी होण्यासाठीं अफू अथवा मारफिया पोटांत देतात. अर्थात् जठरांत क्षत पडलें असतां अथवा दुष्टग्रंथि ( क्यानसर ) झाला असतां किंवा अति सुरापानानें जठराचा दाह झाला असतां अफूचा उपयोग वरील लक्षणांवर चांगला होतो. अत्यंत सुरापानापासून क्षुधा मंद झाल्यास किंवा मळमळ सुटूं लागल्यास व पोट दुखूं लागल्यास शक्तिवर्धक औषधाबरोबर थोड्या प्रमाणानें मार्फिया जेवणाचे पूर्वी दिल्यास फार उपयोग होतो. जेवणानंतर **पोट दुखून घसा जळजळूं लागतो** त्यावर त्रिसमथबरोबर मार्फिया मिश्र करून देतात.

१६. अफूचा परिणाम ज्याप्रमाणें कोठ्यावर होतो त्याप्रमाणेंच आंतड्यांवर ( आंत्रांवर ) होतो; ह्मणजे अफूपासून आंतड्यांतील रस व हालचाल हीं कमी होतात, अर्थात् त्यामुळें निरोगी स्थितींत **अवष्टंभ** होतो व रुग्ण स्थितींत **हगवण** लागली असतां ती बरी होते. अफू पोटांत घेतल्यानें अवरोध होऊन जितकें असमाधान उत्पन्न होतें तितकें मार्फियाची पिचकारी घेतल्यानें होत नाहीं. कित्येक लोकांनीं, अगदीं थोड्या प्रमाणानें, अफू, अफूचा अर्क अथवा मार्फिया घेतला असतां पुढें एक दोन दिवस त्यांना काळसर मल व तांबडी लघवी होते.

१७. **नूतन** किंवा **जुनाट** हगवणींत अफू किंवा अफूचें सत्व

मार्फिया हीं दिल्यानें हगवण राहून रोग्यास समाधान वाटतें. मात्र नूतनें हगवणींत पोटांतील अपक्क किंवा उपद्रविक पदार्थ बाहेर पडल्यानंतर अफूचा उपयोग करावा. विशेषतः जीर्ण आमांशांत व हगवणींत अफूचा उपयोग चांगला होतो. क्षयरोगाच्या हगवणींतही अफूचा उपयोग बरा होतो.

१८. **सान्निपात ज्वरांत** रात्रौ थोड्या प्रमाणानें अफू दिल्यास दुहेरी उपयोग होतो. ह्मणजे रोग्यास झोंप नसून तो मोठ्यानें किंवा हळूं हळूं बडबडत असल्यास अफूपासून त्याला बहुधा झोंप येऊन त्याची बडबड कमी होते, व हगवण असल्यास ती बंद होते किंवा हगवणीचा उपद्रव होतच नाहीं.

१९. **एक प्रकारचें अग्निमांद्य** व तज्जन्य **हगवण** हीं अफू थोड्या प्रमाणानें दिल्यास बरीं होतात. ह्या स्थितींत जठराची व आंत्राची हालचाल नेहमींपेक्षां अधिक झाल्यामुळें अन्न पोटांत जातांच तें अर्धवट पचलेल्या स्थितींतच जठरांतून खालीं आंत्रांत उतरतें. आंत्रांत उतरल्यावर तें अपक्क अन्न आंत्रास टोंचतें व त्यांत आंत्राचें चलनही जठराप्रमाणें जलद झाल्यामुळें अन्न पोटांत जातांच तें हगवणीच्या रूपानें अपक्क स्थितींत लौकर बाहेर पडतें. अशा प्रकारच्या रोग्यास नेहमीं क्षुधा लागणें, व पोट रिकामें झाल्यासारखें वाटणें, हीं लक्षणें होतात. अन्न पोटांत घेतल्यावर कांहीं वेळ त्यास बरें वाटतें, परंतु त्याचें नीट पचन न झाल्यामुळें व त्यांतील पोषक रस रक्तांत शोषण होण्याचे आगोदरच तें अन्न गुदद्वारानें बाहेर पडल्यामुळें शरीरपोषण नीट होत नाहीं, अर्थात् वरील लक्षणें पुनः लागलींच सुरू होतात. अशा प्रकारच्या अग्निमांद्याचीं मुख्य लक्षणें ह्मटलीं ह्मणजे जठर रितें झाल्यासारखें वाटणें, अन्न घेतांच थोडा वेळ बरें वाटणें, जेवणानंतर लौकरच किंवा क्वचित् जेवण होतां होतांच अपक्क अन्नाचा जुलाब होणें व इतर वेळांत बहुधा शौचास न होणें, हीं होत. सहा वर्षांच्या वयापासून बारा वर्षांच्या वयापर्यंतच्या मुलांना विशेषतः अशा प्रकारचें अग्निमांद्य होण्याचा फार संभव असतो, त्यावर अफूच्या अर्काचे दोन

पासून ५ थेंब जेवणाचे थोडे आगोदर दिल्यास चांगला आराम पडतो. ह्मणजे एवढ्या अर्कानें जठराच्या व आंत्राच्या स्नायूंचें फाजील चलन-वलन बंद होऊन अन्नपचन होईपर्यंत त्यास अवधी मिळते. अशा विकारांत अफूपेक्षांहीं **सोमलाचा** अधिक उपयोग होतो. ( सोमलाचे औषधी उपयोग लौकरच देऊं. )

२०. थोडथोड्या अवकाशानें व थोड्या प्रमाणानें अफू पोटांत देत गेल्यास पोट दुखत असतांना राहतें. हा त्रासदायक विकार बहुधा अवष्टंभापासून होतो व पोट दुखतांनाही अवष्टंभ असतोच. यासाठीं रेचकाबरोबरच थोडी अफू अथवा अफूचा अर्क मिसळून द्यावा. अफूच्या योगानें आंत्राच्या स्नायूंचें झालेलें संकोचन ढिलें होऊन आंत्रांतून मल खालीं खालीं लोटला जाण्यास होणारा अडथळा नाहींसा होतो.

२१. **आंत्रांच्या दाहांत, आंत्रावरणाच्या दाहांत**, अथवा **पोटांत लागलेल्या आघातापासून उद्भवलेल्या दाहांत** अफू दिल्यानें आंत्रांच्या स्नायूंची हालचाल नाहींशी होऊन दाह पावलेल्या आंत्रांस विश्रांति मिळते व रोग्यांची पीडाही कमी होते, एवढेंच नव्हे, पण अफूपासून दाह शमन होण्यासही चांगली मदत होते. मात्र अशा प्रसंगीं अफूचें प्रमाण, अपाय न होण्याच्या मर्यादेपर्यंत, लौकर लौकर वाढवावें लागतें. ह्मणजे प्रत्येक दोन अथवा तीन तासांनीं तीन तीन किंवा चार चार ग्रेनपर्यंत सुद्धां अफू पोटांत द्यावी लागते.

२२. अनेक कारणांसाठीं अफू किंवा अफूचा अर्क बस्तीच्या रूपानें गुदकोंडांत घालावा लागतो. एक औंस डिकाच्या गरम पाण्याबरोबर २०।३० थेंब अफूच्या अर्काचा बस्ति दिल्यास **जुनी** अथवा **नूतन हगवण**सुद्धां राहते; लहान मुलांना जेव्हां अतिशय हगवण लागते व ती इतर उपायांनीं रहात नाहीं, तेव्हां वरच्याप्रमाणें अफूच्या अर्काचा बस्ति देणें मोठा उत्तम उपाय आहे. लहान मुलांना भयंकर हगवण लागून ती तशीच कांहीं तास राहिल्यास पुष्कळ मुलें जाया होतात. अशासाठीं वरील उपाय ताबडतोब केल्यास जुलाब बंद होऊन लेंकराच्या जिवाचा धोका टळतो. **सन्निपात ज्वरांत, क्षयांत** अथवा

**आमांशांत** लागलेल्या हगवणींत जेव्हां इतर उपायांची मात्रा चालत नाहींशी होते तेव्हां अफूचा अर्कमिश्रित बस्ति दिल्यानें पुष्कळ उपयोग होतो. आंत्रांत अथवा गुदकांडाजवळच्या इंद्रियांत कोणत्याही कारणानें वेदना होऊं लागल्यास त्या वरील उपचारानें शमतात, मूत्रमार्गांत अथवा जननेंद्रियांत होणाऱ्या अनेक व्याधींपासून उद्भवलेल्या वेदना वरील उपायानें दूर होतात. गुदांत, बोट जाईल तोंपर्यंत, अफू अथवा मारफियामिश्रित फलवर्ती घातल्यासही वरील प्रकारच्या वेदना शमण्याचे कामीं चांगला उपयोग होतो, पण तो अफूमिश्रित बस्तीच्या खालोखाल होय.

२३. **मूळव्याधींचे मोड सुजून दुखूं लागल्यास** अथवा **गुदाभोंवतीं भेगा पडून त्या प्रत्येक शौचाचे वेळीं फार पीडा करितात** त्यांवर कोणत्याही स्तंभक व मृदु मलमांत अफू मिश्र करून लाविल्यास फार सुखावह होतें. मात्र ह्या उपचाराबरोबर सौम्य अशा सारक औषधांचाही- त्रिफळा, गुलकंद, एरंडेल गंधक, इ० उपयोग केला पाहिजे.

२४. बस्तीवाटें गुदकांडांत पोंचलेली अफू रक्तांत शोषण पावून तिचा परिणाम दूरच्या इंद्रियांवरही होतो. तोंडानें अफू देऊन झोंप येत नाहीं तेव्हां गुदावाटें पोंचलेल्या अफूनें खातीनें झोंप येते. अग्निमांद्यामुळें पुष्कळदां दिवसांचे दिवस निद्रा येत नाहीं तशा स्थितींत अथवा दुसऱ्या तीव्र व्याधींपासून रोग बरा होत असतांना रोग्यास निद्रा येत नाहीं अशा स्थितींत गुदावाटें अफूच्या अर्काचा ( Tinct opii ) बस्ती दिल्यास झोंप चांगली येते. **मदात्ययामध्यें**( Delirium Tremens) ह्मणजे सुरापानापासून मनुष्यास उन्माद होतो त्यांत किंवा कांहीं आघातापासून वायु होतो त्यांत अफू तोंडावाटें दिल्यापेक्षां गुदावाटें देणें अधिक फायद्याचें होय. अफूच्या अर्काचें प्रमाण निरनिराळ्या स्थितींत कमजास्ती असतें. स्थानिक पीडा कमी करण्याची असल्यास थोडें प्रमाण बस्स आहे, परंतु झोंप येण्यासाठीं अफूच्या अर्काचा बस्ती देणें झाल्यास तोंडानें द्यावयाच्या प्रमाणापेक्षां तिप्पट अथवा चौपट प्रमाण

पुष्कळदां द्यावें लागतें. परंतु कांहींवेळ आगोदर सारक औषधानें अथवा साध्या बस्तीनें गुदकांड स्वच्छ करून अफूचा अर्क नेहमींच्या प्रमाणानें ( १९-३० थेंब ) बस्तीशीं मिश्र करून देणें पुरें होतें.

२५. अफूंतील मुख्य घटक द्रव्यें रक्तामध्यें ताबडतोब जाऊन पोंचतात. ह्मणजे अफू पोटांत घेतली किंवा तिची त्वचेखालीं पिचकारी मारिली तथापि लक्षणें एकसारखींच होतात.

२६. अफूची संवय नसलेल्या मनुष्यानें थोड्या प्रमाणानें अफू घेतल्यास त्याचा मेंदू शांत व आनंदी होतो, पुढें पन्नास साठ मिनिटांचे आंत त्याला झोंप येऊं लागते; चांगली झोंप नच आली तरी शारीरिक व मानसिक विश्रांति त्यास मिळाल्यावांचून राहत नाहीं. अफू घेतल्यानंतर १०।२० मिनिटांचे आंतच नाडीचे आठ दहा पर्यंत ठोके वाढतात व नाडी अधिक जोरानें चालूं लागते. परंतु अर्ध्या पाऊण तासाचे आंतच पुनः वाढलेले ठोके कमी होतात. घसा व तोंड हीं कोरडीं होतात व अंगास पुष्कळ घाम येतो. अफू मोठ्या प्रमाणानें ह्मणजे २ ग्रेन पासून ३ ग्रेनपर्यंत घेतांच प्रथम वृत्तींत चांचल्य उत्पन्न होतें, कानांत आवाज होतात व कनीनिका ( बुबुळें ) संकोच पावतात; मन लहान मोठ्या विचारांत गोंधळून जातें आणि मनुष्य बेसावध होऊन वायु झाल्यासारखा बडबड करूं लागतो; डोकें जड व भरल्यासारखें वाटतें, ज्ञानेंद्रियें मंद होतात आणि मग निद्रा येते. पुष्कळदां निद्रा फारच गड्द येते, घसा घरघरूं लागतो आणि अनेक वेडीं वांकडीं स्वप्नें पडतात. नाडी प्रथम पूर्ण व जलद वाहते पण पुढें लागलींच मंद होते.

२७. **सन्निपातादि विशेष** अथवा **दाहयुक्त ज्वरांत** निद्रा आणणाऱ्या औषधांचा, त्यांत विशेषतः अफूचा, फारच उपयोग होतो. अशा रोग्यांपैकीं कांहींना प्रथमारंभींच त्यांची मज्जाशक्ति क्षीण होऊं लागल्याचीं सूचक चिन्हें होतात व त्याचें कारण निद्रेचा अभाव हेंच असतें. निद्रेच्या अभावामुळें मज्जेची शक्ति क्षीण होते व त्यापासून

रोग्याचें मन भटकूं लागतें. आपोआप किंवा औषधाच्या सहाय्यानें झोंप न आल्यास रोग्यास वायु होऊन तो दांडगाई व आरडाओरड करूं लागतो अथवा हळूं हळूं बडबड करीत पडून राहतो. मज्जाशक्तीचा ऱ्हास अधिक झाल्यामुळें हात पाय व बाहेर पडलेली जीभ हीं कांपूं लागतात आणि स्नायूंस हिसके बसतात; जीभ कोरडी पडते, क्षुधा, पचन व अन्नाचे विपाक हीं कमी होतात. इतकी मज्जाशक्ति नष्ट होऊनही कांहीं वेळ हृदयाची क्रिया चांगली चालली असली तथापि लौकरच तींत क्षीणता येऊं लागली असें आपणांस अशक्त व जलद चाललेल्या नाडीवरून समजून येतें. एकदां अशी नाजूक स्थिति येऊन पोंचली कीं, रोगी बचण्याचा संभव फारच कमी असतो. मज्जाशक्ति क्षीण होण्याचे आगोदर ह्मणजे वेळेवारी जर अफू किंवा अफूचा अर्क दिला तर त्यापासून रोग्यास निद्रा मिळून समाधान वाटतें व मेंदू अशक्त होत नाहीं; अर्थात् त्यामुळें उत्तेजक औषधें देण्याचें फारसें कारणच राहत नाहीं. बहुतकरून अफूच्या अर्काचे १०-१५ थेंब दिल्यास वरील स्थितींतल्या रोग्यास चांगली झोंप येते, तथापि त्या अर्काबरोबर क्लोरल ( Chloral ) चे १०-१५ ग्रेन मिश्र करून दिल्यास झोंप आल्यावांचून कधींही राहत नाहीं. वायु होऊन रोगी हळूं हळूं बडबडत असल्यास नुसती अफू, किंवा क्लोरल व अफू, देण्यापासून चांगला उपयोग होतो. मारफियाची त्वचेखालीं पिचकारी देणेंही ह्या स्थितींत चांगलें. मज्जाशक्ति अतिशय कमी झाली असतांना अफू दिल्यापासून रोग्याच्या स्थितींत पुष्कळ सुधारणा होते. रोग्यास झोंप नसून हातपाय कांपत असले अथवा त्यांस आंचके येत असले, जीभ तांबूस व कोरडी होऊन कांपत असली, त्वचा कोरडी असली, आणि नाडी सूक्ष्म व जलद चालत असली तर अफू दिल्यापासून रोग्यास पुष्कळ तास झोंप मिळते; वायु कमी होतो अथवा मुळींच नाहींसा होतो; स्नायूंचे आंचके व कंप हीं पुष्कळ कमी होतात; जीभ ओली होते, क्षुदबोध होतो, आणि नाडी जोरानें चालून ठोके कमी होतात. ह्याप्रमाणें रोज रात्रौ एकवेळां अफूचा उपयोग करीत गेल्यास मज्जाशक्तीचा ऱ्हास

न होतां ज्वर अथवा दुसरा आजार बरा होईपर्यंत रोगी चांगल्या प्रकारें टिकाव धरतो.

२८. सन्निपातादि ज्वरांत मज्जाशक्ति नष्ट होऊं लागली असतांना ती राखण्यासाठीं ह्मणून मद्यार्क द्यावा लागतो. परंतु अफू अथवा अफूचा अर्क अशा स्थितींत देत गेल्यास मद्याचा उपयोग फार थोड्या प्रमाणानें करावा लागतो, एवढेंच नव्हे, पण वेळेवारी केल्यास मद्य देण्याचें कारणच सहसा पडत नाहीं.

२९. सन्निपातादि दोषिकज्वरांत, मज्जाशक्ति नष्ट होऊं लागल्याचीं सूचक चिन्हें होतांच, अफूचा उपयोग केल्यावांचून राहूं नये ह्मणून वर स्पष्ट सांगितलेंच आहे. परंतु अशाच विकारांत केव्हां केव्हां मज्जाशक्ति कमी न होतां हृदयाची शक्ति प्रथम कमी होऊं लागते, तेव्हां मात्र अफूचा उपयोग करूं नये. हृदय क्षीण होऊं लागल्याचें लक्षण ह्मटलें ह्मणजे—नाडी क्षीण व जलद चालूं लागणें— हें होय. हृदय क्षीण झालें तथापि इतर प्रकृति बरी वाटते, रोग्याचा आवाज खणखणीत असतो, भूक व पाचन हीं साधारण चांगलीं राहतात आणि रोग्यास वायु होत नाहीं, अर्थात् त्याची मज्जाशक्ति बरी असते. सारांश प्रथम हृदय क्षीण होतेंसें वाटतांच अफू न देतां मद्यार्क द्यावा. किंवा हृदयाची शक्ति राखणारें इंग्रजी औषध डिजिटेलीस ( Digitalis ) ह्यासारखें औषध द्यावें ह्मणजे त्यापासून हृदयाची क्रिया सावकाश चालून त्याची शक्ति कायम राहते व मद्यही फारसें द्यावें लागत नाहीं. अशा स्थितींत कोयनेल व डिजीटेलीस मिळून देणें चांगलें.

३०. मदात्ययामध्यें अफू दिल्यानें झोंप येऊन रोग्यास आराम पडतो. अशा वेळीं अफूची त्वचेखालीं पिचकारी देणें चांगलें. किंवा थोड्या हलक्या मद्यामध्यें अफू मिश्र करून पोटांत द्यावी ह्मणजे अफूचा गुण लौकर होतो व रोगीही तें औषध खुषीनें घेतो. मदात्ययामध्यें अफू बस्तीच्या द्वारें दिल्यास हटकून लागू पडते, असें मागें सांगितलेंच आहे. ह्या विकारांत अफू पुष्कळदां लौकर लागू पडते किंवा नेहमीं-

पेक्षांही थोड्या प्रमाणानें तिचा अंमल जोराचा होतो. ह्याचें कारण एवढेंच दिसतें कीं, बहुधा दारूबाज लोकांचे मूत्रपिंड ( Kidneys ) बिघडलेले असतात. मूत्रांतून अलबुमन ( एक रक्ताचा घटकावयव ) जातो व ज्या विकारास इंग्रजींत ब्राईट्स डिझीज (Bright's disease) ह्मणतात त्यांत अफू थोड्या प्रमाणानें द्यावी. ह्याचें कारण, कांहीं ह्या विकारांत अफू देणें अयोग्य होय हें नव्हे, तर ह्या विकारांत तिचा अंमल जोराचा होतो, हें होय. सबब अशा स्थितींत अफू देणें ती सावधगिरीनें द्यावी. सारांश मदात्ययाच्या रोग्यास अफू देण्याचे पूर्वीं त्याचें मूत्र तपासून त्यांत आलबुमन आहे किंवा नाहीं ह्याची खात्री करून घ्यावी हें चांगलें.

३१. झोंपेसाठीं ह्मणून जेव्हां अफू द्यावयाची असेल तेव्हां ती योग्य वेळीं देण्याची खबरदारी घ्यावी. नेहमींचे निजण्याचे वेळीं ती द्यावी अथवा रोग्यास जेव्हां झोंपेची गुंगी वाटेल त्यावेळीं ती द्यावी, ह्मणजे स्वाभाविक सृष्टिक्रमास आयती मदत होऊन अफूच्या थोड्या प्रमाणानें सुद्धां चांगली झोंप आल्यावांचून राहत नाहीं. जीर्णक्षयासारख्या रोगांत जेव्हां सारखा ज्वर येत असतो तेव्हां अफू रात्रौ फार उशिरा द्यावी. कारण, ज्वरामुळें रोग्यास पहाटपर्यंत झोंप येण्याचा संभव नसतो. अफू दिल्यापासून चांगली झोंप येण्यास एक किंवा दोन तास लागतात. फार दिवस झोंप येत नसून त्याचें कारण एखादा स्पष्ट रोग नसेल तर होईल तितकें करून अफू देण्याचें टाळावें. अग्निमांद्य व गर्भाशयाचे विकार ह्यांपासून निद्रा येत नसल्यास अफू न देतां क्लोरल व ब्रोमाईड हींच द्यावींत.

३२. कसल्याही वेदना अफूपासून शमतात. परंतु, ती देण्याचे पूर्वीं असल्या प्रकारच्या दुसऱ्या औषधांचा प्रथम उपयोग करून पहावा. कारण, नेहमींच्या संवईनें अफूचा अंमल कमी होऊं लागतो, व पुढें पुढें तिचें प्रमाण वाढवावें लागतें, अशामुळें रोगी अगदीं तिच्या आधीन होऊन जातो आणि जरी त्याची वेदना कायमची बरी झाली तथापि त्याला अफू सुटत नाहीं व जबरदस्तीनें सोडल्यास त्याला फार

त्यास सोसावा लागतो.

३३. **तीव्र आमवातांत** मार्फियाची त्वचेखालीं पिचकारी दिल्यानें रोग्याची वेदना कमी होऊन त्यास झोंपही येते.

३४. **डांग्या खोकल्याच्या** ऐनभरांत अफूचा अर्क अथवा मारफिया दिल्यापासून चांगला उपयोग होतो. लेंकराचे अंगीं थोडी सुस्ती येईल अशा बेतानें तीं द्यावींत व पुढें तीच स्थिति कायम राहण्यासाठीं दोन किंवा तीन तासांनीं बेताचें प्रमाण द्यावें. मारफिया देणें झाल्यास प्रत्येक तीन किंवा चार तासांनीं $\frac{1}{50}$ ग्रेन ह्याप्रमाणें देत जावा. अफूचा अर्क देणें झाल्यास लेंकराचे वयानुसार $\frac{1}{4}$ थेंबापासून २ थेंबांपर्यंत प्रत्येक तासानें द्यावा. ह्या उपायानें खोकल्याची उबळ कमी होऊन खोकला जोरानें व वरचेवर येत नाहीं. परंतु अशा स्थितींत पोटांत जंत झाले असले, दांत येत असले, अथवा पुष्कळ कफ छातींत सांचला असला तर, इतर पुष्कळ उपायांप्रमाणें, ह्या उपायाचीही मात्रा चालत नाहीं.

३५. मूत्रपिंडांतून रेतीचे कण खालीं उतरतांना जी पोटांत असह्य कळ निघते ( Renal colic ) अथवा पित्ताचे खडे पित्ताशयांतून खालीं उतरतांना जी कळ ( Biliary colic ) निघते ती नुसती अफू अथवा तिचीं दुसरीं औषधें ह्यांपासून तावडतोब राहते. अशा स्थितींत मारफियाच्या पिचकारीचा अधिक चांगला उपयोग होतो. अफू पोटांत देणें झाल्यास लहान प्रमाणानें ( $\frac{1}{4}$--$\frac{1}{2}$ ग्रेन ) प्रत्येक दहा पंधरा मिनिटांनीं, कळ कमी होईपर्यंत, देत जावी.

३६. **दमा.**— फार जोरावला असतां अफूपासून पुष्कळदां तो दबतो. कित्येक दमेकऱ्यांचा असा अनुभव आहे कीं, रोज किंचित् अफू घेत गेल्यास दमा वरचेवर व जोराचा उठतच नाहीं.

३७. मधुमेहांत ( Diabetes ) अफू दिल्यानें फार वाढलेली क्षुधा कमी होते, अर्थात् अपक्व अन्न पोटांत कमी संचय पावल्यामुळें मूत्रपिंडांपासून पुष्कळ मूत्र उत्पन्न होण्याची अवश्यकता राहत नाहीं त्यामुळें तृषाही कमी लागते. पूर्वी ह्या रोगांत अफूचा फक्त अशा प्रकारचाच

उपयोग होतो असा समज होता, परंतु आतां अफू वरचेवर व मोठ्या प्रमाणानें देत गेल्यास मूत्रांतील साखर कमी होते किंवा अगदीं नाहींशीही होते असें सिद्ध झालें आहे व तीपासून अन्नपचनावर कांहीं एक वाईट परिणामही होत नाहीं. मधुमेहांत नुसती अफू अथवा मारफिया न देतां अफूचा दुसरा घटकावयव जो कोडिया ( Codeia ) तो दिल्यास विशेष उपयोग होतो.

३८. शरीरांतील श्लेष्मल त्वचेपासून उद्भवणारे सर्व रस अफू अथवा अफूचे दुसरे प्रकार हे दिल्यानें कमी होतात, म्हणून त्यांचा, खोकल्यामध्यें पुष्कळ कफ अथवा पू पडूं लागल्यास, तो कमी होण्यासाठीं उपयोग करितात.

३९. ज्वरांत घाम येण्यासाठींसुद्धां अफूचा अथवा अफूमिश्रित औषधांचा चांगला उपयोग होतो.

४०. अफूचा एक प्रकार जो डोव्हरपाऊडर ( Dovers powder ) त्याचे दहा ग्रेनपर्यंत प्रमाण रात्रौ निजतांना दिल्यास क्षयरोगामध्यें किंवा त्याच्या सारखी क्षीणता आणणाऱ्या दुसऱ्या रोगांत जो रात्रौ फार घाम येतो तो नाहींसा होतो.

४१. सर्दी होतांच रात्रौ थोडी अफू घेऊन वर थोडें कडकडीत पाणी प्यालें तर ती न वाढतां दुसरे दिवशींच नाहींशी होते.

४२. भूतोन्मादाचा विकार असलेल्या अथवा कोंवळ्या मनाच्या स्त्रियांना किंवा फार श्रम करणाऱ्या व काळजी वाहणाऱ्या पुरुषांना जे अनेक किरकोळ विकार होतात त्यांवर अफूचा अर्क व कुचल्याचा अर्क[१] ( Tincture of Nuxvomica ) योग्य प्रमाणानें मिश्र करून दिल्यास फार चांगला उपयोग होतो.

४३. चाळीस पन्नास वर्षांच्या वयाचे सुमारास विशेषतः स्त्रियांना-डोक्याचा माथा तापून जड झाल्यासारखा वाटणें, तोंडावर वरचेवर एक प्रकारची लाली येणें, डोळे भरून येणें, गरम अथवा थंड घाम

---

१ नेहमींचें प्रमाण- १०।२० थेंब.

येणें व डोक्याचे मागल्या भागांत वेदना होणें, इत्यादि लक्षणें होतात. शिवाय त्यांची एकच भिवई फार ठणकते, जेवणानंतर अंगांत सुस्ती व ग्लानि येते, मधून मधून डोक्यावर कांहीं आवळलें आहे असें वाटतें किंवा कुठें तरी ठणका भासतो, त्यांचें लक्ष एका विषयाकडे लागत नाहीं व त्यांचा उल्हास अगदींच नाहींसा होतो हीं सर्व लक्षणें अग्निमांद्य, पोटांत वायु धरणें, घशांत जळणें, निरनिराळे गर्भाशयाचे विकार किंवा घाणेरड्या जागीं राहणें, इत्यादि अनेक कारणांपासून उद्भवतात. कोणतेंही कारण असलें तथापि वर सांगितल्याप्रमाणें सुमारें एक थेंब अफूचा अर्क व दोन थेंब कुचल्याचा अर्क मिश्र करून घोटभर पाण्यांत दिवसांतून तीन चार वेळा दिल्यास वरील लक्षणें नाहींशीं होऊन रोग्याचे जिवास समाधान वाटल्यावांचून राहत नाहीं.

४४. ही गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे कीं, अफूचे मुख्य घटकावयव मारफिया, कोडिया इ. स्त्रियांच्या दुधांतून बाहेर पडतात. ह्यासाठीं अंगावर मूल पीत असतांना स्त्रीस अफू दिल्यास लेंकराच्या जिवास धोका होण्याचा फार संभव असतो.

४५. वयानुसार सर्वच औषधांचा कमी जास्ती अंमल होतो. त्यांत विशेषतः अफूचा तर होतोच. अफूचा अंमल मोठ्यापेक्षां लहानावर जोराचा होतो. ह्यासाठीं लहान मुलांस अफू किंवा अफूचे दुसरे प्रकार अथवा अफूमिश्र औषधें देतांना फार सावधगिरी ठेविली पाहिजे. जरा ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष केल्यास अपघात होण्याचा फार संभव असतो. पुरुषांपेक्षां स्त्रियांवर अफूचा अंमल अमळ अधिक होतो.

४६. पोटांत देण्याचीं साधारण प्रमाणें— **अफू**- प्रमाण $\frac{१}{२}$ ग्रेन-पासून २ ग्रेनपर्यंत. **अफूचा अर्क**- प्रमाण ५ थेंबांपासून ४० थेंब ( ह्याच्या चवदा थेंबांत १ ग्रेन अफू असते ). **मारफिया**- प्रमाण $\frac{१}{८}$ ग्रेन पासून $\frac{१}{२}$ ग्रेन पर्यंत. **कोडिया**- प्रमाण $\frac{१}{४}$ ग्रेन पासून २ ग्रेनपर्यंत.

४७. अफूपेक्षां मारफिया कमी उत्तेजक असून त्यानें अवष्टंभही कमी होतो, घाम कमी येतो आणि अफूसारखें ह्यापासून डोकें दुखत नाहीं व मळमळतही नाहीं.

४८. येथपर्यंत अफूच्या सर्व औषधी गुणांचा विचार झाला. पुढील खेपेस आणखी थोडी राहिली साहिली माहिती देऊन अफू विषारी प्रमाणानें पोंचली असतां त्यापासून होणारीं लक्षणें व त्यांवर उपाय यांचाही विचार करण्यांत येईल.

## निद्रा.

**लेखक**— डा. विष्णुपंत भागवत एल्. एम्. आन्ड एस्.

आतां निद्रेविषयीं माहिती सांगणें ह्मणजे, १ निद्रा ह्मणजे काय, २ ती कशानें येते, ३ तिची अवश्यकता, ४ तिचे उपयोग, ५ ती किती घ्यावी, ६ ती घेण्याची वेळ कोणती, ७ ती न येण्याचीं कारणें आणि ती गाढ येण्याबद्दल उपाय, वगैरे गोष्टी सांगितल्या पाहिजेत.

१. **निद्रा ह्मणजे काय?** तर निद्रा ह्मणजे विश्रांति. आणि ही विश्रांति प्रत्येक सजीव वस्तूला जरूर आहे; मग ती सजीव वस्तु प्राणी असो वा वनस्पति असो. इतकेंच नाहीं तर विश्रांति ही तिच्या प्रत्येक भागालाही पाहिजे आहे. व ही विश्रांति अनेक रीतींनीं मिळते. आपल्या शरीरांतील अमुक एक गात्रांचे व्यापार एकादिवसांत- अहोरात्र मिळून- अमुक एक वेळ पर्यंत बंद केले पाहिजेत किंवा झाले पाहिजेत, असा जो सृष्टीचा क्रम तोच विश्रांतीचा एक मार्ग होय. मांसल शिरांचे व्यापार बंद करणें ह्मटलें ह्मणजे बोलणें चालणें आदेकरून बंद करणें होय; पचन करणाऱ्या इंद्रियांचे व्यापार बंद करणें ह्मटलें ह्मणजे जठर, आंतडीं, प्लीहा, यकृत्, आदिकरून इंद्रियांचा व्यापार बंद करणें अर्थात् अन्नादि पदार्थ खाल्यावर त्यांचे रस करून रक्तांत मिसळण्यास योग्य असें करण्याची जी क्रिया ती बंद करणें हें होय; तसेंच हृदयाचा व्यापार बंद करणें ह्मटलें ह्मणजे तें जें लब् लब् किंवा अशाच प्रकारचे दोन सूक्ष्म ध्वनि करीत संकोच विकास पावत असतें त्या दोन ध्वनींमधील ह्मणजे संकोच विकास या क्रियांमधील अंतर वाढविणें होय व हेंच त्याची विश्रांति होय. आणि हें निद्रेच्या वेळीं जरा जास्त असतें

तसेंच फुप्फुसाचे व्यापार बंद करणें ह्मणजे श्वास व उच्छ्वास यांमधील जो विराम काल तोच त्याची विश्रांति असून झोंप आली असतां तो काल अधिक असतो. तेव्हां अशा प्रकारची विश्रांति वर सांगितलेल्या इंद्रियांना आपोआप मिळते किंवा आपल्यास त्यांना देतां येते. आपल्या मस्तकांत जो मेंदू आहे त्याचे चार भाग आहेत- १ सहस्रदल नामक ( सेरिब्रम ) मोठा मेंदू, २ शतदल नामक ( सेरिबेलम ) लहान मेंदू, ३ भ्रमरगुंफा ( पान्स्व्हेरोलीम ), ४ वेणीस्थान (मेड्युला ऑबलँगेत.) त्यांत मोठा मेंदू बाकीच्या तीन भागांचा धनी आहे. ह्मणजे त्याचें काम त्या तीन भागांस आज्ञा करण्याचें आहे. अर्थात् शरीरांतील प्रत्येक क्रिया त्या तीन भागांकडून मोठा मेंदू करवितो; व लहान मेंदू व दुसरे दोन भाग आपल्या शरीरांतील चालणें, बोलणें, हृदयाचा संकोच विकास, फुप्फुसाचे श्वास उच्छ्वास, वगैरे क्रिया निरनिराळ्या इंद्रियांकडून करवितात. तेव्हां इंद्रियांना विश्रांति मिळते ह्मणजे ते मेंदूचे तीन भाग विश्रांति घेतात; ह्मणजे अर्थात् इंद्रियें निर्व्यापार होतात. या सर्वांवर पाहणारा मोठा मेंदू असल्यामुळें त्याचें काम सर्व दिवसभर एकसारखें चाललें असतें. कारण, त्याचेमध्यें ‘ इच्छाशक्ति ’ वास करीत असते. तेव्हां आमच्या बाकीच्या इंद्रियांना जरी विश्रांति मिळाली असली ह्मणजे आह्मी स्वस्थ बसून राहिलों, आमची पचनक्रिया अगदीं चालली नसली, तरी मोठ्या मेंदूमध्यें ‘ कल्पना ’ ‘ बुद्धि ’ ‘ स्मरण ’ ‘ तर्क ’ ‘ इच्छा ’ वगैरे मोठमोठाल्या शक्ति असल्यामुळें त्याचें काम एकसारखें चाललें असतें. ह्मणून त्याला विश्रांति पाहिजे असेल तर त्या निरनिराळ्या शक्तींचे व्यापार बंद झाले पाहिजेत ह्मणजे अर्थात् आह्मांस गाढ झोंप आली पाहिजे. एकंदरींत आपल्या शरीरांतील व मेंदूंतील प्रत्येक गात्रांना ( फुप्फुसें व हृदय खेरीज करून ) निर्व्यापार झालें पाहिजे आणि असें झालें ह्मणजे जी स्थिति प्राप्त होते तिलाच निद्रा ( सुषुप्ति ) असें ह्मणतात. आतां मेस्मेरिझम ( Mesmerism ), हिपनाटिझम (Hypnotism), ट्रान्स [ Trance ] वगैरे अवस्था खऱ्या निद्रेशीं साम्य पावल्यासारख्या दिसतात. परंतु या अवस्थांमध्यें

लहान मेंदूची आणि पॉन्स व मेड्यूला यांच्या क्रिया ब्याच अंशीं चाललेल्या असतात. वरील अवस्था एका मनुष्याच्या मानसिक शक्तीचा दुसऱ्याच्या मानसिक शक्तीवर परिणाम घडून उद्भवतात. त्यासंबंधी माहिती योग्य प्रसंगीं देण्यांत येईलच.

२. **निद्रा कशानें येते** याबद्दल विचार करूं— निद्रा कशानें येते याबद्दल सर्वांशीं खात्रीपूर्वक माहिती नाहीं. ह्मणून हा जरा वादग्रस्तच विषय आहे. तथापि तिच्याबद्दल जी कांहीं आपल्यास खात्रीपूर्वक माहिती मिळाली आहे ती थोडक्यांत पुढें दिली आहे, पण ती माहिती निषेधरूप आहे; ह्मणजे निद्रा कशानें येत नाहीं हें मात्र सांगतां येतें. व ह्यावरून निद्रेसंबंधानें ज्या कांहीं कल्पना हल्लीं प्रचारांत आहेत त्या सर्व भ्रममूलक आहेत असें सिद्ध करितां येतें. आजपर्यंत मोठमोठ्या प्राणींद्रियशास्त्रवेत्यांचें असें मत होतें कीं, निद्रा ही अवस्था मेंदूंतील शुद्ध व अशुद्ध रक्तवाहिन्यांमध्यें सांखळलेल्या रक्ताचा भार मज्जेवर पडल्यामुळें तिचा व्यापार बंद पडून प्राप्त होते, किंवा मज्जेला रक्ताचा पुरवठा कमी झाल्यामुळें ही स्थिति प्राप्त होते, अथवा रक्ताच्या परमाणूंमध्यें एक प्रकारची विक्रिया झाल्यामुळें ही अवस्था प्राप्त होते. परंतु हें मत साधार नाहीं. कारण, वर सांगितलेल्या कारणांपासून किंवा डोक्यावर प्रहार केल्यानें, किंवा मानेच्या रक्तवाहिन्या दाबून धरल्यामुळें, किंवा बराच रक्तस्राव झाल्यामुळें जी एक अवस्था प्राप्त होते ती खरी गाढ निद्रा नसते. अशा स्थितीला मूर्च्छा, ग्लानि, तंद्रा, असें कांहीं तरी ह्मणतां येईल. तसेंच कॅर्बानिक असिडनें रक्त दूषित झाल्यामुळें किंवा ऑक्सिजन वायु आकर्षण करून घेणारे जे कण ते पुनः पुनः तीच ती हवा फुप्फुसांत श्वासोच्छ्वासानें ओढून घेत गेल्यामुळें रक्त दूषित होऊन निद्रेसारखी एक अवस्था प्राप्त होते, परंतु ती खरी निद्रा नव्हे.

( पुढें चालू. )

---

## कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य मु॰ आंजर्ले ता॰ दापोली जि॰ रत्नागिरी यांचीं जगत्प्रसिद्ध, सर्वोपयोगी, निर्दोष व रामबाण औषधें.

या जाहिरातीचे खालीं " विशेष सूचना " केली आहे
ती वाचकांच्या अवश्य लक्ष्यांत असावी.

### १. वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साह- बुद्धि कांतिवर्धक व धातुपौष्टिक, सुवर्णमाक्षिक- मौक्तिक- कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१ शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें त्यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्व भागीं व त्याच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, कोणत्याही कारणांनीं आलेली अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, उन्हाळे, छातींतील रोग, मस्तकशूळ, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूळव्याधि, भगंदर, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूळ, कटिवात, वातरोग, निद्रानाश, चक्कर, कफातिरेक, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, सूतिकारोग, व्रण, हात, पाय, मूत्रमार्ग व शरीर यांचा दाह, ठणका, ग्लानि, अरुचि, मूत्राश्मरी व चित्तभ्रम इत्यादि अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले, नवीन किंवा जुनाट असले तरी अगदीं खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति, व बुद्धि हीं वाढतात. ज्यांस फिरण्याचे, अभ्यास करण्याचे लिहिण्याचे व शिकविण्याचे श्रम फार पडतात त्या सर्वांच्या अंगीं यांणीं

अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो व सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें. कोष्ठशुद्धि होते. कोष्ठांतील अनियमित व्यापारांपासून होणारे दुष्ट परिणाम टळतात. या अप्रातिम गुटिका अत्यंत उपयुक्त शोधानें केल्या असून यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें आहेत, सबब जास्त वर्णन येथें करीत नाहीं. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस या अत्यंत उपयोगी आहेत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रातिम औषध नाहींच असें स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात, यामुळें यांचा अतिशय खप सुरू आहे. हल्लीं या गोळ्यांत अंतर्वेदी, नेपाळ, काश्मीर इ० देशांतील अत्यंत शुद्ध, ताजे, महत्वाचे व मौल्यवान् असे अनेक पदार्थ आणखी घालून त्यांची विशेष सुधारणा केली आहे आणि लोकाग्रहावरून केवळ परोपकारार्थ ह्मणून गोळ्यांचा दर फारच स्वस्ता केला आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व ट. खर्च माफ आहे. अनुपान ख० सोबत देऊं. एकदम १६ गोळ्यांस १ रु., ३६ गो० २ रु., ८० गो० ४ रु., व १२० गो० ६ रु.

## ३. थंडगार नेत्रांजन.

हें परम गुणकारक अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंडू, फूट, चिकटा, ठणका, व लाली, इ. अनेक विकार तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यांस कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा बिलकूल न होतां बरे होतात.

दृष्टि तीव्र व थंडगार राहते. शिवाय जागरण, उन्हांत फिरणें

अग्नीचा शेक, उपदंशविकार, अतिवाचन, अतिव्यायाम, अतिमैथुन, अतिमद्यपान, अत्युष्ण व विदाही पदार्थ भक्षण, इ० कारणांनीं ज्यांचे डोळे बिघडतात त्यांस याचा फारच मोठा उपयोग आहे. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार बिलकुल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगीं आहे. २ तो० ड० १॥ रु०

## ४. कर्णस्त्रावनाशक अप्रतिम तैल.

हें उत्तम तेल कानांत घातल्यानें कानांतून पू वाहणें, तत्संबंधीं ठणका, कंडू, दाह, रक्तस्राव, इ. विकार तत्काळ बरे होतात. कानांतील कोणत्याही प्रकारचे साधारण व्रण तर तत्कालच, परंतु कानाचा समूळ नाश करणारे जुनाट किंवा हाडीं खिळून बसलेले कितीही वयाचे मनुष्याचे व कोणत्याही कारणानें प्राप्त झालेले अनेक प्रकारचे असाध्य व्रण कोणतीही इजा किंवा आग वगैरे बिलकुल न होतां अगदीं खात्रीनें बरे होतात. बाटलीस रु० १ शिवाय प्या० ख० दोन आणे. रोखीनें किंवा व्हॉ. पे. पार्सलनें खालील पत्यावर मागविल्यास पाठवूं. अनुपान खर्डा बाटलीसोबत.

**५. पर्म्यावर अपूर्व मिश्रण.**—कोणत्याही प्रकारचा नवीन किंवा जुनाट पर्मा, तत्संबंधी दाह, तिडीक, मूत्राची विवर्णता, संकोच किंवा मूत्रातिरेक इ. विकारांसह या मिश्रणापासून इजा बिलकुल न होतां व पथ्यसेवनाची खटपट नसतां ताबडतोब बरा होतो. पर्म्यावर इतकें प्रतिज्ञेचें औषध दुसरें नाहींच. बा. १ रु.

**६. दंतरक्षक पूड.**— ही चोळिल्यानें दंतसंबंधी सर्व विकार हिर्ड्यांचा रक्तस्राव व व्रण, पू, कीड इ. फारच त्वरित व नाजूक रीतीनें बरे होऊन दांत स्वच्छ व फार मजबूत होतात. ड. ६ आणे.

७. गजकर्ण, नायटे, खरूज इ. विकार ३ दिवसांत बरे होतात. ड. ६ आणे.

८. विंचवाचें विष हें औषध लावतांच उतरतें. ड. ८ आणे. इतकें औषध ४० मनुष्यांस पुरतें.

वरील औषधें अत्यंत खात्रीचीं आहेत. त्यांणीं हजारों लोकांस गुण आला व नित्य येत आहे. अनुभवानंतर पक्की खात्री होईलच. याशिवाय आमच्या येथें कस्तूरीच्या उत्तम कातगोळ्या, तमाखूच्या अर्काच्या कस्तूरीमिश्र गोळ्या, उत्तम सुगंधी अत्तरें व ग्रंथोक्त रसायनें, धातूंचीं भस्में, पाक, तैलें, चूर्णें, गोळ्या, घृतें, आसवें, द्राव, क्षार हेमगर्भादि रसायनें इ. औषधें माफक किंमतीस मिळतील. पाहाण्यासाठीं सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. अनुपान पत्रक औषधासोबत पाठवूं. पत्ता सुवाच्य. कोणीं प्रकृतिमान कळविल्यास रोगाचें निदान व योग्य चिकित्सा कळवूं. औषधें रोखीनें किंवा व्ही. पी. नें विकत मिळतील. टपालखर्च वेगळा पडेल. गरीब लोकांस स्वस्त दरानें औषधें देऊं. जाहिरातीच्या खालील किंवा वरील पत्यावर मिळतील. या औषधांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून त्यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटा मिळविल्या आहेत व नित्य मिळत आहेत.

**विशेष सूचना**:— आलीकडे वर्तमानपत्रांतून आंजर्लें व नजीकच्या मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या नवीन ब-याच जाहिराती सुरू झाल्या आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींच्या खालीं किंवा वर ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या ग्राहकांस भासण्याचा संभव आहे, यामुळें कदाचित् ग्राहकांचा घोंटाळा होईल. तरी अशा लोकांशीं व त्यांच्या जाहिरातींशीं आमचा कोणत्याही प्रकारें अगदीं संबंध नाहीं हें ग्राहकांनीं अवश्य लक्षांत ठेऊन, आमचीं औषधें मागणें तीं **"कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य मु० आंजर्लें ता० दापोली जि० रत्नागिरी"** या अगदीं बिनचूक सही व पत्यावर मागवावींत.

कृष्णशास्त्री बिवलकर.

**पत्ता**— मु० आंजर्लें, ता० दापोली, जिल्हा रत्नागिरी.

पुष्कळ उपयुक्त असा झाला आहे, ह्या गोष्टी ग्रंथकर्त्यास मोठ्या भूषणार्ह आहेत. एकंदरींत हें पुस्तक संग्रहास योग्य आहे असा आमचा अभिप्राय आहे. पुस्तकाची किं. ८४ असून पुस्तकें कोल्हापूर येथें 'विद्याविलास' छापखान्यांत मिळतील.

## पोंच.

**चवथे वर्षाबद्दल ( एप्रील १८९५ तें मार्च १८९६ अखेर. )**

३ डा. महादेव विनायक लिमये.
३ डा. परसनसिंग.
३ रा. रा. रामचंद्र गणेश मुंडले, वकील,
३ रा. सा. कृष्णाजी सदाशिव रिसबडकर.
३ रा. रा. भाई रामचंद्र.
३ श्री० बाळासाहेब पटवर्धन, चीफ आफ मिरज.
३ रा. रा. रामचंद्र वासुदेव जोशी.
३ डा. आपटे, कोल्हापूर.
३ रा. रा. चनबसापा भावेपा मुगी.
३ रा. सा. व्यंकटराव रामचंद्र वकील.
२८२ डा. मिस. जे. ब्रिसेल, एम, डी, ( चवथे वर्षाबद्दल राहिलेली बाकी.)
६ डा. हरी त्रिंबक चांदोरकर, ( तिसरे व चवथे वर्षाबद्दल. )
१२ डा. भालचंद्र कृष्ण, ( चारी वर्षांबद्दल. )

**विनंति.**— हा चौथे वर्षाचा चौथा अंक वाचकांचे हातीं पडत आहे, हें त्यांनीं ध्यानांत आणून ज्यांजकडून अद्याप वर्गणी येणें आहे त्यांनीं ती जरूर धाडावी. वर्गणीसाठीं पत्रें पाठविण्याचाही एक हप्ता होऊन गेला. जुलईअखेर ज्यांचेकडून वर्गणी येणार नाहीं त्यांजकडे आगस्टचा अंक व्ही. पी. करावा लागेल.

## जी. बी. नाईक कंपनीच्या

विजेच्या आंगठ्या, कडी, लेखण्या व गळपट्टे.

प्रत्येक वस्तूवर G. B. N. मार्क पाहून घेत जा.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

### रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे.




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग, अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें, कंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे, काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धशिशी, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दखणें, गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मूळव्याधी, पाठींतील अशक्तता, निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे गळपट्टा- लहान मुलांचे दंतोत्पत्तीसमयीं होणारे रोग शमन होऊन सुखें निर्विघ्नपणानें निघतात. लेखणी- हातास कांपरें व स्मरणशक्ति. अशा ह्या उत्तम गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

### विजेच्या वस्तूंची किंमत

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं रु. २ | धातूचे लेखणीस किं रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपट्टा किं. रु. १॥ |

कमरपट्टा किंमत रु० ६.

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही.पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठीकरितां बोटाचें माप पाठवीत असावें. पत्ता स्पष्ट असावा. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आण. बंगी करणावळ माफ.

**जी. बी. नाईक आणि कंपनी.**

मुंबई, भायखळा, जुन्या दावणीसमोर; व पुणें, बुधवारपेठ.

पत्ता.-डा० रानडे यांचा दवाखाना, सोलापूर.

# भिषग्विलास

## BHISHAGVILASA.

वैद्यकसंबंधी अनेक विषयांचें सुबोध भाषेंत
मासिक पुस्तक.

A Monthly Magazine in Marathi
to popularise Medicine.

आयुःकामयमानेन धर्मार्थसुखसाधनं ॥
आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः ॥ १ ॥

पुस्तक ४. आगस्ट १८९८ अंक ५

विषयानुक्रम. पान.


| विषय | पान |
|---|---|
| शरीररचना .... .... .... .... .... | ७७ |
| निद्रा .... .... .... .... .... | ८३ |
| अफू-विषप्रयोग.... .... .... .... | ८९ |
| अफूचे उपयोग ( आपल्या वैद्यकानुसार ) .... | ९५ |


सोलापूर

आनंदवृत्त छापखान्यांत छापिला.

वर्षाची आगाऊ वर्गणी ट. ह सह ३ रु.

# भिषग्विलास.

वर्ष ४ थें अंक ९ आगस्ट १८९५.


## शरीररचना.

( लेखक— डा. कृष्णराव गडबोले. )

( मा. अं. व. पुढें चालू. )

### पृष्ठतंतु ( डार्सलनर्व्हझ ).

९. पृष्ठमण्यांमधील छिद्रांतून जे बारा तंतु बाहेर निघतात त्यांस पृष्ठतंतु ह्मणतात. त्यांपैकीं शेवटचा तंतु मात्र बारावा पृष्ठमणि व पहिला कटिमणि यांच्या मधून बाहेर पडतो. मानेंतील खालच्या तंतूपेक्षां पृष्ठतंतु लहान असतात. पहिल्या तंतूपासून दहाव्या तंतूपर्यंत हे क्रमानें उत्तरोत्तर लहान लहान होत जातात, आणि पुढें अकरापासून मोठे होत जातात. मणक्यांच्या छिद्रांतून बाहेर पडतांच यांच्या दोन दोन शाखा होतात- एक प्रत्यक्शाखा व दुसरी प्राक्शाखा. प्रत्यक्शाखेच्या पुनः अनेक सूक्ष्म शाखा होतात. त्या पाठींतील स्नायूंत शिरून वर त्वचेंतही फैलावतात.

१०. **प्राक्शाखा.**– या बारा शाखा दोहों बरगड्यांमधील अंतरांतून मागुन पुढें छातीच्या मध्यापर्यंत येतात, ह्मणून यांस पार्शुकशाखा ( इंटरकॉस्टलनर्व्हझ ) असें ह्मणतात. या पार्श्वमध्यस्नायूंतुन वर निघतात आणि वक्षःस्थलावरील त्वचेंत पसरतात. वरील सहा शाखा वक्षःस्थलाकडे गेलेल्या असतात आणि सातवीपासून अकरावीपर्यंतच्या शाखा उदरावरील स्नायूंत व त्वचेंत पसरतात. आणि बारावी शाखा बाराव्या बरगडीच्या खालून उदराकडे वळून उदरस्नायूंत पसरते. मग हिच्या पुनः सूक्ष्म शाखा होतात,त्यांपैकीं एक शाखा व पहिल्या पार्शुक तंतूचे पुष्कळसे तंतु भुजतंतुसंघातांत मिळतात.

### कटितंतु ( लंबरनर्व्हज ).

११. कटितंतूंच्या पांच जोड्या असतात, त्यांपैकीं पहिल्या चार मण्यांमधील छिद्रांतून बाहेर पडतात व पांचवी शेवटचा कटिमणि व त्रिकास्थीचा वरील कांठ या दोहोंमधून निघते. कटितंतूंचेही प्रत्येकीं दोन विभाग होतात. उदराकडे जो वळतो ती प्राक्‌शाखा व पाठीकडे वळतो ती प्रत्यक्‌शाखा. प्राक्‌शाखा, पहिलीपासून पांचवीपर्यंत उत्तरोत्तर मोठ्या होत जातात. यांचे प्रत्येकीं दोन दोन विभाग होतात. मग या पांची प्राक्‌शाखांचे तंतु एकमेकांस मिळून त्यांचा एक संघात होतो, त्यास **कटितंतुसंघात** ह्मणतात. प्रत्यक्‌शाखा वरून खालीं उत्तरोत्तर लहान लहान होत जातात. प्रत्येक प्रत्यक्‌शाखेचे पुन: दोन दोन विभाग होतात- एक अंत:शाखा व दुसरी बहि:शाखा. अंत:शाखा बहि:शाखेपेक्षां लहान असते. ती पृष्ठवंशाच्या बाजूस जवळच असणाऱ्या स्नायूंत पसरते; व बहि:शाखा एकमेकींस मिळून कंबरेच्या बाजूकडील स्नायूंत पसरून श्रोणीफलकाच्या वरील कांठाच्या मागल्या त्वचेंत विस्तारतात.

### कटितंतुसंघात ( लम्बरप्लेक्सस ).

१२. वरील चार कटितंतूंच्या प्राक्‌शाखा व शेवटच्या पृष्ठतंतूच्या कांहीं शाखा एकमेकींस मिळून हा संघात होतो. हा कटिमण्यांच्या बाजूस असणाऱ्या पोटांतील स्नायूंत असतो. यापासून अनेक शाखा निघतात, त्यांतील कांहीं श्रोणीफलकाच्या आंतील अंगास पसरतात. कांहीं गुह्येंद्रियांत पसरतात व कांहीं मांडींतील स्नायूंत पसरतात, मांडींत पसरणाऱ्या शाखांपैकीं एका शाखेचें नांव **प्रागूरुशाखा**. तिचें वर्णन मात्र येथें केलें आहे.

१३. **प्रागूरुशाखा** (आंटीरियरक्रूरल) ही कटितंतुसंघातांतील सर्व शाखांमध्यें मोठी व लांब आहे. दुसरा, तिसरा, व चौथा कटितंतु यांच्या शाखा एकत्र होऊन ही बनते. ही मांडीच्या पुढल्या व आंतल्या बाजूच्या त्वचेंत व स्नायूंत पसरते व हिच्या कांहीं शाखा पोटरी व पाऊल यांच्या आंतील अंगच्या त्वचेंत पसरतात. त्वचेंत पसरणाऱ्या

शाखांमध्यें एक शाखा फार लांब असते तिला अंगुष्ठदीर्घशाखा असें ह्मणतात.

### अंगुष्ठदीर्घशाखा ( लॉंगसॉफिनस ).

१४. ही शाखा मांडीच्या आंतील अंगानें खालीं उतरत उतरत साक्थिधमनीच्या आवरणावर येते. मग त्या धमनीबरोबर उतरत उतरत गुडघ्याच्या वर सुमारें दोन तीन अंगुलांपर्यंत जाऊन मग त्या धमनीस सोडून गुडघ्याच्या आंतल्या बाजूकडे वळते, आणि चरणांत:शिरेबराबर खालीं पोटरींतून उतरत जाते ती आंतील घोंट्यावरून पावलाच्या व अंगठ्याच्या आंतील कांठानें अंगठ्याच्या टोंकापर्यंत येऊन पोंचते.

### त्रिकतंतु ( सेक्रलनर्व्हझ ).

१५. त्रिकतंतूंच्या पांच जोड्या असतात त्यांपैकीं पहिल्या चार जोड्या त्रिकास्थीच्या छिद्रांतून बाहेर पडतात व पांचवी त्रिकास्थि व गुदास्थि या दोहोंमधून निघते. त्रिकतंतु छिद्रांतून बाहेर पडण्यापूर्वी विभागतात. इतर मणक्यांमध्यें जशा प्राक्शाखा व प्रत्यक्शाखा एकाच छिद्रांतून निघतात, तशी व्यवस्था त्रिकास्थींत नाहीं. तर त्रिकास्थीस प्राक्शाखा निघण्याकरितां पुढल्या बाजूस छिद्रें केलेलीं असतात व प्रत्यक्शाखांकरितां मागें छिद्रें केलेलीं असतात त्या त्या छिद्रांतून त्या त्या शाखा बाहेर पडतात. प्रत्यक्शाखा बारीक असतात आणि वरून खालीं उत्तरोत्तर अधिकाधिक बारीक होत जातात. या शाखा त्रिकास्थिछिद्रांतून बाहेर पडतांच एकमेकींस मिळतात आणे पुढें त्यांतील कांहीं शाखा नितंबांतील स्नायूंत व त्रिक व गुद यांजवरील त्वचेंत पसरतात.

### त्रिकप्राक्शाखा ( ऑंटीरियरसेक्रलनर्व्ह ).

१६. त्रिकप्राक्शाखा या वरून खालीं उत्तरोत्तर बारीक होत जातात. पहिली शाखा चतुर्थ पंचम कटितंतु मिळून होणाऱ्या एका शाखेस मिळते, दुसरी पहिल्या शाखेस मिळते, तिसरी वरील दोहोंस मिळते व चौथीची एक शाखा तिसरीस मिळून एक तंतुसंघात होतो; त्यास त्रिकतंतुसंघात ह्मणतात.

१७. **चौथ्यात्रिकतंतूची एक शाखा** त्रिकसंघातांत मिळते. व दुसऱ्या शाखेच्या तीन शाखा होतात त्यांपैकीं एक पंचमत्रिकतंतूस मिळते व एक मूत्राशयास व एक गुदस्नायूंस मिळते.

१८. **पांचवी त्रिकप्राक्शाखा.**— ही त्रिकास्थि व गुदास्थि यांच्या मधून बाहेर पडते. मग तींत चतुर्थ त्रिकतंतूची एक शाखा व गुदास्थि तंतु मिळतात. नंतर ही शाखा गुदास्थीच्या मागील प्रदेशांत पसरते.

### त्रिकतंतुसंघात ( सेक्रलप्लेक्सस ).

१९. हा संघात चतुर्थ, पंचम कटितंतूंच्या योगानें झालेली शाखा आणि वरील तीन त्रिकतंतूंच्या प्राक्शाखा व चौथा त्रिकतंतु अर्धा मिळून होतो. हा त्रिकास्थीच्या पुढील बाजूवर त्रिकोणाकृति पसरलेला असतो. या संघातापासून अनेक शाखा निघतात, त्यांपैकीं कांहीं बस्तिप्रदेशांतील अवयवांस मिळतात, कांहीं नितंबस्नायूंस मिळतात, व एक सर्वांत मोठी शाखा आहे ती पायांत जाऊन पसरते तिला महा नितंबशाखा ( ग्रेटर इस्कियाटिक ) ह्मणतात.

२०. **महानितंबशाखा** (ग्रेटर इस्कियाटिक) त्रिकतंतुसंघातांतील बहुत तंतु या शाखेंत आलेले असतात त्यामुळें हा एक अंगठ्यासारखा जाड दोर बनतो. हा दोर आसनास्थीच्या खालील कांठांतल्या खांचेंतून बाहेर पडतो, तो वंक्षणसंधीच्या मागील बाजूवरून खालीं उतरतो आणि मांडीच्या मागल्या भागाकडून मध्यरेषेंतून खालीं जानुसंधीच्या वरल्या बाजूस सुमारें चार अंगुलांपर्यंत जातो. मग तेथें त्याचे दोन विभाग होतात. त्यांपैकीं जो जानुसंधीच्या आंतल्या कांठाकडे असतो त्यास अंतर्जानु ह्मणतात व जो बाहेरच्या कांठाकडे असतो त्यास बहिर्जानु ह्मणतात. हे दोन विभाग होण्यापूर्वी महानितंबशाखेपासून कांहीं बारीक शाखा निघतात, त्यांतील कांहीं शाखा मांडीच्या मागील बाजूकडच्या स्नायूंत पसरतात. एक शाखा जानुसंधींत जाऊन पसरते. केव्हां केव्हां नितंबापासून पायापर्यंत अकस्मात् असह्य वेदना होते याचें कारण, या नितंब तंतूंत झालेला विकार, हेंच होय.

२१. **अंतर्जानुशाखा** (इंटर्नल पॉप्लिटियल) महानितंबशाखेच्या शेवटच्या दोन विभागांपैकीं एक आंतील जो विभाग ती अंतर्जानुशाखा. ही गुडघ्याच्या मागील खळगीच्या मध्यभागांतून खालीं पोटरीकडे उतरते, मग पोटरींतील स्नायूंच्या योगानें झालेल्या एका कमानीखालून जाऊन प्रत्यक्जंघाधमनीची सहचरी होते, तेथेंच तिला प्रत्यक्जांघशाखा असें नांव मिळतें.

२२. **प्रत्यक्जांघशाखा** [पोस्टीरियर टिबियल] ही शाखा पोटरीच्या मागील बाजूकडून खालीं उतरत उतरत आंतील घोंट्याच्या खालच्या कांठापर्यंत जाते. मग तेथें तिच्या दोन शाखा होतात, त्यांपैकीं एकीचें नांव पादतलांतःशाखा व दुसरीचें नांव पादतलबाहिःशाखा. प्रत्यक्जांघशाखा प्रत्यक्जंघाधमनीबरोबरच खालीं उतरते तेव्हां प्रथम ती धमनीच्या आंतल्या बाजूस असते, मध्यें तिच्यावर चढते आणि अगदीं खालच्या अंगास तिच्या बाहेरल्या बाजूस जाते.

**पादतलांतःशाखा** ( इंटर्नल प्लांटारनर्व्ह ).

२३. ही शाखा बाहिःशाखेपेक्षां मोठी असते ही पायाच्या तळव्यांत जाते आणि तळव्याच्या मध्यभागच्या सुमारास तिच्या तीन शाखा होतात, त्यांपैकीं पहिली अंगठा व दुसरें बोट यांच्या मधल्या बेचकापर्यंत येते आणि पुनः दुभागून बेचकाच्या दोहों बाजूंनीं त्या दोन्ही बोटांच्या शेंड्यापर्यंत जातात. दुसरी शाखा दुसऱ्या बेचकाच्या दोहों बाजूंवरून व तिसरी तिसऱ्या बेचकाच्या दोहों बाजूंवरून त्या त्या बोटांच्या शेंड्यापर्यंत जाते.

२४. **पादतलबाहिःशाखा** ( एक्स्टर्नलप्लांटार ).

ही शाखा तलबहिर्धमनीबरोबर तळव्याच्या बाहेरच्या कांठाकडून जाते, आणि तळव्याच्या मध्याच्या सुमारास तिच्या तीन शाखा होतात. एक शाखा खोल आंत शिरते आणि तळव्यांतील स्नायूंत पसरते. दुसरी शाखा करंगळी व अनामिका यांच्या मधील बेचकाच्या दोहों बाजूंकडून जाते व तिसरी शाखा करंगळीच्या बाहेरील कांठावरून तिच्या टोंकापर्यंत जाते.

**बहिर्जानुशाखा** ( एक्स्टर्नलपॉप्लिटेयल ).

२५.ही शाखा अंतर्जानूच्या अर्ध्यानें असते ही महानितंबतंतूच्या मोठ्या दोन विभागांपैकीं एक विभाग होय. ती जानुकक्षेच्या बाहेरल्या कांठाकडून खालीं उतरत उतरत बहिर्जंघास्थीच्या मानेपर्यंत जाते, मग तेथें तिच्या दोन शाखा होतात- एकीचें नांव प्राक्जांघशाखा व दुसरीचें नांव स्नावत्वक्. बहिर्जानुशाखा विभक्त होण्यापूर्वी तिजपासून दुसऱ्या कांहीं शाखा निघतात त्यांपैकीं कांहीं जानुसंधींत जातात, कांहीं स्नायूंस मिळतात, व कांहीं तेथील त्वचेंत पसरतात.

**प्राक्जांघशाखा** ( ॲंटीरियर टिबियल ).

२६ ही शाखा जंघेच्या पुढील बाजूकडून खालीं पावलाकडे उतरत जाते ह्मणून हिला हें नांव मिळालें आहे. ही प्रथम प्राक्जंघाधमनीच्या बाहेरल्या बाजूस असते, मग तिच्यावर चढते आणि गुल्फसंधीच्या सुमारास पुनः तिच्या बाहेरल्या बाजूस येते. मग पावलाच्या बाजवरून अंगठा व दुसरें बोट यांच्या मधल्या बेचकापर्यंत येऊन विभागून त्या बेचकाच्या दोहों कांठांवरून बोटांच्या शेवटापर्यंत जाते.

**स्नावत्वक्शाखा** ( मस्क्युलोक्युटेनियस ).

२७.ही शाखा बहिर्जंघास्थीवरील स्नायूंमधून खालीं उतरते आणि जंघेच्या खालच्या तिसऱ्या भागाच्या सुमारास आली ह्मणजे बरीच उत्तान होते. आणि मग तेथें तिच्या दोन शाखा होतात- एक अंतश्चरण व दुसरी बहिश्चरण.

२८. **अंतश्चरणशाखा** ( इंटर्नलक्युटेनियस ) ही बहिश्चरण शाखेपेक्षां लहान असते. ही शाखा पावलाच्या अंगठ्याच्या आंतील कांठावरून त्याच्या टोंकापर्यंत जाते.

२९.**बहिश्चरणशाखा** (एक्स्टर्नलक्युटेनियस) हिच्या तीन शाखा होतात त्या पावलाच्या वरच्या बाजूकडून दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या बेचकापर्यंत क्रमानें जातात आणि त्या त्या बेचकांत ती ती शाखा दुभागून बेचकाच्या दोहों कांठावरून त्या त्या बोटाच्या टोंकापर्यंत पसरतात व पुढें अंतर्जानु शाखेच्या एका फांटीशीं संगम पावतात. (पुढें चालू.)

# निद्रा.

लेखक- डा. विष्णुपंत भागवत एल्. एम्. आन्ड एस्.

( मा. अं. ब. पुढें चालू. )

शिवाय व्हलपिअन् नांवाच्या एका फ्रेंच शास्त्रवेत्यानें असें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, तंद्रा, मुर्च्छा, निद्रा, वगैरे अवस्थांमध्यें मेंदूतील रक्तांत जे कांहीं फेरफार होतात ते त्या त्या स्थितींचीं कारणें नसून त्यांचे परिणाम आहेत. हे प्रयोग निरनिराळया प्राण्यांच्या डोक्याचीं कवचें फोडून केलेलें आहेत. केव्हां केव्हां मनुष्याच्या डोक्याचें कवच कांहीं अपघातामुळें फुटल्यानें हे प्रयोग सहज पाहण्यांत आले आहेत. बहुतकरून मेंदूचे व्यापार बंद झाले ह्मणजे पुष्कळ ऑक्सिजन-मिश्रित रक्त तिकडे जाण्याची जरूर नसते. त्यामुळें त्या मानानें मेंदूंतलि रक्त कमी होतें. परंतु मेंदु अगदींच रक्तहीन होतो असें नाहीं. हे फेरफार झोंप आल्यावर पाहण्यांत येतात.कारण, कोणत्याही इंद्रियाचा व्यापार जसा जसा कमी जास्त होतो तसें तसें रक्त त्या इंद्रियाला कमी जास्त मिळतें. आतां मेंदू बाकीच्या इंद्रियांप्रमाणेंच एक इंद्रिय आहे, त्यामुळें त्याच्याही क्रिया कमी जास्त झाल्या ह्मणजे त्याला कमी जास्त रक्त मिळतें. ह्मणून त्याचे व्यापार बंद झाले याचा अर्थ आपल्यास गाढ झोंप लागते ह्मणजे आपल्या मेंदूंतील रक्ताभिसरण हळूं हळूं चालूं लागतें हा होय.

२ **झोंपेची अवश्यकता**- वरतीं सांगितलेंच आहे कीं,प्रत्येक सजीव वस्तूस विश्रांति ही अगदीं अवश्य आहे. कारण, प्रत्येक प्राणिमात्राचा हा एक उपजत धर्मच आहे त्यामुळें त्यानें विश्रांति घेतली पाहिजे, एवढेंच नाहीं,तर आपण कोण आहों व काय आहों हेंही कांहीं काळत्यानें अगदीं विसरलें पाहिजे; ह्मणजे त्यानें मेंदूचे व्यापार बंद ठेऊन अगदीं गाढ निजलें पाहिजे. अन्न जितकें मनुष्यास प्रिय, तितकीच किंबहुना जास्त झोंप मनुष्यास प्रिय आहे. आपल्या एकण्यांत व कित्येकांच्या पाहण्यांतही असेल कीं, लढाईच्या वेळीं शिपाई लोक लढाई करीत

असतां एखादे वेळेस अन्न खात नाहींत, परंतु लढाई चालली असतां आपण निजलों तर आपल्यावरचे अधिकारी आपल्यास ठार मारतील असें ठाऊक असून ते निजतात. ह्मणजे अशा स्थितींत सुद्धां निद्रा आपला पगडा त्यांचेवर बसविल्यावांचून राहत नाहीं. आपण कोणतीही क्रिया करीत असतांना तीपासून जो एक प्रकारचा मनावर व शरीरावर दाब पडतो तो नाहींसा होऊन आपला नेहमींचा व्यापार करण्यास आपणास पूर्ववत् हुषारी यावी यासाठीं निद्रेची अवश्यकता परमेश्वरानें ठेविली आहे. एका डाक्तरानें असें ह्मटलें आहे कीं, एकदां बंदूक उडविल्यावर पुनः उडविण्याकरितां बार भरून ठेवण्याचा बंदुकीस जो उपयोग होतो, तोंच झोंपेचा आपल्या मेंदूस होतो.

**४. झोंपेचे उपयोग किंवा तीपासून फायदेः—** रात्रीं गाढ झोंप लागल्यापासून आपला मेंदू, व मन हीं तरतरीत व उल्हासित होतात, तसेंच मांसल शिरांना चांगला जोम येतो.

५. झोंपेंत थोडेबहुत वाईट पदार्थ अंगांतून बाहेर पडतात. व ही गोष्ट पुष्कळांच्या निजण्याच्या जागेच्या वासावरूनच सिद्ध होते.

६. निद्रेमध्यें शरीराचें पोषण होतें असें कित्येक ह्मणतात व कित्येक अगदीं त्याच्या उलट मताचेही आहेत आणि ह्मणून हाही अद्याप वादग्रस्तच विषय आहे. डॉ. डन्ह्यॅम, हॅमंड, फाउलर, लॅंग्रे वगैरे लोक ह्मणतात कीं, झोंपेमध्यें रक्ताचें अभिसरण सावकाश चालून झीज झालेले पदार्थ बाहेर पडतात व रक्ताचें शुद्धीकरण होतें आणि अन्नपचनही होतें. याप्रमाणें शरीराचें पोषणही होतें. लॅंग्रेज साहेब ह्मणतात कीं, शरीरांत जी झीज झाली असते ती काम करीत असतां बाहेर न जातां विश्रांतीच्या वेळीं बाहेर निघून जाते आणि त्याच वेळीं पोषणास योग्य असे पदार्थ निरनिराळ्या इंद्रियांला व मेंदूला रक्ताच्या द्वारें मिळतात. आणि अशा पदार्थांचा विश्रांतीच्या वेळीं संचय होऊन पुनः दुसरे दिवशींच्या कामाला उपयोगीं पडतात. शिवाय ते असें ह्मणतात कीं, लहान मुलांना झोंप अधिक असते आणि त्यावेळीं त्यांची वाढही बरीच जोराची असते.

७. लॅंग्रेजसाहेबांचा पहिला मुद्दा जो 'शरीरांतील झीज झालेले निरुपयोगी पदार्थ विश्रांतीच्या वेळींच बाहेर पडतात ' याविषयीं विचार करूं लागलें असतां असें आढळून येतें कीं, आपला नेहमींचा अनुभव त्यांच्या ह्मणण्याहून अगदीं उलट आहे, तो असा कीं, आपण काम करीत असतां आपल्याला घाम अधिक येतो, श्वासोच्छ्वास अधिक जलद होऊन वाफ व कार्बन डाय ऑक्साईड हीं अधिक बाहेर पडतात. दिवसां आपल्याला अधिकदां लघवीला व शौचास जावें लागतें; आणि रात्रीं आपण विश्रांति घेतों त्यावेळीं कोणतेही झीज झालेले पदार्थ- घाम, मल,मूत्र-अधिक जात नाहींत. यावरून साहेब मजकुराचा पहिला मुद्दा बऱ्याच अंशीं सयुक्तिक नाहीं असें दिसतें.

८. आणखी लॅंग्रजसाहेब ह्मणतात कीं,गाढ झोंप लागली असतां मेंदू बराच रक्तहीन होतो. हें त्यांचें ह्मणणें बहुतेक डाक्टरांना ग्राह्य आहे. परंतु झोंपेमध्यें जर सर्व इंद्रियांचें पोषण होतें आणि पोषण झालें ह्मणजे जसा मनुष्य जेवल्यावर ताजातवाना होऊन त्याच्या अंगावर एक प्रकारची लाली किंवा प्रफुल्लितपणा दिसतो, तसा मेंदूही विश्रांतीच्या वेळीं दिसला पाहिजे. परंतु तो तर त्यावेळीं बराच रक्तहीन असा दिसतो.

९. मुलांना झोंप अधिक असते, ह्मणून त्यांचें चांगलें पोषण होऊन तीं लवकर लवकर वाढ पावतात. असें प्रतिपादन करणारे वरच्याप्रमाणें बरेच लोक आहेत. त्यावर आमचें असें ह्मणणें आहे कीं, मुलांच्या सामर्थ्याच्या मानानें व त्यांच्या जागृत अवस्थेच्या वेळेच्या मानानें त्यांना हात पाय हालविण्याचा, रडण्याचा, वगैरे व्यायाम पुष्कळ होऊन त्यापासूनच तीं वाढतात. तथापि वरील दोन्ही मुद्दे अद्याप वादग्रस्त आहेत असेंच कबूल करावें लागतें.

१०.ह्यासंबंधी **ग्रेनवेली** साहेबांचें असें ह्मणणें आहे कीं,जर वरील क्रम प्राण्यांमध्यें असेल तर वनस्पतींमध्येंही असला पाहिजे. परंतु तसें दिसत नाहीं. कारण, हिंवाळ्यांत जेव्हां झाडें आपले व्यापार अगदीं थोडे करीत असतात त्या वेळेस तीं वाढत नाहींत. आणि ज्या अर्थी प्राण्यां-

मध्यें व वनस्पतींमध्यें बरेंच साम्य आहे त्या अर्थी इंद्रियांचे व्यापार चालत असतांनाच वनस्पतीप्रमाणें मनुष्याचेंही अधिक पोषण होण्याचा बराच संभव आहे.

११. बरें, रात्रींच इंद्रियांचें पोषण होतें असें जर कोणी ह्मणेल तर आह्मी जागे झालों असतां बाकीच्या वेळेपेक्षां सकाळीं आह्मांला भूक कमी लागली पाहिजे. कारण, त्या वेळेस सर्व इंद्रियें खाऊन पिऊन तृप्त झालीं असतात. परतु अनुभवावरून आह्मी असें खात्रीनें सांगू शकतों कीं, तसें न होतां सकाळींच आह्मांला अधिक भूक लागते, व तसेंच जेव्हां मेंदूमधील रक्तवाहिन्यांतील रक्तामध्यें पोषणास योग्य अशा पदार्थांची कमतरता असते त्या वेळेस लगेच आपल्याला ग्लानीसारखी स्थिति येते. उदाहरणार्थ, आपल्याला अमुक एक वेळीं दररोज जेवणाची संवय असते ती वेळ टळून अधिक उशिरां कधीं सणावाराचे दिवशीं जेवणाची पाळी येते त्या वेळेस आपल्याला जांभया, आळस व ग्लानि येते. शिवाय ज्या लोकांचा मेंदू अति वाचनानें व विचारानें थकून जातो, त्या लोकांना बहुतकरून गाढ निद्रा लागत नाहीं; आणि सकाळीं उठलें ह्मणजे त्यांना ग्लानि व आळस येतो आणि ही स्थिति कांहीं तरी खाल्याशिवाय नाहींशी होत नाहीं. यावरून बाकीच्या इंद्रियांप्रमाणें मेंदूलाही विश्रांति व पोषण हीं अवश्य आहेत व तीं रात्रीं व दिवसाच झालीं पाहिजेत.

१२. निद्रेचे पुष्कळ प्रकार आहेत. पहिला प्रकार मेंदूची निद्रा ( Cerebral sleep ) ही केवळ चैतन्यहीन अशी स्थिति होय. या स्थितींत मन निर्व्यापार होतें आणि ही कृत्रिमतेनें औषधाशिवाय आणिली ह्मणजे हिला इंग्रजींत हिपनॉटिझम ( Hypnotism ) असें ह्मणतात. ही संवयीनेंही येते व अशा रीतीनें आलेल्या झोंपेपासून सुषुप्तीचें काम होतें. ह्मणून मेंदूचेंच काम ( मानसिक श्रम ) करणाऱ्या लोकांस अशा प्रकारची निद्रा ही एक उत्तम विश्रांति होय. जो कोणी फक्त मानसिक व्यायाम करितो आणि शारीरिक व्यायाम करीत नाहीं त्याला स्नायूंच्या निद्रेची ( स्नायूंस विश्रांति ) क्वचितच जरूरी लागते.

आणि मानसिक व्यायाम केल्यानें जी कांहीं मेंदूची झीज झाली असते ती खेरीजकरून फक्त रोजच्या कामधामामुळें जी कांहीं थोडी शरीरांत झीज होते ती ताबडतोब भरून येते. आणि जे लोक नियमितपणें कोणताही व्यायाम करीत नाहींत त्यांना नियमित विश्रांति थोडीच मिळते. अशा प्रकारच्या निद्रेमध्यें लहान मेंदूंतील 'चालक शक्ति' न दमतां सारखी जागृत असते; परंतु मोठ्या मेंदूंतील चैतन्यशक्ति मात्र निद्रिस्त असते. अशा प्रकारच्या अर्धवट निद्रेमध्यें स्वप्नें पडण्याचा बराच संभव असतो; आणि तीं सारीं जागृतावस्थेंतील व्यापारक्रियादिसंबंधानें पडतात. एकंदरींत पाहतां मेंदूंतील ज्या गौणशक्ति आहेत त्या शारीरिक व्यायाम न घेतल्यामुळें दिवसा अर्धवट केलेल्या क्रियांशीं जणूं काय वरील प्रकारच्या अर्धवट निद्रेमध्यें खेळतच असतात. आणि केव्हां केव्हां आश्चर्य वाटण्यासारखे त्यापासून अनर्थही उत्पन्न होतात. याला उघड उघड उपाय म्हटला म्हणजे पुरेसा योग्य असा शारीरिक व्यायाम नियमितपणें घेऊन मेंदूंतील गौण शक्ति दमविली पाहिजे, आणि अशा प्रकारें आपोआप येणाऱ्या निद्रेची अवश्यकता उत्पन्न केली पाहिजे; हाच निद्रेचा दुसरा प्रकार होय. याला स्वतःसिद्ध निद्रा ( Automatic sleep ) म्हणतात.

१३ जे लोक एखाद्या क्रियेंत प्राविण्य मिळण्याकरितां अति श्रम करून मेंदूंतील गौण शक्ति इतकी वाढवितात कीं, ती गौण शक्ति मोठ्या मेंदूंतील चैतन्य शक्तीहून अधिक उच्च होऊन बसते, त्या लोकांना दुसऱ्याच एका प्रकारची विश्रांति ( निद्रा ) घेण्याची संवय असते. आणि या प्रकारच्या निद्रेंत चालक शक्ति व दुसरीं ज्ञानेंद्रियें सुषुप्तींत असतात; आणि चैतन्यशक्तीचे मात्र व्यापार चालू असतात, किंवा ती इतक्या अर्धवट निद्रेंत असते कीं, तिला सहज जागी करितां येते आणि अशा प्रकारच्या निद्रेस श्वाननिद्रा म्हटलें तरी चालेल. अशा प्रकारची झोंप घेणारासही स्वप्नें बरींच पडतात- मात्र तीं चैतन्य शक्तीचेच तरंग असून गौण शक्तीचा त्यांमध्यें कांहीं एक संबंध नसतो. उदाहरणार्थ आपल्याला अशीं केव्हां केव्हां स्वप्नें पडतात, त्या वेळेस

आपल्या छातीवर एखादा साप किंवा मनुष्य बसला आहे असें आपण पाहतों व ह्मणून आपण ओरडण्याचा किंवा बोलण्याचा प्रयत्न करितों. परंतु शद्ब मुळींच न उमटता त्या वेळेस आपली मनोवृत्ति मात्र दुखित होते ( खरें ह्मटलें तर ‘ इच्छाशक्ति ’ ‘ स्वतः चालक शक्ती ’कडूनच बहुत करून आपलीं कार्यें करवीत असते हें मागेंच दर्शविलें आहे. ). अन्न पचन न झाल्यामुळेंही अशा प्रकारचीं दुःस्वप्नें पडतात, परंतु त्यांचीं कार्य कारणें याहून अगदीं भिन्न असतात. आतांपर्यंत सांगितलेल्या सर्व मानासिक क्रिया होत; आणि ज्या कित्येक स्वप्नांचा कार्यकारण भाव पुष्कळांना कळत नाहीं तो यावरून सहज लक्षांत येण्यासारखा आहे.शद्ब उमटत नसल्यामुळें आपला कांहीं एक इलाज चालत नाहीं व आपला हेतु सिद्धीस जात नाहीं हें पाहून आपण अगदीं निराश होऊन जातों. यांत लहान मेंदूंतील ‘ स्वतःसिद्ध चालक शक्ति ’ जर निद्रिस्त नसती तर आपल्याला ओरडतां व बोलतां आलें असतें ( कारण, या क्रिया त्या शक्तीपासून होतात.स्वतः चालक शक्ति गाढ झोंपेंत असल्या-मुळें मोठ्या मेंदूंतील ‘ इच्छाशक्तीचें ’ कांहीं एक चालत नाहीं. )

१४.आतां झोंपेचा तिसरा प्रकार ‘स्नायुनिद्रा ’ होय.या स्थितींत मेंदूंतील उच्च व गौण शक्ति या दोन्हीही जणूं काय मोहित होऊन निद्रिस्त होतात. आणि ही निद्रा जे स्नायूंनाच व्यायाम देतात त्यांनाच येते. उदाहरणार्थ पहाडी लोक, शेतकरी, पारधी, नावाडी, क्रिकेट खेळणारे, वगैरे लोकांनाच ही निद्रा मिळते व ते सकाळीं आपला काम धंदा करायाला अगदीं ताजे तवाने होतात.

१५. ही निद्रा प्राप्त होण्यास अशा प्रकारचा व्यायाम पाहिजे कीं, तो शारीरिक शक्तीपेक्षां बिलकुल अधिक उपयोगी नाहीं. दाह, शैत्य, जाड्य, वगैरे निरनिराळे विकार व्यायामापासून झाले कीं, व्यायाम अधिक तरी झाला किंवा संवय नसलेला व्यायाम त्या मनु-ष्यानें केला असें समजावें व अशा प्रकारच्या व्यायामानें केव्हां केव्हां वाईट स्वप्नेंही पडतात. वाजवीपेक्षां फाजील व्यायाम घेतला तर दुसरे दिवशीं सकाळीं जागें झाल्यावर आंखडलेल्या स्नायूंला शिथिल करण्या-

करितां ते बरेच ताणावे लागतात. ( पुढें. चालू. )

---

## अफू– विषप्रयोग.

१. भिषग्विलास पु. २ पान २०५ ह्यामध्यें ' नेहमीं घडणारे अपघात आणि त्यांवर उपाय ' या सदराखालीं अफूपासून होणाऱ्या विषप्रयोगांसंबंधी माहिती आली आहे, पण ती फार त्रोटक आहे, सबब ती पुन: येथें दिली आहे. शिवाय अफू हें मोठें आवडतें व अनायासें प्राप्त होणारें विष असल्यामुळें विषप्रयोगाच्या संख्येंत अफू खाणारांची संख्याच फार मोठी असते. अफू घेतल्यानें मनुष्य हळूं हळूं बेशुद्ध होत जाऊन त्याला बिन आयासानें मरण येतें. अफू एकवेळीं पांच तोळेपर्यंत विकण्यास मक्तेदारास सरकारची परवानगी आहे. इतकें प्रमाण तीस चाळीस मनुष्यें मरण्यास पुरें आहे. दोन चार आण्यांची अफू कोणीं घेतली तर त्याबद्दल मुळींच मक्तेदार विचारपूस सुद्धां करीत नाहीं. सारांश, थोडक्या पैशांत बिनबोभाट व अनायासें मरण देणारें अफू हें विष असल्यामुळें साहजिकच तीपासून प्राणहानी मोठी होत आहे. आत्महत्या करणारे बहुतेक लोक- त्यांत विशेषत: स्त्रिया- अफूचाच उपयोग करितात. आमच्यांत आलीकडे अफू न खाणारीं शेंकडा वीस मुलें सुद्धां आढळत नाहींत. यामुळें बायकांच्या मूर्खपणानें किंवा अज्ञानानें लेंकरांस अफू अधिक पोंचून पुष्कळ लेंकरें जायां होतात. सबब अफूच्या विषप्रयोगावर प्रतिकार करण्यासंबंधीची सर्व माहिती प्रत्येकास माहीत असणें फारच इष्टही आहे.

२. **लक्षणें:**— अफूचें अधिक प्रमाण पोटांत जातांक्षणींच अफूपासून जी एरवी उत्तेजक व उल्हासाची स्थिति उद्भवते ती फारच थोडा वेळ राहून मनुष्य लागलींच सुस्त होऊन तो गुंगूं लागतो. त्याचें डोकें फिरून जाऊन जीव गुदमरल्यासारखा वाटतो आणि तो अगदीं निद्रेनें व्यापून जातो. केव्हां केव्हां मळमळून वांतीही होते. पुढें पुढें तो अगदीं बेशुद्ध होतो, श्वास मंद मंद व अर्धवट चालूं लागतो व

शेवटीं बंद पडतो; चेहरा फिक्का पडून काळवंडतो आणि त्याच्या शिरा ( अशुद्ध रक्तवाहिन्या ) फुगतात. नाडी प्रथम पूर्ण व जोरानें वाहते, पण पुढें बारीक व अशक्त होऊन दोऱ्यासारखी हातास लागते; डोळ्यांचीं बुबुळें संकोच पावून फार लहान होतात; केव्हां केव्हां तर तीं टांचणीच्या डोक्याइतकीं लहान होतात; हळू हळू रोग्याची गिळण्याची शक्ति नष्ट होते; बुबुळावर उजेडाचा कांहींएक परिणाम होत नाहीं; शरीराचे स्नायु ढिले पडतात आणि कांहीं केलें तरी रोगी आपल्या गाढनिद्रावस्थेंतून सावध ह्मणून होतच नाहीं; घशांत कफ जमून तो घरघरूं लागतो व शेवटीं श्वास बंद होऊन रोगी मरण पावतो.

क्वचित् शेवटल्या स्थितींत श्वास कांहीं वेळ थांबून पुनः चालूं लागतो. अशा स्थितींत रोगी कांहीं वेळ राहून नंतर श्वास कायमचा थांबतो. श्वास चालला असतांना नाडी जलद वाहते- तिचे ठोके १२० पासून १४० ही भरतात. जेव्हां श्वास बंद पडतो तेव्हां नाडी लागलीच मंद मंद होऊन तिचे ठोके ८०।९० पर्यंत भरतात. श्वास बंद पडतांच नाडीचे एकदम २० ठोकेही कमी होतात व श्वास पुनः एक दोन वेळा चालतांच पुनः लागलीच ठोके वाढतात.

अफूपासून विषप्रयोग झाला असतांना वरील सामान्य लक्षणांशिवाय केव्हां केव्हां हगवण, आंचके ( विशेषतः मुलांत ) येणें, दांतखिळी बसणें, बुबुळें विकास पावून मोठीं होणें किंवा एक बुबुळ संकोच पावून दुसरें विकास पावणें, त्वचा कोरडी पडून तिला खाज सुटणें, इत्यादि लक्षणें होतात.

**३. निदान.**— अफूपासून झालेला विषप्रयोग रक्तजमूर्च्छा ( ऑपोप्लेग्झी ) व मद्यापासून झालेला विषप्रयोग ह्याशीं साम्य पावतो. रोग्यास विकार एकदम झाला किंवा कसा ह्याबद्दलची माहिती मिळाल्यास, श्वासोच्छ्वासाचा वास व उलटीचा वास घेऊन पाहिल्यास, रोग्याचें वय ध्यानांत आणल्यास ( ऑपोप्लेक्शी बहुधा वृद्ध मनुष्यासच होते ) व बुबुळांची स्थिति (ऑपोप्लेक्सींत बुबुळें अफूप्रमाणें संकोच न पावतां बहुधा मोठीं होतात किंवा दोन्ही बुबुळें सारखीं नसतात )

पाहिल्यास ती स्थिति रक्तजमूर्च्छेपासून आहे किंवा अफू-पासून आहे हें सहज ध्यानांत येईल. अत्यंत मद्यपान केलेलें असलें तरच ह्याचीं लक्षणें अफूच्या साधारण लक्षणांशीं साम्य पावतात. दोन्ही स्थितींत रोगी बेशुद्ध असतो, पण मद्य प्यालेल्या रोग्यास सावध केल्यास तो प्रश्नाचीं वेडींवांकडीं उत्तरें देतो. पण अफू खाल्लेला मनुष्य उत्तर जरी सावकाश देतो तरी अगदीं बरोबर देतो. मद्य घेतलेलें असल्यास त्याची परीक्षा तोंडाच्या व उलटीच्या वासावरून सहज होते. अफूच्या विषप्रयोगांत बुबुळें संकोच पावतात, पण मद्यापासून झालेल्या विषप्रयोगांत तीं मोठीं होतात. रोग्याची हकीकत व आरंभीचीं लक्षणें ह्यांचा चांगला विचार केल्यास बहुधा संशयास जागा राहतच नाहीं.

४. **विषारी प्रमाण.**— चार ग्रेन ( दोन गुंजा ) अफू किंवा अफूचा अर्क एक ड्राम ( ६० थेंब ) एवढ्यानें सुद्धां रोगी जाया झाल्याचीं उदाहरणें आहेत. मुलांना अफू अगदीं सोसत नाहीं, यामुळें अगदीं सूक्ष्म प्रमाणानें दिल्यास सुद्धां अपघात होतो.

५. **उपचार.**— अफू हें विष कोठ्यांत उतरतांच रक्तांत शोषण होऊं लागतें. यासाठीं जितका लौकर उपचारास आरंभ होईल तितका रोगी निर्भय पार पडण्याचा अधिक संभव. प्रमाण मोठें असून उपचारास दोन तीन तासांपेक्षां उशीर झाल्यास रोगी पुष्कळदां दगावल्यावांचून राहतच नाहीं. रोगी जेव्हां अगदीं बेशुद्ध होऊन पडतो, त्याचे अंगास घाम येतो, बुबुळें अगदीं संकोच पावतात, व त्यास श्वास लागून रोग्याचा घसा घरघर करूं लागतो, तेव्हां कोणत्याही उपचाराचा उपयोग क्वचितच होतो पण रोगी सावध असून वसूं बोलूं शकतो, त्याचा श्वासोच्छ्वास नेहमींप्रमाणें चालत असतो व बुबुळें फारशीं संकोच पावलेलीं नसतात तेव्हां सामान्य उपाय सुद्धां तातडीनें व दक्षतेनें केल्यास रोगी सहसा दगावतच नाहीं असा सर्वत्र अनुभव आहे. यासाठीं घरच्या माणसांनीं अथवा वैद्यांनीं आपल्यास समजतांच क्षणभरसुद्धां वेळ फुकट न दवडतां योग्य उपचारांची तजवीज करावी.

रोग्याचे जवळ गर्दी न करितां त्यास खुल्या जागेंत निजवून वैद्यास मदत करण्यास एक दोन हुषार मनुष्यें ठेऊन बाकीच्यांनीं दूर राहावें ह्मणजे उपचारांत धांदल होत नाहीं.

( १ ) **कोठा धुणें.**— प्रथमची गोष्ट ही कीं, रोग्यास एखादें उलटीचें औषध द्यावें· आपल्यांत ह्यासाठींच पैसे चिंचेंत कोळून तो बलक पाजतात. अर्धा तोळा मोहोरीची पूड ऊन पाण्यांत द्यावी किंवा इंग्रजी औषधें सलफेट आफ झिंक ( Salphate of zinc ) अथवा इपिकाक ( Ipicac ) वीस ग्रेन ऊन पाण्यांत पाजावें. निदान चमचाभर मीठ पाजावें. उलटीचें औषध देऊन वर रोगी पील तितकें ऊन पाणी पाजून त्याचे घशांत बोटें घालून उलटी करवावी. एकदां औषध देऊन लागलींच उलटी न झाल्यास पुन: वरील औषध गरम पाण्यांत द्यावें व घशांत बोटें घालावीं. एवढ्या उपायानें उलटी होऊं लागल्यास दोन चार उलट्या होऊन स्वच्छ पाणी बाहेर पडेपर्यंत त्यास पुनः पुनः ऊन पाणी पाजून उलटी करवावी. केव्हां केव्हां असें होतें कीं, वरील औषधें तिप्पट चौपट प्रमाणानें सुद्धां पोंचून कांहीं केल्या उलटी होतच नाहीं किंवा रोगी अगदीं बेशुद्ध झाल्यामुळें उलटीचें औषध अथवा पुष्कळ गरम पाणी पाजणें शक्यच नसतें, अथवा लहान मुलें असलीं तर त्यांना औषध पाजणें अशक्य होतें. अशा समयीं उलटी होईल ह्मणून फार वेळ न घालवितां लगेच पोटांत घालण्याच्या नळीचा ( स्टमकट्यूब ) उपयोग वैद्याकडून करावा. ह्या नळीनें रोगी बेसावध असला तरी कोठ्यांत पाणी घालून तें पुन: लागलींच बाहेर काढतां येतें. ह्याप्रमाणें आंतून पाणी अगदीं स्वच्छ निघेपर्यंत करावें लागतें. अफू पोटांत जाऊन चार तासांवर झाले असल्यास उलटीचे औषधाची अथवा नळीची जरूर राहत नाहीं. कारण, त्या वेळापुढें सर्व अफू रक्तांत शोषण होऊन जाते, त्यामुळें कोठ्यांत ती शिलकच नसते. कोठा धुऊन उलटीनें अथवा नळीनें स्वच्छ केल्यावर काफी करून रोग्यास पाजावी. काफी वरचेवर रोग्यास आराम पडेपर्यंत थोड्या प्रमाणानें देतच जावी. रोगी पिऊं शकत नसल्यास नळीनें कोठ्यांत

घालावी अथवा अछेरपर्यंत काफीचा प्रत्येक दोन दोन तासांनीं बस्ती द्यावा.

( २. ) **रोग्यास जागें करणें.**— त्याला अगदीं गुंगू देऊं नये. व ह्यासाठीं त्याला धरून चालवावें, त्याचे डोळ्यांवर पाणी मारावें, त्याचे कमरेवर ओलें फडक्यानें मारावें, त्याचेजवळ आरडावें, त्याला चिमटे घ्यावे, अमोनियाचा अगर विजेच्या पेटीचा उपयोग करावा, मूल असल्यास त्याला खरबरीत जागेवर अथवा चिरगुटावर किंवा काथ्याच्या चटईवर निजवावें. सारांश, हवे त्या युक्तीनें रोगी जागा राहील असें करावें. अशा रोग्यास उत्तेजक ह्मणून कसलेंही मद्य देऊं नये.

( ३. ) **काफी पाजणें.**— या बद्दलचा वर उल्लेख केलाच आहे. ती गरम गरम पाजावी, अथवा तिचा बस्ती द्यावा. काफीही अफूचें विषनाशक आहे असा समज आहे. शिवाय ती दिल्यानें रोगी हुषार राहण्यास मोठी मदत होते.

( ४. ) **अट्रोपीन.**— ( Atropine ) वरील सौम्य उपायांची मात्रा न चालून रोगी भयंकर स्थितींत पोंचल्यास अट्रोपिया ह्मणून इंग्रजी एक जाज्वल्य विषारी औषध आहे त्याची त्वचेखालीं पिचकारी मारण्याचा आजपर्यंत बराच प्रघात आहे. श्वास बंद पडूं लागतांच अट्रोपीनचा $\frac{१}{२०}$ ग्रेन पांच दहा थेंब उदकांत विरघळून त्याची त्वचेखालीं पिचकारी मारतात. अट्रोपियाचे ऐवजीं टिंकचर बेलाडोनाचे ( Tincture of Belladonna ) तीस थेंब पोटांत द्यावे अथवा त्याची त्वचेखालीं पिचकारी मारावी. अट्रोपिया हें बेलाडोनाचें सत्व आहे. रोग्याचे स्थितींत अर्ध्या तासाचे आंत सुधारणा न झाल्यास पुनः वरील उपचार करीत जावा. अफूचें मुख्य सत्व जें मारफिया ( Morphia ) त्याचा १ ग्रेन, $\frac{१}{२०}$ ग्रेन अट्रोपियानें, नाहींसा होतो असा समज आहे. चीनांतील बरेच डाक्तर लोकांचा ह्या उपायाविषयीं अनुकूल अभिप्राय आहे. व अगदीं भयंकर स्थितींत सुद्धां अट्रोपियानें रोगी बचतात असा त्यांचा समज आहे. पण आमचा अनुभव

तसा नाहीं. पुष्कळ प्रसंगी आह्मीं अट्रोपियाचा उपयोग करून पाहिला, पण त्यापासून उपयोग झाला नाहीं. ज्या रोग्यांत अट्रोपियाचा उपयोग केला ते रोगी पुष्कळ उशिरा ४-८ तासांनीं उपचाराखालीं आले व तेव्हां ते अगदीं बेशुद्ध होऊन त्यांना श्वास व घरघर लागली होती. अट्रोपियाचा प्रत्येक १५-२० मिनिटांनीं असा तीन वेळ सुद्धां उपयोग केला, पण उपयोग झाला नाहीं. सारांश, पूर्व स्थितींत रोगी आल्यास अट्रोपियाची जरूरच नाहीं व पुढील स्थितींत त्याचा उपयोग मुळींच होत नाहीं, असा आमचा व आमच्या मित्रांचा अनुभव आहे.

(५.) **परम्यँागनेट आफ पोट्याशियम** (Permanganate of Potaisum)-हें एक औषध अफूच्या विषावर उत्तम उतार आहे, असें आलीकडे प्रसिद्ध झालें आहे. ह्याचे आठ ग्रेन घेऊन ते एक औंस ( २॥ तोळे ) पाण्यांत विरघळून मिश्रण करावें; तें मोठ्यास आठवा हिस्सा ह्याप्रमाणानें अर्ध्या अर्ध्या तासानें आराम पडेपर्यंत द्यावें. लहान मुलास वयाचे मानानें द्यावें. ह्यापासून भयंकर स्थितींत पोंचलेले रोगी उठले असे बरेच लेख हल्लीं वाचण्यांत येत आहेत. सारांश, ह्या उपायानें अट्रोपिया मागें पडला.

( ६. ) **कृत्रिमश्वासोच्छ्वास.**— ( Artificial Respiration ) करण्याची कृति भिषग्विलास पुस्तक २ पान १६८ ह्यामध्ये दिली आहे, सबब तिचा येथें पुनः उल्लेख केला नाहीं. सर्व उपाय थकून रोग्याचा श्वासोच्छ्वास थांबूं लागल्यावर कृत्रिम श्वासोच्छ्वासाशिवाय उपायच नाहीं. सारांश, मधून मधून रोग्याचा श्वासोच्छ्वास आपोआप चालत असतांना तेवढा वेळ कृत्रिम श्वासोच्छ्वास बंद ठेऊन बाकीच्या वेळांत तो सारखा चालू ठेवावा. क्वचित् अगदीं व्यापलेलाही रोगी ह्या उपायानें जगतो, सबब तेवढी संधी रोग्यास दिल्यावांचून राहूं नये.

( ७. ) **इतर उपचार.**— इंग्रजी औषध अमिलनैट्रस (Amyl Nitras) हुंगण्यास देणें, काफीच्या सत्वाची ( Caffeine )

त्वचेखालीं पिचकारी मारणें, वगैरे अनेक उपचार प्रत्येक डाक्टर आपल्याअनुभवानुसार करीतच असतो. देशी- कोहळ्याचा रस, पेरूचा व शिताफळीचा वगैरे रस देतात पण त्यांच्यापासून उपयोग कितपत होतो हें सांगतां येत नाहीं. कारण, तत्संबंधी जितका व्यवस्थित अनुभव घेण्यास पाहिजे आहे तितका घेतलेला नाहीं.

९. शेवटीं पुनः एकवार इतकेंच सुचवितों कीं, अफूसारखें विष घरांत ठेऊंच नये- निदान अज्ञान स्त्रियांचे स्वाधीन ठेऊं नये. मुलांस त्याची मुळींच संवय लाऊं नये, ह्मणजे त्यांचे आरोग्याची हानि न होतां- खेळतां खेळतां अफूच्या डबींतील अफू तीं न खातां- अपघात होणार नाहीं. व अफूच्या विषप्रयोगाचा संशय येतांच उपाय तत्काळ करावेत. थोडक्या उपायानें रोग्याचा बचाव करणारी ही सोन्यासारखी संधी जाऊं दिल्यास पुढें मोठें मोठे जाज्वल्य उपचार केले तरी व्यर्थ होतात, हें ध्यानांत ठेवावें.

## अफूचे उपयोग ( आपल्या वैद्यकानुसार ).

१. अफू ही औषधी **चरक**, **सुश्रुत** किंवा **वाग्भट** ह्यांचे, काळापर्यंत आपल्या लोकांस माहीत नव्हती असें दिसतें. कारण वरील ग्रंथांतून तिचा कोठेंही उल्लेख केलेला आढळत नाहीं. ही औषधी मुसलमान लोकांनीं आपल्या बरोबर हिंदुस्थानांत आणली असावी असें तिच्या नांवावरूनच दिसतें. हिला संस्कृतांत **अहिफेन** ह्मणतात. तें व मराठी अफू हे नांव अरबी भाषेंतील **अफीन**(Afyun) ह्यापासूनच निघालेलें असावें. पूर्वींच्या ग्रंथांतून जरी अफूचा उपयोग सांगितलेला नाहीं, तथापि आलीकडील **चक्रदत्त**, **रसेंद्रसारसंग्रह**, **भैषज्यरत्नावली**, **शार्ङ्गधर**, इत्यादि ग्रंथांतून तिचा उपयोग सांगितलेला आहे.

२. अफूचे फुलांस अफूचीं बोंडें किंवा पोस्त ह्मणण्याचा लोकांत प्रचार आहे. संस्कृतांत त्यांस खाकस ह्मणतात. अफूचें बीज

ज्यास मराठींत खसखस ह्मणतात, त्याचें संस्कृत नांव **खाखासतिल** हें होय. कोठें कांहीं वेदना होत असल्या- पोट दुखत असलें, सांधे सुजून दुखत असले, गळू ठणकत असलें- तर अफूचीं बोंडें पाण्यांत उकडून त्या पाण्यांत एखादें गरम चिरगूट भिजवून तें पिळून त्यानें वेदनेचे जागीं शेकल्यास वेदना शमन होण्यास फार चांगला उपयोग होतो, व ह्याचें कारण तरी त्यांत अंशतः ( अगदीं थोड्या प्रमाणानें ) अफू असतें, हेंच होय. खसखशींत मादकपणा नसतो, यामुळें ती खातात- तिची खीर लाडू इत्यादि पदार्थ करितात, किंवा मेवामिठाईवर ती लावतात. खसखशीपासून तेल निघतें त्याचा उपयोग जाळण्याचे व खाण्याचे कामीं करितात. खसखस ही पौष्टिक व स्निग्ध असून तिचा उपयोग खोकल्यांत व दम्यांत करितात.

३. अफू ही स्तंभक, मादक व वेदनास्थापक आहे. अर्थात् त्यामुळें आमच्या ग्रंथकारांनीं तिचा उपयोग आंतड्याचे विकारांत—आमांश, हगवण, पोटदुखी इ. खोकल्यांत, दाहामध्यें, मूत्ररोगांत, संधिभंगांत आणि त्वग्रोगांत करण्यास सांगितलेला आहे. अफूमिश्रित औषधांचे अनेक प्रकार ( कल्प ) आपल्या ग्रंथांतून दिलेले आहेत, त्यांपैकीं कांहीं खालीं दिले आहेत.

४. **आमराक्षसी**— अफू, जायफळ, लवंगा, हिंगूळ व कापूर ह्यांचें समभाग चूर्ण घेऊन थोड्या उदकाबरोबर चांगला खल करून दोन गुंजेची ( चार ग्रेन ) एक गोळी ह्याप्रमाणें गोळ्या कराव्यात. ह्या गोळ्यांचा उपयोग हगवण व महामारीवर करण्यास सांगितला आहे. ( रसेन्द्रसारसंग्रह. )

५. **ग्रहणी कपाटरस**.— जायफळ, टाकणखार, अभ्रकभस्म, धोतऱ्याचें बीं, हीं समभाग, अफू दोन भाग घेऊन त्या सर्वांचा नेदचांलीच्या ( प्रसारणी ) रसांत खल करून एकेक गुंजेच्या गोळ्या बांधाव्या. ह्याचा उपयोग जीर्ण हगवणींत व संग्रहणींत चांगला होतो. ( रसेंद्रसार संग्रह. )

६. **दुग्धवटी**.– अफू व शुद्ध केलेला बचनाग प्रत्येक १२

गुंजा,लोहभस्म ६ गुंजा, अभ्रकभस्म ६ गुंजा घेऊन त्या सर्वांचा दुधांत खल करावा व दोन गुंजांच्या गोळ्या बांधाव्यात. रोज सकाळीं दुधाबरोबर एक गोळी घेतल्यानें हगवण असून अंगावर सूज आली असल्यास बरी होते. अन्न फक्त दूध घ्यावें, मीठ व उदक सुद्धां घेऊं नये. [ भैषज्यरत्नावली. ]

७. **शंभुनाथरस.**– हरताळ, मनशीळ, हिंगूळ, सोमल [ शंखविष ], टांकणखार, शुद्ध बचनाग व तुरटी हीं सर्व एकेक भाग, पारा, गंधक व अफू हीं प्रत्येक सात भाग घेऊन सात सात दिवस पर्यंत गांजा, निरगुडी, धोतरा, व निंब ह्यांच्या रसांत खल करून एकेक गुंजेच्या गोळ्या बांधाव्यात. हगवण असून ज्वर पुष्कळ असल्यास ह्या गोळ्या द्याव्यात [ भैषज्यतंत्र, ]

८. **अकरादिचूर्ण.**— अक्कलकारा, सुंठ, कंकोळ, केशर, पिंपळीं, जायफळ, लवंगा, रक्तचंदन, हीं प्रत्येक २ तोळे व अफू ८ तोळे घेऊन त्या सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करावें. नंतर त्या सर्व चूर्णांत तितकीच साखर मिसळावी. प्रमाण ३ गुंजांपासून ६ गुंजांपर्यंत. अनुपान मध. हें चूर्ण मोठें कामोत्तेजक आहे. [ भैषज्यतन्त्र. ]

९. **मधुमेहावर.**— [ डायाबिटीस. ] कापूर व कस्तूरी, प्रत्येक १ भाग अफू व [ मेस ] प्रत्येक चार भाग घेऊन एकेक गुंजेची गोळी बांधावी. व ती रोज एक, विड्याच्या पानाच्या रसांत, घ्यावी.

१०. ह्याशिवाय कुंकुमादि वटी वगैरे अनेक प्रकार आलीकडील ग्रंथांत दिलेले आहेत. त्यांवरून पाहतां अफूचा पुष्कळच उपयोग त्यांनीं केला आहे. व्यवहारांतही ग्रंथाव्यतिरिक्त पुष्कळ लोकांस अफूमिश्रित अनेक औषधी माहीत असल्याचें दिसून येतें. एकंदरींत अफू औषधोपचाराचे कामीं फारच उपयुक्त व अतुल्य होय, असें वर दिलेल्या इंग्रजी व देशी माहितीवरून वाचकांचेसहज ध्यानांत येईल.

## कृष्णशास्त्री त्रिवलकर वैद्य मु॰ आंजर्ले ता॰ दापोली जि॰ रत्नागिरी यांचीं जगत्प्रसिद्ध, सर्वोपयोगी, निर्दोष व रामबाण औषधें.

या जाहिरातीचे खालीं " विशेष सूचना " केली आहे ती वाचकांच्या अवश्य लक्ष्यांत असावी.

### १ वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साह· बुद्धि कांतिवर्धक व धातुपौष्टिक, सुवर्णमाक्षिक· मौक्तिक· कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

---

१ शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें त्यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्व भागीं व त्याच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, कोणत्याही कारणांनीं आलेली अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, उन्हाळे, छातींतील रोग, मस्तकशूळ, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूळव्याधि, भगंदर, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूळ, कटिवात, वातरोग, निद्रानाश, चक्कर, कफातिरेक, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, सूतिकारोग, व्रण, हात, पाय, मूत्रमार्ग व शरीर यांचा दाह, ठणका, ग्लानि, अरुचि, मूत्राश्मरी व चित्तभ्रम इत्यादि अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले, नवीन किंवा जुनाट असले तरी अगदीं खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदुष्पणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति, व बुद्धि हीं वाढतात. ज्यांस फिरण्याचे, अभ्यास करण्याचे लिहिण्याचे व शिकविण्याचे श्रम फार पडतात त्या सर्वांच्या अंगीं यांणीं

वरील औषधें अत्यंत खात्रीचीं आहेत. त्यांणीं हजारों लोकांस गुण आला व नित्य येत आहे. अनुभवानंतर पक्की खात्री होईलच. याशिवाय आमच्या येथें कस्तूरीच्या उत्तम कातगोळ्या, तमाखूच्या अर्कांच्या कस्तूरीमिश्र गोळ्या, उत्तम सुगंधी अत्तरें व ग्रंथोक्त रसायनें, धातूंचीं भस्में, पाक, तैलें, चूर्णें, गोळ्या, घृतें, आसवें, द्राव, क्षार हेमगर्भादि रसायनें इ. औषधें माफक किंमतीस मिळतील. पाहाण्यासाठीं सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. अनुपान पत्रक औषध सोबत पाठवूं पत्ता सवाचा. कोणी प्रकृतिमान कळविल्यास रोगाचें निदान व योग्य चिकित्सा कळवूं. औषधें पोष्टानें किंवा व्ही. पी. नें विकत मिळतील. टपालखर्च वेगळा पडेल. गरीब लोकांस स्वस्त दरानें औषधें देऊं. जाहिरातीच्या खालील किंवा वरील पत्यावर मिळतील. या औषधांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून त्यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळविल्या आहेत व नित्य मिळत आहेत

**विशेष सूचनाः—** आलीकडे वर्तमानपत्रांतून आंजर्लें व नजीकच्या मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या नवीन बऱ्याच जाहिराती सुरू झाल्या आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींच्या खालीं किंवा वर ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या ग्राहकांस भासण्याचा संभव आहे, यामुळें कदाचित् ग्राहकांचा घोंटाळा होईल. तरी अशा लोकांशीं व त्यांच्या जाहिरातींशीं आमचा कोणत्याही प्रकारें अगदीं संबंध नाहीं हें ग्राहकांनीं अवश्य लक्षांत ठेऊन, आमचीं औषधें मागणें तीं "**कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य मु० आंजर्लें ता० दापोली जि० रत्नागिरी**" या अगदीं बिनचूक सही व पत्यावर मागवावीं.

**कृष्णशास्त्री बिवलकर.**

**पत्ता—** मु० आंजर्लें, ता० दापोली, जिल्हा रत्नागिरी.

दांतांचें मंजन.—किं. ।. ट. व बं. खर्च ३ डब्यांपर्यंत ॥.

केशवर्धक तेल.— किं. रु. १ ट. व बं. ख. ।॥.

जुलाबाच्या गोळ्या.— किं. ।≈ ट. व बं. ख. ।≡

अन्नपाचक गोळ्या— किं. ॥. ट. व बं. ख. ।≡

मुलांचे ताड्यावर.— ( आंकडीवर )रामबाण— किं. रु.३ व रु. २ ट. व बं. ख. ॥.

केंस जाण्याचें औषध.— किं. रु. १ ट. व बं. ख. ॥. हें पाण्यांत भिजवून लेप करून खरवडल्यास तात्काळ केंस जातात.

बाळंतपणावर अर्क.— हें सतत घेतलें असतां बाळंतरोग साफ बरा होतो. किं. रु. ४ ट. व बं. ख. रु. २॥

मुद्दाम उन्हाळ्याकरितां.— थंडगार. हुषारी, आणणारी व ऊत येणारी सर्बतची भुकणी, किं. रु. १ ट. व बं. ख. रु. १≈

इंग्रजी डाक्तरांकरितां लागणारीं औषधें विलायतेहून आणविलीं आहेत. त्यांचा क्याटलागही अर्ध्या आण्याचें टिकिट पाठवून मागवा.

वैद्य गोपीनाथ कृष्णाजी क्षत्रिय.

१ ली सदाशिवजीची गल्ली, गिरगांव पोस्ट आफिसाचे समोरचे गल्लींत, मुंबई.

---

THE MEDICAL ASSOCIATION OF INDIA.

The usual monthly meeting of the above Association was held at No. 85, Bow Bazaar Street, on Wednesday the 17th instant. After the minutes of the last meeting were read and confirmed, and prior to proceeding with the business of the evening, the following resolutions were proposed and duly adopted.

1. That the members of the Medical Association of India, have heard with the deepest sorrow the sad intelligence of the death of Brigade-Surgeon J. M. Coates, M. D. I. M. S., late Principal of the Calcutta Medical College, and desire to place on record their high appreciation of him as the Principal of the College; the esteem in which he was held by them as a physician; and the confidence in which they held him as a friend.

( Resolved that a copy of the above resolution be forwarded to the relatives of the deceased. )

2. That a public memorial fund be opened at once to be called "The Coates' Memorial Fund" the shape of the memorial to be determined hereafter.

3. That Dr. L. Fernandez, the Secretary of the Association, be appointed Honorary Treasurer to the above Fund; and that he deposit all subscriptions received in a public bank.

As a mark of respect to the memory of Dr. Coates, no further business was transacted and the meeting was adjourned.

## जी. बी. नाईक कंपनीच्या

### विजेच्या आंगठ्या, कडी, लेखण्या व गळपट्टे.

प्रत्येक वस्तूवर G. B. N. मार्क पाहून घेत जा.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

## रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे.




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग, अशक्तपणा, संधिवायु, शिरांगतवायु, पोटांत वायु धरणें, कंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे, काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धशिशी, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें, गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मूळव्याधी, पाठींतील अशक्तता, निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा- लहान मुलांचे दंतोत्पत्तीसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात. लेखणी- हातास कांपरें व स्मरणशक्ति. अशा ह्या उत्तम गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

## विजेच्या वस्तूंची किंमत

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपट्टा किं. रु. १॥ |

कमरपट्टा किंमत रु० ६.

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही.पी. पार्सलनें मागविल्यास पाठवूं देऊं. आंगठीकरितां बोटाचें माप पाठवीत असावें. पत्ता स्पष्ट असावा. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे. बंगी करणावळ माफ.

**जी. बी. नाईक आणि कंपनी.**

मुंबई, भायखळा, जुन्या दावणीसमोर; व पुणें, बुधवारपेठ.

पत्ता.—डा० रानडे यांचा दवाखाना, सोलापूर.

# भिषग्विलास

## BHISHAGVILASA.

वैद्यकसंबंधी अनेक विषयांचें सुबोध भाषेंत
मासिक पुस्तक.

A Monthly Magazine in Marathi
to popularise Medicine.

**आयुःकामयमानेन धर्मार्थसुखसाधनं ॥**
**आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः ॥ १ ॥**

**पुस्तक ४. सप्टेंबर १८९९ अंक ६**

**विषयानुक्रम.** **पान.**


| | |
|---|---|
| शरीररचना .... .... .... .... .... | ९७ |
| निद्रा .... .... .... .... .... | १०२ |
| यात्रा व आरोग्य.... .... .... .... | १०७ |
| स्फुट लेख.... .... .... .... .... | ११२ |


**सोलापूर**

आनंदवृत्त छापखान्यांत छापिला.

वर्षाची आगाऊ वर्गणी ट. ह सह ३ रु.

## परीक्षेसाठीं आलेल्या औषधावर अभिप्राय.

सातारा येथील गृहस्थ रा. रा. वासुदेव विष्णु जोशी आर्यौषधीकर्ते यांडेकडून **हेमगर्भमात्रा, पंचामृतपर्पटी, अग्निकुमार, रससिंदुरमात्रा, सूतशेखर, वातावध्वंसमात्रा, सान्निपातभैरव, सुवर्णमालिनी वसंत** इत्यादि औषधें अनुभव घेण्यासाठीं आमचेकडे येऊन बरेच दिवस झाले. आमचा अनुभव कळविण्यास बराच उशीर लागला याबद्दल रा. जोशी आह्मांस माफी करतील अशी आशा आहे. आम्ही आपल्या दवाखान्यांत वरील औषधें रोग्यांस प्रसगानुसार देऊन पाहिलीं त्यावरून तीं चांगलीं तयार केलेलीं आहेत असा आमचा अनुभव आहे. जोशी यांस परंपरेनें ही विद्या माहीत आहे असें त्यांचे लिहिण्यावरून दिसतें. प्रसंगानुसार आम्ही साताऱ्यास जाऊं त्यावेळीं जोशी यांची समक्ष भेट घेऊन त्यांस ज्या सूचना करावयाच्या त्या समक्ष करूं. व त्यांचे औषधासंबंधानें जें आणखी लिहावयाचें तें लिहूं.

**श्रीपतुरारिंगवर्म मिक्चर** (Thripat's Ring Worm Mixture) ह्मणून गजकर्णावर लावण्याचें पातळ औषध त्याचे कर्त्याकडून आमचेकडे अनुभवास आलें आहे त्याचा अनुभव घेतां तें इंग्रजी **गोवापावडर** च्या तोडीचें औषध आहे, असा आमचा अभिप्राय आहे.

**सूचना.**— भिषग्विलासाचा चौथ्या वर्षाचा हा सहावा अंक वाचकांचे हातीं पडत आहे इकडे लक्ष देऊन त्यांनीं वर्गणी लौकर पाठवावी. पोंच पुढील अंकीं येईल.

---

**गोपीनाथ कृष्णाजी क्षत्रियकृत**



**अचूक गुणकारी औषधें.**

पुणें येथील सन १८८८ सालांतील देशी कलाकौशल्याचे जंगी प्रदर्शनांत औषधांच्या योग्यतेबद्दल व गुणाबद्दल सर्टिफिकिट (दाखला) मिळालेंआहे.

**ज्वरांकुश** (तापावर रामबाण) तीन दिवसांत हटक नाहीं वताप व

# भिषग्विलास.

पुस्तक ४ सप्तेंबर १८९९. अंक ६

## शरीररचना.

( लेखक — डा. कृष्णराव गडबोले. )

( मा. अं. व. पुढें चालू. )

### रक्तवाहिनी विचार.

वातवाहिनीविषयीं पूर्वींच्या अंकांत वर्णन झालें आहे, आतां रक्तवाहिन्यांविषयीं विचार करूं.

ज्या नलिकांतून रक्त वाहतें त्यांस रक्तवाहिन्या ह्मणतात. या तीन प्रकारच्या असतात; ज्यांतून शुद्ध रक्त ह्मणजे अगदीं लालभडक रंगाचें रक्त वाहतें,व ज्याच्या नळ्या नाडी असतात,व ज्यांतून रक्त वाहत असतांना ज्या दाबून धरल्या असतां बोटास धक्का बसतो त्यांस धमन्या ह्मणतात; ज्यांतून अशुद्ध रक्त ह्मणजे काळसर तांबुस रंगाचें रक्त वाहतें त्यांस शिरा म्हणतात; व धमनीच्या ज्या शेवटच्या केशाकृति शाखा त्यांस केशवाहिन्या ह्मणतात. तेव्हां वर सांगितलेल्या तीन प्रकारच्या वाहिन्यांपैकीं प्रथम धमन्यांविषयीं विचार करूं.

### ( धमनीविचार. )

भिषग्विलासाच्या दुसऱ्या वर्षाच्या आठव्या अंकांत हृदयाचें वर्णन केलें आहे तेथें हृदयापासून एक महा धमनी निघते असें लिहिलें आहे. ती, सर्व धमन्यांमध्यें फारच महत्वाची आहे कारण सर्व शरीरांत जितक्या धमन्या आहेत त्या सर्व हिच्याच शाखा आहेत याकरितां प्रमथ महाधमनीविषयीं विचार करून मागाहून तिजपासून झालेल्या विस्ताराचें वर्णन क्रमानें करूं.

### महाधमनी ( एओर्टा )

१. महाधमनी हृदयाच्या डाव्या कप्प्याच्या खालील भागापासून

सुरू होऊन वर चढत जाते, तेव्हां प्रथम पुढल्या व उजव्या बाजूस वळते, मग आडवी होऊन मागल्या व डाव्या बाजूस वळते, व तेथून खालीं उतरत वक्षःस्थलांतून मध्यपटलास वेधून पोटांतून खालीं उतरते व चौथ्या कटिमण्याच्या मध्यरेषेच्या किंचित् डाव्या बाजूस येऊन विभागते. मग तेथें ज्या तिच्या दोन मोठ्या शाखा होतात त्यांस श्रोणिधमनी ह्मणतात. महाधमनी हृदयापासून निघाली ह्मणजे प्रथम कमानदार होते. तिचा आरंभ तिसऱ्या बरगडीच्या व उरोवंशाच्या डाव्या बाजूकडील संधिस्थानासमोर असतो, पुढें ती उरोवंशाच्या उजव्या बाजूस दुसऱ्या बरगडीच्या संधिस्थानापर्यंत चढते, मग तेथून मागे वळून डाव्या बाजूकडे उतरत उतरत पांचव्या पृष्ठमण्याच्या डाव्या बाजूपर्यंत येते. एवढ्या भागास महाधमनीची कमान असें ह्मणतात. तेथून पुढें पांचव्या पृष्ठमण्याखालून वक्षःस्थळांतील जेवढा महाधमनीचा भाग आहे त्यास **औरस महाधमनी** ( थेरॉसिक एओर्टा ) असें ह्मणतात व पुढें मध्यपटलाला वेधून बाराव्या पृष्ठ मण्याखालून जेवढा भाग उदरांत उतरलेला असतो त्यास **औदर महाधमनी** ( आब्डॉमिनल एओर्टा ) असें ह्मणतात. औदर महाधमनी चौथ्या कटिमण्याच्या खालील कांठापर्यंत येते, मग तेथें तिचे दोन विभाग होतात, त्या विभागांस **श्रोणिधमन्या** असें ह्मणतात.

महा धमनीची जी कमान तिजपासून ज्या मोठ्या शाखा निघतात त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:– पहिली अनामिका, दुसरी वामग्रैवेयक व तिसरी वामाधोजत्रु.

१. **अनामिका** ( इनॉमिनेटा ) ही महाधमनीची सर्वांत मोठी व पहिली शाखा आहे. ही महाधमनीच्या कमानीपासून सुरू होते ती वर चढत चढत उजव्या बाजूच्या उरोवंशजत्रुसंधीपर्यंत तिरकस जाते तेथें तिच्या दोन शाखा होतात-एक दाक्षिणग्रैवेयक व दुसरी दाक्षिणाधोजत्रु.

२. **ग्रैवेयक धमनी** ( कॉमनकरॉटिड ) ग्रैवेयक धमन्या दोन आहेत- एक दाक्षिण व एक वाम. दाक्षिणग्रैवेयक अनामिकेपासून सुरू होते. व वामग्रैवेयक महाधमनीच्या कमानीपासून सुरू होते. यांपैकीं

प्रत्येक धमनी कंठाच्या बाजूनें वर चढत जाते, आणि कंठमण्याच्या वरल्या कांठाच्या सुमारास तिच्या दोन शाखा होतात. एक बहिर्ग्रैवेयक व दुसरी अंतर्ग्रैवेयक.

४. **बहिर्ग्रैवेयक** (एक्टर्नलकरॉटिड )या धमनीच्या पुढें अनेक शाखा होऊन त्या डोक्याचे बाहेरील भाग व मुखाचे बहुतेक भाग यांत पसरून त्यांस रक्ताचा पुरावा करितात.

५. **अंतर्ग्रैवेयक** (इंटर्नलकरॉटिड) ही धमनी कर्णास्थीच्या एका छिद्रांतून डोक्यांत शिरते व तेथें मस्तिष्कांत तिच्या अनेक बारीक शाखा होतात व हिच्या कांहीं शाखा डोळ्यांत व कानांतही पसरतात.

६. **अधोजत्रु** ( सब्क्लेव्हियन ) **अधोजत्रुधमनी** हें नांव अन्वर्थच आहे ह्मणजे ही जत्रु खालून आडवी जाते व पुढें खाकेंत शिरते तेव्हां तेथें ती कक्षाधमनी हें नांव पावते. हिची एक मोठी शाखा ग्रैवेयकमण्याच्या छिद्रांतून वर चढून महारंध्रांतून मस्तकांत शिरते व मस्तिष्काच्छादनास व शतदलास रक्त पोंचविते. वर सांगितलेल्या शाखेखेरीज अधोजत्रु धमनीच्या दूसऱ्या कांहीं शाखा आहेत त्या छातींत, गळ्यांत वगैरे पसरून त्या त्या भागांस रक्ताचा पुरवठा करितात. ही प्रत्येक बाजूस एकेक मिळून दोन आहेत- एक दाक्षिण व दुसरी वाम.

७. **कक्षाधमनी** ( आक्झिलरि ) ही पुढें बाहूच्या आंतल्या बाजूनें उतरूं लागते तेव्हां तिला भुजधमनी ( ब्रेकियल ) ह्मणतात. कक्षाधमनीपासून सात शाखा निघतात त्या काखेच्या आजुबाजूस व छातींत पसरतात. काखेच्या भागांतील जेवढी धमनी आहे तेवढीस कक्षधमनी असें ह्मणतात. **दक्षिणअधोजत्रु** अनामिकेपासून सुरू होतें आणि **वामअधोजत्रु** महाधमनीच्या कमानीपासून सुरू होते.

८. **भुजधमनी**.– ( ब्रेकियल ) पुढें बाहुंतून खालीं उतरतां उतरतां कोपराच्या पुढील खळगीपर्यंत जाते आणि तेथें तिच्या दोन शाखा होतात. एक बहि:प्रकोष्ठ धमनी व दुसरी अंत:प्रकोष्ठधमनी. भुजधमनपासून अनेक शाखा निघतात त्या बाहुंतील स्नायूंस रक्त

पोंचवितात.

९. **बहिःप्रकोष्ठधमनी.**–( रेडियल ) ही धमनी कोपराच्या पुढील खळगीच्या सुमारापासून सुरू होते. ती प्रकोष्ठप्रदेशांतील अंगठ्याकडल्या कांठाकडून मणगटापर्यंत येते. मणगटाच्या सुमारास ही धमनी बरीच त्वचेनजीक आलेली असते ह्मणून रक्तानुधावनाचा वेग कसा काय आहे तो या स्थळीं स्पर्श करून पाहण्याचा विशेष संप्रदाय आहे. याच धमनीस वैद्य लोक नाडी ( पल्स ) अशी विशेष संज्ञा देतात. पायांच्या धमन्यांपेक्षां हाताची धमनी हृदयापासून जवळ आहे व पाहण्यास विशेष सोईची पडते ह्मणून हीच धमनी पाहण्याची वहिवाट आहे. कोणी कोणी कपाळाच्या दोहों बाजूंच्या धमन्या पाहूनही रोगपरीक्षा करितात. बहिःप्रकोष्ठधमनी पासून पुढें मणगटाच्या पुढच्या अंगानें एक बारीक शाखा तळहाताकडे जाते, आणि बाकी राहिलेली धमनी अंगठ्याच्या मागल्या बाजूकडे येऊन तेथें पुनः विभागते. तिच्या शाखा बोटाच्या मागल्या बाजूकडील भागांत रक्त पोंचवितात.

१०. **अंतःप्रकोष्ठधमनी.**–(अल्नरआर्टरी ) ही भुजधमनीच्या शेवटच्या दोन शाखा त्यांपैकीं एक मोठी शाखा आहे. ही प्रकोष्ठाच्या करंगळीकडील कांठाकडून खालीं मणगटापर्यंत जाते आणि मणगटांतून तळहातांत जाऊन तेथें कमानदार बांक घेऊन अंगठ्याकडे येते आणि बहिःप्रकोष्ठ धमनीच्या एका शाखेस मिळते. त्या कमानी पासून प्रत्येक बेंचकाच्या सुमारास एकेक शाखा निघते. व ती शाखा पुनः विभागून प्रत्येक बोटाच्या कांठावरून टोंकापर्यंत जाते.

११. **औरस महाधमनी** (थोरॅसिकएओर्टा) ही वक्षःस्थलांतून खालीं उदराकडे जातां जातां अनेक शाखा देते. त्यापैकी तीन, फुप्फुसास जातात, पांच सहा शाखा अन्ननलिकेस जातात, व बरगड्यांच्या मध्यावकाशामधून जाणाऱ्या वीस शाखा आहेत ( उजवीकडल्या दहा व डावीकडल्या दहा मिळून वीस होतात).

१२. **औदर महाधमनी.**–(ॲब्डॉमिनल एओर्टा)औरसधमनी मध्यपटलांतून खालीं उदरावकाशांत आली कीं, औदरधमनी हें नांव

पावते ही धमनी पृष्ठवंशाच्या डाव्या बाजूनें खालीं उतरत जाऊन चौथ्या कटिमण्याच्या सुमारास जाते आणि तेथें तिच्या दोन शाखा होतात. पोटांत असणाऱ्या सर्व अवयवांस याच महाधमनी पासून शाखा मिळतात. बेंबीजवळ जोरानें दाबून पाहिलें असतां या धमनीचा धक्का हातास लागतो. या धक्यांत कांहीं फेरफार झाल्यासारखा भासतो त्यावरून वाट सरली अथवा गांठ सरली ह्मणून जो एक विकार होतो असा लोकांचा समज आहे त्याची परीक्षा करितात.

१३. **श्रोणिधमनी.**– ( कॉमन इलियाक ) औदरधमनीचे जे शेवटीं दोन विभाग होतात त्यांस श्रोणिधमनी ह्मणतात. या दोन आहेत, एक दाक्षिण व एक वाम. प्रत्येक श्रोणि धमनी त्रिकनितंबसंधी-पर्यंत जाते व तेथें तिचे दोन विभाग होतात- एक अंतःश्रोणिधमनी व दुसरी बहिःश्रोणिधमनी.

१४. **अंतःश्रोणि धमनी**— (इंटर्नलइलियाक) हिच्या पुढें अनेक शाखा होतात त्या बस्तिप्रदेशांतील अवयवांस रक्त पोंचवितात,

१५. **बहिःश्रोणिधमनी** ( एक्स्टर्नल इलियाक )ही त्रिकनितंबसंधीपासून खालीं तिरपी उतरते ती वंक्षणसंधीपर्यंत येते, तेथें तिला सक्थिधमनी हें नांव मिळतें. बहिःश्रोणिधमनी पासून दोन शाखा निघतात त्यांपैकीं एक उदराकडे वर चढते व दुसरी नितंबास्थिच्या वरील कांठावरून पोटाच्या बाजूकडील कांहीं स्नायूंस पोषण देते.

१६. **सक्थिधमनी** ( फीमरल आर्टरी ) बहिःश्रोणि धमनीच पुढें मांडींत उतरली ह्मणजे सक्थिधमनी हें नांव पावते. ही धमनी मांडीच्या आंतील बाजूनें खालीं उतरतां उतरतां गुडघ्याच्या मागील खळगींत जाते व त्या खळगींतून कांहींशी खालीं उतरते. नंतर तेथें तिचे दोन विभाग होतात- एका विभागाचें नांव प्राक्जंघधमनी व दुसऱ्याचें नांव पश्चाज्जंघधमनी. सक्थिधमनीपासून अनेक शाखा निघतात त्यांपैकीं कांहीं गुह्यस्थानांत व कांहीं मांडींत पसरतात.

१७. **प्राक्जंघधमनी** (ऑंटीरियर टिबियल) ही जंघेच्या पुढील भागांतून खालीं उतरते व पुढें पावलांत शिरली ह्मणजे चरणधमनी

नांव पावते व ती पावलाच्या वरील प्रदेशांत रक्त पोंचविते.

१८. **पश्चाज्जंघधमनी** (पोस्टीरियर टिबियल) ही पोटरींतून खालीं उतरून आंतील घोट्याच्या आंतल्या बाजूनें जाते व पुढें पायाच्या तळव्यांत शिरते तेथें तिला पदतल धमनी( प्लांटार आर्टरी ) हें नांव मिळतें. पुढें हिच्या दोन शाखा होतात- एक अंतःपदतल व दुसरी बहिःपदतल. या पायाच्या तळव्याचें पोषण करितात. (पुढें चालू.)

# निद्रा.

लेखक- डा. विष्णुपंत भागवत एल्. एम्. आन्ड एस्.

( मा. अं. व. पुढें चालू. )

१६. निद्रेचा एक चवथा प्रकार आहे त्याला अंत्रनिद्रा ( Visceral sleep ) ह्मणतात. या स्थितींतही कांहीं दुःस्वप्नें पडतात. परंतु या स्वप्नांचें कारण मेंदूचा अशक्तपणा नाहीं तर त्यांचें कारण वरच्याहून अगदीं भिन्न आहे असें पुढील विवेचनावरून कळून येईल.

१७. उदरावकाशांतील इंद्रियांना अमुक वेळ व्यायाम (क्रिया) व अमुक वेळ विश्रांति असें असणें हें साहजिक आहे.परंतु त्या नियमित वेळेपेक्षां त्यांची जर अधिक वेळ क्रिया झाली तर तीं अत्रें जणू काय आपल्या हिताकारितांच बाकीचीं इंद्रियें निद्रस्थ ( निर्व्यापार ) असतांना आपणही विश्रांति घेतात. ज्याअर्थी शरीरांतील निरनिराळ्या इंद्रियांचा, मेंदूचा व पृष्ठवंशस्थ रज्जू यांचा परस्परांशीं अन्योन्यसंवेदनमज्जातंतु कोशाच्याद्वारें ( Sympathatic System ) संबंध आहे, त्याअर्थी जेव्हां एखादें इंद्रिय किंवा अंत्र अति क्रियेमुळें स्वस्थ बसते तेव्हां त्या अंत्रांतील रुधिराभिसरण कमी होते; आणि त्या अंत्रापासून ज्ञानमज्जातंतूच्या योगानें स्वतश्चालक व मुख्य शक्तीवर व तेथून पुनः गति मज्जातंतूच्याद्वारें दुसऱ्या अंत्रावर किंवा इंद्रियावर जे ठसे उमटतात ते संताप किंवा भीतिदायक असतात, आणि ह्मणून अमुक इंद्रियाची चळवळ झाली आहे किंवा तें अगदीं निर्व्यापार झालें आहे हें स्वप्नाच्या-

योगानें उच्च शक्तीला कळून येते. यांशीं तारायंत्राचे साम्य दिलें असता हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

१८. लहान स्टेशनवरचा तारमास्तर ( इंद्रिय ), तारा (ज्ञान-मज्जातंतु ) मोठ्या स्टेशनावरचा तारमास्तर ( स्वतः चालक शक्ति ), मुख्य स्टेशनमास्तर ( मुख्य शक्ति ), दुसऱ्या तारा ( गति मज्जातंतु ) तार घेणारा ( दुसरें इंद्रिय ) इतकी व्यवस्था तारायंत्राला लागत असते. आतां वरील उदाहरण तारायंत्राला कसें लागूं होतें तें पाहूं. समजा लहान स्टेशनवरचा तारमास्तरानें गैर शुद्धींत मोठ्या तारमास्तरला भलतीच तार केली आणि ती या तारमास्तरनें मुख्य स्टेशन मास्तरला कळविली. तेव्हां हा मोठा स्टेशन मास्तर रागावून किंवा भिऊन ( वस्तुस्थिति असेल त्याप्रमाणें ) आपल्या स्टेशनवरच्या तार मास्तरला त्याप्रमाणें तार करण्यास सांगेल आणि त्याची ती तार जो घेणारा असतो त्याला ती वांचून किती हंसें येईल, किंवा भीति वाटेल ! हें सर्व लहान स्टेशनवरच्या तारमास्तरच्या गैरशुद्धींत त्याच्या हातून घडलेल्या मूर्खपणाचें फळ होय. याचप्रमाणें प्रत्येक तार-मास्तर, स्टेशनमास्तर, तार घेणार हे सर्व आपलें काम चांगलें करीत असून ताराही चांगल्या असल्या पाहिजेत म्हणजे सर्व काम सुरळीत चालेल; नाहींतर कोणतीही एखादी गोष्ट बिघडली असली कीं वरील-प्रमाणें खास घोंटाळा झाल्यावांचुन कदापि राहणार नाहीं.

१९. **झोंप किती घ्यावी?** ती वयाच्या मानानें कमीजास्त लागते-तान्ह्या मुलास २४ तासांतून १७ पासून १८ तासपर्यंत,तारुण्यावस्थेंत ६ पासून ९ तास व वार्धक्यांत २ पासून ४ तासपर्यंत सुद्धां झोंप पुरी होते. परंतु झोंपेमध्यें अमुक तासच घालविले पाहिजेत असें कायमचें प्रमाण बांधतां येत नाहीं. कारण, कांहीं लोकांस सर्व रात्रभर निजून जो फायदा होतो तितकाच किंबहुना त्यापेक्षां जास्त फायदा दुसऱ्यांस एक तासभर निजून होतो, याचें कारण रात्रभर निजणाऱ्यांची झोंप अर्धवट असते आणि तासभर निजणाऱ्यांची झोंप अति गाढ असते.

२०. चांगल्या प्रकृतीच्या लोकांना सरासरीनें ६ तास झोंप

पुरे होते व अशक्तांना त्यापेक्षां जास्त लागते; पुष्कळ काम करणाऱ्या लोकांना पुष्कळ झोंप लागते. म्हणजे त्यांना पुष्कळ वेळ निजावें लागतें असें नाहीं, तर त्यांना अति गाढ झोंप येणें जरूर असतें व त्याप्रमाणें ती त्यांना येतेही. अति झोंप घेणें हें अति खाण्यासारखेंच वाईट होय. अती झोंपेपासून हुषारी न येतां उलटा मनुष्य सुस्थ होऊन गळून जातो, आणि त्याचे अंगीं दिवसभर कामधंदा करण्यास हुषारी राहत नाहीं.

२१. **झोंप घेण्याची वेळ कोणती?** झोंप घेण्याची वेळ म्हणजे अर्थात् रात्र होय. परंतु नाजूक प्रकृतीचे लोक व मुलें यांना बहुत करून रात्रीं उशीरां झोंप येते व ती सकाळी उठतातही उशीरां; याचें कारण आपली पृथ्वी दुपारपासून पुढें पाझिटिव विद्युतनें बाकीच्या वेळेपेक्षां अधिक भारलेली असते. आणि ह्मणून वरील प्रकारचे लोक ही पॉझिटिव विद्युतनें अधिक भारले जातात आणि त्यामुळें जोंपर्यंत सूर्य पश्चिमेकडे आहे तोंपर्यंतच त्यांना काम करण्याची तरतरी अधिक असते, आणि ती रात्रीं ११-१२ वाजेपर्यंत टिकते, अर्थात त्यामुळें रात्रीं लवकर अशा लोकाना झोंपही येत नाहीं. मोठमोठे ग्रंथकार संध्याकाळीं व रात्रींच अधिक ग्रंथरचना करितात असें आपलें ऐकण्यांत आहे, आणि ते रात्रीं १२ वाजल्यावर निजून सकाळीं उशिरा उठतात.

२२. आपल्या मेंदूमध्यें 'निद्राशक्ति' ह्मणून एक शक्ति आहे आणि ती 'क्षुधाशक्तीला' अगदीं लागून आहे. आणि ह्मणूनच आपणास जेवण होतांच झोंप किंवा डुकली येते. याच कारणामुळें अजीर्ण झालेल्या लोकांना चांगली झोंप येत नाहीं. कित्येक लोक ह्मणतात कीं, आपल्या अन्नांत कांहीं मादक अशीं द्रव्यें असतात ह्मणून जेवतांचक्षणी आपणास डुकली येते. ही 'निद्राशक्ति' निद्रालू लोकांमध्यें व लहान मुलांमध्यें अति मोठी असते व वार्धक्य येऊं लागलें असतां कमी कमी होऊं लागते.

२३. अशक्त लोकांना, मुलांना व ज्यांना रात्रीं चांगली झोंप येत नाहीं त्यांना दिवसाची झोंप घेणें चांगलें.

१४. झोंप न येण्याचीं कारणें म्हटलीं म्हणजे नेहमीं वेळेवर न निजणें, अजीर्णांश वगैरे, व्यायामाचा आभाव व आपल्या आसपास निजण्याच्या सोईचा आभाव हीं होत.

१५. जशी खाण्यापिण्याची वेळ किंवा अभ्यासाची किंवा खेळण्याची वेळ ठरलेली असते तशीच झोंप घेण्याची वेळ ठरलेली पाहिजे. झोंप येऊं लागली कीं निजलेंच पाहिजे मग तेथें भीडभाड उपयोगाची नाहीं. शाळेंत जाणाऱ्या लहान मुलांना रात्रीं भारीसा अभ्यास करून देऊं नये; कारण, सर्व रात्रभर त्यांच्या मनांत रात्रीं शिकलेले धडे घोंळत असतात, आणि त्यामुळें त्यांना गाढ झोंप येत नाहीं. त्याप्रमाणें अगदीं लहान मुलांस बागलबुवा आला वगैरे भीति दाखवूं नये. कारण, या गोष्टीमुळें मेंदूचे विकार उत्पन्न होतात. आणि त्यापैकीं बालग्रह हा एक रोग होय.

२१. तसेंच गाढ झोंप येण्यास शारीरिक स्थिति चांगली असली पाहिजे. नाडी अति जोरानें व जलद वाहात असतां कामा नये. दुसरीं इंद्रियेंही सुस्थितींत असलीं पाहिजेत, पचनेंद्रियांपैकीं कोणत्याही इंद्रियाला त्रास होत असतां कामा नये. म्हणून अधिक श्रम उपयोगाचे नाहींत, एखादा घास कमी खाल्ला असला तर बरें. शरीरांतील उष्णता ९८ ५ असली पाहिजे, ती कमी जास्त होतां कामा नये. आपल्या त्वचेची क्रिया चांगली असली पाहिजे. गाढ झोंपेंत घाम थोडाबहुत येणें चांगलें. ज्यांना झोंप येत नसेल त्यांनीं जें कारण झालें असेल तें काढून टाकण्याकडे लक्ष पुरविलें पाहिजे. म्हणेज अजीर्णांश झाला असेल तर त्यावर उपाय केला पाहिजे किंवा त्वचेची क्रिया चांगली नसेल तर निजतांना सर्वांग स्वच्छ धुतलें पाहिजे. निजण्यापूर्वी प्रकृतीच्या मानाप्रमाणें थंड किंवा ऊन पाण्यांत बसणें चांगलें. सहसा झोंप येण्याचीं औषधें घेतां कामा नये. त्यांचा बहुतकरून उपयोग थोडा होऊन अपाय मात्र जास्त होतो, असें डा. हॉल, कूना वगैरेंचें मत आहे. परंतु कांहीं मानसिक रोगापासून, काळजी, जागरण वगैरे-पासून झोंप येत नसेल तरच तसल्या औषधांचा उपयोग एखादे वेळे-

स करावा. कारण, त्यांच्या योगानें मेंदूमध्यें जो कांहीं बिघाड झाला असतो तो नाहींसा होऊन नेहमींप्रमाणें झोंप येऊं लागते परंतु ज्या लोकांना फक्त विचारतरंगामुळेंच झोंप येत नाहीं त्यांच्या मेंदूंत अशा प्रकारचा बिघाड होत नसल्यामुळें या झोंप आणणाऱ्या औषधांचा उपयोग होत नाहीं. तसेंच आपल्याला एखादी इजा झाली असून तो भाग दुखत असला तर दुःखविमोचक औषधें द्यावींत, त्यांच्या योगानें तें दुःख नाहींसें होऊन झोंप येते. उताणें निजतां कामा नये कारण, ज्यांचें रुधिराभिसरण चांगलें चाललें नसतें त्यांच्या पाठींत रक्त उतरून तें तेथें सांखळतें, व वाईट साईट स्वप्नें पडतात. व अशा स्थितींत बहुतकरून टाळ्याचा मागला मांसलभाग व पडजीभ जिभेवर लोंबूं लागतात व जीभ पाठीमागें जातें आणि त्यामुळें श्वासोच्छ्वासाच्या नळीचें तोंड बंद होऊन पडजीभ उच्छ्वासाच्या जोरानें फडफडूं लागून मनुष्य घोरूं लागतो.

२४, आतां झोंप येण्यास तिसरी एक गोष्ट अवश्य पाहिजे आहे ती ही:– मनाला कोणताही त्रास होत नसला पाहिजे, निजण्याचे ठिकाणीं अतिप्रकाश असूं नये, हवा कोंदट नसून खेळत असली पाहिजे आणि ढेंकूण पिसवादि ह्या जागीं नसावींत. आतां या सर्व गोष्टी प्रत्ये-काला लागूं पडतात असें नाहीं, कारण ' भुकेस कोंडा व निजेस धोंडा ' या ह्मणीप्रमाणें कित्येकांना हवी तेथें झोंप येते. लढाई चालली असतां देखील शिपाई गाढ निजलेले असतात. निजतांना जशा प्रकारची आस-पासची स्थिति असते तशीच सर्व रात्रभर असली पाहिजे व ही गोष्ट मुख्यत्वें करून लहान मुलांस लागूं आहे, कित्येक लहान मुलांना झोंप येत नसल्यामुळें आया जवळ दिवा ठेऊन मुलाला कुशींत घेऊन थो-पटून निजावितात, आणि त्यांना थोडीशी झोंप लागली असें कळतांच त्याच्या जवळून उठून दुसरीकडे जाऊन निजतात व दिवा मालवतात, याचा परिणाम मूल मध्येंच जागें झालें ह्मणजे त्याच्या मनावर फार वाईट होऊन त्याला बालग्रह वगैरे रोग होऊन त्याचा स्वभाव चिर डखोर व तिरसट असा होतो.

## यात्रा व आरोग्य.

१. कोणताही धर्म घ्या त्यामध्यें अनेक ठिकाणच्या तीर्थयात्रा करणें हा एक पुण्याचा मार्गच समजल्यामुळें प्रत्येक मनुष्यास जेव्हां सवड होईल तेव्हां, काशी, रामेश्वर, गिरी, बद्रिकेदार किंवा जैनपंथी मनुष्य असल्यास गोमटस्वामी पालिठाणा इत्यादि ठिकाणीं अथवा मुसलमान असल्यास मक्केस जाण्याची इच्छा करून तो असतो. व त्याप्रमाणें तो आपल्या हयातींत तडीसही नेतो. असो, हा एक केवळ धर्ममार्ग झाला. पण त्याबरोबर दुसरा मार्ग ह्मणजे धर्म, अर्थ, काम, व मोक्ष हीं साधण्यास अवश्य जी आरोग्यता तिच्या मार्गाची हेळसांड होऊन त्याचे हातून धर्ममार्गाचें किंवा कोणत्याही पुण्यमार्गाचें अवलंबन अथवा कार्यसिद्धि होत नाहीं. सारांश, यात्रेचा जो मुख्य लाभ तो एकीकडेच राहून आरोग्याची हानि किंवा समुदायापैकीं एखादा दुसरा किंवा दोन चार असामी सुद्धां बळी देऊन बाकीचे कण्हत कुथत घरीं येऊन पडतात सर्व धर्मामध्यें यात्रा करण्यास सांगण्याचा हेतु नुसता पारमार्थीकच नसून त्यापासून इहलोकींही अनेक लाभ व्हावे असाच असला पाहिजे. यात्रा केल्यानें दूरदूरचे प्रदेश, हवापाणी, मनुष्यें, निरनिराळ्या चालीरीति इत्यादि पाहण्यास मिळून पुष्कळ व्यवहारिक ज्ञान मिळावें हा एक त्यापैकीं उद्देश खास असला पाहिजे. दुसरा मोठा व महत्वाचा उद्देश प्रकृतीची सुधारणा हा एक असला पाहिजे. पूर्वीचे काळीं व्यापार टापारास किंवा नोकरीस वेशीचेबाहेर सुद्धां जाण्याची जरूर नव्हती अर्थात यात्रेशिवाय दूरप्रदेशी जाण्याचा दुसरा ओढाच नव्हता. सारांश, यात्रेची योजना करितांना आरोग्यप्राप्ति हा एक मोठा हेतु योजकांचे मनांत आला असावा. पण सद्यःस्थिति पाहतां तो महत्वाचा हेतु एकीकडेच राहून आरोग्याचा किंवा जिवाचा सुद्धां ऱ्हास यात्रांच्यापायीं होतो असें सिद्ध करणें अगदीं सहज आहे. कारण, प्रत्येकाचे घरांतील माणसें दूरदेशीं यात्रेस जाऊन आजारी किती होऊन आले किंवा तिकडच्या तिकडे किती मरण पावले ह्याची आठवण त्यानें केली

ह्मणजे त्याच्या मनाची खात्री होणार आहे. ह्यावरून एवढेंच ध्यानांत आणावयाचें कीं, यात्रा करून नुसता परमार्थ साधण्याचा हेतु न धरतां त्याबरोबर आरोग्य प्राप्त करूनही घेतां येईल. निदान मुळचें आरोग्य तरी नाहींसें न होतां व आजारी पडण्याची पाळी न येतां आपण सुखरूप घरीं पोचूं अशी व्यवस्था ठेवणें हें प्रत्येकाचें कर्तव्य होय.

२. आधीं ह्मातारपणीं यात्रा करावयाची हा जो आमचा सर्वसाम प्रघात तो मोठा घातुक आहे. ह्मातारपणीं प्रवासांत किती हाल अपेष्टा त्या मनुष्याची व त्याच्या बरोबरच्या इतर मनुष्यांची होते तें अनुभविक लोकांवाचून कोणासही सांगतां येणार नाहीं पूर्वीं दूरदेशी जाण्यास आगगाड्यांची सोय नव्हती तेव्हां पायरस्त्यानें,बैलगाडीनें, घोड्यावर अथवा पाईच महिनोगणती प्रवास करावा लागे. प्रवासामध्यें चोर, लुटारू, दंगेखोर इत्यादि लोकांची भीति असे, यामुळें काशी रामेश्वरासारख्या दूर यात्रेस जावयाचें ह्मणजे वरील सारखीं अनेक संकटें सोसून यात्रा कराव्या लागत अर्थात बहुतेक संसाराची मजल मारल्यावर इहलोकाचें आपलें कर्तव्य आटपलें असें समजून उतार वयांत पूर्वीं लोक यात्रेस निघत, ह्मणजे बहुतेक मरणास तयार होऊन पुनः परत येण्याची आशा सोडून घरांतून बाहेर पडत. सारांश, यात्रेस निघणें ह्मणजे मरणाचें प्रस्थान ठेवावयाचें अशी स्थिति पूर्वीं असल्यामुळें लोक उतारवयातच यात्रेस निघत हें साहजीकच होय. पण तसा प्रकार आतां नाहीं. आतां अग्निरथ, रस्तें, शांतता, इत्यादि अनेक गोष्टीनें प्रवासांत कोणतीही भीति किंवा धोका राहिलेला नाहीं. तथापि यात्रेस जाणारें बहुतेक वयातीतच असतात. ही गोष्ट बरी नाहीं, जोंपर्यंत हातपाय, दृष्टि वगैरे चांगली असून आपण आपल्या स्वाधीन आहोंत तोंपर्यंतच दूरदेशचा प्रवास केला पाहिजे. पायानें चालवत नाहीं, डोळ्यानें दिसत नाहीं, अशी स्थिति झाल्यावर प्रवासास जाणें ह्मणजे आपलें दुहेरी हाल करून घेणें व आपल्या बरोबरच्या मुलबाळांचा जीव धोक्यांत घालणें होय. ह्माता-

ऱ्या कोताऱ्याची उस्तवार करतांना इतर मंडळी इतकी बेजार होते कीं, थोडेच दिवसांत त्यांनाही आजारी पडावें लागतें. आजारी पडल्यावर तरी मागला पुढला विचार न करितां पुन: पुढें मार्गक्रमण चालूच असतें. त्यांत अनेक त्रास व हाल होऊन शेवटीं कोणी तरी अस्वावस्थ झाल्यावांचून अथवा मृत्यु पावल्यावांचून राहतच नाहीं. ह्या सर्वांचा परिणाम असा होतो कीं, यात्रा यथासांग होण्याची एकीकडेच राहून सर्वांच्या प्रकृति बिघडून त्यांना जेमतेम घरीं येऊन पोंचण्याची मारामार पडते.

२. फार लहान मुलांनाही यात्रेसाठीं नेणें हें आरोग्याचे नात्यानें मोठें घातुक आहे. त्यांची वाटेंत यथास्थित जोपा न राहून त्यांच्या प्रकृति बिघडल्यावांचून राहत नाहीं. अर्थात् त्याचा परिणाम इतरांचेही प्रकृतींवर होऊन सर्वांना फार त्रास व विपत्ति भोगावी लागते. लहान बाळांच्या प्रकृति, वृद्ध मनुष्याप्रमाणेंच, फार नाजुक असल्यामुळें त्यांना दूर देशचें व वरचेवर बदलणारें हवा पाणी आणि प्रवासाचे श्रम सोसण्याची शक्ति नसते. त्यांत त्यांची यथा योग्य जोपा राहणें हेंही अशक्य असल्यामुळें तीं आजारी पडल्यावांचून राहतच नाहींत.

३. एकंदरीवरून यात्रेस जाणें तें बाळपणीं अथवा वृद्धपणीं कामाचें नाहीं. प्रकृति चांगली असतांना तरुणपणींच गेलें पाहिजे, ह्मणजे प्रवासांतलीं अनेक संकटें टळणार आहेत. शिवाय प्रवासास निघण्याच्या काळाचा व यात्रेस जाण्याच्या ठिकाणच्या हवापाण्याचा वगैरेही विचार केला पाहिजे. भरपावसाळ्यांत किंवा अति उन्हाळ्यांत यात्रेस न जातां इतर दिवसांत यात्रेस निघावें. तसेंच आपण मुख्यत: ज्या ठिकाणीं यात्रेस जाणार तेथील चांगल्या हवेचे जे दिवस त्यावेळींच आपण तेथें जावें. नुसती अमुक एक पर्वणी साधावयाची ह्मणून यात्रेची गर्दी असतांना, महामारीसारखी सांथ तेथें असतांना, किंवा अमुक एक पर्वणीस तिचा उपद्रव झाल्यावांचून सहसा राहतच नाहीं, असें आपणांस पक्कें ठाऊक असतांना, अशा समयीं यात्रेस कधींही निघूं नये, व त्यासाठीं एखादी विवक्षित पर्वणी चुकली तरी तिकडे लक्ष न देतां दुसरे जे अनेक फायदे होतात, ते ध्यानांत आणून अशा वेळीं यात्रेस जाण्याचें टाळावें. यात्रा फार असतांना न जातां शांततेचे वेळीं

यात्रेस गेल्यास देवदर्शन, तीर्थविधि वगैरे धर्मसंबंधी कामें यथासांग होऊन आरोग्यरक्षणाची हेळसांडही होत नाहीं,व त्यास खर्चही बेताचा लागतो. श्रीपंढरपूर क्षेत्रीं पावसाळ्यांत आषाढीच्या यात्रेस लोकांची गर्दी फारच होते,व त्यावेळीं महामारी नाहीं असें वर्ष क्वचितच जातें.तेव्हां पंढरपूरची यात्रा आषाढांत न करितां चैत्रांत अगर कार्तिकांत केल्यास कोणतीही गैरसोय व हाल अपेष्टा न होतां आरोग्य राहून यात्रेचें यथासांग फल मिळणार आहे. आषाढीचे वेळीं दर्शनाची सुद्धां मारामार पडते.

४. यात्रेस निघतांना भरपूर ऊबेचे कपडे बरोबर घेण्याची काळजी ठेवावी. कपड्यांची उणीव असल्यानें हवेचा अंमल प्रकृतीवर लौकर होऊन, पडसें, खोकला, ज्वर व हगवण इत्यादि विकार सहज जडतात. ह्या कामीं काटकसर किंवा हलगर्जीपणा केला तर त्याचें प्रायश्चित्त रोगरूपानें भोगण्यास लागून व औषधपाण्यास अतिशय खर्च करावा लागून जीवही धोक्यांत पडतो. तेव्हां अशा प्रकारची घातुक काटकसर करितां कामानये.

५. यात्रेमध्यें रोग होण्याचें मुख्य कारण अन्नोदकाची अव्यवस्था हें होय. अवेळीं, पोहे, चिवडा, शिळ्या दशम्या, लाडू इत्यादि पदार्थ खाऊन निर्वाह करणारेच पुष्कळ लोक आढळतात. सारांश केव्हां तरी व कांहीं तरी खाऊन राहण्याचा प्रघात मोठा घातुक आंहे. भोजनाच्या वेळा संभाळून मग प्रवास केला पाहिजे. रोज दोनदां नेहमींचे वेळीं नेहमीचा आहार--भात चपाती दूध वगैरे--हें ताजें खाल्यानें सहसा रोग होण्याची भीतीच नाहीं. सारांश खाण्यासंबंधी हयगय आमच्या लोकांचे हातून फारच होते. एकेक दोन दोन दिवस अन्न पाण्यावांचूनही काढणारे पुष्कळ लोक आढळतात. प्रवासाचे श्रम, जागरण व उपवास झाल्यामुळें प्रकृति बिघडल्यावांचून राहिल्यास आश्चर्यच होय. असें होण्याचें कारण कांहीं धर्मांतील विशेष प्रघात होत असें जरी ह्मणावें लागतें, तथापि मुख्यतः आरोग्याविषयीं आमचें अज्ञान व तदंगभूत अनास्था हीच मुख्य कारणें होत. भोजनाच्या दोन वेळां साधून प्रवास करण्याची व्यवस्था ठेवावी. शिधा सामुग्री चांगली मिळवून अवेळ होऊं न देतां भोजन केल्यास प्रकृति सहसा बिघडतच नाहीं.

काशीसारख्या ठिकाणीं अनेक फळावळ व अनेक खाण्याचे आयते पदार्थ मिळतात,त्यामुळें यात्रेकरू मागला पुढला विचार न करितां हवे ते पदार्थ सेवन करितो,अर्थात् तें त्यास सोसत नाहीं.यासाठीं पाहिलेल्या पदार्थास न भुलता आपणास पचेल असे पदार्थ व संवईचेच पदार्थ खावेत.

६. खाण्यासंबंधानें साहेब लोकांच्या दक्षतेकडे व व्यवस्थेकडे लक्ष दिल्यास आपणांस असें आढळून येईल कीं, तें प्रवासांत असले तथापि खाण्याची वेळ चुकूं देत नाहींत. त्यांच्याकरितां जागजागीं भोजनगृहें ( हाटेलस ) असल्यामुळें त्यांना ताजे स्वच्छ व चांगलें शिजविलेलें अन्न अनायासेंच मिळतें. तशा सोई आपल्या लोकांसाठीं कां नसाव्यात हें समजत नाहीं. त्या नसण्याचें कारण आपल्यास त्यांची अवश्यकताच वाटत नाहीं. आरोग्य संरक्षणासाठीं अशीं भोजनगृहें पाहिजेत, असें सर्वास वाटूं लागल्यास तीं तयारही होतील. रेलवेच्या स्टेशनावर साहेब लोकांचीं भोजनगृहें आहेत तशीं आपल्या लोकांचींही पाहिजेत.मद्रासेकडे कोठें कोठें अशीं गृहें आहेत; पण त्यांत असावी तशी व्यवस्था नसते. ज्याप्रमाणें साहेब लोकांच्या हाटेलांस रेलवे कंपन्यां जागा वगैरे सोई व सवलती देते,तशा सोई व सवलती आपल्या लोकांसाठींही त्या देतील; पण जेव्हां आह्मीं त्या मागूं तेव्हां. कित्येक मोठमोठ्या स्टेशनावर खाणावळी आहेत, पण त्यांच्या जागा घाण, व्यवस्थापक अडाणी, अन्न वाईट वगैरे अनुभव आपणांस नेहमीं येतोच.

७. अन्नाप्रमाणें पाण्याचीही काळजी घ्यावी. पवित्र गंगा पण तींत अपवित्र असा कर्दम सोडल्यामुळें तिचें पाणी आमांश, हगवण, किंवा महामारी उद्भवण्यास कारणीभूत होतें. यासाठीं पाण्याच्या स्वच्छतेबद्दल संशय येतांच तें कडकडींत तापविल्यावांचून पिऊं नये. कित्येक तीर्थाचे ठिकाणीं लहान सहान कुंडच असतात, त्यांतच स्नानें धुणें इत्यादि घाण होतें सबब तसल्या ठिकाणीं नुसतें मार्जनावर भागवून पिण्यास दुसरें ठिकाणचें स्वच्छ पाणी मिळवावें.

८. वरच्यासारख्या अवश्य गोष्टी करण्यास काटकसरीकडे पाहूं नये. कारण, ती काटकसर घातुक होय असें वर ह्मटलेंच आहे. अशा कामीं फारसा अधिक खर्चही लागत नाहीं. नेहमींच्या

व्यवस्थेनें होणारी यात्रा शंभर रुपयांत होते तर आणखी वीस पंचवीस रुपये अधिक खर्च केल्यास वरीलप्रमाणें सर्व व्यवस्था करून यात्रा होईल. यात्रेस जावयाचें ह्मणजे नुसत्या पारमार्थिक गोष्टीकडेच लक्ष न देतां आरोग्याकडेही लक्ष दिलें पाहिजे. प्रकृती सुधारण्यासाठीं हवा पालटावयाची ह्मणजे प्रकृती जशी अधीक चांगली होते त्याप्रमाणें यात्रा करण्यापासून हवापाणी बदलून प्रकृति अधिक चांगली करावयाची असा संकल्प मनांत ठेऊन यात्रेस निघाल्यास आरोग्य जें इह लोकचें खरें सुख तें प्राप्त होऊन परलोकचें सुखही प्राप्त होईल अशी आमची खात्री आहे.

## स्फुट लेख.

**पाणी स्वछ करणारें औषध.**— इंग्रजी औषध परम्यँागनेट आफ पोटासियम ( Permanganate of potassium ) या पासून घाणपाणी अगदीं स्वच्छ व निर्बाध होतें. हें औषध पाण्यांत टाकतांच लागलींच विद्रुत होऊन त्यापासून पाण्याचा रंग जांभळा होतो. एखाद्या विहिरींत एक तोळाभर हें औषध टाकल्यानें सर्व विहिरीच्या पाण्याचा रंग जांभळासा होऊन जातो, इतकी पाण्याचा रंग बदलण्याची शक्ति या औषधाचे अंगीं आहे; पण हा पाण्यास आलेला रंग फार वेळ राहत नाहीं. पाण्यांत जी घाण असेल ती हें औषध नाहींसें करतें, व घाण नाहींशी करण्याच्या क्रियेंत हें औषधही नाहींसें होऊन पाण्यास आलेला रंगही नाहींसा होतो. एखाद्या स्वच्छ ग्लासांत वरील कृति करून पाहिल्यास कांहीं वेळानें तळाशीं उदी रंगाचा साखा बसलेला दिसून येईल. हा साखा ह्मणजे हें औषध पाण्यांतील विद्रुत झालेल्या अथवा पाण्यांत तरंगत असलेल्या घाणीशीं रसायन संयोग पावून झालेला तिसरा निरुपद्रविक पदार्थ होय. हें औषध पाण्यांत टाकल्यानें त्यांत कांहीं विशेष फेरबदल झालेला दिसून येत नाहीं, तथापि पाण्यांत मिसळलेली घाण त्यापासून खास नाहींशी होऊन तें पाणी अगदीं स्वच्छ होऊन जातें, हें अगदीं खरें आहे. पाण्यांतील घाण व हें औषध परस्परांशीं संयोग पवून तळाशीं जाऊन बसतात. एखाद्या विहिरीचें

पाणी स्वच्छ करण्याचें असल्यास ह्या औषधीपासून त्या पाण्यास थोडासा रंग येईल इतकें औषध त्या विहिरींत टाकलें पाहिजे. साधारण विहिरीचें पाणी स्वच्छ करण्यास एक दोन औंस परमॉगनेट आफ पोटाश पुरे आहे. पाणी होईल तितका वेळ अगदीं स्तब्ध राहावें ह्मणून सूर्यास्ताचे वेळीं हें औषध विहिरींत टाकणें सोयीचें होय. अशा व्यवस्थेनें सर्व गदळ बुडाशीं जाऊन बसण्यास हवा तितका वेळ मिळतो. दुसरे दिवशीं सकाळी हें पाणी पिण्यास हरकत नाहीं. इतका वेळ गेल्यावर पाण्यास औषधाचा जरी थोडा बहुत रंग असला तरी चिंता नाहीं; कारण पाण्यांत परम्यॅगनेट इतक्या क्षुद्र प्रमाणानें विद्रुत राहिल्यास त्यापासून कांहीं एक अपाय होत नाहीं. जोंपर्यंत पाण्यास थोडासा तरी रंग आहे तोंपर्यंत त्यांत परम्यॅागनेट मिसळलेला आहे असें समजावें. महामारीचें विष पाण्यांत मिसळल्यापासून तें पूर्णदशेस येऊन लोकांस बाधक होण्यास तीन दिवस लागतात. यासाठीं अशा प्रकारचें पाणी स्वच्छ करणें झाल्यास वरील औषध पाण्यांत टाकून तीन दिवस झाल्यावांचून महामारीचें विष ह्या औषधापासून नाश पावण्याचा संभव नाहीं.

**तीन महिन्यांच्या आंतील मुलांससुद्धां जंताचा उपद्रव होतो.**— असें आमच्या नुक्तेंच पाहण्यांत आलें आहे. ह्या मुलास वरचें दूध नव्हतें, फक्त आईचें दुधावर त्याचा निर्वाह चालला असे. तो मुलगा महिना दीड महिन्याचा झाल्यावर त्यास बालग्रहाचा उपद्रव होऊं लागला. उपद्रव होतांच ह्या रोगावरील नेहमींच्या उपचारांनीं तो राहत असे. ह्याप्रमाणें सुमारें पंधरा दिवसांचे अंतरानें त्यास एकदां दोनदां झटका येई; तथापि त्याला जंताचें औषध दिलें नव्हतें. फक्त मधून मधून मलशुद्धि साफ राहण्यासाठीं एरंडेल देत असत. एकदा त्याला आपोआप जंत पडला. पुढें जंताचें औषध दिल्यावर आणखी कांहीं जंत पडल्याचें समजलें नाहीं. तथापि त्याला एक बराच मोठा जंत पडला, हें खरें आहे. तेव्हांपासून त्याला अद्याप बालग्रहाचा झटका आलेला नाहीं. लेंकरास आईचें दुधाशिवाय दुसरें दूध नसून जंताच्या किड्याचा प्रवेश त्याच्या पोटांत कसा झाला हा एक मोठा प्रश्न उद्भवतो. त्याच्या

आईस मात्र जंताचा उपद्रव होण्याची संवय आहे; पण तिच्या दुधाचे द्वारें जंताचा सूक्ष्म किडा लेंकराचे पोटांत जाऊन मग वाढला असावा असें जर ह्मणावें, तर तीहि गोष्ट संभवत नाहीं. वरील दूध त्यास पाजीत असते तर त्याच्या द्वारें जंताचा प्रवेश त्याचे पोटांत झाला असें ह्मणतां आलें असतें; पण तशीही गोष्ट झाल्याचें दिसत नाहीं. कदाचित् कांहीं औषधाचे मिश्रणाबरोबर अथवा बाहेरच्या दुधांत क्वचित् कांहीं औषध दिलें असल्यास त्याचे द्वारें जंताचा प्रवेश लेंकराचे पोटांत झाला असावा इतकेंच संभवतें. एकंदरींत इतक्या लहान मुलांना सुद्धां वरचें दूध नसून जंताचा उपद्रव होतो ही गोष्ट, विशेषतः त्यांना बालग्रहाची पीडा झाली असतांना, उपचार करण्याचे कामीं ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. कारण, लहान मुलांना जंतापासून बालग्रहाची पीडा होते असें नेहमीं पाहण्यांत येतें.

**महामारीवर कोयनेलचा उपयोग.**— ह्या रोगाचें कारण एक प्रकारचे सूक्ष्म जंतु आहेत असेंच आतां बहुतेकांचें मत झाल्यासारखें आहे. तथापि हिंवज्वर ज्याप्रमाणें एक प्रकारच्या कर्दमोध्थ विषापासून ( म्यालेरिया ) उद्भवतो त्याचप्रमाणें महामारीचा रोगही म्यालेरियाचे विषापासून उद्भवतो असें पुष्कळ चांगल्या चांगल्या शोधक लोकांचें मत आहे, अर्थात् त्यावर कोयनेलचा उपयोग करावा असें त्यांचें अनुभवसिद्ध ह्मणणें आहे. हिंवज्वर राहण्यासाठीं कोयनेल दिवसांतुन तीन वेळा देण्यापेक्षां हिंवाची पाळी येण्याचे अगोदरच एक दोन तास कोयनेल मोठ्या प्रमाणें दिल्यास हिंवज्वर हटकून येत नाहीं. ह्याचें कारण म्यालेरियाचें विष शरीरांत गेल्यावर हिंव भरूं लागतें. व ह्या सुमारासच तें शरीरांत वृद्धि पाऊं लागतें, ह्मणजे त्या विषाचे अथवा जंतूंचे निरनिराळे सूक्ष्म भाग होऊन त्यापासून नवें विष अथवा बिषारी जंतू उत्पन्न होऊं लागतात. त्यासरशी अंगांत हुडहुडी व ज्वर भरूं लागतो. एकदां ही स्थिति आली म्हणजे विष शरीरांतल्या शरीरांत वृद्धि पावूं लागलें, कीं मग कोयनेलचा अंमल चालत नाहीं. त्याचप्रमाणें महामारीचा पक्का अंमल सुरू होतांच फारसा उपयोग होत नाहीं. तथापि मोठ्या प्रमाणानें त्वचेखालीं पिचकारीच्या रूपानें कोयनेलचा उपयोग,

रोगास आरंभ झाला तरी, ताबडतोब केल्यास फायदा होतो; असें त्यांचें ह्मणणें आहे. महामारीच्या अगदीं पूर्व स्थितीस ( पण ती समजल्यास ) हिंवज्वराप्रमाणें एक दोन तास आगोदर कोयनेल पोंचल्यास रोगाचा अंमलच होत नाहीं, पण हिंवज्वराची वेळ जशी समजते, तशी महामारिची वेळ समजण्याचा मार्गच नाहीं. यासाठीं उपद्रव झाल्यावर कोयनेल किंवा कापूर वगैरे दुसऱ्या औषधांवर भरंवसा देऊन बसण्यापेक्षां साथीचे दिवसांत रोज कोयनेलचा उपयोग केल्यास महामारी रोग होण्याची भिती नाहीं. चंद्रघाट मुनिसिप्यालिटी (निजामहैद्राबाद) गेली चार वर्षें महामारीचे सांथींत कोयनेलचा उपयोग करीत आहे, व त्यापासून पुष्कळ उपयोग होतो असें डा. **हेअर**, तेथील हेल्थ आफिसर, यांचें ह्मणणें आहे. साथींत जे कोयनेल घेतात त्यांना सहसा कालरा होतच नाहीं, असा त्यांचा अनुभव आहे. कमिटीच्या सॉनिटरी खात्यांतील बऱ्याच लोकांना- भंगी इनस्पेक्टर वगैरेना- महामारीचा उपद्रव, कोयनेल देण्यास सुरुवात करण्याचे पूर्वीं, होत असे, पण त्या लोकांना प्रतिबंधक उपाय ह्मणून साथीचे दिवसांत कोयनेल देऊं लागल्यापासून त्यांचेपैकीं लोकांना क्वचीतच उपद्रव होतो, असें डा. हेअर यांचें ह्मणणें आहे. लोकांनीं व कमिट्यांनीं ह्याचा अवश्य अनुभव घेऊन पहावा, अशी आमची शिफारस आहे.

**आगस्ट महिन्यांतील सोलापूरचें आरोग्य.**— आरोग्याचे नात्यानें ह्या शहरवासी जनांस हा महिना फारच वाईट गेला, असें ह्मणावें लागतें. दरसाल ह्या महिन्यांत आमांश, हगवण, ज्वर, व केव्हां केव्हां महामारी इत्यादि विकार जारी असतात; पण या सालीं त्यांचा अंमल अधिक जारी व कडक झाला असें ह्मणावें लागतें. महामारीचा विकार वस्तीच्या मानानें थोडाच होता असें आंकड्यावरून दिसल पण तो मोठा जाज्वल्य होता. एकदां जुलाब वांतीस सुरुवात झाली कीं, रोग्याचा शक्तिपात होऊन उपायाची मात्रा फारशी न चालतां लौकरच रोगी मृत्युमुखी पडे. कांहीं रोगी तर तीन चार तासांचे आंतच मरण पावले. बऱ्याच दिवसांत इतका कडक महामारिचा अंमल येथें झाला नाहीं. आमांश व हगवणीवांचून एकही

घर सुनकें नव्हतें असें ह्मटल्यास मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. विशेषतः लहान मुलांना हगवणीचा उपद्रव फार झाला, व तो फार तीव्रही होता. तो उपद्रव कालऱ्याचा धाकटा भाऊच ( कालरिक डायरिया ) होता, असें ज्यांनीं लहान मुलांची ती भयंकर स्थिति पाहिली असेल त्यांना वाटल्यावांचून राहिलें नसावें. चार चार दिवस लेंकरांना सारखी वांती व जुलाब होत, ते कासावीस फार करीत, त्यांना निद्रा मुळींच नाहीं व त्यांत कित्येकांना मोठा ज्वरही असे. अर्थात् मृत्यूची संख्याही ह्या महिन्यांत अधिकच झाली. ह्या सर्वांचें कारण पाहूं जातां असें दिसतें कीं, यंदां पाऊस जरी मधून मधून पडला व १०·१२ इंचांची भरतीही झाली तरी मोठा धो धो पाऊस न पडल्यामुळें गांवांतील घाण स्वच्छ धुऊन गेली नाहीं. व ऊनही मधून मधून बरेंच कडक होतें. तथापि मुख्य कारण पाणीच ह्या महिन्यांत बिघडलेलें असावें असें दिसतें. परगांवचे लोक येथें आले कीं कुरकूर करूं लागतात व लोक बाहेर गेले कीं पोटांतील गुरगुर, पोटांत मुरडणें, अवेळीं शौचास होणें, इत्यादि विकार नाहींसे होतात, असें सांगतात. ह्यावेळीं पाण्याची परीक्षा केमिकल अनालायझर कडून करविणें जरूर आहे. एंजीनजवळच्या कनालांतून पाणी न घेतां आतां नळ्या टाकून लांबच्या कनालांतून पाणी घेतात, पण त्यापासून काल्पनिक स्वच्छतेपलीकडे अधिक स्वच्छ पाणी लोकांस पिण्यास मिळतें, असें ह्मणण्यास खात्रीलायक पुरावा कांहीं असेल असें आह्मांस वाटत नाहीं. बिना पाणी गाळून मिळण्याची सोय ( फिल्टर ) केल्यावांचून स्वच्छ पाणी लोकांस मिळण्याचा संभव नाहीं. यासाठीं आरोग्य जर पाहिजे आहे तर लोकांनींच घरोघर स्टेशनावरून असल्याप्रमाणें **तीन ढेऱ्यांचें गाळणें** ( ज्यांच्या बद्दल वेळोवेळीं आह्मी उल्लेख केला आहे ) करून पाणी स्वच्छ करून नंतर प्यावें. निदान तें कडकडीत तापऊन तरी प्यावें,अथवा त्यांत परम्यॅागनेट आफ पोटाश, किंवा थोडी तुरटी टाकून ती खालीं बसल्यावर तें पाणी प्यावें. येथल्याप्रमाणें अंशतः स्थिति इतर ठिकाणींही ह्या महिन्यांत असेलच, तेव्हां सर्वांनींच वरील प्रमाणें पाण्याच्या स्वच्छतेकडे लक्ष ठेवावें अशी आमची त्यांस विनंति आहे.

## कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य मु॰ आंजर्ले ता॰ दापोली जि॰ रत्नागिरी यांचीं जगत्प्रसिद्ध, सर्वोपयोगी, निर्दोष व रामबाण औषधें.

या जाहिरातीचे खालीं " विशेष सूचना " केली आहे ती वाचकांच्या अवश्य लक्ष्यांत असावी.

### १. वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साह- बुद्धि कांतिवर्धक व धातुपौष्टिक, सुवर्णमाक्षिक- मौक्तिक- कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१ शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें त्यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्व भागीं व त्याच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, कोणत्याही कारणांनीं आलेली अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, उन्हाळे, छातींतील रोग, मस्तकशूळ, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूळव्याधि, भगंदर, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूळ, कटिवात, वातरोग, निद्रानाश, चक्कर, कफातिरेक, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, सूतिकारोग, व्रण, हात, पाय, मूत्रमार्ग व शरीर यांचा दाह, ठणका, ग्लानि, अरुचि, मूत्राश्मरी व चित्तभ्रम इत्यादि अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले, नवीन किंवा जुनाट असले तरी अगदीं खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति, व बुद्धि हीं वाढतात. ज्यांस फिरण्याचे, अभ्यास करण्याचे लिहिण्याचे व शिकविण्याचे श्रम फार पडतात त्या सर्वांच्या अंगीं यांणीं

अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो व सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें. कोष्ठशुद्धि होते. कोष्ठांतील अनियमित व्यापारांपासून होणारे दुष्ट परिणाम टळतात. या अप्रतिम गुटिका अत्यंत उपयुक्त शोधानें केल्या असून यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें आहेत, सबब जास्त वर्णन येथें करीत नाहीं. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस या अत्यंत उपयोगी आहेत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषध नाहींच असें स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात, यामुळें यांचा अतिशय खप सुरू आहे. हल्लीं या गोळ्यांत अंतर्वेदी, नेपाळ, काश्मीर इ० देशांतील अत्यंत शुद्ध, ताजे, महत्वाचे व मौल्यवान् असे अनेक पदार्थ आणखी घालून त्यांची विशेष सुधारणा केली आहे आणि लोकाग्रहावरून केवळ परोपकारार्थ ह्मणून गोळ्यांचा दर फारच स्वस्ता केला आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व ट. खर्च माफ आहे. अनुपान ख० सोबत देऊं. एकदम १६ गोळ्यांस १ रु., ३६ गो० २ रु., ८० गो० ४ रु, व १३० गो० ६ रु.

## ३. थंडगार नेत्रांजन

हें परम गुणकारक अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे तिमिरांध्य,वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भार, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंडू, फूट, चिकटा, ठणका, व लाली, इ. अनेक विकार तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यांस कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा बिलकूल न होतां बरे होतात.

दृष्टि तीव्र व थंडगार राहते. शिवाय जागरण, उन्हांत फिरणें

अग्नीचा शेक, उपदंशविकार, अतिवाचन, अतिव्यायाम, अतिमैथुन, अतिमद्यपान, अत्युष्ण व विदाही पदार्थ भक्षण, इ० कारणांनीं ज्यांचे डोळे बिघडतात त्यांस याचा फारच मोठा उपयोग आहे. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार बिलकुल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रु०

## ४. कर्णस्रावनाशक अप्रतिम तैल.

हें उत्तम तेल कानांत घातल्यानें कानांतून पू वाहणें, तत्संबंधीं ठणका, कंडू, दाह, रक्तस्राव, इ. विकार तत्काळ बरे होतात. कानांतील कोणत्याही प्रकारचे साधारण व्रण तर तत्कालच, परंतु कानाचा समूळ नाश करणारे जुनाट किंवा हाडीं खिळून बसलेले कितीही वयाचे मनुष्याचे व कोणत्याही कारणानें प्राप्त झालेले अनेक प्रकारचे असाध्य व्रण कोणतीही इजा किंवा आग वगैरे बिलकुल न होतां अगदीं खात्रीनें बरे होतात. बाटलीस रु० १ शिवाय प्या० ख० दोन आणे. रोखीनें किंवा व्हॉ. पे. पार्सलनें खालील पत्यावर मागविल्यास पाठवूं. अनुपान खर्डा बाटलीसोबत.

५. **पर्म्यावर अपूर्व मिश्रण.**—कोणत्याही प्रकारचा नवीन किंवा जुनाट पर्मा, तत्संबंधी दाह, तिडीक, मूत्राची विवर्णता, संकोच किंवा मूत्रातिरेक इ. विकारांसह या मिश्रणापासून इजा बिलकुल न होतां व पथ्यसेवनाची खटपट नसतां ताबडतोब बरा होतो. पर्म्यावर इतकें प्रतिज्ञेचें औषध दुसरें नाहींच. बा. १ रु.

६. **दंतरक्षक पूड.**— ही चोळिल्यानें दंतसंबंधी सर्व विकार हिरड्यांचा रक्तस्राव व व्रण, पू, कीड इ. फारच त्वरित व नाजूक रीतीनें बरे होऊन दांत स्वच्छ व फार मजबूत होतात. ड. ६ आणे.

७. गजकर्ण, नायटे, खरूज इ. विकार ३ दिवसांत बरे होतात. ड. ६ आणे.

८. विंचवाचें विष हें औषध लावतांच उतरतें. ड. ८ आणे. इतकें औषध ४० मनुष्यांस पुरतें.

वरील औषधें अत्यंत खात्रीचीं आहेत. त्यांणीं हजारों लोकांस गुण आला व नित्य येत आहे. अनुभवानंतर पक्की खात्री होईलच. याशिवाय आमच्या येथें कस्तुरीच्या उत्तम कातगोळ्या, तमाखूच्या अर्काच्या कस्तुरीमिश्र गोळ्या, उत्तम सुगंधी अत्तरें व ग्रंथोक्त रसायनें, धातूंचीं भस्में, पाक, तैलें, चूर्णें, गोळ्या, घृतें, आसवें, द्राव, क्षार हेमगर्भादि रसायनें इ. औषधें माफक किंमतीस मिळतील. पाहाण्यासाठीं सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. अनुपान पत्रक औषधासोबत पाठवूं. पत्ता सुवाच्य. कोणीं प्रकृतिमान कळविल्यास रोगाचें निदान व योग्य चिकित्सा कळवूं. औषधें रोखीनें किंवा व्ही. पी. नें विकत मिळतील. टपालखर्च वेगळा पडेल. गरीब लोकांस स्वस्त दरानें औषधें देऊं. जाहिरातीच्या खालील किंवा वरील पत्यावर मिळतील. या औषधांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून त्यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळविल्या आहेत व नित्य मिळत आहेत.

**विशेष सूचनाः—** आलीकडे वर्तमानपत्रांतून आंजर्लें व नजीकच्या मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या नवीन बऱ्याच जाहिराती सुरू झाल्या आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींच्या खालीं किंवा वर ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या ग्राहकांस भासण्याचा संभव आहे, यामुळें कदाचित् ग्राहकांचा घोंटाळा होईल. तरी अशा लोकांशीं व त्यांच्या जाहिरातींशीं आमचा कोणत्याही प्रकारें अगदीं संबंध नाहीं हें ग्राहकांनीं अवश्य लक्षांत ठेऊन, आमचीं औषधें मागणें तीं **"कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य मु० आंजर्लें ता० दापोली जि० रत्नागिरी"** या अगदीं बिनचूक सही व पत्यावर मागवावींत.

**कृष्णशास्त्री बिवलकर.**

**पत्ता—** मु० आंजर्लें, ता० दापोली, जिल्हा रत्नागिरी.

पाळीचे ताप जातात. पैसे परत करणाऱ्या पैजेच्या हिंवतापाचे औषधांपेक्षां हें किती गुणकारी आहे ह्याची अनुभवाअंतीं खात्री होईलच. कारण, जास्त फाजील लिहिण्यांत हंशील नाहीं. किं. रु १ ट. व बं. खर्च १८–

**जुलाब, पोटदुखी, व पटकी बंद करण्याचें वस्ताद औषध** प्रत्येक कुटुंबानें अवश्य संग्रहीं ठेवावें. किं. ।।।. ट. बं. ख. ।।.

**शक्तीवरील गोळ्या.**–– नंबर १, बलवर्धक, शक्तिवर्धक, पौष्टिक, इत्यादि. विशेष माहिती पत्र पाठविल्यास मिळेल. किं. १०० गो. रु. ३॥ ट. व बं. ख. ।≡

**कपाळशूळ व अर्धशिशीवर.**— पांच मिनिटांत गुण. किं. रु० १॥ ट. व. बं. ख. .॥.

**शक्तीवरील गोळ्या.**— नंबर २ सुस्तीवर, पानथर, मुलांचे डब्यावर व अफूचे व्यसनावर वस्ताद. किं. रु० १. ट. व बं. ख. ।≡

**पूपम्यावर वस्ताद.**– ह्या औषधानें बारांपेक्षांही कमी तासांत खात्रीनें गुण पडतो. किं. रु० १ ट. व बं. ख. ।।।.

**केंस काळेभोर करण्याचा कलप.**-किं. रु. १।ट. व बं. ख. ॥≡

**रक्तपितीवर रामबाण.**— किं. रु० ६ ट. व बं. ख. १।-

**खोकल्यावर गोळ्या.**– किं. ।।। ट. व बं. ख. ।≡

**गजकर्ण व खरजेवर मलम.**— किं. ।= ट. व बं. खर्च तीन डब्यांपर्यंत ।=

**नेत्रसंजीवनी थेंब.**— किं. रु. १ ट. व बं. ख. ।।.

**मूळव्याधीवर चूर्ण अथवा मलम.**–किं. रु. २ ट. व बं. खर्च।≡

**वायुनाशक तेल.**— किं. ।. ट. व बं. खर्च ।।.

**खोकल्यावर सरबत.**– [ दम्यावर फारच गुणकारी ] किं० रु. १ ट. व बं. खर्च ।।.

**बालसंजीवन.**— किं. रु. १ ट. व बं. खर्च ।।.

**कर्णरोगावर थेंब.**— किं. ।।।. ट. व बं. खर्च ।।.

**दांतांचें मंजन.**—किं. ।. ट. व बं. खर्च ३ डब्यांपर्यंत ।।.

**केशवर्धक तेल.**— किं. रु. १ ट. व बं. ख. ।।।.

**जलावाच्या गोळ्या.**— किं. ।= ट. व बं. ख. ।≡

**अन्नपाचक गोळ्या**— किं. ॥. ट. व बं. ख. ।≡

**मुलांचे ताड्यावर.**—( आंकडीवर )रामबाण— किं. रु.३ व रु. २ ट. व बं. ख. ॥.

**केंस जाण्याचें औषध.**— किं. रु. १ ट. व बं. ख. ॥. हें पाण्यांत भिजवून लेप करून खरवडल्यास तात्काळ केंस जातात.

**बाळंतपणावर अर्क.**— हें सतत घेतलें असतां बाळंतरोग साफ बरा होतो. किं. रु. ४ ट. व बं. ख. रु. २॥

**मुद्दाम उन्हाळ्याकरितां.**— थंडगार, हुपारी, आणणारी व ऊत येणारी सर्बतची भुकणी, किं. रु. १ ट. व बं. ख. रु. १≈

इंग्रजी डाक्तरांकरितां लागणारीं औषधें विलायतेहून आणविलीं आहेत. त्यांचा क्याटलागही अर्ध्या आण्याचें टिकिट पाठवून मागवा.

**वैद्य गोपीनाथ कृष्णाजी क्षत्रिय.**

१ ली सदाशिवजीची गल्ली, गिरगांव पोस्ट आफिसाचे समोरचे गल्लींत, मुंबई.

---

## महामारी

हें प्रत्येक कुटुंबांत ठेवण्यायोग्य पुस्तक असून, विशेषतः जेथें चांगल्या वैद्याची मदत नाहीं अशा गांवांत सांथीचे दिवसांत तर फारच उपयोगी आहे. ह्यामधील उपाय अगदीं साधे व पाहिजे तेथें करतां येण्याजोगे आहेत. ह्या पुस्तकावर डा. भालचंद्र, डा. विश्राम, वगैरे विद्वान लोकांचे व वर्तमानपत्रकर्त्यांचे फार चांगले अभिप्राय आले आहेत. पुस्तकाची किंमत ८१० आहे. मुद्दाम टपाल हंशील माफ केलें आहे.

**म्यानेजर भिषग्विलास,**

डा. रानडे यांचा दवाखाना, सोलापूर.

पत्ता.—डा० रानडे यांचा दवाखाना, सोलापूर.

# भिषग्विलास

## BHISHAGVILASA.

वैद्यकसंबंधी अनेक विषयांचें सुबोध भाषेंत
मासिक पुस्तक.

A Monthly Magazine in Marathi
to popularise Medicine.

आयुःकामयमानेन धर्मार्थसुखसाधनं ॥
आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः ॥ १ ॥

पुस्तक ४. आक्टोबर १८९९ अंक ७

विषयानुक्रम. पान.


| विषय | पान |
|---|---|
| चित्ताकर्षणशास्त्र अथवा मोहिनीविद्या .... .... | ९ |
| निद्रा .... .... .... .... .... | ११८ |
| मादक पदार्थ—तंबाकू व गांजा .... .... | १२१ |
| स्फुट लेख.... .... .... .... .... | १२९ |


सोलापूर

आनंदवृत्त छापखान्यांत छापिला.

वर्षाची आगाऊ वर्गणी ट. ह. सह ३ रु.

**गोपीनाथ कृष्णाजी क्षात्रियकृत**



**अचूक गुणकारी औषधें.**

पुणें येथील सन १८८८ सालांतील देशी कलाकौशल्याचे जंगी प्रदर्शनांत औषधांच्या योग्यतेबद्दल व गुणाबद्दल सर्टिफिकिट ( दाखला ) मिळालेंआहे

**ज्वरांकुश** (तापावर रामबाण) तीन दिवसांत हाटकन हिंवताप व पाळीचे ताप जातात. पैसे परत करणाऱ्या पैजेच्या हिंवतापाचे औषधांपेक्षां हें किती गुणकारी आहे ह्याची अनुभवाअंतीं खात्री होईलच. कारण, जास्त फाजील लिहिण्यांत हंशील नाहीं. किं. रु १ ट. व बं. खर्च १८-

**जुलाब, पोटदुखी, व पटकी बंद करण्याचें वस्ताद औषध** प्रत्येक कुटुंबानें अवश्य संग्रहीं ठेवावें. किं. ।।।. ट. बं. ख. ॥.

**शक्तीवरील गोळ्या.**— नंबर १, बलवर्धक, शक्तिवर्धक, पौष्टिक, इत्यादि. विशेष माहिती पत्र पाठविल्यास मिळेल. किं. १०० गो. रु. ३॥ ट. व बं. ख. ।=

**कपाळशूळ व अर्धशिशीवर.**— पांच मिनिटांत गुण. किं. रु० १॥ ट. व. बं. ख. .॥.

**शक्तीवरील गोळ्या.**— नंबर २ सुस्तीवर, पानथर, मुलांचे डब्यावर व अफूचे व्यसनावर वस्ताद. किं. रु० १. ट. व बं. ख. ।≡

**पूपम्यावर वस्ताद.**– ह्या औषधानें बारांपेक्षांही कमी तासांत खात्रीनें गुण पडतो. किं. रु० १ ट. व बं. ख. ।।।.

**केंस काळेभोर करण्याचा कलप.**-किं. रु. १।ट. व बं. ख. ॥≡

**रक्तपितीवर रामबाण.**— किं. रु० ६ ट. व बं. ख. १।

**खोकल्यावर गोळ्या.**– किं. ।।। ट. व बं. ख. ।≡

**गजकर्ण व खरजेवर मलम.**— किं. ।= ट. व बं. खर्च तीन डब्यांपर्यंत ।=

**नेत्रसंजीवनी थेंब.**— किं. रु. १ ट. व बं. ख. ॥.

**मूळव्याधीवर चूर्ण अथवा मलम.**–किं. रु. २ट. व बं. खर्च।≡

**वायुनाशक तेल.**— किं. ।. ट. व बं. खर्च .॥.

**खोकल्यावर सरबत.**– [ दम्यावर फारच गुणकारी ] किं०

# भिषग्विलास.

पुस्तक ४ आक्टोबर १८९९. अंक ७

## निद्रा.

लेखकः— डा. विष्णुपंत भागवत एल्. एम्. ऑन्ड एस.
( मा. अं. व. पु. चा. )

२९. चांगली झोंप येण्यास मनाला एक प्रकारची संवय किंवा एक प्रकारचें वळण असलें पाहिजे. आपण दिवसभर काय केलें किंवा उद्यां काय करावयाचें याबद्दलचे विचार मनांत निजतांना घोळूं न दिले पाहिजेत. उदाहरणार्थ झोंपेमधून उठून चालणारे जे लोक असतात ते निद्रेपूर्वी मनांत घोळत असलेल्या सर्व क्रिया अर्धवट झोंपेमध्यें त्यांना न कळत करीत असतात. कारण, त्या वेळेस त्यांची 'विचारशक्ति' निद्रिस्त असते. तसेंच कांहीं बायका आपल्या मुलास पाजीत गाढ झोंप घेत असतात, आणि त्या दुसऱ्या कोणत्याही गोष्टी घडून आल्या तरी बहुतकरून जाग्या होत नाहींत. परंतु जरा मूल रडलें कीं, झाल्याच त्या जाग्या; कारण त्यांना, आपलें मूल केव्हां रडूं लागेल, त्याला केव्हां काय होईल, याची त्यांना नेहमीं आंच असते. या सर्व उदाहरणांत मोठ्या मेंदूंतील मुख्य शक्ति निद्रिस्त असतात. अशा स्थितींत जी विश्रांति मिळते ती अर्थात् पूर्ण नसते. आणि अशा रीतीनें कोणत्याही प्रकारचा भयंकर रोग न होतां ही स्थिति बरेच दिवस चालूं असते. याचें कारण त्या गौण शक्तींना जागृतावस्थेंत मधून मधून विश्रांति मिळते. अनुभवांतीं असेंही कित्येक वेळां सिद्ध झालें आहे कीं, मुख्य शक्तींपैकीं देखील कांहीं निद्रिस्त असतात व कांहीं जागृत असून त्यांचे व्यापार चाललेले असतात. याचीं उदाहरणें- झोंपेंत उठून निबंध लिहून दुसरे दिवशीं तो न आठवणें वगैरे गोष्टी वर्तमानपत्रांतून पुष्कळदा वाचण्यांत येतात; आमचे **ग्लॅडस्टन** साहेब निजायाच्या अगोदर कांहींही

करोत परंतु त्यासंबंधानें निजतांता कोणतेही विचार मनांत राहूं देत नाहींत, ह्मणून त्यांचें इतकें वय झालें असून त्यांना रात्रीची गाढ झोंप येते; परंतु तेच नुकतेच होऊन गेलेले प्रधान **लॉर्ड रोजबरी** यांचे मनांत नेहमीं विचार घोळत असल्यामुळें त्यांना रात्रीं झोंप गाढ येत नाहीं.

२६. कित्येक लोकांना दोन तीन तासच झोंप येते व पुढें झोंप येत नाहीं. बराच शारीरिक किंवा मानसिक व्यायाम घेतला असला ह्मणजे निजतांक्षणींच झोंप लागते, परंतु ज्या इंद्रियांना कमी व्यायाम झाला असेल ती जागीं होऊन आपलीं कामें करूं लागतात. उदाहरणार्थ शारीरिक व्यायाम बराच असून मानसिक कमी झाला असेल तर विचारशक्ति जागी होते व चालकशक्ति विश्रांतींत, अर्थात् अर्धवट अशा स्थितींत, असते. त्याप्रमाणें अपचन झालें असल्यास पचनेंद्रियें अन्योन्यसंवेदन कोशाच्याद्वारें पहिल्या प्रथम निद्रिस्थ होतात तीं लौकरच पुनः जागीं होऊन आपली क्रिया सुरू करतात. ह्मणून अजीर्णांश झाल्या दिवशीं थोडेंसें अधिक जागून पुढें झोंप घेतली असतां दुसरे दिवशीं चांगली भूक लागते.

२७. झोंप न आल्यामुळें हृदयाचे रोग, ग्लानि, चक्कर, अपस्मार वेड, डोकें दुखणें, वगैरे मेंदूचे व धातुविकार होऊन तदंगभूत दुसरे विकार उत्पन्न होतात.

२८. आपल्यामध्यें असा एक समज होता ( तसाच ग्रीस वगैरे देशांतही होता ) कीं, झोंपेंत आपला जीव ( मन ) देहाला सोडून जातो. आणि एखाद्या निजलेल्या मनुष्याला एकदम जागें केलें ह्मणजे जीवाला शरीरांत येण्यास न मिळाल्यामुळें फक्त जीव ( मन ) विरहित शरीर जागें होतें. हा समज जरी खोटा आहे, तरी झोंपेंतून एकदम जागें करणें वाईट. कारण, मनुष्य एकदम भिऊन दचकून उठतो, त्यामुळें त्याच्या मनाला धक्का बसून वेड देखील लागतें किंवा तो वेशुद्ध होतो. त्याचप्रमाणें निजलेल्यास उठविण्यास बराच वेळ लागतां कामानये. कारण अशा करण्यानेंही हळूं हळूं कांहीं शक्ति जागृत होऊन भयप्रद अशीं स्वप्नें पडूं लागतात, व पुढें फुप्फुसांत हवा कमी

असल्यामुळें जांभया येऊं लागतात व डोकें दुखूं लागतें. अन्न पचन न झाल्यामुळें कित्येक तरुण लोकांस सकाळीं उठतांच खोकला येत असतो किंवा त्वचेंत जोराचें रुधिराभिसरण होत नसल्यामुळें अंगास खाज होऊं लागते. यांचें कारण रात्रीं चांगली झोंप येत नसते हें होय.

२९. **निद्राभावावर उपाय** — शारीरिक किंवा मानसिक व्यथेपासून झोंप येत नसेल तर तीवर योग्य अशा औषधांचा- अफूचें सत्व मॉर्फिआ, पोटासाब्रोमाइड, क्लोरल, आणि सुरा व भांग यांचा उपयोग केला पाहिजे. यांजवर दुसरे कोणतेही उपाय चालावयाचे नाहींत.

३०. अव्यवस्थित संवयी कांहीं कारणामुळें लागतात व त्याचा परिणाम झोपेंवर होऊन झोंप चांगली येत नाहीं, किंवा मिळत नाहीं. कामधंद्यासंबधानें काळजी किंवा नेट असल्यामुळें, अथवा एखादा मनुष्य घरीं आजारी असल्यामुळें त्याच्याजवळ एकसारखें बसावें लागतें, अर्थात् ह्याचा परिणाम खाण्यापिण्यांत अव्यवस्था, व्यायामांत व झोपेंतही व्यत्यय होतो, असा होतो.परंतु हे अडथळे नाहींसे झाल्यावर झोंप येते. नच आल्यास प्रकृतीप्रमाणें थंड किंवा ऊन पाण्याचें स्नान निजण्याच्यापूर्वी करावें, तें न झाल्यास आपल्या पंचेंद्रियांपैकीं एखादें इंद्रिय अमुक एका पदार्थाकडे तल्लीन केलें पाहिजे. परंतु तो पदार्थ स्थिर किंवा एकाच आकाराचा असतां उपयोगी नाहीं. उदाहरणार्थ कर्णेंद्रियांस तल्लीन करायाचें असेल तर मंजुळ परंतु उच्च नीच स्वरांत गायन किंवा वाद्य ऐकावें. नेत्रेंद्रियांस रमवायाचें असल्यास कांहीं निरनिराळ्या आकाराच्या परंतु चल अशा खऱ्या किंवा मनःकल्पित पदार्थांकडे पहावें. अशा रीतीनें बहुतकरून निद्रा येतेच. निद्रा न येणाऱ्या लोकांना कित्येक असें सांगतात कीं, भिंतीवरील चित्राकडे एकसारखें पहावें किंवा घड्याळाचा किट किट आवाज ऐकत रहावें. परंतु या दोन्ही गोष्टी स्थिर किंवा सतत सारख्या असतात ह्मणून त्यापासून व्हावा तितका उपयोग होत नाहीं, उलट मन त्रस्त होतें.

३१. कांहीं रोगांमध्यें असें होतें कीं, कांहीं इंद्रियें विलक्षण

उत्तप्त होऊन तीं आपलीं कामें, रागानेंच जणूं काय, अधिक जोरानें करूं लागतात; हृदय नेहमींसारखें नियमितपणानें न उडतां अधिक जलदीनें व अव्यवस्थित रीतीनें उडूं लागतें, अर्थात् रक्त निरनिराळ्या इंद्रियांकडे कमीजास्त जातें. त्यामुळें मेंदूंत रक्त अधिक जाऊन विचारेंद्रियें वगैरे क्रुद्ध होऊन तीं आपलीं कामें अधिक करूं लागतात. त्यामुळें नेत्रेंद्रियांना भलभलतें दिसूं लागतें; कर्णेंद्रियांना भलभलते ध्वनि ऐकूं येऊं लागतात. या सर्व गोष्टी अन्योन्यसंवेदन कोशाची चलबिचल झाल्यामुळें होतात. त्यामुळें झोंप येत नाहीं. अशा वेळेस मेंदूस व वरील कोशास बल देणारें असें एखादें औषध द्यावें.

३२. चांगली झोंप येण्यास ठिकाण, दुसरा किंवा तिसरा मजला, असणें चांगलें. प्रकाश साधारण असून हवा चांगली खेळत असली पाहिजे. उताणें किंवा डावे कुशीवर निजणें चांगलें नाहीं. कारण, डावे कुशीवर निजलें असतां हृदयास आपली क्रिया चांगली चालवितां येत नाहीं.ह्यास प्रत्यंतर हें कीं, १०० निजलेले लोक पाहिले तर निदान ७५ लोक उजव्या कुशीवर निजलेले आढळतात. आतां जेवण होतांच वामकुक्षीवर निजण्याचा जो प्रघात आहे, त्याचें कारण किंवा उपपत्ति अशी.— आपण जें अन्न खातों त्यानें आपलें जठर अगदीं भरलेलें नसतें व तेणेंकरून जठरांतील सर्व रस अन्नांत मिसळत नाहीं; शिवाय जठरांतील जो भाग भरला नसतो तो आकुंचन पावलेला असतो त्यामुळें अन्न पुढें ढकललें जात नाहीं; तर वामकुक्षीवर तास अर्धा तास निजलें असतां या दोन्ही गोष्टी सहज घडून येतात.

३३. निजतांना अति पांघरूणें घेणें वाईट. त्याचप्रमाणें उशा अति जाड घेऊन निजण्याची संवय वाईट. त्यायोगानें मानेंतील रक्तवाहिन्यांवर वाईट परिणाम होतो. तसेंच निजतांना कानटोपी घालणें वाईट. कारण, त्यायोगें डोकें थंड राहात नाहीं. तसेंच डोक्यावरून पांघरूण घेऊन निजणें अधिक वाईट. कारण, तीच ती हवा ह्मणजे पुष्कळ कॉर्बानिक आसिडवायु मिश्र हवा फुफ्फुसांत जाते.व तेणेंकरून कॉर्बानिक आसिड वायूची विषारीं लक्षणें उत्पन्न होतात.

३४. त्याचप्रमाणें अति खाणें, किंवा उपासमार करणें, शौचास वेळेच्या वेळीं न जाणें. हें सर्व वाईट. त्यांत अति खाल्यानें पोटांत एकसारखें अन्न राहून जठरास अधिक काम पडतें व तेथेंच अन्न कुजून वायु उत्पन्न होतो, व पोट फुगतें. तर याला उपाय ह्मटला ह्मणजे त्या संवयी मोडल्या पाहिजेत, अन्नपचनाचीं औषधें घेतलीं पाहिजेत व व्यायाम चांगला केला पाहिजे. ( पुढें चालू )

---

## मादक पदार्थ- तंबाकू व गांजा.

१. तंबाकू.— व्यसनांमध्यें तंबाकूचा नंबर पहिला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कारण, तिचा उपयोग तीन तऱ्हेनें- खाणें, ओढणें, व तपकीरीचे रूपानें- करितात. तंबाकूचा प्रसार आपल्याच देशामध्यें फार आहे असें नाहीं, तर चोहींकडेच आहे. युरोपांतील सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें (जरी तिकडे तंबाकूवर जरब जकात आहे तरी) किंवा अमेरिकेंत सुद्धां तिचा उपयोग जारी आहे. तिकडे प्रत्येक माणसी २ पौंडांपासून १२ पौंडांपर्यंतही तंबाकू लागते. तंबाकूचा उपयोग करण्यांत पटाईत जर्मन लोक होत. तिचा सर्वांत कमी उपयोग पोर्तुगीज लोक करितात. ज्याप्रमाणें आपल्या इकडे फारच थोड्या बायका ( त्याही खालच्या वर्गांतल्या ) तंबाकू खाणाऱ्या किंवा ती ओढणाऱ्या आढळतात त्याप्रमाणें युरोप किंवा अमेरिकेंतही खालच्या वर्गांत थोड्या बायका आढळतात. विशेषतः युरोपांत तंबाकू खाण्याचा प्रचार मुळींच नाहीं ह्मटलें तरी चालेल. पण तपकीर ओढण्याचा किंवा चिरूट ओढण्याचा प्रचार अतिशय आहे. सुखी लोक चैनीसाठीं तंबाकूचा उपयोग करितात, परंतु गोरगरीब किंवा मजूर लोकांना, एकदां तिची संवय लागल्यावर, तिचा उपयोग केल्यावांचून चालतच नाहीं. तिच्या वांचून त्यांना काम धाम करण्यास उत्तेजन व हौस यावयाचीच नाहीं. तंबाकू खाण्यास, तलफेच्या वेळीं, जर मिळाली नाहीं तर त्याला चुकल्या चुकल्या सारखें होऊन कांहींच सुचेनासें होतें. मजुरांना तंबाकू खाऊं

किंवा ओढूं दिली नाहीं तर ते सुस्त व आळशी होऊन त्यांच्यानें काम चांगलें होत नाहीं.

२. असा अदमास आहे कीं,जगांतील ऐंशी कोट माणसें तंबाकूचा उपयोग करितात व सरासरी प्रत्येक माणसास ७० औंस तंबाकू लागते. तंबाकू सुमारें २ कोट टन उत्पन्न होते. इतकी तंबाकू उत्पन्न होण्यास पृथ्वींतील ९॥ लक्ष एकर चांगली सुपीक जमीन लागते. तंबाकूच्या लागवडीसंबंधी ही एक गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे कीं, ह्या पिकापासून जमिनींतील जितका कस नाहींसा होतो तितका कस दुसरा कोणत्याही पिकापासून नाहींसा होत नाहीं.

३.तंबाकूच्या घटकावयवांत एकही असा घटकावयव नाहीं कीं, जो शरीरपोषणास उपयोगीं पडतो.उलटें तिच्या अकरा घटकावयवांपैकीं बरेच विषारी पदार्थ आहेत. असें असून तिचा जगभर- गरिबापासून श्रीमंतापर्यंत- एवढा प्रसार कसा झाला? ह्याचें उत्तर इतकेंच कीं, तिचे अंगीं जो थोडा मादक गुण आहे तेवढ्यानें मनुष्याची जी मादक पदार्थांविषयीं स्वाभाविक इच्छा ती तृप्त होते. तो मादकपणा किती किंवा कोणत्या प्रकारचा आहे हें इतरांस सांगतां येत नाहीं, एवढेंच नव्हे, पण तंबाकू खाणारास सुद्धां,ती खाल्यावर तुह्मांस कसें वाटतें? असा प्रश्न केल्यास, मला कांहीं सांगतां येत नाहीं असेंच तो ह्मणेल. समजून येण्याजोगा मादकपणा तंबाकूंत नाहीं हें खरें आहे. तथापि इतर मादक पदार्थांप्रमाणें, एकदां तिची संवय झाल्यावर ती सुटत नाहीं. श्रम व त्रास झाला असतांना तिचा उपयोग नेहमीं करणारांस हुषारी वाटून त्याचे श्रम परिहार होतात. गहन विषयावर विचार करण्यास तिची मदत ( संवय झालेल्यास ) होते.

४. तंबाखूचे अंगीं औषधी गुण आहेत.स्ट्रिचनियाचे विषावर तंबाखू चांगला उतारा आहे. त्या विषाची बाधा झालेल्यास तंबाकूच्या पानाचा बराचसा रस पाजल्यास तें विष नाहींसें होतें. ठेंच, जखमा, विषारी प्राणी ( सर्प, विंचू ) चावल्यास तंबाखूचा बाह्य उपयोग करितात.

५. **गांजा**.— गांजा किंवा त्याचा चीक ( चरस )हा अधिक मादक आहे. गांजा एशिया खंडांत उत्पन्न होतो व त्याचा उपयोग इकडचे लोक अमलासाठीं करितात. तंबाखुप्रमाणें तो खात नाहींत; फक्त चिलमींतून ओढून त्याचा धूर घेतात. गांजा हिंदुस्थानांत पुष्कळ होतो. ज्यास **चरस** ह्मणतात तो गांजाचे झाडापासून आपोआप निघणारा चीक होय. ज्या झाडापासून हा चीक काढलेला असतो त्या झाडाचा गांजाप्रमाणें उपयोग होत नाहीं. कारण, चरस काढून न घेतां त्यासह जीं झाडें वाळवितात तोच गांजा होय. चिकाच्या योगानें झाडाचीं पानें व फुलें एकत्र चिकटून राहतात. अर्थात् त्यांत त्यामुळें मादकपणा अधिक राहतो. अशा तऱ्हेनें गांजाचीं बोंडें तयार करणास विशेष हतोटीच लागते असें समजतात.

६.चरस काढणें झाल्यास तो हातानें खरडून काढितात व हीच चाल नेपाळांत आहे. अथवा मनुष्यें कातडीं पांघरून झपाट्यानें गांजाच्या शेतांतून फिरतात ह्मणजे आयतांच चीक त्यास चिकटतो, तो मग कातड्यावरून खरडून घेऊन त्याचे गोळे बांधतात, त्यासच काबुली चरस ह्मणतात. परशियामध्यें गांजाचें झाड खरबरीत कपड्यांत घालून दाबतात ह्मणजे चीक आयताच कपड्यांस चिकटतो, तो काढून घेऊन गरम पाण्यांत वितळतात. बाजारांत मिळणारा चरस ज्यास काबुली चरस ह्मणतात, तो मध्यप्रांतांत पुष्कळ होतो. हा चरस दुप्पट किंमतीनें विकतो. हिरातेंतील चरस फार मादक असतो,पण तो ह्या देशांत येत नाहीं.गांजा मद्यार्कामध्यें ( आलकोहोल) भिजविल्यास चरस त्यांत मिसळून तेव्हांच तो निराळा काढतां येतो व त्यास वेळ व खर्च कमी लागून उत्तम चरस मिळतो. पण ही सोपी पद्धत इकडच्या अडाणी शेतकरी लोकांस मुळींच माहीत नाहीं. रसायनरीत्या गांजाच्या अथवा चरसाच्या घटकावयवांची ह्मणण्याजोगी माहिती नाहीं.

७. गांजा व चरस एकटाच ओढीत नाहींत. गांजा व तंबाकूचा पाला मिळून ओढतात. आणि चरसाबरोबर तशीच तंबाकू न ओढतां

$\frac{2}{3}$ तंबाकू व $\frac{1}{3}$ चरस मिळून तंबाकू तयार करितात. व तीपैकीं सुमारें एक तोळाभर तंबाकू चिलमींत घालून ओढतात. गांजाही याचप्रमाणानें ओढतात. गांजा घेऊन तो लाकडावर कुटतात, नंतर हातावर चोळून त्याच्या काड्यांची व पानांची इतकी बारीक भुकटी तयार करितात कीं, तिची सहज गोळी होऊन जाते. गांजा ओढण्याचा हुक्का किंवा चिलीम तंबाकूच्या पेक्षां थोडी निराळी असते. गांजाभक्त वाटोळे बसून महादेवाचें नांव घेऊन ओढण्यास सुरुवात करितात आणि प्रत्येकजण एक दोन मोठे दम मारतो. गांजाचे भक्त सहसा एकटे बसून गांजा ओढीत नाहींत. त्यांची दोन, चार किंवा अधिक मंडळी मिळून गांजा ओढण्याची चाल आहे. त्यावेळीं तेथें कोणी नवखा मनुष्य हजर असल्यास त्याला गांजा ओढण्याचा आग्रह सर्व करितात.

८. चेहऱ्यावरून गांजेकसास ओळखतां येतें. त्याचा चेहरा निस्तेज असून डोळे खोल गेलेले व गालफडें बसलेलीं असतात. गांजापासून शरीरांतील रस वाळून शरीर निःसत्व होतें. गांजेकसास दूध, मिठाई, इत्यादि पौष्टिक अन्न न मिळाल्यास त्याला गांजा सोसत नाहीं. त्यास आमांश व हगवणीचा उपद्रव होतो. गांजापासून ओढणारास काय वाटतें किंवा कोणचे तरंग त्याचे मनावर उमटतात हें ओढणारास सुद्धां सांगतां येत नाहीं. गांजापेक्षां चरसानें मनुष्य अधिक सावध व नम्र असतो. पण गांजानें तो एककल्ली, उद्धट व लहरी होतो. चरसापेक्षां गांजाचा प्रकृतीवर अधिक वाईट परिणाम होतो व त्यापासून प्रकृति कायमची खराब होते.

९. गांजांतील बी तेलांत कढवून त्या तेलाचा अनेक त्वग्रोगांत उपयोग करितात. चरस थोड्या प्रमाणानें ( $\frac{1}{4}$ ग्रेन पासून १ ग्रेन पर्यंत ) पोटांत दिल्यास क्षुधा वाढते व मन आनंदी राहतें. परंतु अधिक दिल्यास मनुष्य भकतो. गांजा किंवा चरस ह्यांचा नेहमीं उपयोग केल्यास मेंदूची शक्ति दिवसेंदिवस नष्ट होऊन तो मनुष्य वेडा बनतो. वेड्यांचे इस्पितळांतील शेंकडा ५९ वर लोक गांजापासूनच वेडे झालेले असतात.

१०. गांजाचें झाड जेव्हां फार माजतें व त्याचीं पानें बोंडास

चिकटून न राहतां मोठीं वाढतात तेव्हां तीं पानें गोळा करून वाळवि-तात. त्यांनाच **सिद्धी** अथवा **भांग** ह्मणतात. तिचा उपयोग पंजाबांत व काशीकडे फार करितात. ह्मणजे इकडे ज्याप्रमाणें तंबाकूचा खप होतो, त्याप्रमाणें तिकडे भांगेचा खप होतो. भांग नुसती न घेतां तींत वेलची, पत्री, जिरें वगैरे मसाला घालून ती पितात. भांग थोडक्या प्रमाणानें घेतल्यास मनुष्याचे वृत्तींत फारसा बदल होत नाहीं; पण अमळ अधिक घेतली कीं, त्याच्या वृत्तींत चलबिचल होते व त्याचे डोक्यांत चमत्कारिक तरंग येतात. तिचा अंमल झालेल्या मनुष्यास वाटतें कीं, आपण डोकें टेंकून पडलों आहों. त्याला ओळखीचे सर्व पदार्थ उलटे भासूं लागतात. भांगेचा मागून जो परिणाम होतो त्यापासून क्षुधा वाढून मनुष्यास खाखा सुटते. भांगेपासून अवष्टंभ होतो. अर्थात् ती स्तंभक असल्यामुळें हगवणींत तिचा उपयोग करितात.

११. गांजांमध्यें मसाला, दूध व साखर घालून त्याच्या वड्या करितात त्यांसच **माजूम** ह्मणतात. माजुमापासून मनुष्य आनंदी होतो, हंसूं लागतो, त्याला गावेंसें व नाचावेंसें वाटतें आणि तो वर्तनांत उधळ्यासारखा वागतो. मानवी प्राण्यांपैकीं तीस कोट लोक गांजाचा, वर सांगितल्या तऱ्हेंपैकीं कोणत्या तरी तऱ्हेनें, उपयोग करितात असा अदमास आहे.

## स्फुट लेख.

**महामारीच्या जंतूंविषयीं कांहीं माहिती.**— आज मि-त्तीला हा दुर्धर रोग उद्भवण्याचें कारण एक प्रकारचे सूक्ष्म जंतु ( Microbe ) च होत असें मत ठाम झाल्यासारखेंच आहे. ह्या जंतूची लांबी $\frac{१}{५०००}$ इंच व व्यास $\frac{१}{१५०००}$ इंच असून एका चौरस इंचाचे जागेंत ७५००० जंतु राहूं शकतात इतके सूक्ष्म ते जंतु आहेत. पुष्कळ आक्सिजन वायूचे ठिकाणीं ते जंतु मरतात. तसेंच पुष्कळ कार्बानिक आसिड जेथें असेल तेथेंही हे जंतु जीवंत राहूं शकत नाहींत. खात्रीच्या ठिकाणचें सोडावाटर आणून उपयोग न करितां थोडे दिवस

तसेंच ठेविल्यास आंतील कार्बानिक ग्यासचे योगानें व दाबानें, जर त्या पाण्यांत ह्या जंतूंचा कोणत्या तरी कारणानें प्रवेश झाला असेल तर, हे जंतु मरून जातात. घाण पाण्याचीं डबकीं, मोऱ्या, उथळ व जाग जागीं घाण पाणी जमलेले ओढे अथवा लहान नद्या, घाणेरड्या व उजेड नसलेल्या विहिरी किंवा काळोखाच्या राहण्याच्या जागा इत्यादि ठिकाणीं हे राहून वृद्धि पावतात. डोंगरावरून वाहणारे झरे, ओढे व वाळुमय अथवा खडकमय नद्या ह्या ठिकाणीं हे जंतु स्वभावतःच नसतात. प्रवाहाचा जोर जितका अधिक तितका तें पाणी ह्या जंतूविरहित राहण्याचा अधिक संभव. क्यार्बालिक आसिड [ Carbolic Acid ] पासून हे किडे तात्काळ मरतात. ह्मणूनच कमेट्या हें औषध मिश्र असलेली भुगटी ( मेगडोगल् पावडर ) घाण जागीं टाकितात. कोणताही पदार्थ चांगला तापविला किंवा कडकडीत उन्हांत एक दिवस ठेविला तर त्यांतील जंतु मरण पावतात. अर्थात् सांथीचे दिवसांत तापविलेलें पाणी व ताजें शिजलेलें अन्न किंवा निदान आयत्या वेळीं कढत केलेलें अन्न खाल्यास हा रोग होण्याची भीति नाहीं. वाळविल्यानें काल-याचे जंतु ज्याअर्थी नाहींसे होतात त्याअर्थी हवेच्याद्वारें ह्मणजे श्वासोच्छ्वासाचेद्वारें जंतु शरीरांत जाण्याचा संभव मुळींच नाहीं. अर्थात् ह्यांचा पोटांत प्रवेश होण्याचा मार्ग फक्त अन्नो दकच होय. पुष्कळदां उदकाचेचद्वारें हे जंतू पोटांत जातात व रोग फैलावतो;पण क्वचित् हे जंतु असलेल्या अन्नापासूनही हा रोग फैलावतो. हे जंतु असलेल्या ढाळ व वांतीवर माशा बसतात व त्यांचेद्वारें तें विष दुसऱ्या पदार्थांत अथवा पाण्यांत मिसळून ह्या रोगाची सांथ उद्भवते. वरील हकीकतीवरून आपणास आरोग्याचे बाबतींत किती तरी बोध घेण्याजोगा आहे बरें?

**मधुमेहांत** ( Diabetes ) **पेटके येणें.**– मधुमेहामध्यें केव्हां केव्हां पायाचे स्नायूंस- त्यांत विशेषतः गुडघ्याचे खालचे स्नायूंस- गोळे येतात. गोळे दिवसा क्वचितच येतात, पण रात्रौ फार येतात. गोळे फार वेळ टिकत नाहींत, तथापि त्यांपासून दुःसह वेदना होतात. ह्या

संबंधानेंच सकाळीं उठल्यावर कांहीं वेळ पायांचे स्नायूंस झटके बसतात व ते सकाळीं तीन तासपर्यंतही राहतात. परंतु जसजसा दिवस वाढत जातो तसतसे ते झटके नाहींसे होतात.

**स्टेशनावरील गाळणीं ( फिलटर्स ) व त्यांची अस्वच्छता.**— पाणी गाळून प्यावें व त्यासाठीं स्टेशनावर पाहण्यांत येतात अशीं तीन 'डेऱ्यांचीं गाळणीं' करावींत असें आह्मी आमचे लोकांस सांगत आहोंत. यावरून तीं गाळणीं अगदीं निर्दोष आहेत असें मात्र कोणीं समजूं नये. इतर बाबींत तीं चांगलीं आहेत, पण त्यांत एक मोठी गोम आहे व ती फार घाणेरडी व आरोग्यास धोक्याची आहे ह्यांत संशय नाहीं. ती चाल ही कीं, त्याच घडवंचीस साखळीनें एक जस्ती टमरेल अडकाविलेलें असतें तेंच प्रत्येकजण मडक्यांत बुडवून तोंडास लावितो. दुसरा येतो तो तें न धुतां तसेंच पुनः मडक्यांत बुडवितो. तिसरा पुनः फार झालें तर त्यांत शेष असलेलें पाणी फेंकून तसेंच्या तसेंच मडक्यांत बुडवून त्यानें पाणी पितो. ह्याप्रमाणें सारखा क्रम चाललेलाच असतो. तें जस्ताचें टंब्रेल लौकरच काळें पडतें. क्वचित पोर्टराकडून कधीं तें चांगलें धुतलें जात असेल तर असेल. सारांश, त्या उष्ट्या टिनपाटाचेद्वारें पिण्याचे पाण्यांत प्रत्येक मनुष्याचे मुखांतील अंशतः घाण- दारू,तंबाकू,मुखरोग,इत्यादिकांची- मिश्र पावण्याचा फार संभव असतो. सारांश ही चाल अगदीं घाणेरडी आहे असें ह्मणावें लागतें. ह्या कामीं युरोपियन लोकांनीं आमचें अनुकरण करणें अगदीं जरूर आहे. आमच्या पिण्याच्या पाण्यास अशा प्रकारचें टिनपाट पक्कें बांधलेलें नसतें. पण पिण्यासाठीं एक दोन धातूचीं भांडीं जवळ ठेविलेलीं असतात व कांहीं मध्यम भांडीं ( गडवे ) हीं असतात. गडवा भरून पाणी हंड्यांतून काढतात व मग गडव्यांतील पाणी पंचपात्रीनें पितात. प्रत्येक मनुष्य पाणी पितांना पंचपात्री स्वच्छ विसळून नंतर पाणी पितो. व प्याल्यावर तें भांडें आपण अथवा नोकरकडून विसळून ठेवितो पिण्याचें लहान भांडें चांगलें स्वच्छ असतें, तरी तें मोठ्या भांड्यांत बुडवीत नाहींत. मोठ्या भांड्यांत तांब्या बुडवून पाणी

घेतात व तो कोणीही तोंडास लावीत नाहीं. ‘ पाणी उष्टें करूं नये ’ हा धडा लहानपणापासून आया मुलांस शिकवीत असतात. व ही गोष्ट आरोग्याचे नात्यानें फार महत्वाची आहे ह्यांत बिलकुल शंका नाहीं. उष्टें पाणी पिणें, उष्टें खाणें, ह्या गोष्टी आमच्यांत जितक्या अपवित्र मानल्या जातात तितक्या युरोपियन लोकांत किंवा त्यांचें अनुकरण करणाऱ्या इतर लोकांत मानल्या जात नाहींत.

**कडू दोडक्याचे गुण**—- ह्या झाडाचीं पानें, फुलें, फळें, मुळ्या, इत्यादि सर्वच फार कडू असतात. कडू दोडक्याचे फळापासून सडकून जुलाब व वांत्या होतात. डोकें दुखूं लागलें असतां कडू दोडका फोपाळ्यांत घालून त्याचा रस काढून आंकांस चोळतात. पिकलेल्या कडू दोडक्याच्या बियाचा काढा अथवा पूड दिली असतांनाही उलटी व जुलाब होतात. गुरांना दुखापत झाली असतां त्या जागीं ह्या झाडाचीं पानें बांधितात. कुत्रें चावलें असतांना दोडक्यांतील मगस पाण्यांत कालवून पाजतात, त्यानें जुलाब व वांत्या होतात. बिंचू व घोण, गांधील माशी इत्यादि चावल्याजागीं त्याचा रस चोळतात वाळलेल्या दोडक्यांतील मगजाची पूड कामिणीमध्यें नाकांत (तपकिरीप्रमाणें) ओढतात. इंडियन फार्माकोपियांत कडू दोडका हा मूत्रल व शक्तिवर्धक असून पानथरीमध्यें देण्यास सांगितलें आहे.इंग्रजी उलटीचें औषध जें इपिक्याक त्याच्या तोडीचें देशी उलटीचें ( अर्थात् वनस्पतींपैकीं ) औषध ह्मटलें ह्मणजे कडू दोडक्याच्या बियांतील मगज होय. तो उलटीसाठीं २०-३० ग्रेनपर्यंत देतात. आमांशामध्यें जसें इंग्रजी औषध इपिक्याक चालतें तसें हेंही चालतें. बियांचा मगज कफघ्नही आहे;मात्र त्यासाठीं ह्याचें प्रमाण ९ ग्रेनपर्यंत द्यावें.

**गोरोचन.**— हें गाईच्या किंवा बैलाच्या पित्ताशयांत सांपडतें. तें थंड व सुगंधी असून लहान मुलास थोड्या प्रमाणानें दिलें असतां त्यापासून मल साफ होतो.

## आर्यधर्मरहस्य.

वांई येथें येत्या कार्तिकापासून सुरू होणाऱ्या ह्या डेमी अष्टपत्री ४० पृष्ठांच्या मासिक पुस्तकांत श्रीमच्छंकराचार्यांचें भगवद्गीतेवरील अप्रतिम भाष्य मराठी भाषांतरासह येत जाईल. आगाऊ वर्गणी वर्षाची फक्त २ रु० ट. हं ६ आणे. शिवाय मधुसूदनीप्रभृति सर्व संस्कृत व ज्ञानेश्वरीप्रभृति सर्व प्राकृत टीका ह्या भाष्याच्याच आधारानें झालेल्या आहेत. तेव्हां मूळभाष्य मराठींत समजणें अर्थातच फार अवश्य आहे.

( ज्यांना फक्त भाषांतरच हवें असेल त्यांनीं वांई येथें दर गुरुवारीं निघणारें मोदवृत्त वर्तमानपत्र घ्यावें. ह्या पत्रांत वरील भाषांतर येत्या आश्विनापासून येत जाईल व महिन्याच्या सर्व अंकांत मिळून मासिक पुस्तकाच्या एका अंकाइतकें भाषांतर येईल. पत्राची वर्गणी १ रु० ट. हं. १२ आणे शिवाय. ) वर्गणी आगाऊ पाठवून द्यावी अगर पहिला अंक व्ही. पी. नें मागवावा.

काशीनाथ वामन लेले,
आर्यधर्मदर्पण व मोदवृत्तकर्ते वांई, जि० सातारा.

---

**सूचना:**— आजच्या अंकापासून 'चित्ताकर्षणशास्त्र अथवा मोहिनी विद्या' हा विषय निराळे पृष्ठांक देऊन छापण्यास आरंभ केला आहे. त्याचीं सुमारें २००।२५० पानें होतील असा अदमास आहे. सबब त्या विषयाचें निराळेंच पुस्तक बांधतां यावें यासाठीं वरील व्यवस्था केली आहे. इंग्रजींत ज्यास मेस्मेरिझम ( Mesmerism ) ह्मणतात तो हा विषय होय हें वाचकांचे ध्यानांत येईलच. अद्याप ज्या लोकांकडून वर्गणी यावयाची आहे त्यांनीं हा अंक ( चवथ्या वर्षाचा ७ वा अंक ) हातीं पडतांच वर्गणी धाडावी. भिषग्विलास जसें नियमित आपलें कर्तव्य बजावीत आहे तसेंच वाचकही बजावीत गेल्यास परस्पर फायद्याचें होईल.

---

**चुकीची दुरुस्ती**— मागील अंकांत 'अभिप्राय' या सदराखालीं 'श्रीपतस रिंगवर्म मिक्‌चर' असें जेथें ह्मटलें आहे तेथें 'श्रीपती यांचें रिंगवर्म मिक्‌चर' असें समजावें. या औषधाचे उत्पादक श्रीपती निकम हे, रांधेर येथील डिस्पेन्सरी वरील हास्पिटल असिस्टंट. आहेत.

चवथें वर्षाबद्दल

[ एप्रील १८९५तें मार्च १८९६ अखेर. ]

३ रा. रा. गोविंद सदाशिव चासकर.
३ ,, ,, काशीनाथ जनार्दन भावे.
३ ,, ,, डा. देशमुख.
३ ,, ,, रामराव वैद्य.
३ ,, ,, नरसु दाजूजी.
३ ,, ,, सेक्रेटरी, व्यांप लायब्ररी सोलापूर.
३ ,, ,, रघुनाथ महेश्वर जोशी.
३ ,, ,, बहिरव उद्धव चितळे.
३ ,, ,, वैजनाथ रामकृष्ण आठवले
३ ,, ,, डा. पटवर्धन, पालनपूर.
३ ,, ,, सेक्रेटरी, दाहिवडी लायब्ररी.
३ रा.सा. लघाटे मुनसफ.
३ ,, ,, नारायण दासो बनारटी.
३ ,, ,, विठ्ठल भिकाजी आसिपटल असिस्टंट.
३ डा. कृष्णा कामती, कोचीन.
३ रा.रा. कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य
३ ,, ,, सेक्रेटरी, ने. ज. लायब्ररी इंदूर..
३ ,, ,, विष्णु कृष्ण पुराणिक.
४८४ ,, ,, गोविंद केशव बापट.
( चवथे वर्षाबद्दल ३ रु. व मागील ९ अंकांबद्दल १८४ )
३ रा. सा. यादवराव साठे.
३ रा. रा. श्रीकिसन विठूराम शेट, मारवाडी.
३ ,, ,, अच्युत कृष्ण सोनटक्के.
३ ,, ,, बाळकृष्ण दिनकर वैद्य.
३ ,, ,, केशव जनार्दन सुपरवायझर
३ ,, ,, कृष्णाजी गणेश देशपांडे.
३ ,, ,, विनायक बापूजी जोशी.
३ ,, ,, झिप्रुकृष्ण पो. हवालदार.
३ ,, ,, केशवराव वकील, कलबुर्गी.

चारी वर्षाबद्दल

११४१० गंगाधर आत्माराम माईणकर.
१२ रा. सा. कृष्णाजी बाबाजी फडके.
१२ शेट सोराबजी बयरामजी.
१० रा. रा. हरी नारायण किरपेकर (तीन वर्षांबद्दल ९ रु. व चवथ्या पैकीं १ रु. )
१२ लालशंकर उमयाशंकर

दुसरे व तिसरें वर्षाबद्दल.

६ रा.रा. नारायण वामन, सेक्रेटरी ने. ज. लायब्ररी अकोलें.

तिसरे वर्षाबद्दल.

३ रा.रा. कृष्णाजी वासुदेव नातु.

## कृष्णशास्त्री त्रिवलकर वैद्य मु॰ आंजर्लें ता॰ दापोली जि॰ रत्नागिरी यांचीं जगत्प्रसिद्ध, सर्वोपयोगी, निर्दोष व रामबाण औषधें.

या जाहिरातीचे खालीं "विशेष सूचना" केली आहे ती वाचकांच्या अवश्य लक्ष्यांत असावी.

### १. वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साह- बुद्धि कांतिवर्धक व धातुपौष्टिक, सुवर्णमाक्षिक- मौक्तिक- कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१ शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें त्यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्व भागीं व त्याच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, कोणत्याही कारणांनीं आलेली अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, उन्हाळे, छातींतील रोग, मस्तकशूळ, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूळव्याधि, भगंदर, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूळ, कटिवात, वातरोग, निद्रानाश, चक्कर, कफातिरेक, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, सूतिकारोग, व्रण, हात, पाय, मूत्रमार्ग व शरीर यांचा दाह, ठणका, ग्लानि, अरुचि, मूत्राश्मरी व चित्तभ्रम इत्यादि अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले, नवीन किंवा जुनाट असले तरी अगदीं खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति, व बुद्धि हीं वाढतात. ज्यांस फिरण्याचे, अभ्यास करण्याचे लिहिण्याचे व शिकविण्याचे श्रम फार पडतात त्या सर्वांच्या अंगीं यांनीं

अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो व सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें. कोष्ठशुद्धि होते. कोष्ठांतील अनियमित व्यापारांपासून होणारे दुष्ट परिणाम टळतात. या अप्रतिम गुटिका अत्यंत उपयुक्त शोधानें केल्या असून यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें आहेत, सबब जास्त वर्णन येथें करीत नाहीं. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस या अत्यंत उपयोगी आहेत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषध नाहींच असें स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात, यामुळें यांचा अतिशय खप सुरू आहे. हल्लीं या गोळ्यांत अंतर्वेदी, नेपाळ, काश्मीर इ० देशांतील अत्यंत शुद्ध, ताजे, महत्वाचे व मौल्यवान् असे अनेक पदार्थ आणखी घालून त्यांची विशेष सुधारणा केली आहे आणि लोकाग्रहावरून केवळ परोपकारार्थ ह्मणून गोळ्यांचा दर फारच स्वस्ता केला आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व ट. खर्च माफ आहे. अनुपान ख० सोबत देऊं. एकदम १६ गोळ्यांस १ रु., ३६ गो० २ रु., ८० गो० ४ रु., व १३० गो० ६ रु.

## ३. थंडगार नेत्रांजन.

हें परम गुणकारक अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भार, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंडू, फूट, चिकटा, ठणका, व लाली, इ. अनेक विकार तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यांस कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा बिलकूल न होतां बरे होतात.

दृष्टि तीव्र व थंडगार राहते. शिवाय जागरण, उन्हांत फिरणें

अग्नीचा शेक, उपदंशविकार, अतिवाचन, अतिव्यायाम, अतिमैथुन, अतिमद्यपान, अत्युष्ण व विदाही पदार्थ भक्षण, इ० कारणांनीं ज्यांचे डोळे बिघडतात त्यांस याचा फारच मोठा उपयोग आहे. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार बिलकुल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगीं आहे. २ तो० ड० १॥ रु०

## ४. कर्णस्रावनाशक अप्रतिम तैल.

हें उत्तम तेल कानांत घातल्यानें कानांतून पू वाहणें, तत्संबंधीं ठणका, कंडू, दाह, रक्तस्राव, इ. विकार तत्काळ बरे होतात. कानांतील कोणत्याही प्रकारचे साधारण व्रण तर तत्कालच, परंतु कानाचा समूळ नाश करणारे जुनाट किंवा हाडीं खिळून बसलेले कितीही वयाचे मनुष्याचे व कोणत्याही कारणानें प्राप्त झालेले अनेक प्रकारचे असाध्य व्रण कोणतीही इजा किंवा आग वगैरे बिलकुल न होतां अगदीं खात्रीनें बरे होतात. बाटलीस रु० १ शिवाय प्या० ख० दोन आणे. रोखीनें किंवा व्हॉ. पे. पार्सलनें खालील पत्यावर मागविल्यास पाठवूं. अनुपान खर्डा बाटलीसोबत.

५. **पर्म्यावर अपूर्व मिश्रण.**—कोणत्याही प्रकारचा नवीन किंवा जुनाट पर्मा, तत्संबंधी दाह, तिडीक, मूत्राची विवर्णता, संकोच किंवा मूत्रातिरेक इ. विकारांसह या मिश्रणापासून इजा बिलकुल न होतां व पथ्यसेवनाची खटपट नसतां ताबडतोब बरा होतो. पर्म्यावर इतकें प्रतिज्ञेचें औषध दुसरें नाहींच. बा. १ रु.

६. **दंतरक्षक पूड.**— ही चोळिल्यानें दंतसंबंधी सर्व विकार हिरड्यांचा रक्तस्राव व व्रण, पू, कीड इ. फारच त्वरितं व नाजूक रीतीनें बरे होऊन दांत स्वच्छ व फार मजबूत होतात. ड. ६ आणे.

७. गजकर्ण, नायटे, खरूज इ. विकार ३ दिवसांत बरे होतात. ड. ६ आणे.

८. विंचवाचें विष हें औषध लावतांच उतरतें. ड. ८ आणे. इतकें औषध ४० मनुष्यांस पुरतें.

वरील औषधें अत्यंत खात्रीचीं आहेत. त्यांणीं हजारों लोकांस गुण आला व नित्य येत आहे. अनुभवानंतर पक्की खात्री होईलच. याशिवाय आमच्या येथें कस्तूरीच्या उत्तम कातगोळ्या, तमाखूच्या अर्काच्या कस्तूरीमिश्र गोळ्या, उत्तम सुगंधी अत्तरें व ग्रंथोक्त रसायनें, धातूंचीं भस्में, पाक, तेलें, चूर्णें, गोळ्या, घृतें, आसवें, द्रावं, क्षार हेमगर्भादि रसायनें इ. औषधें माफक किंमतीस मिळतील. पाहाण्यासाठीं सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. अनुपान पत्रक औषधासोबत पाठवूं. पत्ता सुवाच्य. कोणीं प्रकृतिमान कळविल्यास रोगाचें निदान व योग्य चिकित्सा कळवूं. औषधें रोखीनें किंवा व्ही. पी. नें विकत मिळतील. टपालखर्च वेगळा पडेल. गरीब लोकांस स्वस्त दरानें औषधें देऊं. जाहिरातीच्या खालील किंवा वरील पत्यावर मिळतील. या औषधांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून त्यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळविल्या आहेत व नित्य मिळत आहेत.

**विशेष सूचना:—** अलीकडे वर्तमानपत्रांतून आंजर्लें व नजीकच्या मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या नवीन बऱ्याच जाहिराती सुरू झाल्या आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींच्या खालीं किंवा वर ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या ग्राहकांस भासण्याचा संभव आहे, यामुळें कदाचित् ग्राहकांचा घोंटाळा होईल. तरी अशा लोकांशीं व त्यांच्या जाहिरातींशीं आमचा कोणत्याही प्रकारें अगदीं संबंध नाहीं हें ग्राहकांनीं अवश्य लक्षांत ठेऊन, आमचीं औषधें मागणें तीं "**कृष्णशास्त्री चिपलकर वैद्य मु० आंजर्लें ता० दापोली जि० रत्नागिरी**" या अगदीं बिनचूक सही व पत्यावर मागवावींत.

**कृष्णशास्त्री चिपलकर.**

**पत्ता**— मु० आंजर्लें, ता० दापोली, जिल्हा रत्नागिरी.

रु. १ ट. व बं. खर्च .॥.

वालसंजीवन.— किं. रु. १ ट. व बं. खर्च .॥.

कर्णरोगावर थेंब.— किं. .॥। ट. व बं. खर्च .॥.

दांतांचें मंजन.—किं. .। ट. व बं. खर्च ३ डब्यांपर्यंत .॥.

केशवर्धक तेल.— किं. रु. १ ट. व बं. ख. .॥।.

जुलाबाच्या गोळ्या.— किं. .।= ट. व बं. ख. .।≡

अन्नपाचक गोळ्या— किं. .॥. ट. व बं. ख. .।≡

मुलांचे ताड्यावर.—( आंकडीवर )रामबाण— किं. रु.३ व रु. २ ट. व बं. ख. .॥.

केंस जाण्याचें औषध.— किं. रु. १ ट. व बं. ख. .॥ हें पाण्यांत भिजवून लेप करून खरवडल्यास तात्काळ केंस जातात.

बाळंतपणावर अर्क.— हें सतत घेतलें असतां बाळंतरोग साफ बरा होतो. किं. रु. ४ ट. व बं. ख. रु. २॥

मुद्दाम उन्हाळ्याकरितां.— थंडगार. हुषारी, आणणारी व ऊत येणारी सर्बतची भुकणी, किं. रु. १ ट. व बं. ख. रु. १৵

इंग्रजी डाक्तरांकरितां लागणारीं औषधें विलायतेहून आणविलीं आहेत. त्यांचा क्याटलागही अर्ध्या आण्याचें टिकिट पाठवून मागवा.

**वैद्य गोपीनाथ कृष्णाजी क्षात्रिय.**

१ ली सदाशिवजीची गल्ली, गिरगांव पोस्ट आफिसाचे समोरचे गल्लींत, मुंबई.

---

## महामारी

हें प्रत्येक कुटुंबांत ठेवण्यायोग्य पुस्तक असून, विशेषतः जेथें चांगल्या वैद्याची मदत नाहीं अशा गांवांत सांथीचे दिवसांत तर फारच उपयोगी आहे. ह्यामधील उपाय अगदीं साधे व पाहिजे तेथें करतां येण्याजोगे आहेत. ह्या पुस्तकावर डा. भालचंद्र, डा. विश्राम, वगैरे विद्वान लोकांचे व वर्तमानपत्रकर्त्यांचे फार चांगले अभिप्राय आले आहेत. पुस्तकाची किंमत ৵१० आहे. मुद्दाम टपालहंशील माफ केलें आहे.

**म्यानेजर भिषग्विलास,**

डा. रानडे यांचा दवाखाना, सोलापूर.

# जी. बी. नाईक कंपनीच्या

## विजेच्या आंगठ्या, कडी, लेखण्या व गळपट्टे.


प्रत्येक वस्तूवर G. B. N. मार्क पाहून घेत जा.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

## रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे.




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग, अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें, कंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे, काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धशिशी, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें, गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मळव्याधी, पाठींतील अशक्तता, निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे गळपट्टा- लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात. लेखणी- हातास कांपरें व स्मरणशक्ति. अशा ह्या उत्तम गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट, चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

## विजेच्या वस्तूंची किंमत

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं रु १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां पुतळीस किं रु. २ | धातूचे लेखणीस किं रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो पुतळीस किं रु. २२ | रेशमी गळपट्टा किं. रु. १॥ |

कमरपट्टा किंमत रु० ६.

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही.पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठीकरितां बोटाचें माप पाठवीत असावें. पत्ता स्पष्ट असावा. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे. बंगी करणावळ माफ.

**जी. बी. नाईक आणि कंपनी.**

मुंबई, भायखळा, जुन्या दारूखान्याजवळ; व पुणें, बुधवारपेठ.

पत्ता.–डा० रानडे यांचा दवाखाना, सोलापूर.

BHISHAGVILASA.

वैद्यकसंबंधी अनेक विषयांचें सुबोध भाषेंत
मासिक पुस्तक.

A Monthly Magazine in Marathi
to popularise Medicine.

आयुःकामयमानेन धर्मार्थसुखसाधनं ॥
आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः ॥ १ ॥

पुस्तक ४. नवंबर १८९५ अंक ८

विषयानुक्रम. पान.


चित्ताकर्षणशास्त्र अथवा मोहिनीविद्या .... .... ९

शरीररचना .... .... .... .... १२९

नाडी (पल्स) .... .... .... .... १३५

ज्वर .... .... .... .... .... १३७

स्फुट लेख.... .... .... .... .... १४०



सोलापूर

आनंदवृत्त छापखान्यांत छापिला.

वर्षाची आगाऊ वर्गणी ट. ह. सह ३ रु.

**गोपीनाथ [illegible]जी क्षत्रियकृत** **अचूक गुणकारी औषधें.**



पुणें येथील सन १८८८ सालांतील देशी कलाकौशल्याचे जंगी प्रदर्शनांत औषधांच्या योग्यतेबद्दल व गुणाबद्दल सर्टिफिकेट ( दाखला ) मिळालें आहे

**ज्वरांकुश** (तापावर रामबाण तीन दिवसांत हाटकून हिंवताप व पाळीचे ताप जातात. पैसे परत करणाऱ्या पैजेच्या हिंवतापाचे औषधांपेक्षां हें किती गुणकारी आहे ह्याची अनुभवाअंतीं खात्री होईलच. कारण, जास्त फाजील लिहिण्यांत हंशील नाहीं. किं. रु १ ट. व बं. खर्च १८–

**जुलाब, पोटदुखी व पटकी बंद करण्याचें वस्ताद औषध** प्रत्येक कुटुंबानें अवश्य संग्रहीं ठेवावें. किं. ।।।. ट. बं. ख. ॥

**शक्तीवरील गोळ्या**— नंबर १, बलवर्धक, शक्तिवर्धक, पौष्टिक, इत्यादि. विशेष माहिती पत्र पाठविल्यास मिळेल. किं. १०० गो. रु. ३॥ ट. व बं. ख. ।≡

**कपाळशूळ व अर्धशिशीवर.**— पांच मिनिटांत गुण. किं. रु. १॥ ट. व बं. ख. ॥.

**शक्तीवरील गोळ्या** —नंबर २-सुस्तीवर, पानथर, मुलांचे डब्यावर व अफूचे व्यसनावर वस्ताद. किं. रु. १ ट. व बं. ख. ।≡

**पूपम्यांवर वस्ताद.**—ह्या औषधानें बारांपेक्षांही कमी तासांत खात्रीनें गुण पडतो. किं. रु. १ ट. व बं. ख. ।।।.

**केंस काळेभोर करण्याचा कलप.** किं. रु. १ ।ट. व बं. ख. ॥≡

**रक्तोपतीवर रामबाण.**—किं. रु. ६ ट. व बं. ख. १।

**खोकल्यावर गोळ्या.**- किं. ।।। ट. व बं. ख. ।≡

**गजकर्ण व खरजेवर मलम.**— किं. ।= ट. व बं. खर्च तीन डब्यांपर्यंत. ।=

**नेत्रसंजीवनी थेंब.**— किं. रु. १ ट. व बं. ख. ॥.

**मूळव्याधीवर चूर्ण अथवा मलम.**-किं. रु. २ ट. व बं. खर्च ।≡

**वायुनाशक तेल.**– किं. ।. ट. व बं. ख. ॥.

**खोकल्यावर सरबत.**- ( दम्यावर फारच गुणकारी ) किं.

# भिषग्विलास.

पुस्तक ४ नवंबर १८९९. अंक ८


## शरीररचना.

लेखक— डा० कृ० राव गडबोले.

### शिराविचार.

हस्तपादादि अवयवांतील अशुद्ध रक्त हृदयांत पुनः परत आणून पोहोंचविणाऱ्या ज्या वाहिन्या त्यांस शिरा ( व्हेन्स ) ह्मणतात. यांच्या नलिकेची त्वचा धमनीपेक्षां पातळ असते. या काळसर तांबूस रक्तानें भरलेल्या असतात व काळसर हिरव्या दिसतात. धमन्या बहुधा खोल मार्गांतून जातात आणि शिरा अगदीं त्वचेच्याच खालीं बहुधा असतात. शिरांतून मध्यें मध्यें पडदे पुष्कळ असतात. या वाहिनीवर बोट ठेवून पाहिलें असतां धमनीप्रमाणें नाडीच्या ठोक्याचा स्पर्श लागत नाहीं. या वाहिन्या शरीरांतील रक्त उलट हृदयाकडे आणतात. धमनीच्या उत्तरोत्तर सूक्ष्म शाखा होतां होतां त्या केसाइतक्या बारीक होतात तेव्हां त्यांस **केशवाहिन्या** ( क्यापिलरीझ ) ह्मणतात. तर या केशवाहिन्या पुढें पुनः एकमेकांस मिळून मिळून त्यांपासूनच शिरा होतात. अशा प्रकारच्या शिरा शरीरांत असंख्य आहेत, तथापि त्या एकमेकांस मिळतां मिळतां त्यांजपासून मोठ्या शिरा दोनच होतात. त्यांपैकीं एक शीर हृदयाच्या खालीं असणारा जेवढा शरीराचा भाग त्यांतील अशुद्ध रक्त गोळा करून आणते व हृदयाच्या दक्षिण विभागांतील वरच्या कप्प्यांत नेऊन पोहोंचविते, हिला **अधोमहच्छिरा** ( इन्फीरियर व्हीनाकेव्हा ) ह्मणतात. व दुसरी हृदयाच्या वरील जेवढा शरीराचा भाग त्यांतील अशुद्ध रक्त आणते, तिला **ऊर्ध्वमहच्छिरा** ( सुपीरियरव्हीनाकेव्हा ) असें ह्मणतात. आतां या दोहोंपैकीं प्रथम ऊर्ध्वमहच्छिरेचा विचार करूं.— मस्तकांतील, मानें-

तील व हातांतील सर्व शिरा, एकत्र मिळून ऊर्ध्वमहच्छिरा होते. याजकारितां मस्तक, मान व हात यांतील शिरा क्रमानें वर्णिल्या आहेत.

## मस्तकशिरा

मस्तकांतील रक्त आणणाऱ्या शिरांमध्यें मोठे विभाग दोन करितां येतात. पहिला विभाग मस्तकबहिःशिरा व दुसरा विभाग मस्तकांतःशिरा.

**बहिःशिरा** डोक्यावरील त्वचा, कपाळ, डोळे, नाक, तोंड वगैरे भागांतील रक्त गोळा करून आणतात. व **अंतःशिरा** डोक्याच्या आंत असणारा जो मस्तिष्क अवयव त्यांतील रक्त आणतात. मस्तिष्काच्या शिरांतून मध्यें मध्यें पडदे नसतात व त्या शिरा इतर शिरांपेक्षां अतिशयच पातळ कोशिऱ्याच्या बनलेल्या असतात. मस्तिष्काचें जें आवरण त्याच्या कांहीं थोड्या भागांत त्याच्याच दोन पदरांमध्यें अशुद्ध रक्त वाहणाऱ्या मोठमोठ्या नलिका बनलेल्या असतात त्यांस **शिराकल्प** ( सायनसेस ) असें ह्मणतात. हे शिराकल्प मस्तिष्कावरणांत एकंदर पंधरा आहेत. आतां यांस शिराकल्प असें ह्मणण्याचें कारण इतकेंच कीं, हे शिरांसारखेंच कार्य करितात व यांचे आंतील जें अस्तर तें शरीरांतील शिरांच्या आंतील अस्तराशीं जुळून असतें पण बाहेरील रचना मात्र शिरेसारखी नसते. हे जे पंधरा शिराकल्प सांगितले त्यांमध्यें एक मोठा शिराकल्प असतो तो मस्तिष्काच्या दाक्षिणोत्तर विभागाच्या मधून, पुढून मागें गेलेला असतो त्यास **प्राक्प्रसक्शिराकल्प** ( सुपीरियर लाँजीट्यूडिनलसायनस ) असें ह्मणतात. या शिराकल्पास सहस्रदलांतिल व शतदलांतील शिरा येऊन मिळतात. व बाकीचे जे चौदा शिराकल्प तेही याच शिराकल्पास मिळतात त्यामुळें हा शिराकल्प सर्वांमध्यें फारच मोठा असतो. पुढें यांतील रक्त मानेच्या शिरेंत जातें.

मानेच्या शिरा चार असतात त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—

बहिर्ग्रैवेयक, प्राक्ग्रैवेयक, अंतर्ग्रैवेयक, अंतर्माणि. १ **बहिर्ग्रैवेयक** ( एक्स्टर्नलजुगुलर ) ही मानेच्या बाहेरल्या बाजूकडून पुढल्या

अंगानें खालीं उतरते आणि अधोजत्रु शिरेस मिळते. २ **प्राक्ग्रैवेयक**-( आँटीरियर जुगुलर ) गळ्याच्या पुढील बाजूच्या मध्येरेषेतून खालीं उतरत जाऊन अधोजत्रु शिरेस मिळते. ३ **अंतर्ग्रैवेयक,** ( इंटर्नेल जुगुलर ) ही सर्व ग्रैवेयक शिरांमध्यें मोठी असते ही मस्तकांतील रक्त घेऊन येऊन खालीं मानेंत उतरते व ग्रैवेयक धमनीच्या बाहेरल्या बाजूनें खालीं उतरून अधोजत्रु शिरेशीं हिचा संगम होतो.

४. **अंतर्मणिशिरा** (व्हर्टिब्रल) ही मानेंतील मणक्याच्या बाजूच्या छिद्रांतून खालीं उतरत जाऊन अधोजत्रु शिरेस मिळते. या ज्या ग्रैवेयक शिरा सांगितल्या या मानेच्या एका बाजूच्या झाल्या. तेव्हां उजव्या बाजूच्या चार व डाव्या बाजूच्या चार मिळून एकंदर आठ असतात.

## हस्तशिरा.

हातांच्या शिरांचे दोन विभाग करितां येतात. पहिला विभाग उत्तानशिरा व दुसरा विभाग निम्नशिरा. ज्या फार खोल नसतां अमर्दी त्वचेच्या खालींच असतात त्या उत्तान व ज्या फार खोल व धमनीबरोबर असतात त्या निम्न ( डीप ).

## उत्तानशिरा.

हाताच्या बोटापासून बारीक बारीक शाखा एकमेकीस मिळतां मिळतां त्यांच्या तीन मोठ्या शिरा होतात. त्या प्रकोष्ठाच्या पुढल्या बाजूकडून वर कोंपराच्या खळगीकडे चढत येतात त्यांस प्रकोष्ठ दक्षिण शिरा, प्रकोष्ठोत्तरशिरा व प्रकोष्ठमध्यशिरा असें ह्मणतात.

५. **प्रकोष्ठ दक्षिणशिरा**( रेडियलव्हेन )ही प्रकोष्ठाच्या मागल्या अंगानें प्रथम वर चढते, मग सुमारें मध्यप्रदेशापर्यंत आली ह्मणजे प्रकोष्ठाच्या पुढल्या बाजूकडे वळते, नंतर त्याच्या उजव्या काठानें तशीच वर कोंपराच्या खळगीपर्यंत जाते, त्याच सुमारास तिला मध्यशिरेची एक शाखा येऊन मिळते, नंतर ही **भुजदक्षिणशिरा** ( किफालिकव्हेन ) हें नांव पावते. पुढें ही शीर बाहूच्या बाहेरील कांठाकडून वर चढते आणि जत्रूच्या खालीं जाऊन कक्षा-

शिरेंत मिळते

६. **प्रकोष्ठमध्यशिरा** ( मीडियनव्हेन ) ही प्रकोष्ठाच्या पुढील प्रदेशाच्या मध्यरेषेंतून वर चढत चढत कोपराच्या खळगीच्या सुमारास आली ह्मणजे तेथें तिच्या दोन शाखा होतात. एक शाखा दक्षिण-शिरेस मिळते व एक उत्तरशिरेस मिळते.

७. **प्रकोष्ठोत्तरशिरा** ( आंटीरियर अल्नर) ही प्रकोष्ठाच्या पुढील बाजूच्या डाव्या कांठावरून वर चढत जाऊन कोपराच्या पुढील खळगींत येते, तेथें तिला प्रकोष्ठप्रत्यक्शिरा येऊन मिळते. नंतर तिलाच भुजोत्तरशिरा ( बासिलिक ) हें नांव मिळतें.

८. **भुजोत्तरशिरा** ( बासिलिक ) बाहूच्या आंतील बाजूकडून वर चढत चढत खाकेंत जाते मग तेथें तिला कक्षाशिरा ( आक्झिलरीव्हेन ) ह्मणतात. भुजोत्तरशिरेस मध्यशिरेची एक शाखा येऊन मिळते.

९. **कक्षाशिरा** ( आक्झिलरी ) ही खाकेंतून आंतल्या बाजूस छातीकडे वळते आणि पहिल्या बरगडीच्या खालच्या कांठापर्यंत गेली ह्मणजे तेथें तिला अधोजत्रुशिरा हें नांव मिळतें. या कक्षाशिरेंत भुजधमनीबरोबर असणाऱ्या शिरा येऊन मिळतात. व खाकेंतील शिराही मिळतात.

१०. **अधोजत्रुशिरा**(सब्क्लेव्हियन)ही पहिल्या बरगडीला वळांडून जत्रूच्या खालून आंतल्या अंगास जाते.मग तिला अंतर्ग्रैवेयक शिर येऊन मिळेत. या दोहोंच्या संगमापासून झालेली जी शीर तिला अनमिक (इनॉमिनेट) असें ह्मणतात. ही शीर मानेच्या उजव्या बाजूस एक व डाव्या बाजूस एक असते. डाव्या बाजूची शीर उजवीकडच्या शिरेस मिळावयाकरितां येते व दोहोंचा संगम वक्षःस्थळाच्या मध्यरेषेच्या कांहींसा उजव्या बाजूस होतो, त्यामुळें डावी अनामिक शीर उजवीपेक्षां अधिक लांब असते. या दोन्ही शिरांचा संगम होऊन जी एक मोठी शीर तीच ऊर्ध्वमहच्छिरा ( सुपीरियरव्हीनाकेव्हा )

११. **ऊर्ध्वमहच्छिरा** ही वक्षःस्थळांतील महाधमनीच्या कमानी-

च्या उजव्या बाजूकडून खालीं उतरत उतरत हृदयाच्या दक्षिण विभागाच्या वरल्या अंगास येऊन मिळते. ही सुमारें तीन इंच लांब असते.

आतां पूर्वी सांगितलें आहे कीं, शरीरांत मोठ्या शिरा दोन-ऊर्ध्वमहच्छिरा व अधोमहच्छिरा. त्यांपैकीं पहिलीचें वर्णन झालें. आतां पुढें अधोमहच्छिरेचें वर्णन केलें आहे.

१२. **अधोमहच्छिरा** ही एक मोठी शीर पायांतील व कोष्ठांतील सूक्ष्म शिरा एकत्र मिळून झाली आहे. करितां प्रथम पायांतील शिरांविषयीं विचार करूं. पायाच्याही शिरांचे दोन विभाग करितां येतात- निम्न व उत्तान. निम्नशिरा पायांतील प्रत्येक धमनीबरोबर दोन दोन असतात त्यांस सहचरीशिरा ( व्हीनाकॉमिटीझ ) ह्मणतात. या शिरा जानुकक्षेंत एकत्र होतात व त्यांपासून एक मोठी शीर बनते तिला जानुकक्षशिरा ( पॉप्लिटियलव्हेन ). ह्मणतात हीच शीर पुढें मांडींतून सक्थिधमनीबरोबर वर चढते तेव्हां तिला **उर्वीशिरा** ( फीमरलव्हेन ) ह्मणतात.

१३. ही उर्वीशिरा वंक्षण संधीच्या वर जाऊनबस्तिप्रदेशाच्या कांठावरून जाते त्या स्थळीं तिला **बहिःश्रोणिशिरा** ( एक्स्टर्नल इलियाक ) असें ह्मणतात पायांतील रक्त वर आणणाऱ्या उत्तानशिरा ( सुपरफिशलव्हेन्स ) दोन आहेत एक बहिःशिरा व एक अंतःशिरा.

१४. **चरणबहिःशिरा** (एक्स्टर्नल साफिनस) ही पावलाच्या बाहेरल्या बाजूनें सुरू होते ती बाहेरील घोंट्याच्या मागल्या अंगानें पोटरीच्या मागील बाजूकडून वर जानुकक्षेपर्यंत चढत जाते आणि तेथें जानुकक्षशिरेस मिळते.

१५. **चरणांतःशिरा** ( इंटर्नलसाफिनस ) ही पावलाच्या अंगठ्यापासून सुरू होते ती पावलाच्या आंतील कांठावरून वर चढते, नंतर आंतील घोंट्याच्या पुढल्या बाजूनें व पोटरीच्या आंतल्या अंगानें वर चढत चढत मांडीच्या आंतील बाजूकडून वंक्षण संधीच्या किंचित् खालच्या प्रदेशापर्यंत जाऊन उर्वीशिरेस मिळते.

बस्तिप्रदेशांतील अवयवापासून निघालेल्या सर्व शिरा एकमे-

कीस मिळून त्यांपासून एक मोठी शीर बनते तिला अंतःश्रोणिशिरा ( इंटर्नल इलियाक) ह्मणतात. अंतश्रोणिशिरा व बहिःश्रोणिशिरा एकमेकीस मिळून जी शीर बनते तिला श्रोणिशिरा ( कॉमनइलियाकव्हेन ) असें ह्मणतात.

१६. **श्रोणिशिरा.**– उजव्या श्रोणीकडची एक व डाव्या श्रोणीकडची एक मिळून या दोन असतात. डावी उजवीपेक्षां कांहींशी लांब असते. या दोहोंचा संगम चौथ्या व पांचव्या कटिमण्याच्या मध्यें होतो, त्यांच्या संगमापासून झालेली जी एक मोठी शीर तिलाच अधोमहाच्छिरा ( इन्फीरियरव्हेनाकेव्हा ) अशी संज्ञा आहे.

१७. **अधोमहाच्छिरा** ही चौथ्या व पांचव्या कटिमण्याच्या मध्यस्थानापासून सुरू होते. ती पृष्ठवंशाच्या पुढील प्रदेशावरून आणि औदर धमनीच्या उजव्या बाजूनें वर चढत जाऊन यकृताच्या पश्चिमकांठांतील खांचणींतून वर जाते. पुढें मध्यपटलास वेध करून वक्षःस्थलांत शिरते. आणि हृदयाच्या उजव्या बाजूकडील वरच्या कप्यांत जाऊन मिळते. कंबरेपासून हृदयापर्यंत येई तों तिला पोटांतील सर्व अवयवांच्या शिरा येऊन मिळत जातात त्यामुळें ती जसजसी वर चढते तसतसा तिचा आकार मोठा होत जातो. कोष्ठांतील शिरांपैकीं एक शीर मोठी आहे तिला **कोष्ठशिरा** ( पोर्टलव्हेन ) असें ह्मणतात.

१८. **कोष्ठशिरा** ही शीर आमाशयशिरा, प्लीहशिरा, क्षुद्रांत्रशिरा व स्थूलांत्रशिरा या चार शिरा एकत्र मिळून झाली आहे. ही यकृतांत शिरते व त्या अवयवांत तिच्या अनेक सूक्ष्म शाखा होतात. नंतर त्या शाखा पुनः एकमेकीस मिळून यकृतावयवांतच त्यांची एक मोठी शीर बनते तिला **यकृच्छिरा** ( हिपाटिकव्हेन ) ह्मणतात. ही यकृच्छिरा अधोमहच्छिरेंत यकृताजवळच मिळते.

## नाडी ( पल्स. )

नाडीवरून हृदयाची स्थिति समजते व तदनुसार उपचार करितां येतात.

१८. जीर्ण रोगांत नाडी जलद झाली तर तें बहुशः हृदय अशक्त झाल्याचें चिन्ह होय. ह्याबरोबरच हृदय अशक्त झाल्याबद्दलचीं दुसरीं ही चिन्हें असतात. हृदय अशक्त झाल्यावर हृदयाकडून पूर्वी इतक्या जोरानें रक्तवाहिन्यांत रक्त ढकललें जात नाहीं. त्यामुळें त्याच्यांत रक्त कमी जाऊन त्यांचा तंगपणा कमी होतो आणि नाडी मृदु व दबणारी होते. नाड्या शिथिल असतील तर त्यांपासून नाडी विशेष दबणारी होते. कारण नाड्या शिथिल झाल्या असतां त्यांमध्यें रक्त फारवेळ न ठरतां शिरांत लवकर सरून जातें आणि त्यांचा तंगपणा पुष्कळ कमी होतो. आणखी त्यामुळें हृदय अतिशय अशक्त असेल तेवढा मात्र प्रसंग खेरीज करून बाकी सर्वदा नाडी मोठी व स्थूल अशी होते. अशा समयीं नाडी मोठी व स्थूल आहे एवढ्यावरून नाडीचा प्रवाह जोराचा असून हृदय बळकट आणि जोरानें आपलें काम करीत आहे असा चुकीचा समज होण्याचा संभव आहे. परंतु नाडीवर बोट ठेऊन तिच्या दबण्याची चांगली परीक्षा केली असतां तो भ्रम तेव्हांच दूर होतो. हृदय फार अशक्त होईल आणि नाड्या फार शिथिल होतील तर पाहिल्यानें नाडींत रक्तच कमी येतें आणि दुसऱ्यानें जेवढें येतें तेवढें सारें भराभर शिरांत जातें. ह्याप्रमाणें ह्या दोन कारणांनीं नाडी फार सूक्ष्म,तीव्र आणि फार दबणारी अशी होते. नाडी फार सूक्ष्म झाली तर अशक्तता जास्त झाल्याचें लक्षण होय. फार सूक्ष्म नाडी सुताएवढी बारीक हातास लागते, ह्मणून सुतासारखी किंवा सुताएवढी नाडी ह्मणतात. हृदय अशक्त झालें असल्यास त्याचा संकोच फार जलद व त्वरित होतो, त्यामुळें नाडी फार जलद होते. ह्यावरून नाडी जलद झाली तर ती बहुशः हृदय अशक्त झाल्याची खूण होय. आणि हिच्याबरोबर आणखी दुसऱ्या खात्रीच्या खुणा असल्यास हीस विशेष महत्व येतें. ह्याकरितां हृदयाची स्थिति

समजण्यासाठीं रोग्याच्या उष्णतेच्या मानानें नाडी कितपत जलद आहे, कितपत दबणारी आहे, आणि तिची आकृति केवढी आहे हें समजणें फार अवश्य आहे. ती फार जलद, फार दबणारी, आणि फार सूक्ष्म, अशी असेल तर हृदय फार अशक्त असते, आणि रोगी फार भयंकर अवस्थेंत असून त्यास उत्तेजक औषधांची जास्त जरूर असते.

मद्यार्क किंवा दुसरे उत्तेजक औषधें देण्याची अवश्यकता दाखविणारी नाडी.

१९. रोग्यास ताप असो किंवा ताप नसलेला आजार असो, त्याची नाडी याप्रकारची झाल्यास त्यास उत्तेजक औषधें दिलीं पाहिजेत- विशेषतः मद्यार्क दिला पाहिजे. तो किती दिला पाहिजे, आणि दिला असतां त्याचा कितपत उपयोग झाला हें नाडीवरून समजतें. मद्यार्क दिला असतां हृदयास जोर येतो, त्याचे ठोके सावकाश होतात, नाड्याही आकुंचित होतात आणि त्यामुळें त्यांचा तंगपणा जास्त होऊन त्यांचें दबणें कमी होतें.

२०. तीव्र किंवा जीर्ण रोगांत हृदय अशक्त झालें तर सर्वांगभर अशक्ततेचीं लक्षणें होतात. मात्र कांहीं थोड्या प्रसंगीं हीं लक्षणें झालेलीं दिसण्यांत येत नाहींत. एखादे वेळ तीव्र रोग झालेला रोगी असा आपल्या पाहण्यांत येतो. त्यावर अशक्ततेचीं चिन्हें मुळींच दिसत नाहींत. त्याचा ताप १०२–१०३ पर्यंत असतो. हातरुणांत ह्या बाजूवरून त्या बाजूवर तो वळतो आणि उठून बसूंही शकतो. त्याचा आवाज चांगला खणखणीत असतो. जिभेस ओलावा असतो आणि तीवर पिठी मुळींच नसते किंवा असलीच तर अगदीं थोडीशी असते. जेवण बरोबर असतें आणि खाल्लेलें अन्न चांगलें पचतेंसें दिसतें. झोप चांगली लागते. भ्रम मुळींच नसतो. सारांश, दिसण्यांत रोग्यास कोणत्याही प्रकारची भीति दिसत नाहीं, परंतु त्याच्या नाडीचे ठोके मिनिटांत १३० पर्यंत पडतात आणि ती फार सूक्ष्म, दबणारी व जलद अशी असते आणि ती चित्तक्षोभापासून जलद झालेली नाहीं अशी वारंवार तपासून आपली खात्री होते. हा रोगी दि-

सण्यांत निर्भय दिसतो खरा, परंतु त्याची स्थिति खास फार भयंकर असते. अशासमयीं रोग्याच्या दिसण्यास महत्त्व देऊं नये; तर भयाची आधीं सूचना देणाऱ्या नाडीस महत्त्व दिलें पाहिजे हें उघड आहे. कारण, अशा रोग्यास वाईट लक्षणें तेव्हांच होतात आणि तो जास्त जास्त थकूं लागतो. दुसरें उदाहरण असें- एखाद्या तापाच्या रोग्यास पहिल्यानें वाईट लक्षणें मुळींच नसतात, कांहीं दिवस गेल्यावर त्याची दिसण्यांत साधारण स्थिति बरी दिसते, परंतु त्याची नाडी जलद व क्षीण झालेली असते. अशा प्रसंगीं नाडीच्याच अनुरोधानें वागलें पाहिजे. कारण, पुढें रोगी फार थकेल असें अनुमान तीवरून बरेंच आधीं करितां येतें.

---

## ज्वर.

**लेखकः—** डा. विष्णुपंत भागवत एल्. एम्. ॲन्ड एस्.

आपल्या शरीराला ज्या कांहीं व्याधि होतात त्यांपैकीं कांहीं शरीरांतील इंद्रियांचे व्यापार अनियमित झाल्यामुळें उत्पन्न होतात व कांहीं त्या इंद्रियांचे व्यापार नियमित असून फक्त ते चालू राहण्यास दुसराच एखादा बाह्य किंवा अप्रकृत वस्तूचा अडथळा येऊन उत्पन्न होतात. पहिल्या वर्गामध्यें ज्वराचा समावेश होतो. तो कसा हें पुढील विवेचनावरून सहज ध्यानांत येईल.

ज्वर ह्मणजे शरीराच्या उष्णतेचें मान वाजवीपेक्षां जास्त वाढणें; तें वाढण्याचें कारण आणि त्यापासून होणारे परिणाम इतक्या गोष्टींचा ज्वर या शब्दांत समावेश होतो.

शरीराची उष्णता निरोगी असतां मोठ्या मनुष्यामध्यें ९८.४ पासून ९९.५ डिग्री (F) असते, आणि लहान मुलांत यापेक्षां जरा अधिक असते. तथापि ती दिवसांतून चार पांचदां थोडी थोडी बदलत असते. ती रात्रीं दीड वाजल्यापासून सकाळीं ७॥ वाजेपर्यंत बरीच कमी असते व संध्याकाळचे चार वाजल्यापासून रात्रीं नऊ वाजेपर्यंत

बरीच जास्त असते. तथापि ९९.५ डिग्रींपेक्षां कांहीं जास्त नसते. सकाळेच ७॥ पासून दुपारचे ४ वाजेपर्यंत हळू हळू उष्णता वाढत जाते व रात्रींचे ९ वाजल्यापासून रात्रींचे बारांवर १॥ वाजेपर्यंत उष्णता कमी होत जाते. या उष्णेतच्या फेरफाराबरोबर श्वासोच्छ्वास व रुधिराभिसरण हीं कमी जास्त जोरानें चालत असतात.

उष्णता वाढण्याचें दुसरें एक कारण म्हटलें ह्मणजे पचनक्रिया ही होय; व तिसरें कारण व्यायाम आणि चवथें हवेंतील उष्णता हीं होत. हवा अति उष्ण झाली असून तिचें चलनवलन अति जोरानें चाललें असल्यास आपली उष्णता वाढते व हवा अति थंड असून तिचें चलनवलन कमी चाललें असल्यास शरीराची उष्णता कमीही होते.

तसेंच जेव्हां घाम येण्यास कोणत्याही कारणानें ( सर्द हवेनें किंवा थंड पाण्यांत बसल्यानें ) प्रतिबंध होतो, तेव्हां उष्णतेचे वाईट वाईट परिणाम अधिक असह्य होऊं लागतात.

मोठमोठ्या विद्वान् डाक्टर लोकांनीं असें शोधून काढिलें आहे कीं, आपल्या शरीरांतील उष्णता आपण जें कांहीं खातों त्याचें पचन होत असतांना आणि त्यापासून होणारें रक्त, मांस, मज्जा, वगैरे बनत असतांना उत्पन्न होते. ती उष्णता २४ तासांत इतकी उत्पन्न होते कीं, तिच्यायोगानें सुमारें २२ शेर थंडगार पाण्यास खळखळ अधण येईल. इतकी उष्णता आपल्या शरीरांत उत्पन्न होऊन तशीच तेथें राहिली तर आपण जळूनसुद्धां जाऊं-निदान आपलें शरीर शिजून जाईल. तर इतक्या उष्णतेचा विनियोग होतो तरी कसा? ती आपल्या शरीरांतून २४ तासांत घामाच्या रूपानें, उच्छ्वासांतील वाफेच्या रूपानें उष्णमूत्राच्या रूपानें, तसेंच उष्णमलाच्या रूपानें बऱ्याच अंशीं बाहेर निघून जाते, बाकी ९८° पासून ९९° फॅरेनहीट उष्णता आपल्या शरीरांत कायम राहते.

आतां वाफेच्या यंत्रास काम चालविण्यास जशी उष्णता अत्यवश्यक आहे तशीच शारीरिक क्रिया चालविण्यास आपल्या देहाला

ती अवश्यक आहे; आणि ही उष्णता आपल्या शरीरांत आक्सिजन वायूची दुसऱ्या पदार्थावर ( मांस, रक्त वगैरेंवर ) रासायनिक क्रिया घडून उत्पन्न होत असते. आणि कोणत्याही भागाची वाढ झाली असतां, कोणतीही मानसिक क्रिया चालली असतां व प्रत्येक स्नायूंच्या आकुंचनाबरोबर ही उष्णता थोडीशी कमी होते आणि सदहू क्रियांपैकीं एखाद्या क्रियेला अडथळा आला असतां किंवा दुसऱ्या कोणत्याही क्रियेनें बंद पडली असेल तर तीच कमी झालेली उष्णता पुनर्गोचर होते ( अधिक उत्पन्न होते ).

आतां आपल्या शरीरांत उष्णता उत्पन्न होते कशी व ती अमुक प्रमाणानें शरीरांत राहते कशी याचें वर थोडक्यांत दिग्दर्शन केलेंच आहे. परंतु त्याबद्दल आणखी थोडीशी जास्त माहिती देणें अप्रस्तुत होणार नाहीं ह्मणून थोडक्यांत खालीं देतों.

पहिला प्रश्न शरीरांत उष्णता उत्पन्न होते कशी? आपल्या निरानिराळ्या इंद्रियांतील घटकावयवांचें लघुकरण किंवा त्यांचा ऱ्हास होऊन जी उष्णता उत्पन्न होते ती केवळ रासायनिक क्रियेचा परिणाम आहे, असें जरी आहे तरी ती अप्रत्यक्ष रीतीनें मज्जेवर व विशेषतः तींतील अन्योन्यसंवेदन कोशावर ( सिंप्याथिटिक सिस्टिम ) अवलंबून असते; कारण, या कोशाच्याच द्वारें हृदयाचा संकोच, व त्याची गति हीं कमीजास्त होत असतात, तसेंच नाडीचे ठोके कमी जास्त जोरानें पडत असतात व तसेंच अंगांतील दुसरे रस-लाळ, जठररस, वगैरे- कमी जास्त उत्पन्न होतात.

आपल्या शरीराची उष्णता नेहमीं, सारखी राहण्याचेंही प्रत्यक्ष कारण जरी शरीरांतून उत्पन्न होणारी उष्णता व त्यांतून मल, मूत्र, उच्छ्वास, घाम यारूपानें बाहेर जाणारी उष्णता या दोहोंमध्यें जी एक विलक्षण एकीकरणशक्ति असते ती आहे, तरी या वरील सर्व क्रिया ( मलमूत्रादि ) मुख्यत्वें मेंदूवरच अवलंबून असतात. शरीराच्या उष्णतेचें समीकरण रुधिराभिसरणाला अनुसरून असते, म्हणजे जितकें तें जलद चालेल तितकें आपल्या त्वचेचे उष्णतेचें मान शरी-

रांतील इंद्रियांच्या उष्णतेइतकें होतें आणि ह्मणून एकसमयावच्छेदें-करून तितकेंच जलद सर्वांग गारही होतें. आतां दुसऱ्यापक्षीं जितकें मंद रुधिराभिसरण होईल आणि त्यामुळें जितकें जितकें अधिक आपलें अंग गार होतें तितकी तितकी आपल्या त्वचेची उष्णता व आपल्या श-रीरांतील इंद्रियांची ( जठर प्लिहादि ) उष्णता यांमधील अंतर अधिक वाढत जातें आणि ह्मणून त्याच मानानें अधिक हळू हळू आंतील इंद्रियांची उष्णता कमी कमी होऊं लागते.

---

## स्फुट लेख.

**दांत काढल्यावर रक्त वाहते त्यावर उपाय.—** दांत चिमट्यानें ओढून काढल्यावर थोडें बहुत रक्त मागून वाहतेंच, पण तें बहुधा थंड पाण्याच्या दोन चार वेळां गुळण्या करितांच बंद होतें. तथापि क्वचित् तें रक्त सारखें वाहतच राहून कांहीं केल्या बंद होत नाहीं, तेव्हां मृदु ओले चिरगुटाचा लहानसा बोळा करून तो रक्त येत असल्या ठिकाणीं दाबून धरावा; व दुसरा लहानसा बोळा ( दांताचे खळग्यांत मावेल येवढा ) घेऊन तो टरपेन तेलांत भिजवून पहिला बोळा काढून त्या खळग्यांत दाबून हातानें अथवा दाभणासारख्या पण बोथट सळईनें बसवावा व रोग्यास दांत मिटून कांहींवेळ बसण्यास सांगावें. ह्मणजे लौकरच रक्त गोठून वाहण्याचें बंद होतें. हा उपाय एरवीं दांतावांचून रक्त वाहतें त्यास सुद्धां उपयोगीं पडतो.

---

## कृष्णशास्त्री त्रिवलकर वैद्य मु॰ आंजर्ले ता॰ दापोली जि॰ रत्नागिरी यांचीं जगत्प्रसिद्ध, सर्वोपयोगी, निर्दोष व रामबाण औषधें.

या जाहिरातीचे खालीं "विशेष सूचना" केली आहे ती वाचकांच्या अवश्य लक्ष्यांत असावी.

### १. वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साह- बुद्धि कांतिवर्धक व धातुपौष्टिक, सुवर्णमाक्षिक-मौक्तिक- कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१ शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें त्यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्व भागीं व त्याच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, कोणत्याही कारणांनीं आलेली अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, उन्हाळे, छातींतील रोग, मस्तकशूळ, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूळव्याधि, भगंदर, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूळ, कटिवात, वातरोग, निद्रानाश, चक्कर, कफातिरेक, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, सूतिकारोग, व्रण, हात, पाय, मूत्रमार्ग व शरीर यांचा दाह, ठणका, ग्लानि, अरुचि, मत्राश्मरी व चित्तभ्रम इत्यादि अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले, नवीन किंवा जुनाट असले तरी अगदीं खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति, व बुद्धि हीं वाढतात. ज्यांस फिरण्याचे, अभ्यास करण्याचे लिहिण्याचे व शिकविण्याचे श्रम फार पडतात त्या सर्वांच्या अंगीं यांणीं

अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो व सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें. कोष्ठशुद्धि होते. कोष्टांतील अनियमित व्यापारांपासून होणारे दुष्ट परिणाम टळतात. या अप्रतिम गुटिका अत्यंत उपयुक्त शोधानें केल्या असून यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें आहेत, सबब जास्त वर्णन येथें करीत नाहीं. यांत अपायकारक पदार्थ बिलकुल नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस या अत्यंत उपयोगी आहेत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषध नाहींच असें स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात, यामुळें यांचा अतिशय खप सुरू आहे. हल्लीं या गोळ्यांत अंतर्वेदी, नेपाळ, काश्मीर इ० देशांतील अत्यंत शुद्ध, ताजे, महत्वाचे व मौल्यवान असे अनेक पदार्थ आणखी घालून त्यांची विशेष सुधारणा केली आहे आणि लोकाग्रहावरून केवळ परोपकारार्थ ह्मणून गोळ्यांचा दर फारच स्वस्ता केला आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व ट. खर्च माफ आहे. अनुपान ख० सोबत देऊं. एकदम १६ गोळ्यांस १ रु., ३६ गो० २ रु., ८० गो० ४ रु., व १३० गो० ६ रु.

## ३. थंडगार नेत्रांजन.

हें परम गुणकारक अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे तिमिरांध्य,वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भार, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंडू, फूट, चिकटा, ठणका, व लाली, इ. अनेक विकार तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यांस कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा बिलकूल न होतां बरे होतात.

दृष्टि तीव्र व थंडगार राहते. शिवाय जागरण, उन्हांत फिरणें

अग्नीचा शेक, उपदंशविकार, अतिवाचन, अतिव्यायाम, अतिमैथुन, अतिमद्यपान, अत्युष्ण व विदाही पदार्थ भक्षण, इ० कारणांनीं ज्यांचे डोळे बिघडतात त्यांस याचा फारच मोठा उपयोग आहे. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार बिलकुल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रु०

## ४. कर्णस्रावनाशक अप्रतिम तैल.

हें उत्तम तेल कानांत घातल्यानें कानांतून पू वाहणें, तत्संबंधीं टणका, कंडू, दाह, रक्तस्राव, इ. विकार तत्काळ बरे होतात. कानांतील कोणत्याही प्रकारचे साधारण व्रण तर तत्काळच, परंतु कानाचा समूळ नाश करणारे जुनाट किंवा हाडीं खिळून बसलेले कितीही वयाचे मनुष्याचे व कोणत्याही कारणानें प्राप्त झालेले अनेक प्रकारचे असाध्य व्रण कोणतीही इजा किंवा आग वगैरे बिलकुल न होतां अगदीं खात्रीनें बरे होतात. बाटलीस रु० १ शिवाय प्या० ख० दोन आणे. रोखीनें किंवा व्हॉ. पे. पार्सलनें खालील पत्यावर मागविल्यास पाठवूं. अनुपान खर्च बाटलीसोबत.

**५. पर्म्यावर अपूर्व मिश्रण.**—कोणत्याही प्रकारचा नवीन किंवा जुनाट पर्मा, तत्संबंधी दाह, तिडीक, मूत्राची विवर्णता, संकोच किंवा मूत्रातिरेक इ. विकारांसह या मिश्रणापासून इजा बिलकुल न होतां व पथ्यसेवनाची खटपट नसतां तावडतोब बरा होतो. पर्म्यावर इतकें प्रतिष्ठेचें औषध दुसरें नाहींच. बा. १ रु.

**६. दंतरक्षक पूड.**— ही चोळिल्यानें दंतसंबंधी सर्व विकार हिरड्यांचा रक्तस्राव व व्रण, पू, कीड इ. फारच त्वरित व नाजूक रीतीनें बरे होऊन दांत स्वच्छ व फार मजबूत होतात. ड. ६ आणे.

७. गजकर्ण, नायटे, खरूज इ. विकार ३ दिवसांत बरे होतात. ड. ६ आणे.

८. विंचवाचें विष हें औषध लावतांच उतरतें. ड. ८ आणे. इतकें औषध ४० मनुष्यांस पुरतें.

वरील औषधें अत्यंत खात्रीचीं आहेत. त्यांणीं हजारों लोकांस गुण आला व नित्य येत आहे. अनुभवानंतर पक्की खात्री होईलच. याशिवाय आमच्या येथें कस्तूरीच्या उत्तम कातगोळ्या, तमाखूच्या अर्काच्या कस्तूरीमिश्र गोळ्या, उत्तम सुगंधी अत्तरें व ग्रंथोक्त रसायनें, धातूंचीं भस्में, पाक, तैलें, चूर्णें, गोळ्या, घृतें, आसवें, द्राव, क्षार हेमगर्भादि रसायनें इ. औषधें माफक किंमतीस मिळतील. पाहाण्यासाठीं सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. अनुपान पत्रक औषधासोबत पाठवूं. पत्ता सुवाच्य. कोणीं प्रकृतिमान कळविल्यास रोगाचें निदान व योग्य चिकित्सा कळवूं. औषधें रोखीनें किंवा व्ही. पी. नें विकत मिळतील. टपालखर्च वेगळा पडेल. गरीब लोकांस स्वस्त दरानें औषधें देऊं. जाहिरातीच्या खालील किंवा वरील पत्यावर मिळतील. या औषधांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून त्यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळविल्या आहेत व नित्य मिळत आहेत.

**विशेष सूचनाः—** आलीकडे वर्तमानपत्रांतून आंजर्लें व नजीकच्या मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या नवीन बऱ्याच जाहिराती सुरू झाल्या आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींच्या खालीं किंवा वर ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या ग्राहकांस भासण्याचा संभव आहे, यामुळें कदाचित् ग्राहकांचा घोंटाळा होईल. तरी अशा लोकांशीं व त्यांच्या जाहिरातींशीं आमचा कोणत्याही प्रकारें अगदीं संबंध नाहीं हें ग्राहकांनीं अवश्य लक्षांत ठेऊन, आमचीं औषधें मागणें तीं "**कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य मु० आंजर्लें ता० दापोली जि० रत्नागिरी**" या अगदीं बिनचूक सही व पत्यावर मागवावींत.

**कृष्णशास्त्री बिवलकर.**

**पत्ता**— मु० आंजर्लें, ता० दापोली, जिल्हा रत्नागिरी.

रु. १ व बं. खर्च .॥.

**बालसंजीवन.**— किं. रु. १ ट. व बं. खर्च .॥.

**कर्णरोगावर थेंब.**— किं. .॥. ट. व बं. खर्च .॥.

**दांतांचें मंजन.**— किं. ।. ट. व बं. खर्च ३ डब्यांपर्यंत .॥.

**केशवर्धक तेल.**— किं. रु. १ ट. व बं. ख. .॥.

**जुलाबाच्या गोळ्या.**— किं. ।≈ ट. व बं. ख. .।≡

**अन्नपाचक गोळ्या**— किं. .॥. ट. व बं. ख. .।≡

**मुलांचे ताड्यावर.**— ( आंकडीवर )रामबाण— किं. रु.३ व रु. २ ट. व बं. ख. .॥.

**केंस जाण्याचें औषध.**— किं. रु. १ ट. व बं. ख. .॥. हें पाण्यांत भिजवून लेप करून खरवडल्यास तात्काळ केंस जातात.

**बाळंतपणावर अर्क.**— हें सतत घेतलें असतां बाळंतरोग. साफ बरा होतो. किं. रु. ४ ट. व बं. ख. रु. २॥

**मुद्दाम उन्हाळ्याकारितां.**— थंडगार. हुषारी, आणणारी व ऊत येणारी सर्बतची भुकणी, किं. रु. १ ट. व बं. ख. रु. १८

इंग्रजी डाक्तरांकारितां लागणारीं औषधें विलायतेहून आणविलीं आहेत. त्यांचा क्याटलागही अर्ध्या आण्याचें टिकिट पाठवून मागवा.

**वैद्य गोपीनाथ कृष्णाजी क्षात्रिय.**

१ ली सदाशिवजीची गल्ली, गिरगांव पोस्ट आफिसाचे समोरचे गल्लींत, मुंबई.

---

## महामारी

हें प्रत्येक कुटुंबांत ठेवण्यायोग्य पुस्तक असून, विशेषतः जेथें चांगल्या वैद्याची मदत नाहीं अशा गांवांत सांथीचे दिवसांत तर फारच उपयोगी आहे. ह्यामधील उपाय अगदीं साधे व पाहिजे तेथें करतां येण्याजोगे आहेत. ह्या पुस्तकावर डा. भालचंद्र, डा. विश्राम, वगैरे विद्वान लोकांचे व वर्तमानपत्रकर्त्यांचे फार चांगले अभिप्राय आले आहेत. पुस्तकाची किंमत ८१० आहे. मुद्दाम टपालहंशील माफ केलें आहे.

**म्यानेजर भिषग्विलास,**

डा. रानडे यांचा दवाखाना, सोलापूर.

# जी. बी. नाईक कंपनीच्या

## विजेच्या आंगठ्या, कडीं, लेखण्या व गळपट्टे.


प्रत्येक वस्तूवर G. B. N. मार्क पाहून घेत जा.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

## रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे.




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग, अशक्तपणा, संधिवायु, शिरोगतवायु, पोटांत वायु धरणें, कंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे, काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धशिशी, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें, गळा सुजणें-सर्व प्रकारच्या मूळव्याधी, पाठींतील अशक्तता, निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे गळपट्टा- लहान मुलांचे दंतोत्पत्तीसमयीं होणारे रोग शमन होऊन सुखें निर्विघ्नपणानें निघतात. लेखणी-हातास कांपरें व स्मरणशक्ति. अशा ह्या उत्तम गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

## विजेच्या वस्तूंची किंमत

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु. १। | धातूचें कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपट्टा किं. रु. १॥ |

कमरपट्टा किंमत रु० ६.

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्हा.पी.पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठीकरितां बोटाचें माप पाठवांत असावें पत्ता स्पष्ट असावा. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे. बंगी करणावळ माफ.

**जी. बी. नाईक आणि कंपनी.**

मुंबई, भायखळा, जुन्या दावणीसमोर; व पुणें, बुधवारपेठ.

पत्ता.—डा० रानडे यांचा दवाखाना, सोलापूर.

# भिषग्विलास.

BHISHAGVILASA.

वैद्यकसंबंधी अनेक विषयांचें सुबोध भाषेत
मासिक पुस्तक.

A Monthly Magazine in Marathi
to popularise Medicine.

आयुःकामयमानेन धर्मार्थसुखसाधनं ॥
आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः ॥ १ ॥

पुस्तक ४. दिसेंबर १८९५ अंक ९

विषयानुक्रम. पान.

चित्ताकर्षणशास्त्र अथवा मोहिनीविद्या .... .... १३७
शरीररचना .... .... .... .... १४१
ज्वर .... .... .... .... .... १४४
उपयुक्त औषधी संग्रह .... .... .... १४८
स्फुट लेख.... .... .... .... .... १५१

सोलापूर

आनंदवृत्त छापखान्यांत छापिला.

वर्षाची अ.ग.ऊ वर्गणी ट. ह सह ३ रु.

## THE MEDICAL ASSOCIATION OF INDIA.

AT the nsual monthly meeting of thh above Association, held at No. 165 Bazar Street, on the 29 th Novomber, the following resolutions which were passed by the Executive Committee, in connection with the Coates Memorial Fund, were confirmed.

1. Resolled that the time has arrived for giving effect to the object of the Coates Memorial Fund, *viz.* the opening of a College of Medicine for English and Vernacular classes.

2. Resolued that the Memorial be named the " Coates Memoriol College of Physicians and Surgeons of Bengal. "

3. That the Paesident and Honorary--Treasurer be authorisod to secure a building on a monthly rental not exceeding Rs. ioo, and to take such further steps which they think necessary to give effect to the object in view.

4. That Dr. Juggobundo Bose, M. D., F. C. U., President of the Association be the President of the Cllege,and that Dr. Lawrence Fernandez, M. D., L. R. C. P. and S. E., Editor of the *Iandian Lancet* be the Secretary of the College.

( The College premises are No 165 Bow Bazar Street lolrtter. Further information regarding rules of admission and College courses, fees, etc., may be obtained on application to the Secretary, Dr. L. Fernandez, 5 Royd Street. )

---

**आभारपूर्वक स्वीकार–उदेपूरचा महाराणा प्रतापसिंह** हें नाटक त्याचे कर्त्यांकडून आमचेकडे अभिप्रायार्थ आलें आहे. त्यावर सवडीनुसार वाचनानंतर अभिप्राय देण्यांत येईल. येत्या वर्षाची **निरणयसागर छापखान्याची रोजनिशी**.– त्याचे मालकाकडून आली तिचा आम्ही मोठ्या आनंदानें स्वीकार करतों. डायरी सालाबादप्रमाणें सुंदर टाईपानीं छापलेली, चांगल्या कापडानें बांधलेली व अवश्य अशा उपयुक्त माहितीनें भरलेली आहे, ह्या डायरीची सर्वांस आज पुष्कळ वर्षे ओळख असल्यामुळें तिच्याविषयीं अधिक लिहिण्याची मुळींच जरूर नाहीं. दुसरी डायरी जी. व्ही. **पटवर्धन यांची** ( वसई जिल्हा ठाणें येथील बुकसेलर व स्टेशनर ) आली आहे. तींत **श्री शिवाजी महाराजांची** प्रथम तसबीर दिली आहे. पोष्ट,

# भिषग्विलास.

पुस्तक ४ डिसेंबर १८९५. अंक ९

## शरीररचना.

### रसवाहिनी विचार ( लिम्फाटिकव्हेसल्स )

लेखक— डा० कृ० राव गडबोले.

१.धमनी अथवा शिरा यांतून शरीरांतील मांसादिकांमध्यें पाझरणारा जो रक्तांतील द्रव, तो शोषून घेऊन पुनः रक्तांत नेऊन पोंहोचविणाऱ्या ज्या वाहिन्या, त्यांस रसवाहिन्या ह्मणतात, या शिरांप्रमाणेंच कांहीं उत्तान व कांहीं निम्न असतात. उत्तान वाहिन्या निम्न वाहिन्यांस मिळतात. या वाहिन्यांचाही प्रसार सर्व शरीरभर आहे. इतर वाहिन्यापेक्षां यांच्यामध्यें एक विशेष व्यवस्था आहे, ती अशी कीं, या वाहिन्यांच्या शाखा आसपासचा द्रव शोषून एक प्रकारच्या पिंडांत येऊन मिळतात. या पिंडास **गंड** ( लिम्फाटिकग्लँड ) अशी संज्ञा आहे. हे गंड शरीरांत अनेक आहेत, परंतु काखेंत, मानेंत, जांगाडांत अथवा वंक्षणसंधींत पुष्कळच आहेत. काखेंत चाचपून पाहिलें असतां गुठळ्या गुठळ्या हातास लागतात त्या यांच्याच होत. मानेंत गंडमाळांचा वगैरे विकार होतो तो याच गांठींत होतो. हातास किंवा पायांस कांहीं दुखापत झाली किंवा खरूज झाली तर या गांठी सुजतात, त्यांस बाधाणें किंवा अवधाणें ह्मणतात. तेव्हां याप्रमाणें शरीरांत जागोजाग रसधातु क्षमविण्याचे हे ग्रंथिरूपी खजिनेच आहेत. खजिन्यांत जमलेला द्रव या खजिन्यांतून त्या खजिन्यांत नेण्याकरितां मध्यें रसवाहिनी असते, ती एका गांठीपासून सुरू होते ती दुसऱ्या गांठीस जाऊन मिळते. पुनः त्या गांठीपासून दुसरी एक निघते ती तिसऱ्या गांठीस जाऊन मिळते. याप्रमाणें शरीरांत या गांठींची जशी काय माळच झालेली असते. अशा प्रकारें माळ होतां होतां शेवटीं तिजपासून दोन मोठ्या रसवाहिन्या बनतात, त्यांचीं नांवें **दक्षिणरसवाहिनी**

आणि **वामरसवाहिनी** अशीं आहेत.

२. **दक्षिणरसवाहिनी** ( डक्टसलिंफॉटिकस्डेक्स्टर ) मस्तक, मान, वक्षःस्थळ यांच्या उजव्या बाजूकडील रसवाहिन्या व उजवा हात व फुप्फुस व यकृत् यांच्या रसवाहिन्या एकत्र मिळून ही एक मोठी रसवाहिनी बनते. ह्मणून ही वामरसवाहिनीपेक्षां फारच आंखूड असते. हिला दक्षिणरसवाहिनी असें ह्मणतात. ही दक्षिणअधोजत्रुशिरा व दक्षिणअंतर्ग्रैवेयक यांच्या संगमस्थानीं अनामिक शिरेंत मिळते, त्या शिरेंतील रक्त, रसवाहिनींत येऊं नये, ह्मणून रसवाहिनीच्या तोंडाशीं दोन अर्धचंद्राकृति पडदे असतात.

३. **वामरसवाहिनी** (थोरॉसिक्टक्ट) ही पोटांत औदरधमनी व अधोमहाच्छिरा यांच्या मागें दोहोंच्या मध्यभागीं असते. ती पृष्ठवंशाच्या पुढील बाजूकडून वर चढून मध्यपटलांत,जें महाधमनीकरितां छिद्र आहे, त्यांतून वर वक्षःस्थळांत चढून मानेच्या डाव्या बाजूपर्यंत जाऊन वाम अधोजत्रुशिरा व अंतर्ग्रैवेयक यांच्या संगमस्थानीं जाऊन मिळते. तिची लांबी सुमारें अठरा किंवा वीस इंच असते. कंबरेंतील दुसऱ्या मणक्याच्या सुमारास ही वाहिनी प्रथम सुरू होते, तेथें ही बरीच मोठी असून त्रिकोणाकृति असते, ह्मणून त्या भागास **रसाशय** ( रिसेप्टॉकुयुलं कायलाय ) ह्मणतात. पुढें ही जसजशी पृष्ठवंशाच्या पुढल्या अंगानें वर चढत जाते तसतशी बारीक होते. आणि संगम होणें पूर्वी पुनः किंचित् मोठी होते. वक्षःस्थळाच्या मध्यभागीं ही कधीं कधीं दुभागून पुनः एकवट होते. ही प्रथम पृष्ठवंशाच्या उजव्या बाजूनें वर चढते, परंतु चौथ्या पृष्ठमण्याच्या पुढें आली ह्मणजे डाव्या बाजूस वळते. हिचा रंग किंचित् पिवळट असतो. हिचा आकार मोठ्याशा दाभणाएवढा असतो. या वाहिनींत मस्तक, मान, हृदय, वक्षःस्थळ यांच्या डाव्या भागांतील रसवाहिन्या व डावा हात, डावा फुप्फूस, अन्ननलिका श्वासनलिका, अंत्र यांच्या रसवाहिन्या मिळतात. व हिच्या आरंभीं रसाशय आहे त्यांत दोहों पायांकडील रसवाहिन्या मिळतात. पूर्वी सांगितलें आहे कीं, रसवाहिन्या, रक्तांतून पाझरलेलाद्रव वाहून नेऊन

परत रक्तांत मिळवितात. तथापि जठराच्या व क्षुद्रांभाच्या ज्या रसवाहिन्या आहेत त्या आणखी एक दुसरें कार्य करितात, तें असें कीं, अन्न जेव्हां पोटांत जाऊन पचूं लागतें तेव्हां त्या वाहिन्या अन्नांतील एक दुधासारखा रस शोषून घेऊन वामरसवाहिनींत नेऊन पोंहचवितात. ह्मणून यांस **अन्नरसवाहिन्या** ( लॉक्टील्स ) अशी विशेष संज्ञा आहे.

## प्राणवाहिनी विचार.

१. आपण तोंडानें अथवा नाकानें घेतलेला श्वास ह्मणजे प्राणवायु ज्या नळींतून खालीं छातींत उतरून पुढें फुप्फुसांत शिरतो, तीस श्वासनलिका अथवा **प्राणवाहिनी** अशी संज्ञा आहे. या नळीचे स्थानपरत्वें चार विभाग केले आहेत. त्यांचें वर्णन येणेंप्रमाणें:—

२. अगदीं वरील जो विभाग त्यास **काकल** (लारिंग्झ) ह्मणतात व दुसऱ्या विभागास **कंठनाडी** ( ट्रकिया ) ह्मणतात, तिसऱ्या विभागास **अपस्तंभ** ह्मणतात, व चौथ्या विभागास फुप्फुसनलिका असें ह्मणतात. **काकल** अथवा **स्वरेंद्रिय** हें गळ्यामध्यें जिभेच्या गड्ड्यापासून सुरू होतें तें कंठाच्या पुढल्या बाजूगें मध्यरेषेंतून खालीं उतरतें. कंठनाडीपर्यंत हें नऊ तरुणास्थीच्या योगानें बनलेलें असतें. या तरुणास्थीमध्यें सर्वांत मोठें एक तरुणास्थि असतें तें गळ्यांत मध्यभागीं बरेंच पुढें दृष्टीस पडतें हें हाड स्त्रियांपेक्षां पुरुषाच्या गळ्यांत विशेष व्यक्त दिसतें व बाल्यावस्थेपेक्षां तारुण्यावस्थेंत जास्त स्पष्ट होतें, यास कोणीं **कंठमणी** [ पोमम् आडमाय ] असें ह्मणतात. दुसरें एक तरुणास्थि अंगठी सारखें असतें, तें पुढल्या अंगास अरुंद व मागल्या अंगास रुंदट असें असतें. यास **वलयास्थि** [ क्रिकॉइड ] असें ह्मणतात. श्वासनलिकेच्या अगदीं आरंभीं पुढल्या अंगास एक पातळ तरुणास्थींचें पटल असतें त्यास **अंतर्जिव्हा** ( एपिग्लॅाटिस ) असें ह्मणतात. घास गिळण्याच्या वेळीं श्वासनलिकेचा कांहीं भाग हें झांकतें. हें श्वासनलिकेचें तिसरें तरुणास्थि सांगितलें. याखेरीज बाकी सहा राहिलीं. त्यांच्या तीन जोड्या आहेत, त्यापैकीं एका जोडीस **त्रिकोण** ( आरिटिनाईट ) असें ह्मणतात. दुसरीस स्वरस्नायुधर ( कॉर्निक्युला ) व तिसरीस

पीतवर्ण ( क्युनिआफॉर्म ) असें ह्मणतात. कांहीं गिळूं लागलें असतां हा अवयव वर चढतो तो बाहेरूनही दिसतो व गळ्यावर हात ठेवून आंवढा गिळला असतां हा अवयव वर चढल्याचा भास हातासही होतो. काकलाचें आंतील अंग श्लेष्मलत्वचेनें मढविलेलें असतें व स्वर उत्पन्न होण्याकरिनां काकलाच्या अंगास सूक्ष्म पडद्यांची रचना असते.

**कंठनाडी ( ट्रकिया )**

३.कंठनाडी हा श्वासनलिकेचा दुसरा विभाग. हा काकलापासून सुरू होतो तो गळ्याच्या मध्य भागांतून खालीं छातींत उतरतो व तिसऱ्या पृष्ठमण्याच्या सुमारास त्याचे दोन विभाग होतात. ही नळी सुमारें चार पांच इंच लांब असते. हिची घटना पुढल्या अंगानें अर्धचंद्राकृति मृदु अस्थींनी झालेली असते, आणि हिचा मागील कांहीं भाग चर्ममय असतो व तिचें आंतील अंग श्लेष्मलत्वचेनें मढविलेलें असतें. कंठनाडीच्या मागल्या अंगास अन्ननलिका असते.

**अपस्तंभ ( ब्रॉंकस )**

४. कंठनाडीचे पुढें छातींत दोन विभाग होतात त्यांत अपस्तंभ ह्मणतात. त्यापैकीं उजव्या बाजूचा जो विभाग तो दाक्षिण फुप्फुसास जाऊन मिळतो व डाव्या बाजूचा तो वाम फुप्फुसास मिळतो. पुढें प्रत्येक नलिकेच्या दोन दोन शाखा, त्या शाखेच्या पुनः दोन शाखा. अशा शाखा, प्रति शाखा होतां होतां त्यांचें अगदीं जाळेंच होऊन जातें, हा चौथा विभाग होय. या जाळ्याच्या योगानेंच फुप्फुस हे अवयव बहुतेक अंशीं बनलेले असतात. ( पुढें चालू. )

---

## ज्वर.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

**लेणकः**— डा. विष्णुपंत भागवत एल. एन्ड. एस.

शरीरांत ज्वरावस्थेचीं जीं नानाविध लक्षणें दिसून येतात तींच शरीरांत वाजवीपेक्षां जास्त ऊष्णता झाली असतां उत्पन्न होतात. तीं

अशीं- त्वचा अती ऊन होते, नाडी व श्वासोच्छ्वास जलदीनें चालूं लागतात; जठर व आंतड्यांच्या क्रिया अल्प होतात, लुप्त होतात, किंवा बदलतात; मलमूत्र वगैरे उत्सर्ग कमी होतात आणि डोकें दुखणें, व अंग ठेंचल्यासारख्या वेदना हीं लक्षणें उद्भवतात. हे जे ज्वराचे दृग्विषय (लक्षणें) आहेत ते सतत होण्याचाही पुष्कळदां संभव असतो, किंवा २४ तासांतून दोनदां अथवा तीनदां मध्यें थोडा वेळ कमी होऊन दृग्गोचर होतात किंवा त्यांच्या तीन निरनिराळ्या अवस्थाही ( थंडी वाजणें, ताप भरणें व तदनंतर घाम येणें ) होण्याचा संभव असतो.

ज्वर आला असतां शरीरांतील उष्णता ९९° पासून ११०°।११२° पर्यंत वाढूं शकते. ऊष्णता १०१° पेक्षां अधिक नसेल तर या अवस्थेस अल्प ज्वर ह्मणावें. १०१° वर असून १०३° वर नसेल तर त्यास सामान्य ज्वर ह्मणावें. १०३° वर असून १०५ वर नसेल तर महाज्वर ह्मणावें. १०५° पेक्षां जास्त असून १०७ वर नसेल तर त्याला तीव्र ज्वर असें ह्मणावें. १०७ वर ऊष्णता झाली कीं, मृत्यु ज्वर असें ह्मणावें. कारण अशा ज्वरांतून रोगी क्वचितच वांचतो. आरोग्यांत जसें ऊष्ण-तेचें मान दिवसांतून निरानिराळ्या वेळीं कमी जास्त होतें तसेंच ज्वरांतही होत असतें, मात्र ऊष्णता त्यापेक्षां जास्त असते, ह्मणजे बाकी सारा वेळ थोडा ज्वर असून संध्याकाळीं जास्त असतो. परंतु हा नियम विशेष जातीच्या रोगांत ह्मणजे गोंवरांतील ज्वर, द्रेवींचा ज्वर वगैरे रोगांत लागू नाहीं.

सामान्यतः त्वचा ऊन व शुष्क अशी असते; परंतु कित्येक वेळां यामध्यें बराच फरक पडत असतो. पुष्कळ वेळां ताप येतांच ( थंडी वाजते अशा वेळीं थर्मामीटर मात्र ताप दाखवीत असतो ) शरीरांतील इंद्रियें तप्त असून त्वचा मुख्यत्वें करून हात, पाय डोकें, कपाळ हीं थंड असतात. अशा वेळीं त्वचेंतील रक्तवाहिन्या अगदीं आकुंचन झाल्या असल्यामुळें त्वचेंत रुधिराभिसरण अगदींच मंद चालत असतें; ह्मणून त्वचा सुरकुतलेली व निस्तेज अशी होते व कान, नाक, हात, पाय यांवरील त्वचा नेहमींपेक्षांही अधिक थंड असते. परंतु पुढें

कांहीं वेळानें त्वचेंतील रक्तवाहिन्या विकास पावतात, तींत रुधिराभिसरण चांगलें चालूं लागून तीच त्वचा प्रफुल्लित परंतु साधारण शुष्क व अति तप्त अशी होते. आणि त्यानंतर कांहीं वेळानें थोडासा घाम येतो.

ऊष्णतेच्या मानानें नाडीचे ठोकेही कमी जास्त पडतात. १०० पासून १०१ डिग्री पर्यंत ऊष्णता असली तर नाडीचे ठोके ८० पासून ९० पर्यंत पडतात; १०१ पासून १०३ डिग्रीपर्यंत उष्णता असेल तर नाडीचे ठोके ९० पासून ११० पर्यंत पडतात; १०३ पासून १०५ पर्यंत ऊष्णता असेल तर नाडीचे ठोके ११० पासून १३० पर्यंत पडतात. यापेक्षांही अधिक ज्वर असेल तर तिच्या मानानें १३० पासून २०० पर्यंतही ठोके पडूं शकतात. या नियमाला कांहीं अपवादही आहेत. कंपशील किंवा धैर्यहीन मनुष्याचे नाडीचे ठोके ऊष्णतेच्या मानापेक्षां बरेच अधिक पडतात. त्याच प्रमाणें नाडीच्या ठोक्यांतही विशेष फरक दिसून येतात. ज्वरांत ती ( तिचे ठोके ) सामान्यतः भरीव, कठीण व उत्प्लुत ( जोरानें वर उडणारी ) असून तिचे ठोके बोटानें पाहिले असतां हळूं हळूं खालीं न जातां बोटाला लागतांच खालीं जातात. परंतु थंडी वाजत असतां नाडी, सूक्ष्म पण कठीण, व घाम येत असतांना, भरींव परंतु मृदु, अशी असते.

ज्वरांत श्वासोच्छ्वासाचेंही मान उष्णतेच्या मानानें कमी जास्त होतें, परंतु नाडी प्रमाणें त्याचा बरोबर नियम नाहीं. कारण कित्येक वेळा असें होतें कीं, ज्वर बराच चढला असतां देखील श्वासोच्छ्वास नेहमींसारखेच चालूं असतात, व कित्येक वेळा अगदीं थोडा ज्वर असतांना देखील श्वासोच्छ्वास अधिक जलदीनें चालूं लागतात. ज्वर अति चढला असला तर मात्र श्वासोच्छ्वास अति जलद परंतु लघु किंवा अपूर्ण असे असतात. व श्वास घेण्याचे वेळीं बहुधा रोग्याचें तोंड उघडें असून नाकपुड्या खालीं वर होत असतात व एक प्रकारचा आचमनाच्या ध्वनीसारखा नाकांतून श्वासाचा अवाज निघत असतो. ज्वरांत आरोग्यास्थितिपेक्षां तितक्याच वेळांत फुप्फुसांत हवा आधिक जाते आणि ज्वरांत प्रत्येक उच्छ्वासांतून कार्बनडायाक्साईड वायु आरोग्या-

पेक्षां जरी कमी बाहेर पडतो तरी एकंदरींत तो अधिक बाहेर पडतो.

सामान्यत: ज्वरांत तहान ही असतेच व कित्येक वेळां ती अतिशय असते. तसेंच थोडें बहुत अग्निमांद्यही होतें. तोंड कोरडें व चिकट व पुष्कळदां कडू होतें; आणि जीभेवर पांढरा बुरा येऊन ती कोरडी होते आणि शौचास अवरोध होतो.

तसेंच मूत्र ही बहुश: बदलतें. तें थोडें होत असून ह्याचा रंग तांबूस लाल असतो. त्याचें विशिष्ट गुरुत्व नेहमीं पेक्षां जास्त असतें. तें कांचेच्या पात्रांत किंवा कोणत्याही भांड्यांत ठेविलें असतां यूरेट नांवाचा क्षार व यूरिक असिड हीं द्रव्यें तळाशीं बसलेलीं दिसतात. जरी आरोग्यावस्थेपेक्षां ज्वरावस्थेंत दिवसातून एकंदरींत मूत्र विसर्जन कमी होतें तरी त्यांतील क्षार व दुसरे घटकावयव वाढलेले असतात. आणि त्यांपैकीं मुख्यत्वें यूरेट हा क्षार नेहमींपेक्षां सुमारें दुप्पट जस्त असतो; केव्हां केव्हां त्याचप्रमाणें यूरिक असिडही दुप्पट असतें; तद्वत मूत्राचा लाल रंग आणणारीं द्रव्यें, तसेंच हिप्यूरिक ( गवताचें आम्ल ), सल्तयूरिक ( गंधकाचें आम्ल ), फॉस्फरसाचें आम्ल ( ॲसिड् ) व पोट्याशमचे क्षारही अधिक दृष्टोत्पत्तीस येतात. परंतु सोडियम् क्लोराईड् ( मीठ ) व दुसरे सोड्याचे क्षार बरेच नेहमीपेक्षां कमी असतात. तापांतलें मूत्र नेहमींपेक्षां अधिक आम्ल ( आसिड् ) असतें ह्मणजे त्यात निळा लिटमस्चा ( एक प्रकारच्या वनस्पतीच्या रंगाचे ) कागद बुडवला असतां लाल होतो. एकंदरींत बहुतकरून जरी तापामधील मूत्रांत क्षारादि पदार्थ विशेष असतात तथापि केव्हां केव्हां ते पदार्थ एकदम किंवा हळूहळू नेहमींपेक्षांही कमी होतात व मूत्र निस्तेज, थोडेसें गढूळ व कमी विशिष्ट गुरुत्वाचें होतें. असा प्रकार थोडावेळच राहून लगेच शरिरांत सांचून राहिलेले क्षार एकदम मूत्राच्या वाटे निघून जातात.

तापाच्या लक्षणांत मेंदूचे विकार-डोकें दुखणें, भोवंड येणें बडबडणें, शक्तिहीन होणें, पाठ कंबर हात पाय ठेंचल्यासारखें होणें व एकदां थंडी, व एकदां ऊष्णता यांचा भास होणें हे प्रकार-दिसून

येतात. थोडासा कांटा येणें किंवा थंडी वाजणे हें लक्षण बहुश: असतेंच, केव्हां केव्हां थडथड अंगही कापूं लागून दांतही वाजूं लागतात व त्वचा वर सांगितल्या प्रमाणें निस्तेज, सुरकुतलेली अशी होतें. जरी ज्वरग्रस्त रोग्यास बाहेरून अति थंडी वाजत असतें तरी त्याच्या शरीरांतलि इंद्रियें नेहमींपेक्षां बरीच जास्त तप्त असतात. अंगावर वारा लागला असतां अधिक जोरानें थंडी वाजूं लागते. अगदीं लहानमुलाना ज्वर भरण्या पूर्वी थंडी न वाजतां पुष्कळदा आचके येऊं लागतात. ( पुढें चालू. )

## उपयुक्त औषधीसंग्रह.

**ब्रह्मीचे गुण.**— ब्रह्मीचें झाड हिंदुस्थानांत पुष्कळ ठिकाणीं आढळतें. ब्रह्मी हें नांव संस्कृत असून मराठींतही तेंच प्रसिद्ध आहे. ह्या झाडाचें दुसरें संस्कृत नांव मंडूकी हें होय. **त्वग्रोगांत** ब्रह्मीचा उपयोग केल्यास रक्तशुद्धि होऊन शक्ती येते. त्याच प्रमाणें रक्तसंबंधी व मेंदूचे विकार- वेड, फेपरे वगैरे ह्या वनस्पतीपासून बरे होतात असा पूर्वापार समज आहे. मुलास ज्वर येत असल्यास किंवा त्यास आंतड्याची कांहीं विकृति झाली असल्यास ब्रह्मीच्या पाल्याचा काढा देतात. कारोमांडळच्या किनाऱ्याकडे मार लागलेल्या किंवा ठेंचलेल्या ठिकाणीं ब्रह्मीचा पाला ऊन करून बांधतात. मुंबईप्रांतामध्यें लहान मुलांना साधारण आमांशाचा विकार झाला असतांना ब्रह्मीचा उपयोग करितात. ब्रह्मीचीं तीन चार पानें, थोडीशी साखर व जिऱ्याची पूड यांबरोबर पोटांत देतात, व ब्रह्मीचीं पानें बेंबीवर बांधतात. कोंकणामध्यें बोबडें बोलणाऱ्या मुलास ब्रह्मीचीं एक दोन पानें रोज खावयास देतात. जावा बेटांत ब्रह्मी ही मुत्रल आहे, असें समजतात. मलबारामध्यें ब्रह्मीचा उपयोग महारोगावर करितात. तीपासून तो रोग निखालस बरा होतो असें नाहीं परंतु रोग न वाढतां रोग्याची प्रकृति सुधारून त्यास बरें वाटतें. आलीकडील शोधावरून विशेषत: गरमीसंबंधी त्वग्रोगांत

अक्षीचा पोटांत व बाह्य उपयोग केल्यापासून चांगला फायदा होतो असें अनुभवास आलें आहे.

**विंचवावर उपाय.**--इंग्रजी औषध क्लोरल (Chloral) व कापूर समभाग एकत्र मिसळून विंचू चावलेल्या जागीं चोळल्यास चांगला उपयोग होतो. दोन्ही औषधें एकत्र मिसळल्यानें पातळ मिश्रण तयार होतें तें कांचेच्या बुचाचे बाटलींत ठेवावें. ह्यापासून विंचवाच्या वेदना तात्काळ कमी होतात.

**काकडीचे गुण.**—काकडीच्या बिया थंड, पौष्टिक व मूत्रल आहेत. मूत्र उत्पन्न होण्याचेच बंद झाले असताना अथवा उन्हाळे लागले असतांना बियाचा चांगला उपयोग होतो. अर्धा तोळा बियाची पुड पाण्यात मिसळून देतात. भाजलेल्या बियाची पूड तर फारच जबर मूत्रल आहे व रेतीचें कण मूत्रपिंडांतून खालीं मूत्राशयांत लवकर उतरण्यास त्यापासून पुष्कळ उपयोग होतो.

**कडूवृंदावनाचे (संस्कृत इंद्रवारुणी) गुण.**—कडूवृंदावनाच्या फळाचा व मुळाचा औषधींत उपयोग करितात. फळ कडू, तिखट व रेचक असून त्याचा उपयोग, पित्ताधिक्य, अवष्टंभ ज्वर व जंत विकार ह्यामध्यें करितात. कामीण, उदर, पानथरी किंवा यकृत् वाढले असतांना अथवा मूत्र विकार किंवा आमवात झाला असतांना ह्या रेचकापासुन पुष्कळ उपयोग होतो असें आपल्या संस्कृत ग्रंथकारांचे मत आहे. मुसलमान ग्रंथकार ही, हे फळ मोठे जाज्वल्य रेचक समजतात, व ह्यापासून शरिरांतील सर्व दोष जातात, असें त्यांचे मत आहे. बियाही सारक आहेत व त्यापासून केस काळे होतात. कोकणामध्यें फळ व त्याच्या बिया आणि कुचला एकत्र करून तो लेप गळूं जिरण्यासाठीं त्यावर लावितात. स्तनाचा दाह झाला असतांना कडूवृंदावनाच्या मुळाचे पोटीस करून लावितात. लहान मुलांचे यकृत् वाढले असतांना ह्या फळाचा सर्वेसाम उपयोग करण्याचा प्रचार आहे पण त्यापासून उपयोग क्वचितच होतो असा आमचा अनुभव आहे.

**खरबुजाचे गुण.**—खरबुजाच्या बिया काकडीच्या बिया प्रमाणेंच थंड, पौष्टिक व मूत्रल आहेत. अर्थात मूत्र उत्पन्न होण्याचे बंद झाले असतांना किंवा उन्हाळे लागले असतांना ह्याचा उपयोग चांगला होतो. बियाप्रमाणेंच फळाचा गीरही मोठा मूत्रल आहे व त्याचा उपयोग जुनाट अथवा नूतन **इसबामध्यें** फारच चांगला होतो. शक्य असेल तेव्हां विशेषतः जुनाट इसबाचा विकार असलेल्या रोग्यानी रोज एक खरबूज खावे. खरबुजाचे मूळ सारक व वांती करणारे आहे.

**बाभळीचे गुण.**—ह्या झाडाच्या सर्व भागांचा—साल, डिंक, पाने बिया—औषधाचे कामी उपयोग होतो. कोवळी पाने वाटून हगवणीवर देतात. त्यांचे आंगी मोठा स्तंभक गुण आहे. बाभळीचा उपयोग मधूमेहांत करावा असे कित्येक देशी वैद्यांचे मत आहे, कारण ह्या डिंकाची शेवटी साखर बनत नाहीं. कोंकणामध्यें तळलेल्या डिंकांचे लाडू करून विशेषतः बाळंतिणीस व इतर अशक्त मनुष्यास पौष्टिक ह्मणून देतात. तांबूस रेताचा स्त्राव होत असल्यास-एक तोळा कोळी पाने, चार मासे जिरे व दोन तोळे साखरही एकत्र करून दुधा बरोबर रात्रौ देतात. बाभळीच्या सालीचे आंगी फारच चांगला स्तंभक गुण आहे. आंग बाहेर पडते त्यावर तिचा फार उपयोग होतो. धुपणीत तिच्या काढ्याची पिचकारी ध्यावी. घाणेरड्या व्रणावर तिचे पोटिस लावल्यानें ती स्वच्छ होऊन लवकर बरी होतात.

**डिकेमालीचे गुण.**— डिकेमाली पोटांत दिल्यानें अग्निमांद्य व पोटांतील वायू नाहींसा होतो. घाण व्रणावर डिकेमालीची पूड टाकली असतां ते स्वच्छ होतात. मुलास दांत येत असतांना डिकेमाली पोटांत दिल्यास हिरड्यांचा दाह कमी होऊन हगवणही बरी होते. डिकेमालीचे अंगीं वायू हरक, पाचक हे गुण असून ती कृमिघ्नही आहे. एकंदरींत हें औषध लहान मुलांच्या अनेक रोगांत देण्यास मोठें योग्य आहे, इतकेंच नव्हे, पण तें रोज थोडें लहान मुलांना देत गेल्यास जंत, अपाचन, पोटदुखी, हगवण इत्यादि पचनसंबंधी विकार होण्याचा

संभव नाहीं. व ही गोष्ट आमच्या पुष्कळ बायकांना माहीतही आहे. समभाग डिकेमालीची व साखरेची पूड करून ठेऊन रोज चिमुटभर लेंकरास देण्याचा त्यांचा प्रचार आहे. आलीकडे आलीकडे मात्र आयांना अशीं सोपीं,निरुपद्रविक पण गुणकारी आणि पूर्वापार चालत आलेलीं औषधें माहीत नाहींशीं होत चाललीं आहेत. डिकेमालीचे अंगीं घाम आणण्याचा व खोकला नाहींसा करण्याचाही गुण आहे. तसेंच ती नारूवरही पोटांत दिल्यास नारू जळून जातो असें ह्मणतात. प्रमाण-- १ गुंजेपासून ८ गुंजांपर्यंत.

---

## स्फुट लेख.

**आफ्रिकेतील निद्रारोग** ( Sleeping Sickness ) विशेषत: पश्चिम आफ्रिकेतील हा एक विलक्षण रोग आहे. तो तेथील निग्रो लोकासच होतो, परकी लोकांस सहसा होत नाहीं. ह्या रोगापासून रोगी क्वचित्‌च पार पडतो. बायकापेक्षां पुरुषाना हा आजार फार होतो. कोणत्याही वयाचे मनुष्यास हा आजार होतोच, पण १२ पासून २० पर्यंतच्या वयाचे मनुष्यास फार होतो. प्रथम रोगी सुस्त होऊन पुढें हळूं हळूं त्यास गाढ निद्रा येऊं लागते. मोठ्या जुलमानें त्यास थोडे जागे केलें तथापि पुन: तो त्याच स्थितींत जाऊन पोचतो. शेवटी शेवटी तो इतक्या गाढ निद्रेत पोचतो कीं तीतून त्याला जागा करणें अगदीं दुरापास्त होते. प्रथमारंभी मनुष्य काम काज करीत असला तथापि त्याच्या पापण्या जड होऊन हलेनाशा होतात, मानेतील व खाकेतील गाठी सुजतात व रोगी निद्रेच्या स्वाधीन होतो. ह्या वेळीं उपाय केल्यास रोगी जगण्याचा थोडा तरी संभव असतो. पुढें निद्रा वाढून रोगी अगदीं परस्वाधीन होतो, अशा स्थितींत रोगी महिनेच्या महिने राहतो. तो सर्वकाळ निद्रेच्या स्वाधीन होऊन अन्नपाणी सुद्धां घेत नाहीं, त्यामुळें त्याचें शरीर वाळून जाऊन तो अगदीं कृश होतो. शेवटीं तीन किंवा चार महिन्यांनीं अथवा

१२ महिन्यांनीं सुद्धां मृत्युमुखीं पडतो. युरोपियन लोकांना सुद्धां अद्याप या रोगाचें कारण कळून आलें नाहीं. अर्थात् ह्यावर खात्रीलायक उपचारही नाहीं. निरनिराळ्या देशचें हवापाणी, रीति रिवाज वगैरे ज्या प्रमाणें सर्व कांहीं निराळें त्याप्रमाणें रोगांचीही गोष्ट आहे. तथापि कांहीं रोग सर्व ठिकाणीं आढळतात परंतु हा चमत्कारिक रोग मात्र आफ्रिकेशिवाय कोठेंही आढळत नाहीं.

**अशुद्ध एरंडेलापासून विषारी परिणामः**—एरंडाच्या बियांत 'रिसिन' (Ricin) ह्मणून एक विषारी द्रव्य आहे ते तेलात मिसळल्यास रक्ताचे जुलाब व वांती होते, पोटांत आग पडते, हात पाय गार होतात व त्यापासून मनुष्य भयंकर स्थितींत पोचून जाया ही होतो. यासाठीं एरंडेल तेल अशुद्ध असल्यास त्याचा उपयोग करूं नये. बाजारी एरंडेल अशुद्ध असते. तसेच घरीं बायका जे एरंडेल काढतात त्यांतही वरील विषारी द्रव्य राहण्याचा पुष्कळ संभव असतो, कारण त्यात पुष्कळ गाळ राहतो.

**आंतील इंद्रियांच्या जागेचा बदल.**— एका २९ वर्षांच्या जर्मन मजुराविषयीं असें लिहितात कीं, त्याची पानथरी (जी डावे कुशींत असते) ती कुठे आहे हें समजत नाहीं. यकृत् (जें नेहमीं उजव्या बाजूस असतें) तें तेथें नसून डावे बाजूस आहे व पक्वाशय (जो नेहमीं डावे बाजूस असतो) उजवे बाजूस आहे. त्याचें हृदय (जें नेहमीं डावे स्तनाजवळ असतें) तें त्याच जागीं पण उजवे बाजूस आहे. हीं इंद्रियें चांगलीं निरोगी आहेत मात्र त्यांची नेहमींची बाजू बदललेली आहे. हें एक सृष्टिचमत्काराचें ध्यानांत ठेवण्याजोगें उदाहरण आहे. अशाच प्रकाराची एका फकिराविषयीं माहिती कलकत्यांतील इंडियन मेडिकल रेकार्डमध्यें चिनाचिन येथील डा. मिचेल टिंडाल यांनीं प्रसिद्ध केली आहे. त्या फकिराचेंही यकृत् डावे बाजूस असून, पानथरी, हृदय उजवे बाजूस असल्याचें लिहिलें आहे. यावरून आयतीच वरील हकीकतीचीही सत्यता ठरते

## कृष्णशास्त्री त्रिदलकर वैद्य मु० आंजर्ले ता० दापोली जि० रत्नगिरी यांचीं जगत्प्रसिद्ध, सर्वोपयोगी, निर्दोष व रामबाण औषधें.

या जाहिरातीचे खालीं " विशेष सूचना " केली आहे
ती वाचकांच्या अवश्य लक्ष्यांत असावी.

### १. वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साह बुद्धि कांतिवर्धक व धातुपौष्टिक, सुवर्णमाक्षिक-मौक्तिक व [illegible] अपूर्व गुटिका.

१ शरीराची [illegible] सुधारणा करणारीं अत्यंत महत्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें त्यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्व भागीं व त्याच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, कोणत्याही कारणांनीं आलेली अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, उन्हाळे, छातींतील रोग, मस्तकशूळ, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूळव्याधि, भगंदर, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूळ, कटिवात, वातरोग, निद्रानाश, चक्कर, कफातिरेक, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, सूतिकारोग, व्रण, हात, पाय, मूत्रमार्ग व शरीर यांचा दाह, ठणका, ग्लानि, अरुचि, मूत्राश्मरी व चित्तभ्रम इत्यादि अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले, नवीन किंवा जुनाट असले तरी अगदीं खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन व कामोदीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति, व बुद्धि हीं वाढतात. ज्यांस फिरण्याचे, अभ्यास करण्याचे लिहिण्याचे व शिकविण्याचे श्रम फार पडतात त्या सर्वांच्या अंगीं यांनीं

अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो व सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें. कोष्ठशुद्धि होते. कोष्टांतील अनियमित व्यापारांपासून होणारे दुष्ट परिणाम टळतात. या अप्रातिम गुटिका अत्यंत उपयुक्त शोधानें केल्या असून यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें आहेत, सबब जास्त वर्णन येथें करीत नाहीं. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस या अत्यंत उपयोगी आहेत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषध नाहींच असें स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात, यामुळें यांचा अतिशय खप सुरू आहे. हल्लीं या गोळ्यांत अंतर्वेदी, नेपाळ, काश्मीर इ० देशांतील अत्यंत शुद्ध, ताजे, महत्वाचे व मौल्यवान असे अनेक पदार्थ आणखी घालून त्यांची विशेष सुधारणा केली आहे आणि लोकाग्रहावरून केवळ परोपकारार्थ ह्मणून गोळ्यांचा दर फारच स्वस्ता केला आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व ट. खर्च माफ आहे. अनुपान ख० सोबत देऊं. एकदम १६ गोळ्यांस १ रु., ३६ गो० २ रु., ८० गो० ४ रु., व १३० गो० ६ रु.

## ३. थंडगार नेत्रांजन.

हें परम गुणकारक अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणारे तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भार, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंडू, फूट, चिकटा, ठणका, व लाली, इ. अनेक विकार तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यांस कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा बिलकूल न होतां बरे होतात.

दृष्टि तीव्र व थंडगार राहते. शिवाय जागरण, उन्हांत फिरणें

अग्नीचा शेक, उपदंशविकार, अतिवाचन, अतिव्यायाम, अतिमैथुन, अतिमद्यपान, अत्युष्ण व विदाही पदार्थ भक्षण, इ० कारणांनीं ज्यांचे डोळे बिघडतात त्यांस याचा फारच मोठा उपयोग आहे. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार बिलकुल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगीं आहे. २ तो० ड० १॥ रु०

## ४. कर्णस्रावनाशक अप्रतिम तैल.

हें उत्तम तेल कानांत घातल्यानें कानांतून पू वाहणें, तत्संबंधीं ठणका, कंडू, दाह, रक्तस्राव, इ. विकार तत्काळ बरे होतात. कानांतील कोणत्याही प्रकारचे साधारण व्रण तर तत्कालच, परंतु कानाचा समूळ नाश करणारे जुनाट किंवा हाडीं खिळून बसलेले कितीही वयाचे मनुष्याचे व कोणत्याही कारणानें प्राप्त झालेले अनेक प्रकारचे असाध्य व्रण कोणतीही इजा किंवा आग वगैरे बिलकुल न होतां अगदीं खात्रीनें बरे होतात. बाटलीस रु० १ शिवाय प्या० ख० दोन आणे. रोखीनें किंवा व्हॉ. पे. पार्सलनें खालील पत्यावर मागविल्यास पाठवूं. अनुपान खर्डा बाटलीसोबत.

५. **परम्यावर अपूर्व मिश्रण.**—कोणत्याही प्रकारचा नवीन किंवा जुनाट परमा, तत्संबंधी दाह, तिडीक, मूत्राची विवर्णता, संकोच किंवा मूत्रातिरेक इ. विकारांसह या मिश्रणापासून इजा बिलकुल न होतां व पथ्यसेवनाची खटपट नसतां ताबडतोब बरा होतो. परम्यावर इतकें प्रतिज्ञेचें औषध दुसरें नाहींच. बा. १ रु.

६. **दंतरक्षक पूड.**— ही चोळिल्यानें दंतसंबंधी सर्व विकार हिरड्यांचा रक्तस्राव व व्रण, पू, कीड इ. फारच त्वरित व नाजूक रीतीनें बरे होऊन दांत स्वच्छ व फार मजबूत होतात. ड. ६ आणे.

७. गजकर्ण, नायटे, खरूज इ. विकार ३ दिवसांत बरे होतात. ड. ६ आणे.

८. विंचवाचें विष हें औषध लावतांच उतरतें. ड. ८ आणे. इतकें औषध ४० मनुष्यांस पुरतें.

वरील औषधें अत्यंत खात्रीचीं आहेत. त्यांणीं हजारों लोकांस गुण आला व नित्य येत आहे. अनुभवानंतर पक्की खात्री होईलच. याशिवाय आमच्या येथें कस्तूरीच्या उत्तम कातगोळ्या, तमाखूच्या अर्कांच्या कस्तूरीमिश्र गोळ्या, उत्तम सुगंधी अत्तरें व प्रयोक्त रसायनें, धातूंचीं भस्में, पाक, तैलें, चूर्णें, गोळ्या, घृतें, आसवें, द्राव, क्षार हेमगर्भादि रसायनें इ. औषधें माफक किंमतीस मिळतील. पाहण्यासाठीं सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. अनुपान पत्रक औषधासोबत पाठवूं. पत्ता सुवाच्य. कोणीं प्रकृतिमान कळविल्यास रोगाचें निदान व योग्य चिकित्सा कळवूं. औषधें रोखीनें किंवा व्ही. पी. नें विकत मिळतील. टपालखर्च वेगळा पडेल. गरीब लोकांस स्वस्त दरानें औषधें देऊं. जाहिरातीच्या खालील किंवा वरील पत्यावर मिळतील. या औषधांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून त्यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळविल्या आहेत व नित्य मिळत आहेत.

**विशेष सूचनाः—** अलीकडे वर्तमानपत्रांतून आंजर्लें व नजीकच्या मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या नवीन बऱ्याच जाहिराती सुरू झाल्या आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींच्या खालीं किंवा वर ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या ग्राहकांस भासण्याचा संभव आहे, यामुळें कदाचित् ग्राहकांचा घोंटाळा होईल. तरी अशा लोकांशीं व त्यांच्या जाहिरातींशीं आमचा कोणत्याही प्रकारें अगदीं संबंध नाहीं हें ग्राहकांनीं अवश्य लक्षांत ठेऊन, आमचीं औषधें मागणें तीं "**कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य मु० आंजर्लें ता० दापोली जि० रत्नागिरी**" या अगदीं बिनचूक सही व पत्यावर मागवावीत.

**कृष्णशास्त्री बिवलकर.**

**पत्ता**— मु० आंजर्लें, ता० दापोली, जिल्हा रत्नागिरी.

ता.यंत्र, व रेल्वेसंबंधी प्रत्येक मनुष्यास समजणें जरूर अशी माहिती व्यवस्थेशीर ह्यांत दिली आहे. शिवाय कायद्यासंबंधी- गांवचे पोलिस, सिव्हिल प्रोसिजर, स्टांप, वगैरेंचीही माहिती आहे. प्रत्येक पानाचे खालीं इंग्रजी ह्मणी व सोपीं औषधें दिलीं आहेत. कागद, छपाई, बाइडिंगही बरें आहे. घोरपड्यांप्रमाणें पटवर्धन यांची शाई घेणारास ही डायरी फुकट मिळते. बाकीच्यांस किंमत चार आणे.

**आमच्या आश्रयदातास विनंति.**— चवथ्या वर्षाचा हा नववा अंक वाचकांचे हातीं पडत आहे. इकडे लक्ष देऊन ज्यांची वर्गणी अद्याप यावयाची आहे त्यांनीं ती जरूर धाडावी. भिषग्विलास आजपर्यंत अगदीं नेमानें प्रसिद्ध होत आहे परंतु हा अंक वाचकांचे हातीं निदान १० तारखेचे आंत तरी कसा पडतो ह्याची मोठी काळजी होती. कारण, गेला दीड महिना आमचा दुखण्यांत गेला, संतत ज्वरानें ( विषमज्वर ) सुमारें वीस पंचवीस दिवस तर अंथरुणावर खिळून टाकले होते, पुढें फार अशक्ततेमुळें डोक्याचें काम कांहीं दिवस होईना. तथापि ईशकृपेनें आलेलें संकट दूर होऊन पुनः कामास उमेद आल्यामुळें काळजी दूर झाली. आजचा अंक नेहमींपेक्षां चार पांच दिवस उशीरा वाचकांचे हातीं पडत आहे ह्याबद्दल ते क्षमा करतीलच. ज्यांचेकडून डिसेंबर अखेर वर्गणी यावयाची नाहीं त्यांचेकडे जानेवारीचा अंक व्ही. पी. करावा लागेल. ह्याबद्दल मात्र त्यांचा घुस्सा नसावा.

---

## पोंच.

**चवथे वर्षाबद्दल** (एप्रील १८९५ ते मार्च १८९६ अखेर)

| | |
|---|---|
| ३ रावसाहेब कानीठकर. | ३ रा. रा. कृष्णराव सुंदरजी कीर्तीकर |
| ३ डा. प्रभाकर बाळाजी केसकर. | ३ प्रो. भास्कर रामचंद्र आरते. |

---

**बंधुत्वाच्या नात्याचे दोन शब्द**:— खरा प्रकार मासिक पुस्तकाच्या सप्टेंबरच्या अंकांत पान ३७ पासून **वस्त्रांचा आरोग्य-दृष्ट्या विचार** ह्या सदराखालीं जो मजकूर आला आहे, त्यांमध्यें 'आरोग्यावस्थेंतील उष्णता' व रुग्णावस्थेंतील उष्णता (रोग्यावस्थें-तील उष्णता ह्याचे ऐवजीं)' ह्यासंबंधीं जी पांच साडेपांच पानें माहिती दिलेली आहे, ती शब्दशः (कांहीं थोडा आगेमागें वाक्यरचना व शब्दाचा फेरबदल शिवाय करून) भिषग्विलासांतील (पु. १ अंक २ पान ३ पहा) आहे. कर्त्याचा हेतु त्याचे लेखाचा उपयोग सर्वांनीं करावा, असा असल्यामुळें **खरा प्रकारांत** आलेल्या उताऱ्याबद्दल त्यास आनंदच होत आहे. परंतु वरील निबंधाच्या लेखकानें त्या खालीं 'भिषग्विलास' अशीं बारीक टाईपाचीं अक्षरें घातलीं असतीं, तर त्यांचा थोरपणा अधिक दिसून आला असता. व मधून मधून एखाद दुसरा शब्द गाळून किंवा वाढवून जी लपंडावी केली आहे, ती केली नसती तर त्याचा प्रामाणिकपणा चांगला व्यक्त झाला असता आणि 'खरा प्रकार' या नांवास तें लिहिणें शोभलें असतें!

---

## महामारी

हें प्रत्येक कुटुंबांत ठेवण्यायोग्य पुस्तक असून, विशेषतः जेथें चांगल्या वैद्याची मदत नाहीं अशा गांवांत सांथीचे दिवसांत तर फारच उपयोगी आहे. ह्यामधील उपाय अगदीं साधे व पाहिजे तेथें करतां येण्याजोगे आहेत. ह्या पुस्तकावर डा. भालचंद्र, डा. विश्राम, वगैरे विद्वान लोकांचे व वर्तमानपत्रकर्त्यांचे फार चांगले अभिप्राय आले आहेत. पुस्तकाची किंमत ८।० आहे. मुद्दाम टपालहंशील माफ केलें आहे.

म्यानेजर भिषग्विलास,
डा. रानडे यांचा दवाखाना, सोलापूर.


**Novelty** घड्याळ म्हटल्यास घड्याळ, देव्हारा म्हटल्यास देव्हारा. **Novelty**

आर्यधर्माभिमानी देशबांधवांकारितां सचित्र हिंदुघड्याळें.

स्वार्थ साधून परमार्थ साधण्यालायख! धर्मजागृत! सर्वमान्य! अपूर्व! दिसण्यांत अद्भुत!

रजिस्टर्ड हिंदु     रजिस्टर्ड वॉच

देवतांचे दर्शनानें हिंदुधर्माभिमानास भरती नाहीं कां आपणार? नांव ऐकतांच पाहावेंसे वाटतें व पाहतांच घ्यावेंसें वाटतें.




नमुना मागवा. नुसत्या पाहण्यानेंच आ? नंद होईलच, तर मग वापरण्यानें होई- लच होईल यांत काय आश्चर्य?

## हिंदु वॉच.    Hindu Watch.    हिंदु वॉच.

हिंदु घड्याळें कशीं आहेत— दिसण्यांत सुंदर, खिशांत हलकें, मजबूत, टिकाऊ, अंगचे चावीचें, उघड्या तोंडाचें, घड्याळाचे आंतील सामान सर्व फार मजबूत, भरपूर रूबी ज्युवेल्स, बरोबर वेळ दाखविणारें, धक्काबुक्कीस न जुमानणारें, तबकडी पांढरी रंगीत असून त्यावर रीतीप्रमाणें रोमन आंकडे आहेत व देवनागरी आंकडे ठळक असून त्या प्रत्येक आंकड्यांमध्यें हिंदु पूज्य देवतांचीं सुंदर चित्रें आहेत तीं- श्रीगणपती, सरस्वती, रामदासस्वामी, हनुमंत, रामसीता, गरुड, व्यंकटेशलक्ष्मी, अष्टभुजादेवी, विठ्ठलरखुमाई, महादेवपार्वती, अक्कलकोटस्वामी, श्रीगुरुदत्तात्रय, आणि मध्यभागीं वीरशिरोमणी महाराष्ट्रास जीवंत करणारे श्रीछत्रपती शिवाजी महाराज यांचें अप्रतिम चित्र आहे. असें हें हिंदुघड्याळ आमचे देशबांधव व भगिनी कां संग्रहीं करणार नाहींत बरें ?

| नांव. | किंमत. | ग्यारंटी. |
|---|---|---|
| हिंदुसिलेंडर पीक वॉच नी. सी. | रु. ८॥ ते १० | वर्ष १ |
| हिंदुप्रिव्हेलन्स लीव्हर नी. सी. वाच | रु. १५ | वर्षे २ |
| हिंदुरासकोप सिस्टिम नी. सी. वॉच | रु. १७ | वर्षे ३ |
| हिंदुप्रिव्हेलन्स चांदीचें वॉच | रु. २५ तें ३० | वर्षे ४ |
| हिंदु सोन्याचें वॉच | रु. १०० तें १२५ | वर्षे ४ |

हिंदु आर्मी वॉच सेकंड कांटा आहे. किं. रु. १० ते १२५ पर्यंत.

पत्ता.—डा० रानडे यांचा दवाखाना, सोलापूर.

# भिषग्विलास

# BHISHAGVILASA.

वैद्यकसंबंधी अनेक विषयांचें सुबोध भाषेंत
मासिक पुस्तक.

A Monthly Magazine in Marathi
to popularise Medicine.

आयुःकामयमानेन धर्मार्थसुखसाधनं ॥
आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः ॥ १ ॥

पुस्तक ४. जानेवारी १८९६ अंक १०

विषयानुक्रम. पान.

चित्ताकर्षणशास्त्र अथवा मोहिनीविद्या .... .... २९
शरीररचना ( स्नायुविचार ) .... .... १९३
ज्वर .... .... .... .... .... १९८

सोलापूर

आनंदवृत्त छापखान्यांत छापिला.

वर्षाची अ.म.ऊ वर्गणी ट. ह. सह ३ रु.

# भिषग्विलास.

पुस्तक ४ जानेवारी १८९६. अंक १०

## शरीररचना.

लेखक— ( डा. कृष्णराव गडबोले. )

### स्नायुविचार ( मसल्स ).

शरीरांतील अवयवांच्या अंगीं आकुंचन प्रसारणादि क्रिया करण्याची शक्ति देणारे व गोंडसपणा देणारे जे मांसमय दोरक त्यांस स्नायु ह्मणतात. यांचा आकार अनेक प्रकारचा असतो. कित्येक लांबट असतात, कित्येक वर्तुल, कित्येक चौकोनी, कित्येक त्रिकोणी, असे नानाकृति असतात. प्रत्येक स्नायूमध्यें कांहीं भाग तांबडा लाल असतो व कांहीं भाग पांढरा असतो. तांबडा भाग मृदु तंतूंनीं व पांढरा भाग चिवट व जोरदार तंतूंनीं बनलेला असतो. या पांढऱ्या भागास त्या त्या स्नायूची **कंडरा ( टेंडन )** असें ह्मणतात. या कंडरेच्या योगानें स्नायु हाडांस बांधलेले असतात. या कंडरा तळहाताच्या मागल्या बाजूवर स्पष्ट दिसतात. प्रत्येक बोटास जो एकेक दोरीसारखा तणावा असतो तो या स्नायुकंडरेचाच होय. फणसांत गऱ्यास लपेटणारे चार खंडाचे दोरे जसे मजबूत पांढरे व तकतकीत असतात तशाच या कंडरा असतात. कित्येक स्नायूंच्या टोंकासच कंडरा असते, कित्येकांस पंखासारखी मध्येंच असते व कित्येकास एक बाजूसच असते. शरीरांत एकंदर जे स्नायु आहेत त्यांचे स्थानभेदानें मुख्य चार विभाग करितां येतात. ते असे—पहिला विभाग **ऊर्ध्वजत्रुस्नायु** ह्मणजे खांद्याच्या वरील जेवढा शरीराचा भाग तेवढ्याचे; दुसरा विभाग **अंतराधिस्नायु** ह्मणजे शरीराचा जो मधला भाग तत्संबंधीं स्नायु; तिसरा विभाग **ऊर्ध्वशाखा** ह्मणजे हात व चौथा विभाग **अधःशाखा** ह्मणजे पाय; याप्रमाणें हे चार मोठे विभाग झाले. आतां प्रत्येक विभागांतील स्नायूंचें वर्णन करूं.

## ऊर्ध्वजत्रुस्नायु.

ऊर्ध्वजत्रुस्नायूचे स्थानपरत्वें तीन पोटविभाग होतात ते असेः— शीर्षस्नायू, मुखस्नायू, व ग्रैवेयकस्नायू. आतां या तिन्हींपैकीं प्रथम शीर्षस्नायूंचा विचार करूं.

### शीर्षस्नायू.

१. **प्रत्यक्भालस्नायु** ( ऑक्सिपिटोफ्रंटालिस ) हे दोन असतात- डोक्यांतील मध्यरेषेंत जो पूर्वपश्चिम भांग करितात त्याच्या उजव्या बाजूस एक व डाव्या बाजूस एक असतो. या स्नायूचे तंतु भिवयीपासून मागें प्रत्यगस्थीपर्यंत पूर्वपश्चिम गेलेले असतात. या दक्षिणोत्तर स्नायूचे आंतील कांठ कपाळाच्या मध्यरेषेच्या सुमारास अगदीं एकमेकांस लागल्यासारखे असतात, परंतु पुढें डोक्याकडच्या भागांत परस्परांपासून कांहींसे दूर गेलेले असतात. या स्नायूंच्या योगानें डोक्यावरील कातडीच्या अंगीं आकुंचन व प्रसारणं शक्ति येते. कपाळास अठ्या घालतेवेळीं जी क्रिया घडते ती या स्नायूंमुळेंच घडते.

### मुखस्नायु.

२. **अधोभ्रुकुटि.** ( ऑर्बिक्युलारिस पाल्पिब्रेरम ) हा स्नायु नेत्राच्या सभोंवार पसरलेला असतो. पापणीच्या पडद्यांवरही या स्नायूचे कांहीं तंतु आलेले असतात.

३. **भ्रुकुटिस्नायु.** ( कॉरुगेटर सुपरसिलिआय ) हा भिवयीच्या त्वचेखालीं असतो. याचे तंतु भिवईच्या आंतल्या टोंकापासून सुरू होतात, ते सुमारें भिवईच्या अर्ध्या कमानीपर्यंत येतात.

४. **पक्ष्मस्नायु.** ( टेन्सरटार्साय ) हा पापणीच्या आंतील मृदु श्लेष्मल त्वचेच्या आंतल्या अंगास असतो. हा पापणी मिटविण्याच्या कामीं उपयोगीं पडतो.

### कर्णस्नायु.

५. **कर्णोर्ध्वस्नायु.** ( ओटॉलेन्सऑरिक्युलं ) हा स्नायु कानाच्या पाळीच्या वरील भागांत असतो.

६. **कर्णप्राक्स्नायु.** ( आट्रॅहेन्सऑरिक्युलम ) हा स्नायु कानाच्या पुढल्या बाजूस ह्मणजे कानाशिलांत असतो.

७. **कर्णप्रत्यक्स्नायु.** ( रिट्राहेन्स ऑरिक्युलं ) हा कानाच्या पाळीच्या मागच्या अंगास असतो. हे कानाचे स्नायु मनुष्य जातीस विशेष उपयोगीं पडत नाहींत, परंतु पशु जातींत कान मागें पुढें करण्याची जी शक्ति असते ती याच स्नायूंमुळें असते.

**नेत्रस्नायु.**

८. **उन्मीलक** ( लिव्हाटर पाल्पिब्री ) हा स्नायु वरील पापणी व नेत्रगोलक यांच्यामध्यें असतो. हा लांबट व त्रिकोणी असून नेत्रगोलकच्या मध्यरेषेंत असतो. याच्या योगानें पापणी वर करितां येते.

९. **ऋज्वूर्ध्व** ( रेक्टस सुपीरियर ) हा स्नायु डोळयांच्या बुबुळांच्या वरील बाजूवर असतो. याच्या योगानें बुबुळ वर चढवितां येतो.

१०. **ऋज्वधःस्नायु** ( रेक्टस इन्फीरियर ) हा स्नायु नेत्रगोलकाच्या खालच्या बाजूवर असतो.

११. **अंतरपांग** ( रेक्टस इंटर्नस ) हा स्नायु नेत्रगोलकावर आंतल्या अंगास ह्मणजे नाकाकडल्या बाजूस असतो. याच्या योगानें बुबुळ नाकाकडील कोपऱ्याकडे वळवितां येतो. हा स्नायु वर सांगितलेल्या स्नायूपेक्षां आंखूड व जाडा असतो.

१२. **बहिरपांग** ( रेक्टस एक्स्टर्नस् ) हा स्नायु नेत्रगोलकाच्या बाहेरील बाजूवर चिकटलेला असतो. याच्या योगानें बुबुळ कानाकडील कोपऱ्याकडे वळवितां येतो.

१३. **ऊर्ध्वतिर्यक्** ( ऑब्लिकस सुपीरियर ) या स्नायूची कंडरा भालास्थीच्या एका सूक्ष्म छिद्रांत शिरून तेथून पुनः याचे तंतु खालीं बुबुळाकडे वळून ऋज्वूर्ध्व स्नायूच्या खालून आडवे जातात ते बुबुळाच्या बाहेरील बाजूपर्यंत येतात.

१४. **अधस्तिर्यक्** ( ऑब्लिकस् इन्फीरियर ) हा अरुंद व पातळ स्नायु ऊर्ध्वदंतधरास्थीच्या आंतील कांटापासून सुरू होऊन बुबुळाच्या खालील बाजूवरून ऋज्वधः स्नायूच्या खालून मागें व

बुबुळाच्या बाहेरील बाजूपर्यंत जाऊन चिकटलेला असतो.

## नासिकास्नायु.

१५. **नासामूलस्नायु.** ( पिरामिडॉलिसनेझाय ) हा एक शिखराकृति लहानसा स्नायु नाकाचा जो वरील कठिन भाग त्याजवर असतो.

१६. **नासासंकोचक.** ( कंप्रेसर नेझाय ) हा एक त्रिकोणी स्नायु असतो. याचा रुंदट भाग नाकाच्या मध्यरेषेबरोबर असतो व अरुंद भाग गालाकडे उतरून ऊर्ध्वदंतधरास्थीच्या एका टोंकास चिकटतो. नाकपुडीच्या प्रत्येक बाजूवर हा एकेक असतो. हे दोन्ही स्नायु नाकाच्या मध्यरेषेंत येऊन एकमेकास जुळतात व या दोहोंचा मिळून आकार एखाद्या केवड्याच्या पानासारखा दिसतो. म्हणजे केवड्याचें पान जसें दोहों टोंकांस अरुंद व मध्यें रुंद असतें, तसा दिसतो. यांच्या योगानें नाकपुड्या संकुचित करितां येतात.

१७. **नासाप्रसारक.** ( डायलेटर नेझाय ) हा स्नायु नाकपुडीच्या अगदीं कांठावर असतो. हा अगदीं पातळ व अस्पष्ट असून त्यांतच दोन विभाग असतात. प्रत्येक नाकपुडीवर हा एकेक स्नायु असतो. या स्नायूच्या योगानें नाकपुड्या फुगाविण्याची शक्ति येते.

१८. **नासाग्रनिकोचक.** ( डिप्रेसरएलीनेझाय ) हा स्नायु वरील ओठापासून सुरू होतो तो नाकपुडीच्या कांठाला व दोहों नाकपुड्यांच्या मधल्या पडद्याच्या कांठाला चिकटतो. या स्नायूच्या योगानें नाकाचा शेंडा खालीं वाकवितां येतो.

## मुखस्नायु.

मुखस्नायूमध्यें स्थानपरत्वें तीन विभाग होतात ते असे- ऊर्ध्वोष्ठस्नायु, अधरोष्टस्नायु, व कपोलस्नायु ह्मणजे गालावरील स्नायु.

१९. **आस्यवलयस्नायु.** ( ऑर्बिक्युलारिस ऑरिस ) तोंडाच्या सभोंवतीं या स्नायूचा वेढा असतो ह्मणून यास आस्यवलय असें नांव दिलें आहे. याचे अर्धचंद्राकृति दोन विभाग असतात ते असे- वरील ओंठांत असणारा एक व खालच्या ओंठांत असणारा एक.

प्रत्येक अर्धचंद्रांत पुनः आडवे दोन विभाग दृष्टीस पडतात. या दोहों विभागांच्या मधूनच ओष्ठधमनी आडवी गेलेली असते. आंतील विभागाचे तंतु तोंडाच्या शिवणीसभोंवार एकसारखे वेढा देऊन असतात व बाहेरील विभागाचे तंतु तसे नसून वरल्या ओंठाचे तंतु खालच्या ओंठाच्या तंतूंत येऊन मिळतात, व खालच्याचे वरल्यांत मिसळतात. या स्नायूच्या योगानें तोंडाची जिवणी मिटतां येते.

२०. **ऊर्ध्वोष्ठनासापुटस्नायु.** ( लिव्हाटरलेबिआय् सुपीरिआरिस एलिक्विनेझाय ) हा एक पातळ त्रिकोणी स्नायु असतो. हा ऊर्ध्वदंतधरास्थीच्या एका टोंकापासून सुरू होऊन त्याचा कांहीं भाग नाकपुडीच्या कांठास चिकटतो व कांहीं वरील ओंठास चिकटतो. या स्नायूच्या योगानें वरील ओंठ नाकपुडीकडे चढवितां येतो व नाकपुडीचें द्वार रुंद करितां येतें.

२१. **ऊर्ध्वोष्ठोत्कर्षकस्नायु.** ( लिव्हाटरलेबिआय सुपीरिआॅरिस प्रॉप्रिअस ) हा स्नायु नेत्रबिलाच्या खालील कांठापासून सुरू होऊन वरल्या ओंठांत येऊन चिकटतो. याच्या अंगींही ओंठ वर करण्याचीच शक्ति आहे.

२२. **मुखकोनाकर्षक.** ( लिव्हाटर आंग्युलायऑॅरिस ) हा स्नायु ऊर्ध्वदंतधरास्थीच्या एका खळगीपासून सुरू होऊन तोंडाच्या कोपऱ्याकडे खालीं उतरून कोपऱ्यांत चिकटतो. या स्नायूच्या योगानें तोंडाचा कोंपरा आंत ओढतां येतो.

२३. **सेतुस्नायु.** ( झिगोमॉटिक ) हे स्नायू दोन असतात. हे आकारानें बारीक असतात. हे गंडास्थीपासून सुरू होऊन वरल्या ओंठास येऊन चिकटतात. या दोन्हींपैकीं एक मोठा असतो त्यास **बृहत्सेतु** ( झिगोमाटिकस मेजॉर ) असें ह्मणतात व लहान असतो त्यास **लघुसेतु**स्नायु ( झिगोमॉटिकस मायनॉर ) असें ह्मणतात.

## अधरोष्ठस्नायु.

२४. **अधरोष्ठनिकर्षक.** ( डिप्रेसरलेबिआय इन्फीरिआरिष ) हा स्नायु हनवटीच्या मध्यरेषेपासून सुरू होऊन खालच्या ओठांत

जाऊन चिकटतो. याच्या योगानें अधरोष्ठ खालीं ओढतां येतो.

२५. **मुखकोनतनुस्नायु.** ( रिसोरियस सांटोरिनाय ) हा एक पातळ स्नायु गालांत सुरू होऊन तोंडाच्या कोपऱ्यांत येऊन चिकटतो. हा स्नायु फार पातळ असतो.

२६. **हनून्कर्षक.** ( लिव्हाटरलेबिआय इन्फीरिआरिस ) हा स्नायु आंखूड व मजबूत असतो. हा हन्वस्थीच्या एका खळगीपासून सुरू होऊन खालीं उतरून हन्वटींत चिकटतो. याच्या योगानें हन्वटी-वरील कातडें ताणतां येतें. ( पुढें चालू. )

---

# ज्वर.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

**लेखक**—डा. विष्णुपंत भागवत एल्. एम्. अँड एस.

ज्वरासंबंधी बऱ्याच गोष्टी महत्वाच्या व ध्यानांत ठेवण्याजोग्या आहेत.

**पहिली गोष्ट.** ज्वरांत जरी बहुतकरून अति तहान लागत असते व रोगी बरेंच पाणी पितो तरी लघ्वीवाटेनें, मलाच्या वाटेनें किंवा घामाच्या रूपानें थोडेंच पाणी अंगांतून बाहेर जातें. डा. पार्क याच्या मतानें त्याचें कारण जिल्याटिनसारखा एखादा पदार्थ झीज पावून शरीरांत उत्पन्न होऊन त्याचे आंगीं पाणी शोषून घेण्याचा धर्म असावा असें आहे. तथापि आपल्याला वाटतें त्यापेक्षां किंवा आरोग्य स्थितींतल्या पेक्षांही ज्वरावस्थेंत आपल्या अंगांतून अधिक पाणी जातें असें मानण्यास आपल्याला एक आधार आहे. आणि ह्मणूनच ज्वर आल्यामुळें आपलें वजन बरेंच कमी होतें असेही मानण्यास आपल्याला एक सबळ कारण आहे. बरें, जर लघवीच्या द्वारें किंवा मलाच्या द्वारें शरीरांतून पाणी कमी जातें तर उच्छ्वासाच्या वाटेनें किंवा त्वचेच्या वाटेनें अधिक पाणी जात असलें पाहिजे असें सिद्धच होतें. आणि त्वचेसंबंधानें जर ह्मणाल तर ज्वराच्या पूर्वींच्या स्थितींत ह्मणजे थंडी

वाजत असतांना त्वचेची क्रिया बहुतेक बंदच असते. परंतु बराच ज्वर भरला असतांना वाफेच्या रूपानें पाणी ( घाम ) त्वचेंतून आपल्या न कळत बरेंच जात असतें. आणि घाम येत असतांना पाणी पुष्कळच जातें हें तर सांगायाला नकोच.

**दुसरी गोष्ट.**—ज्वरांत रक्ताची स्थितीही लक्षांत ठेवण्यासारखी असते. परंतु त्याबद्दल चांगला महत्वाचा शोध अद्याप लागला नाहीं. तथापि ज्वर कांहीं दिवस तसा अंगांत राहिला तर रक्तांतील तांबडे कण अल्बूमेन, व अल्कलीचे ( अम्लविरुद्धक्षार ) कमी होतात. याप्रमाणें रक्त कमी होऊन बिघडून जातें.

**तिसरी गोष्ट.**—ज्वरांत आतेझीज चालत असते. ही गोष्ट रोग्याच्या लघवीवरून व तो जरी बरेंच खात असला तरी त्याच्या क्षीणतेवरून सहज सिद्ध होते. शरीरांतील अगदीं पहिल्या प्रथम दिसून येण्यासारखी झीज म्हटली म्हणजे चर्बीची होय. त्याच्या खालोखाल मांसल भागाची व त्याच्या खालोखाल केव्हां हाडांची देखील झीज थोडांशी होतेच. जरी आरोग्य स्थितींतील पेक्षां ज्वरांत मूत्रद्वारें बरेच अधिक क्षार जात नाहींत तथापि ज्वरांतील खाण्यापिण्याच्या मानानें ते अधिकच असतात. ताप चढण्याचे पूर्वी व पुढें देखील ' यूरिया ' हा क्षार लघवींत अधिकच असतो. हा जो ' यूरिआ ' नांवाचा क्षार लघवींत असतो तो आरोग्य स्थितींतल्या प्रमाणें अन्नांतील पदार्थापासून उत्पन्न झालेला नसून आपल्या शरीरांतील कांहीं रचनेचा व रक्तांतील कणांचा र्‍हास होऊन उत्पन्न होतो; आणि ही गोष्ट पुढील हकीकतीवरून सिद्ध होते:—ज्वरांतील लघवीमध्यें आरोग्य स्थितींतील लघवीपेक्षां अधिक पोट्याशमचे क्षार असून सोड्याचे क्षार बरेच कमी किंवा केव्हां केव्हां नसतात देखील; आणि पोट्याशमचे क्षार आपल्या शरीररचनेंत स्वाभाविक बरेच असतात. परंतु आरोग्य स्थितींतील लघवीमध्यें ते अधिक नसून बरेच कमी असतात, आणि सोड्याचे क्षार अधिक असतात, कारण, हे सोड्याचे क्षार आपल्या रक्ताच्या द्रव पदार्थांत ( प्लाझमा ) व आपल्या नेहमींच्या

अन्नांत अधिक असतात. तसेंच ज्वरांत रक्तांतील तांबड्या कणांचा ऱ्हास होतो ही गोष्ट लघवीच्या तांबड्या रंगावरून सिद्ध होते.

**चवथी गोष्ट.**— ज्वर जो कमी होतो तो हळूं हळूं कमी होतो किंवा एकदम कमी होतो. हळूं हळूं ज्वर कमी होतो ह्मटलें ह्मणजे ज्वराचीं लक्षणें तहान, उष्णता, वगैरे गोष्टी हळूं हळूं कमी होतात. ज्वर एकदम कमी होतो ह्मटलें ह्मणजे ऊष्णता एकदम कमी होऊन उत्सर्ग ( मळ, मूत्र, घाम ) बरेच होतात. याप्रमाणें रक्तांतील घाण जाऊन तें शुद्ध होतें.

**पांचवी गोष्ट.**– ज्वराचा शेवट मृत्यूमध्येंही होतो. हा भयंकर परिणाम फक्त ज्वराचाच असला पाहिजे असें कांहीं नाहीं; कारण, ज्वर बहुतकरून नेहमीं एखाद्या सांसर्गिक किंवा दुसऱ्या एखाद्या रोगाचें एक लक्षण असतें. तथापि एकंदरींत मनुष्याच्या शरीरांत जे ज्वराचे भयंकर परिणाम घडून येतात त्यांचा विचार केला असतां ज्वरामुळेंच देखील दोन तीन निरनिराळ्या रीतीनें मृत्यु येतो असें दिसतें. त्यांपैकीं मुख्य ह्मटल्या ह्मणजे उपासमारामुळें अति अशक्तता, रक्तदोष किंवा सतत व अति शरीराची उष्णता या तीन कारणांपैकीं कोणत्या तरी एका कारणानें ज्वराच्या रोग्यास मृत्यु येतो. एकसारखी सतत व अतिशय झीज चालू राहिल्यामुळें कृशता व निःशक्तता येऊन शरीरांतील निरनिराळ्या इंद्रियांच्या क्रिया विकृत होतात; आणि हीं कारणें जर लवकर काढून टाकलीं नाहींत तर मृत्यु अपरिहार्य आहे हें उघड आहे. क्षयरोगांतील संततज्वराची जी रोज चढती कळा असते ती याचें एक चांगलें धडधडीत उदाहरण होय. अशा रोगांत जी शरीररचनेची फाजील झीज होत असते त्यामुळें त्या झिजेपासून उत्पन्न झालेले वाईट विषारी पदार्थ [ यूरिआ नांवाचा क्षार व त्यासारखे दुसरे क्षार ] रक्तांत खेळूं लागतात आणि जोंपर्यंत हे विषारी पदार्थ निरनिराळ्या द्वारानें ( मळ मूत्र वगैरे द्वारानें ) शरीरांतून बाहेर जात असतात, तोंपर्यंत रक्त बरेंच शुद्ध असतें आणि त्यामुळें भरीसा वाईट परिणाम होत नाहीं.

पुढें चालू.

## कृष्णशास्त्री त्रिवलकर वैद्य मु॰ आंजर्लें ता॰ दापोली जि॰ रत्नगिरी यांचीं जगत्प्रसिद्ध, सर्वोपयोगी, निर्दोष व रामबाण औषधें.

या जाहिरातीचे खालीं "विशेष सूचना" केली आहे ती वाचकांच्या अवश्य लक्ष्यांत असावी.

### १ वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साह- बुद्धि कांतिवर्धक व धातुपौष्टिक, सुवर्णमाक्षिक- मौक्तिक- कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१ शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें त्यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्व भागीं व त्याच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, कोणत्याही कारणांनीं आलेली अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, उन्हाळे, छातींतील रोग, मस्तकशूळ, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूळव्याधि, भगंदर, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूळ, कटिवात, वातरोग, निद्रानाश, चक्कर, कफातिरेक, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, सूतिकारोग, व्रण, हात, पाय, मूत्रमार्ग व शरीर यांचा दाह, ठणका, ग्लानि, अरुचि, मूत्राश्मरी व चित्तभ्रम इत्यादि अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले, नवीन किंवा जुनाट असले तरी अगदीं खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति, व बुद्धि हीं वाढतात. ज्यांस फिरण्याचे, अभ्यास करण्याचे लिहिण्याचे व शिकविण्याचे श्रम फार पडतात त्या सर्वांच्या अंगीं यांणीं

अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो व सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें. कोष्ठशुद्धि होते. कोष्ठांतील अनियमित व्यापारांपासून होणारे दुष्ट परिणाम टळतात. या अप्रतिम गुटिका अत्यंत उपयुक्त शोधानें केल्या असून यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें आहेत, सबब जास्त वर्णन येथें करीत नहीं यांत अपायकारक पदार्थ बिलकुल नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस या अत्यंत उपयोगी आहेत वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषध नाहींच असें स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात, यामुळें यांचा अतिशय खप सुरू आहे. हल्लीं या गोळ्यांत अंतर्वेदी, नेपाळ, काश्मीर इ० देशांतील अत्यंत शुद्ध, ताजे, महत्वाचे व मौल्यवान असे अनेक पदार्थ आणखी घालून त्यांची विशेष सुधारणा केली आहे आणि लोकाग्रहावरून केवळ परोपकारार्थ ह्मणून गोळ्यांचा दर फारच स्वस्ता केला आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व ट. खर्च माफ आहे. अनुपान ख० सोबत देऊं. एकदम १६ गोळ्यांस १ रु., ३६ गो० २ रु., ८० गो० ४ रु, व १३० गो० ६ रु.

## ३. थंडगार नेत्रांजन

हें परम गुणकारक अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टाचा समूळ नाश करणारे तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खाऱ्या, जळजळ, कंडू, फूट, चिकटा, ठणका, व लाली, इ. अनेक विकार तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यांस कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा बिलकूल न होतां बरे होतात.

दृष्टि तीव्र व थंडगार राहते. शिवाय जागरण, उन्हांत फिरणें

अग्नीचा शेक, उपदंशविकार, अतिवाचन, अतिव्यायाम, अतिमैथुन, अतिमद्यपान, अत्युष्ण व विदाही पदार्थ भक्षण, इ० कारणांनीं ज्यांचे डोळे बिघडतात त्यांस याचा फारच मोठा उपयोग आहे. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार बिलकूल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगी आहे. २ तो० ड० १॥ रु०

## ४. कर्णस्रावनाशक अप्रतिम तेल.

हें उत्तम तेल कानांत घातल्यानें कानांतुन पू वाहणें, तत्संबंधीं ठणका, कंडू, दाह, रक्तस्राव, इ. विकार तत्काळ बरे होतात. कानांतील कोणत्याही प्रकारचे साधारण व्रण तर तत्कालच, परंतु कानाचा समूळ नाश करणारे जुनाट किंवा हाडीं खिळून बसलेले कितीही वयाचे मनुष्याचे व कोणत्याही कारणानें प्राप्त झालेले अनेक प्रकारचे असाध्य व्रण कोणतीही इजा किंवा आग वगैरे बिलकुल न होतां अगदीं खात्रीनें बरे होतात बाटलीस रु० १ शिवाय प्या० ख० दोन आणे. रोखीनें किंवा व्हॉ. पे. पार्सलनें खालील पत्यावर मागविल्यास पाठवूं. अनुपान खर्डा बाटलीसोबत.

**५. पर्म्यावर अपूर्व मिश्रण.**—कोणत्याही प्रकारचा नवीन किंवा जुनाट पर्मा, तत्संबंधी दाह, तिडीक, मूत्राची विवर्णता, संकोच किंवा मूत्रातिरेक इ. विकारांसह या मिश्रणापासून इजा बिलकुल न होतां व पथ्यसेवनाची खटपट नसतां तावडतोब बरा होतो. पर्म्यावर इतकें प्रतिष्ठेचें औषध दुसरें नाहींच. बा. १ रु.

**६. दंतरक्षक पूड.**— ही चोळिल्यानें दंतसंबंधी सर्व विकार हिरड्यांचा रक्तस्राव व व्रण, पू, कीड इ. फारच त्वरित व नाजूक रीतीनें बरे होऊन दांत स्वच्छ व फार मजबूत होतात. ड. ६ आणे.

७. गजकर्ण, नायटे, खरूज इ. विकार ३ दिवसांत बरे होतात. ड. ६ आणे.

८. विंचवाचें विष हें औषध लावतांच उतरतें. ड. ८ आणे. इतकें औषध ४० मनुष्यांस पुरतें.

वरील औषधें अत्यंत खात्रीचीं आहेत. त्यांणीं हजारों लोकांस गुण आला व नित्य येत आहे. अनुभवानंतर पक्की खात्री होईलच. याशिवाय आमच्या येथें कस्तूरीच्या उत्तम कातगोळ्या, तमाखूच्या अर्काच्या कस्तूरीमिश्र गोळ्या, उत्तम सुगंधी अत्तरें व ग्रंथोक्त रसायनें, धातूंचीं भस्में, पाक, तैलें, चूर्णें, गोळ्या, घृतें, आसवें, द्राव, क्षार हेमगर्भादि रसायनें इ. औषधें माफक किंमतीस मिळतील. पाहाण्यासाठीं सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. अनुपान पत्रक औषधासोबत पाठवूं. पत्ता सुवाच्य. कोणीं प्रकृतिमान कळविल्यास रोगाचें निदान व योग्य चिकित्सा कळवूं. औषधें रोखीनें किंवा व्ही. पी. नें विकत मिळतील. टपालखर्च वेगळा पडेल. गरीब लोकांस स्वस्त दरानें औषधें देऊं. जाहिरातीच्या खालील किंवा वरील पत्यावर मिळतील. या औषधांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून त्यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटां मिळविल्या आहेत व नित्य मिळत आहेत

**विशेष सूचनाः—** आलीकडे वर्तमानपत्रांतून आंजर्लें व नजीकच्या मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या नवीन बऱ्याच जाहिराती सुरू झाल्या आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींच्या खालीं किंवा वर ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या ग्राहकांस भासण्याचा संभव आहे, यामुळें कदाचित् ग्राहकांचा घोंटाळा होईल. तरी अशा लोकांशीं व त्यांच्या जाहिरातींशीं आमचा कोणत्याही प्रकारें अगदीं संबंध नाहीं हें ग्राहकांनीं अवश्य लक्षांत ठेऊन, आमचीं औषधें मागणें तीं "**कृष्णशास्त्री विवलकर वैद्य मु० आंजर्लें ता० दापोली जि० रत्नागिरी**" या अगदीं बिनचूक सही व पत्यावर मागवावींत.

**कृष्णशास्त्री विवलकर.**

**पत्ता—** मु० आंजर्लें, ता० दापोली, जिल्हा रत्नागिरी.

हिंदुस्थानचित्र टाइम पीसेस, साधें, अलार्म, स्प्रींग, जंपिंग, इ रु.३।५।८।१०तें ३० पर्यंत. हिंदु.चित्र १८ व २६ आहेत. प्याकिंग, पोस्टेज, मनीआरडर खेरीज. घड्याळाबरोबर कमान, काच, पेटी, व उत्तम छेडाही ग्यारंटीसह फुकट मिळेल. सर्व प्रकारच्या घड्याळांची दुरुस्ती माफक दरानें ग्यारंटीसह करून दिली जाईल अनेक रोगांवर गुण देणाऱ्या बजेच्या आंगठ्या, पुतळ्या, लेखण्या इ० मिळतील. वि. मा. क्याटलाग मागवा.

**जी० बी० नाईक आणि कंपनी.**
वॉच मरचंटस्, **भायखळा, मुंबई.**

---

**गोपीनाथ कृष्णाजी क्षत्रियकृत**



**अचूक गुणकारी औषधें.**

पुणें येथील सन १८८८ सालांतील देशी कलाकौशल्याचे जंगी प्रदर्शनांत औषधांच्या योग्यतेबद्दल व गुणाबद्दल सर्टिफिकिट ( दाखला ) मिळालें आहे

**ज्वरांकुश**- तापावर रामबाण तीन दिवसांत हाटकून हिंवताप व पाळीचे ताप जातात. पैसे परत करणाऱ्या पैजेच्या हिंवतापाचे औषधांपेक्षां हें किती गुणकारी आहे ह्याची अनुभवाअंतीं खात्री होईलच. कारण, जास्त फाजील लिहिण्यांत हंशील नाहीं. किं.रु.१ ट. व बं. खर्च १८-

**जुलाब, पोटदुखी व पटकी बंद करण्याचें वस्ताद औषध** प्रत्येक कुटुंबानें अवश्य संग्रहीं ठेवावें. किं. ॥।. ट. बं. ख. ॥

**शक्तीवरील गोळ्या**— नंबर १, बलवर्धक, शक्तिवर्धक, पौष्टिक, इत्यादि. विशेष माहिती पत्र पाठविल्यास मिळेल. किं. १०० गो.रु.३॥ ट. व बं. ख. ।≈

**कपाळशूळ व अर्धशिशीवर.**— पांच मिनिटांत गुण. किं. रु० १॥ ट. व बं. ख. ॥.

**शक्तीवरील गोळ्या.**—नंबर २-सुस्तीवर, पानथर, मुलांचे डब्यावर व अफूचे व्यसनावर वस्ताद. किं. रु.१ ट. व बं. ख. ।≈

**पूपम्यावर वस्ताद.**—ह्या औषधानें बारांपेक्षांही कमी तासांत

खात्रीनें गुण पडतो. किं. रु. १ ट. व बं. ख. ।॥.

**केंस काळेभोर करण्याचा कलप.** किं. रु. १ ट. व बं. ख. ।≡

**रक्तोपतीवर रामबाण.**—किं. रु. ६ ट. व बं. ख. ॥।

**खोकल्यावर गोळ्या.**- किं. ॥। ट. व बं. ख. ।≡

**गजकर्ण व खरजेवर मलम.**— किं. ।≈ ट. व बं. खर्च तीन डब्यांपर्यंत. ।≈

**नेत्रसंजीवनी थेंब.**— किं. रु. १ ट. व बं. ख. ॥.

**मूळव्याधीवर चूर्ण अथवा मलम.**-किं. रु. २ ट. व बं. खर्च ।≡

**वायुनाशक तेल.**– किं. ।. ट. व बं. ख. ॥.

**खोकल्यावर सरबत.**- (दम्यावर फारच गुणकारी) कि० रु. १ व बं. खर्च .॥.

**बालसंजीवन.**— किं. रु. १ ट. व बं. खर्च .॥.

**कर्णरोगावर थेंब.**— किं. .॥। ट. व बं. खर्च .॥.

**दांतांचें मंजन.**—किं. .।. ट. व बं. खर्च ३ डब्यांपर्यंत .॥.

**केशवर्धक तेल.**— किं. रु. १ ट. व बं. ख. .॥।.

**जुलाबाच्या गोळ्या.**— किं. .।≈ ट. व बं. ख. .।≡

**अन्नपाचक गोळ्या**— किं. .॥. ट. व बं. ख. .।≡

**मुलांचे ताड्यावर.**— (आंकडीवर) रामबाण— किं. रु. ३ व रु. २ ट. व बं. ख. .॥.

**केंस जाण्याचें औषध.**— किं. रु. १ ट. व बं. ख. .॥. हें पाण्यांत भिजवून लेप करून खरवडल्यास तात्काळ केंस जातात.

**बाळंतपणावर अर्क.**— हें सतत घेतलें असतां बाळंतरोग साफ बरा होतो. किं. रु. ४ ट. व बं. ख. रु. २॥

**मुद्दाम उन्हाळ्याकारितां.**— थंडगार, हुषारी आणणारी व रुत येणारी सर्बतची भुकणी, किं. रु. १ ट. व बं. ख. रु. १८

इंग्रजी डाक्तरांकरितां लागणारीं औषधें विलायतेहून आणविलीं आहेत. त्यांचा क्याटलागही अर्ध्या आण्याचें टिकिट पाठवून मागवा.

**वैद्य गोपीनाथ कृष्णाजी क्षत्रिय.**

१ ली सदाशिवजीची गल्ली, गिरगांव पोस्ट आफिसाचे समोरचे गल्लींत, मुंबई.

———————

पत्ता.--डा० रानडे यांचा दवाखाना, सोलापूर.

# भिषग्विलास

## BHISHAGVILASA.

वैद्यकसंबंधी अनेक विषयांचें सुबोध भाषेंत मासिक पुस्तक.

A Monthly Magazine in Marathi to popularise Medicine.

आयुःकामयमानेन धर्मार्थसुखसाधनं ॥
आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः ॥ १ ॥

पुस्तक ४. फेब्रुवारी १८९६ अंक ११.

विषयानुक्रम. पान.


| विषय | पान |
| --- | --- |
| चित्ताकर्षणशास्त्र अथवा मोहिनीविद्या .... .... | ७ |
| ज्वर .... .... .... .... .... | १६१ |
| जळवा .... .... .... .... .... | १६२ |
| उपयुक्त औषधीसंग्रह .... .... .... | १६६ |


सोलापूर

आनंदवृत्त छापखान्यांत छापिला.

वर्षांची अगाऊ वर्गणी ट. ह. सह ३ रु.

## करमणूक करून घ्या आणि पैसाही मिळवा ! ! !

मराठी ग्रंथसंग्रहांत एक उत्तम पुस्तकाची भर घालण्याचें श्रेय घ्या.

## आनंदमठ.

ही स्वदेशाभिमान उत्पन्न करणारी मनोरंजक ऐतिहासिक कादंबरी बंगाली भाषेंत **श्री बंकिमचंद्र चट्टोपाध्याय**–ज्यांस बंगाली भाषेचा पिता ह्मणतात–यांनीं लिहिली आहे. लिबरल पत्रांत या पुस्तकावर एक उत्तम स्तुतिपर लेख आला आहे. याचें एका विद्वान ग्रंथकारानें मराठींत भाषांतर केलें आहे, तें आह्मी छापून प्रसिद्ध करणार आहों. डेमी द्वादशपत्री सांच्याचीं सुमारें २५० पृष्ठें होतील. कागद ग्लेज व जाड, टाईप सुंदर, सोनेरी अक्षरांनीं युक्त कापडी बाइंडिंग, वगैरे गोष्टींनीं हें पुस्तक सर्वांगसुंदर होईल. किंमत फारच माफक ह्मणजे १। रु ठेविली असून,

**या पुस्तकाच्या प्रत्येक वर्गणीदारास दोन पासून दोनशेंपर्यंत रुपये मिळविण्याची संधि मिळणार आहे ! ! !**

कारण, वर्गणीदारांच्या नंबरांच्या चिठ्या घालून इनामें देण्यांत येतील. निदान पांच हजार वर्गणीदार होतील असा अदमास आहे. असें झाल्यास २००,१००,५०,२५,१०, ५,२ अशा रुपयांचीं अनुक्रमें १,२,४,८,२५,३०,२५ बक्षिसें (एकंदर १२५० रु०) दिलीं जातील. मुंबईतील ठळक ठळक वर्गणीदार व डॉ. पाठक, डॉ. देशमुख, डॉ. काणे यांच्यासारख्या गृहस्थांस निमंत्रण करून त्यांच्या पुढें चिठ्या काढल्या जातील. पुस्तकें १८९६ च्या मार्चांत आश्रयदात्यांस मिळतील. किंमत आगाऊच आली पाहिजे व ती येत्या फेब्रुवारीच्या २९ तारखेच्या आंतच. प्रत्येक वर्गणीदारास आमच्या सहीची पावती मिळेल. बाहेरगांवीं पोस्टांतून पाठविली जाईल.

**दहा वर्गणीदार करून देणारास एक पुस्तक मिळून इतर वर्गणीदारांप्रमाणेंच इनामांचीही संधि मिळेल ! ! !**

बाहेर गांवच्या वर्गणीदारांनीं ट. ख. करितां **दोन आणे** जास्त पाठवावे. आह्मीं बाहेरगांवीं एजंट नेमलेला नाहीं. विशेष माहिती मंडळीशीं पत्रव्यवहार केला असतां समजेल.

# भिषग्विलास.

पुस्तक ४ फब्रुवारी १८९६. अंक ११

## ज्वर.

लेखक—डा. भागवत, एल्, एम् ॲन्ड एस.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

आणि ते शरीरांतून जाण्याचे बंद झाले कीं, मूर्च्छा, तीव्र ज्वर, फेंपरें, वगैरे लक्षणें उत्पन्न होऊन रोगी तात्काळ मृत्यूच्या मुखांत पडतो. अमुक एक डिग्रींपेक्षां अधिक उष्णता सतत अंगांत असली तर प्राणरक्षण अगदीं अशक्य होय. कुत्रा, ससा, वगैरेंच्या अंगांतील स्वाभाविक उष्णतेपेक्षां ११ पासून १३ डिग्री जास्त उष्णता कांहीं वेळ झाली तर हे प्राणी मरतात, असें प्रयोग करून सिद्ध केलें आहे. परंतु मनुष्याला त्याच्या स्वाभाविक उष्णतेपेक्षां ( ९८·६ ) किती जास्त उष्णता असली तर मनुष्य वाचूं शकेल हें अद्याप चांगलें समजलें नाहीं. तथापि ११० डिग्रींपेक्षां ज्यास्त उष्णता मनुष्याचे शरीरांत कांहीं वेळ राहिली तर तो जीवंत राहूं शकत नाहींच. शिवाय १०७ डिग्री उष्णता कांहीं वेळ राहिली तरी देखील जीवंत राहणें अशक्यच आहे. अति उष्णतेपासून जेव्हां मृत्यु येतो तेव्हां हृदयावर व दुसऱ्या सर्व चैतन्यरचनेवर ( living protoplasm ) अति उष्णतेचे परिणाम झालेले दिसतात. तीव्र उष्णतेपासून मेंदूवरही कांहीं विलक्षण परिणाम झालेले दिसतात. या परिणामांचीं प्राथमिक लक्षणें तळमळ, असमाधान, मन गोंधळणें, मनाचा क्षोभ वगैरेहीं होत; आणि नंतर वेड्याप्रमाणें मनाचा संक्षोभ, हळूं हळूं बडबड, पुढें आंचके व तीव्र मूर्च्छा येऊन मृत्यु येतो. यांतील किती व कोणतीं लक्षणें अति उष्णतेपासून होतात हें कांहीं बरोबर सांगतां येत नाहीं. आणि ज्या वेळेस अगदीं शेवटीं अंगांत उष्णता चढूं लागून मृत्यु येतो त्यावेळेस

मरणानंतरही शरीरांतील इंद्रियांची उष्णता कांहीं वेळ वाढतच असते.

येथपर्यंत ज्वराबद्दल जी माहिती सांगितली तीवरून येवढें सिद्ध होतें कीं, ज्वराची उष्णता ही शरीररचनेची होत असलेली पुष्कळ झीज व तींत लुप्त असलेल्या उष्णतेचें प्रकटीकरण होय. ज्वर आला असतां रुधिराभिसरण व श्वासोच्छ्वास जोरानें चालूं लागतात. यावरून शरीरांत कांहीं तरी विलक्षण जोराच्या क्रिया चालल्या असल्या पाहिजेत हें साहाजिकच आहे. त्या क्रिया झटल्या ह्मणजे फुफुसांतून कार्बानिक असिड् वायु व मूत्रांतून यूरिआ वगैरे क्षार नेहमींपेक्षां बरेच जास्त जाणें या होत. या क्रियांचें शास्त्रीय रीत्या कारण कोणतें असें जर कोणी विचारील तर त्याला येवढेंच उत्तर देतां येईल कीं, मेंदूमध्यें उष्णता उत्पन्न करण्याचा एक भाग ( शक्ति ) आहे त्याचा थोडासा क्षोभ झाला ह्मणजे तो शरीरांतील आपली उष्णता वाढविण्याची क्रिया सुरू करतो, यापेक्षां पलीकडे कांहीं सांगतां येत नाहीं. (पुढें चालू)

## जळवा.

लेखक—डा. प्रभाकर बाळाजी केसकर.

१. जळवा हिंदुस्थानांतील बहुतेक भागांत, सर्व ऋतूंमध्यें आणि विशेषेंकरून पर्जन्य कालांत, तळीं व दलदलींच्या जागीं, सांपडतात. कांहीं रोगनिवारणार्थ त्यांची योग्य रीतीनें योजना केली असतां त्यांपासून किती फायदा होतो हें पुढील माहितीवरून ध्यानांत येईल.

२. जळवांच्या शरीरांचा आकार निरानिराळा असतो. ह्मणजे कित्येकांचा लांब तर कित्येकांचा आंखूड ; कित्येकांचा फार बारीक तर कित्येकांचा जाड असतो. त्या आपल्या शरीराच्या मानाप्रमाणें मनुष्याचें रक्त शोषून घेतात. फार लहान आकाराच्या जळवा आपल्या शरीराच्या वजनाचे अडीच पट, त्यापेक्षां जरा मोठाल्या किंवा मध्यम लहान चौपट, मोठ्या पण मध्यम आकाराच्या पांच पट आणि अतिमोठ्या सहा पट रक्त शोषून घेतात. ह्मणून आपणास जितकें रक्त

काढावयाचें असेल त्याप्रमाणें आपण लहान अथवा मोठ्या जळवांचा उपयोग करावा. जी जळू मध्यम आकाराची आहे ह्मणजे जिची लांबी एरव्ही दोन इंच असते ती चांगली. हिंदुस्थानांत सर्वत्र ज्या लहान लहान जळवा सांपडतात त्यांचा उपयोग करण्यास पुढील हरकती आहेत—( १ ) त्यांच्या उपयोगाकडून शरीरास अनेक छिद्रें पडतात. ( २ ) त्या लावण्यास जास्त वेळ लागतो. ( ३ ) त्यांचा उपयोग केल्यापासून फार रक्तस्राव होतो आणि तो बंद करणें फार त्रासाचें होतें. तसेंच अति मोठ्या जळवांचा उपयोग केल्यास शरीरास मोठें छिद्र पडतें, आणि तें बंद झाल्यावर त्या ठिकाणीं मोठा वण पडतो, तो जन्मभर तसाच राहतो. मोठ्या जळवा लहान लेंकरांस व विशेषेंकरून तान्ह्या बाळांस कधींच लावूं नयेत.

३. जेव्हां एक अथवा दोनच जळवा लावावयाच्या आहेत तेव्हां त्या अशा बेतानें हातांत धराव्या कीं, त्या जेथें लागाव्या असें आपल्या मनांत आहे तेथेंच लागतील. पण जास्त जळवा लावण्यास ही रीति उपयोगाची नाहीं; तर जितक्या जळवा आपल्या मनांत लावावयाच्या आहेत तितक्या सर्व एका लहानशा ग्लासांत घालून तो अशा प्रकारें शरीराजवळ धरावा कीं, त्या सहज रीतीनें शरीरास लागतील.

४. जळवा ताबडतोब शरीरास लागण्यासाठीं शरीराच्या ज्या भागास त्या लावावयाच्या आहेत तो भाग, साबण व पाणी यांनीं, प्रथम स्वच्छ धुवून कोरडा करावा. आणि विशेषेंकरून जर त्या ठिकाणीं एखादें विषारी औषध पूर्वी चोळलेलें असेल तर मग तो भाग धुवून कोरडा केल्यांवांचून त्या जागीं जळू लावूंच नये. जळवा जेव्हां लवकर लागत नाहींत तेव्हां पुढील कृति करावी—( १ ) त्या पाण्यांतून काढून दहा मिनिटेंपर्यंत गरम कापडांत ठेवाव्या; (२) ज्या भागास त्या लावावयाच्या असतील तो भाग साईनें अथवा दूध व साखर यांनीं माखावा; (३) ज्या शरीराच्या भागास जळवा लावावयाच्या असतील तो खाजवावा अथवा तेथें टोंचून थोडें रक्त काढावें व मग जळवा लावाव्या. जळवा लावण्याचे वेळीं गंधक, शिरका अथवा

तंबाखू यांचा धूर घरांत केल्यास त्या लागत नाहींत, ही गोष्ट लक्षात ठेवण्याजोगी आहे.

५. ज्या विवक्षित ठिकाणीं आपणास जळवा लावावयाच्या आहेत, त्यावर शाईपित्या कागदास जितक्या जळवा लावावयाच्या आहेत तितकीं भोकें पाडून तो लावावा, आणि ग्लासांत जळवा घालून तेथें धराव्या. ह्मणजे कागदानें झाकलेला भाग त्यांस खरबरीत लागल्यामुळें शरीराचा जो भाग मोकळा असेल तेथें त्या लागतील. शाईपिणारा कागद ओला केला ह्मणजे तावडतोब तो काढतां येतो.

६. स्वाभाविकपणें पंधरा वीस मिनिटांत जळवा खालीं पडतात, पण न पडल्यास त्यांवर थोडें मीठ व शिरका ( अंब ) शिंपडावा ह्मणजे त्या खालीं पडतील.

७. जळवा लावलेल्या जखमांतून जर ज्यास्त रक्त वाहविणें असेल तर त्या गरम पाण्यानें धुवाव्या. त्या बंद करणें झाल्यास चिंध्या जाळून त्यांची राख करून ती जखमांच्या तोंडांवर लावून जोरानें दाबावें. अथवा त्यांवर कातणीचें घर अथवा तंबाखूच्या पानाचा तुकडा लावावा. या उपायांनीं राखेपेक्षां रक्त लवकर बंद पडतें. जर यानेंही बंद होणार नाहीं तर त्यांवर फटाकडीची अथवा मोरचुदाची बुकणी टाकावी, ह्मणजे तें तावडतोब बंद होईल.

८. नाकांत अथवा गुदांत अथवा शरीरांतील कोणत्याही मोठ्या छिद्रांत जळू गेल्यास तीस बाहेर काढण्यास पिचकारी मारावी, अथवा तीस शिरका अथवा मिठाचें पाणी लावावें, ह्मणजे ती बाहेर येइल.

९. मोठाल्या शिरांवर, डोळ्यांच्या पापण्यांस, बायकांचे छातीस विशेष करून त्या गरोदर असतांना, तसेंच शिश्नाचें पोकळ कातडीस व अंड्यास जळवा कधींही लावूं नयत. कारण, अशा ठिकाणीं लावल्यास पुष्कळ रक्तस्राव होऊन, त्यावर सूज येईल आणि ठणका व दाह उत्पन्न होण्याचा संभव आहे.

१०. मोठ्या मनुष्यांपेक्षां लहान मुलास जळवा लावतांना फार

जपलें पाहिजे. कारण, प्रौढ मनुष्यापेक्षां लेंकराचे शरिरांतून रक्तस्राव ज्यास्त होत असतो. जळवा लावण्याची जरूरी असल्यास त्या हाडांच्या ठिकाणीं लावाव्या ह्मणजे प्रसंगीं रक्तस्राव झाल्यास त्या हाडावर दाबून तो बंद करण्यास सोईचें पडेल. संध्याकाळापेक्षां सकाळीं जळवा लावणें अधिक सोईचें आहे. संध्याकाळीं लावल्यास मुलांच्या संरक्षकांस झोंप येईल आणि त्यांचा संभाळ व्हावा तसा न झाल्यास जखमांचीं छिद्रें उघडीं होऊन त्यांतून रक्त वाहिल्यामुळें लेंकराचा जीव धोक्यांत पडण्याचा संभव आहे. सारांश अशा रीतीनें लेंकरें मेल्याचीं उदाहरणें वाचण्यांत आलीं आहेत. एका वर्षाचे मुलास एक जळू, दोन वर्षांचे मुलास दोन, याप्रमाणें प्रत्येक वर्षास एक जास्त या मानानें मूल सहा वर्षांचें होईपर्यंत जळवा लावाव्या. साधारण विकृतीमध्यें सहा वर्षांच्या पुढें वयाच्या मानानें तारुण्य प्राप्त होईपर्यंत चढत्या प्रमाणानें जळवा लावाव्या.

११. ज्या तापांत डोकें फार दुखतें त्यांत जळवा लावाव्या. परंतु रोगाच्या प्रारंभीं लावाव्या. रोगी सशक्त असल्यास मस्तकाचे ( कानपट्टीस ) प्रत्येक बाजूस चार पासून सहा जळवा लावाव्या. परंतु कधीं कधीं मानेच्या कांड्यावर लावल्यास लवकर आराम वाटतो. तापांत पोट अथवा छाती फार दुखूं लागल्यास जेथें दुःख आहे त्या ठिकाणीं, आठ, दहा, जळवा लावाव्या, ह्मणजे इजा नाहींशी होते.

१२. मूळव्याधीमध्यें रक्तस्राव बंद होऊन जर डोकें दुखूं लागलें किंवा जड झालें तर गुदद्वाराजवळ जळवा लावाव्या. परंतु त्या आंत न शिरतील याविषयीं काळजी वहावी. स्त्रियांची मासिक अवस्था ( विटाळ ) एकाएकीं बंद झाली तर जंघेच्या आंतल्या बाजूस जळवा लावाव्या.

१३. उग्रातिसाराच्या उपद्रवांतही गुदद्वारास सहांपासून नऊ जळवा लावल्यास शौचसमयीं होणारें दुःख व कुथणें कमी होऊन दुसऱ्याही व्यथा नाहींशा होतात. त्याचप्रमाणें यकृतांत रक्तसंचय झाल्यास त्याच्या बाजूस जळवा लावल्यास त्यापासून फार

फायदा होतो. पण त्यापेक्षांही जास्त गुदद्वारास लावल्यास फायदा होतो.

१४. सर्व प्रकारच्या त्वग्दाहामध्यें ह्मणजे अपक्क पूभरित फोड व गळूं, तसेंच ठेंचलेले, मुरगळलेले, आणि टेंगुळें आल्या जागीं (ज्यांत अतिशय दुःख व दाह आहे ) सहापासून आठ जळवा लावाव्या, आणि मागाहून तो भाग शेकावा, ह्मणजे दुःख शमन होऊन सूज उतरेल.

१५. जर मूल बळकट आहे तर त्यास डांग्या खोकला लागतांच वयाच्या मानानें दर वर्षास एक प्रमाणें सहा वर्षांच्या वयाच्या मुलापर्यंत सहा जळवा मानेच्या कांद्यावर लावाव्या. आणि ( पुढेंही तितक्याच लावाव्या. ) त्या नंतर त्या ठिकाणीं मोहऱ्यांचें पोटीस अथवा लहान ब्लिस्टर मारावें. तेणेंकरून चांगला गुण येतो. गरज असल्यास पुनः जळवा आणि मोहऱ्यांचें पोटीस यांचा उपयोग करावा.

## उपयुक्त औषधीसंग्रह.

**कुडा**—( सं. कुटज ) कुड्याची साल पौष्टिक व ज्वरघ्न आहे. तथापि मुख्यतः तिचा उपयोग **आमांशांत** फारच चांगला होतो, ( भिषग्विलास पु. १ पा. १७७ पहा. ) असें युरोपिअन डाक्तरांचेंही अनुभवसिद्ध मत आहे. इंग्रजी इपिक्याकप्रमाणें किंबहुना अधिक ह्या सालीचा उपयोग आमांशांत होतो व देशी वैद्यकांत तर आमांशावर कुड्यासारखें औषध दुसरें नाहीं ह्मटलें तरी चालेल. कुड्याच्या नुसत्या सालीचा काढा कारितात—पांच तोळे साल घेऊन शेरभर पाण्यांत काढा करून निम्मा उरवावा व त्यापैकीं दोन तोळे काढा तीन चार वेळ पोटांत द्यावा. प्रत्येक खेपेच्या काढ्यांत एक थेंब अफूचा अर्क घालावा. कुड्याचें बीं ( इंद्रजव ) सुद्धां आमांशावर चालतें. इंद्रजव शिवाय पौष्टिकही आहेत. आपल्या वैद्यकांत **कुटज**-

**लेह, कुटजारिष्ट,** इत्यादि कुड्याचे अनेक कल्प सांगितले आहेत. सारांश, कुडा कोणत्याही रूपानें **आमांश, हगवण, ज्वर, जंत,** इत्यादि विकारांत देण्यास मोठा प्रशस्त आहे. विशेषतः कोंकणामध्यें लहान मुलांना कुड्याचें पाळ उगाळून रोज घालण्याचा बायकांचा प्रघात आहे. खरोखर हा प्रघात चांगला आहे.

**अनंतमूळ.**—डोळे आले असतांना कोंकणांत ह्या झाडाचा चीक डोळ्यांत घालतात. त्यापासून डोळ्यांतून पुष्कळ पाणी जाऊन डोळे गार होतात. अनंतमुळावर केळीचीं पानें गुंडाळून तें फुपाट्यांत भाजतात; नंतर समभाग साखर व जिरे ह्यांच्या बरोबर चूर्ण करितात. हें चूर्ण तुपाबरोबर मूत्राशयाच्या दाहांत अथवा मूत्र जळत असल्यास देतात. अनंतमुळाचा लेप सुजेवर लावितात. 'इंडियन फार्माकोपियामध्यें ह्या औषधाचा समावेश केला आहे व इंग्रजी सारसापरिलाचे ऐवजीं तो देण्यास सांगितलें आहे. अनंतमूळ मधुर, मृदुत्व आणणारें, रक्तशुद्धि करणारें, घाम आणणारें, लघवी उत्पन्न करणारें व पौष्टिक आहे. त्याचा उपयोग अग्निमांद्य, ज्वर, त्वग्रोग, धुपणी व गर्मीचे विकार यांमध्यें करावा. विशेषतः मुलांना जुनाट खोकला अथवा हगवण असल्यास अनंतमुळाचा काढा थोडें दूध व साखर ह्यांबरोबर दिल्यास चांगला उपयोग होऊन मुलास शक्ति येते.

**रुई** ( सं. अर्क )— ह्या झाडाचा चीक, मूळ, पानें व साल ह्या सर्वांचा औषधीचे कामीं उपयोग करितात. रुईच्या मुळाच्या सालीपासून शरीरांतील रस अधिक उत्पन्न होतात. तिचा, त्वग्रोगांत, पानथरी किंवा यकृत् वाढलें असतांना, जंत, खोकला, सूज, उदर, इत्यादि रोगांत उपयोग करितात. रुईचा चीक मोठा रेचक असून त्वचा जाळणारा आहे. रुईचीं फुलें पाचक व पौष्टिक असून त्यांचा उपयोग खोकला, दमा, सर्दी, व अग्निमांद्य ह्यांमध्यें करितात. रुईचीं पानें सैंधवाबरोबर तोंड बंद केलेल्या पात्रांत ( आंतील वाफ जाऊं नये ह्मणून ) भाजतात. व ती राख दह्याचे निवळीबरोबर, पानथरी किंवा यकृत वाढलें असतांना अथवा उदरामध्यें, देतात. मूळ ताकांत उगाळून,

अंडवृद्धि झाली असतां अथवा पाय मोठे झाले असतां, वर लावितात. किडून दांत दुखूं लागल्यास रुईचा चीक किडलेल्या जागीं लावल्यानें कळ राहते. युनानी वैद्यकांतही रुईचे चिकाचा उपयोग करण्यास सांगितलें आहे—डोक्याचे खवड्यांस रुईचा चीक लावावा; मूळव्या-धीचे मोड रुईच्या चिकानें जळतात; तोंड आलें असतां रुईचा चीक मधांत मिसळून त्या जागीं लावावा; महारोग, पानथरी व यकृत् वाढलें असतां, उदरांत व जंतांचा उपद्रव झाला असतां रुईच्या चिकाचा पोटांत उपयोग करितात. सांधे दुखत असून सुजले असले तरी रुईचा चीक वर लावावा; अथवा ताजीं पानें ऊन करून सांध्यांवर बांधितात. रुईचीं पानें तेलांत कढवून, वात झालेल्या भागावर तें तेल चोळावें. पानें वाळवून त्यांची भुगटी जखमेवर टाकिल्यानें जखम लौकर बरी होते. ह्या झाडाचे अंगीं उलटी करण्याचे, घाम आणण्याचे, रक्तशुद्धि करण्याचे व रेच उत्पन्न करण्याचे धर्म आहेत. इंग्रजी औषध इपिक्याकचे ऐवजीं **आमांशामध्यें** रुईच्या मुळाची साल द्यावी. म-हारोग आणि गर्मी इत्यादि त्वग्रोगांत मूळ, साल, किंवा वाळलेला रस ह्यांचा अगदीं थोड्या प्रमाणानें पोटांत उपयोग करितात. मुळाची साल मोठ्या प्रमाणांत दिल्यास वांती होते. रुईच्या दोन जाती आहेत त्यापैकीं एक तांबड्या फुलांची व एक पांढऱ्या फुलांची जात असते. तांबड्या व पांढऱ्या फुलांच्या रुई आहेत हें सर्वप्रसिद्धच आहे. दो-न्हींचे गुण जवळ जवळ सारखेच आहेत; तथापि औषधामध्यें तांबड्या फुलांच्या रुईचाच विशेषतः उपयोग करितात. पांढऱ्या फुलांच्या रुई-च्या मुळाचा दांत घांसण्याकडे उपयोग करितात. त्या-पासून दांत दुखत असल्यास राहतो. संस्कृतांत ज्यास **अर्कतैल** ह्मणतात तें खालीं लिहिल्याप्रमाणें तयार करितात—तिळाचें तेल ४ शेर, रुईच्या पानांचा रस १६ शेर, व हळद १ शेर घेऊन तीं नेहमीं प्रमाणें कढवितात. हें तेल **इसब** व दुसरे त्वग्रोग यांस लावितात. हळदीचे ऐवजीं कोणी हरताळ घालितात.

## कृष्णशास्त्री त्रिवलकर वैद्य मु॰ आंजलैं ता॰ दापोली जि॰ रत्नागिरी यांचीं जगत्प्रसिद्ध, सर्वोपयोगी, निर्दोष व रामबाण औषधें.

या जाहिरातीचे खालीं "विशेष सूचना" केली आहे ती वाचकांच्या अवश्य लक्ष्यांत असावी.

### १. वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साह- बुद्धि कांतिवर्धक व धातुपौष्टिक, सुवर्णमाक्षिक- मौक्तिक- कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१ शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें त्यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्व भागीं व त्याच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, कोणत्याही कारणांनीं आलेली अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, उन्हाळे, छातींतील रोग, मस्तकशूळ, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूळव्याधि, भगंदर, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूळ, कटिवात, वातरोग, निद्रानाश, चक्कर, कफातिरेक, उपदंशसंबंधी मुरलेले विकार, सूतिकारोग, व्रण, हात, पाय, मूत्रमार्ग व शरीर यांचा दाह, ठणका, ग्लानि, अरुचि, मूत्राश्मरी व चित्तभ्रम इत्यादि अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले, नवीन किंवा जुनाट असले तरी अगदीं खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति, व बुद्धि हीं वाढतात. ज्यांस फिरण्याचे, अभ्यास करण्याचे लिहिण्याचे व शिकविण्याचे श्रम फार पडतात त्या सर्वांच्या अंगीं यांणीं

अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो व सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें. कोष्ठशुद्धि होते. कोष्ठांतील अनियमित व्यापारांपासून होणारे दुष्ट परिणाम टळतात. या अप्रतिम गुटिका अत्यंत उपयुक्त शोधानें केल्या असून यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें आहेत, सबब जास्त वर्णन येथें करीत नाहीं. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस या अत्यंत उपयोगी आहेत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषध नाहींच असें स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात, यामुळें यांचा अतिशय खप सुरू आहे. हल्लीं या गोळ्यांत अंतर्वेदी, नेपाळ, काश्मीर इ० देशांतील अत्यंत शुद्ध, ताजे, महत्वाचे व मौल्यवान असे अनेक पदार्थ आणखी घालून त्यांची विशेष सुधारणा केली आहे आणि लोकाग्रहावरून केवळ परोपकारार्थ ह्मणून गोळ्यांचा दर फारच स्वस्ता केला आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळ्या घेणारांस बंगीचा सर्व ट. खर्च माफ आहे. अनुपान ख० सोबत देऊं. एकदम १६ गोळ्यांस १ रु., ३६ गो० २ रु., ८० गो० ४ रु., व १३० गो० ६ रु.

## ३. थंडगार नेत्रांजन.

हें परम गुणकारक अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टाचा समूळ नाश करणारे तिमिरांध्य, वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भार, गळती, खुपऱ्या, जळजळ, कंडू, फूट, चिकटा, ठणका, व लाली, इ. अनेक विकार तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यांस कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा बिलकूल न होतां बरे होतात.

दृष्टि तीव्र व थंडगार राहते. शिवाय जागरण, उन्हांत फिरणें

अग्नीचा शेक, उपदंशविकार, अतिवाचन, अतिव्यायाम, अतिमैथुन, अतिमद्यपान, अत्युष्ण व विदाही पदार्थ भक्षण, इ० कारणांनीं ज्यांचे डोळे बिघडतात त्यांस याचा फारच मोठा उपयोग आहे. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार बिलकुल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगीं आहे. २ तो० ड० १॥ रु०

## ४. कर्णस्त्रावनाशक अप्रतिम तैल.

हें उत्तम तेल कानांत घातल्यानें कानांतून पू वाहणें, तत्संबंधीं ठणका, कंडू, दाह, रक्तस्राव, इ. विकार तत्काळ बरे होतात. कानांतील कोणत्याही प्रकारचे साधारण व्रण तर तत्कालच, परंतु कानाचा समूळ नाश करणारे जुनाट किंवा हाडीं खिळून बसलेले कितीही वयाचे मनुष्याचे व कोणत्याही कारणानें प्राप्त झालेले अनेक प्रकारचे असाध्य व्रण कोणतीही इजा किंवा आग वगैरे बिलकुल न होतां अगदीं खात्रीनें बरे होतात. बाटलीस रु० १ शिवाय प्या० ख० दोन आणे. रोखीनें किंवा व्हॉ. पे. पार्सलनें खालील पत्यावर मागविल्यास पाठवूं. अनुपान खर्डा बाटलीसोबत.

**५. पर्म्यावर अपूर्व मिश्रण.**—कोणत्याही प्रकारचा नवीन किंवा जुनाट पर्मा, तत्संबंधी दाह, तिडीक, मूत्राची विवर्णता, संकोच किंवा मूत्रातिरेक इ. विकारांसह या मिश्रणापासून इजा बिलकुल न होतां व पथ्यसेवनाची खटपट नसतां ताबडतोब बरा होतो. पर्म्यावर इतकें प्रतिज्ञेचें औषध दुसरें नाहींच. बा. १ रु.

**६. दंतरक्षक पूड.**— ही चोळिल्यानें दंतसंबंधी सर्व विकार हिरड्यांचा रक्तस्राव व व्रण, पू, कीड इ. फारच त्वरित व नाजूक रीतीनें बरे होऊन दांत स्वच्छ व फार मजबूत होतात. ड. ६ आणे.

७. गजकर्ण, नायटे, खरूज इ. विकार ३ दिवसांत बरे होतात. ड. ६ आणे.

८. विंचवाचें विष हें औषध लावतांच उतरतें. ड. ८ आणे. इतकें औषध ४० मनुष्यांस पुरतें.

वरील औषधें अत्यंत खात्रीचीं आहेत. त्यांणीं हजारों लोकांस गुण आला व नित्य येत आहे. अनुभवानंतर पक्की खात्री होईलच. याशिवाय आमच्या येथें कस्तूरीच्या उत्तम कातगोळ्या, तमाखूच्या अर्काच्या कस्तूरीमिश्र गोळ्या, उत्तम सुगंधी अत्तरें व ग्रंथोक्त रसायनें, धातूंचीं भस्में, पाक, तेलें, चूर्णें, गोळ्या, घृतें, आसवें, द्राव, क्षार हेमगर्भादि रसायनें इ. औषधें माफक किंमतीस मिळतील. पाहाण्यासाठीं सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फकट पाठवूं. अनुपान पत्रक औषधासोबत पाठवूं. पत्ता सुवाच्य. कोणीं प्रकृतिमान कळविल्यास रोगाचें निदान व योग्य चिकित्सा कळवूं. औषधें रोखीनें किंवा व्ही. पी. नें विकत मिळतील. टपालखर्च वेगळा पडेल. गरीब लोकांस स्वस्त दरानें औषधें देऊं. जाहिरातीच्या खालील किंवा वरील पत्यावर मिळतील. या औषधांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून त्यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळविल्या आहेत व नित्य मिळत आहेत.

**विशेष सूचनाः—** अलीकडे वर्तमानपत्रांतून आंजर्लें व नजीकच्या मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या नवीन बऱ्याच जाहिराती सुरू झाल्या आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींच्या खालीं किंवा वर ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या ग्राहकांस भासण्याचा संभव आहे, यामुळें कदाचित् ग्राहकांचा घोंटाळा होईल. तरी अशा लोकांशीं व त्यांच्या जाहिरातींशीं आमचा कोणत्याही प्रकारें अगदीं संबंध नाहीं हें ग्राहकांनीं अवश्य लक्षांत ठेऊन, आमचीं औषधें मागणें तीं **"कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य मु० आंजर्लें ता० दापोली जि० रत्नागिरी"** या अगदीं बिनचूक सही व पत्यावर मागवावीत.

**कृष्णशास्त्री बिवलकर.**

**पत्ता—** मु० आंजर्लें, ता० दापोली, जिल्हा रत्नागिरी.

ठाकूरद्वार, मार्केट पोस्ट, मुंबई. } जगन्नाथ आत्माराम पुनाळेकर मॅनेजर, पुनाळेकर आणि मंडळी.

---

फुकट! फुकट!! फुकट!!!

**कै. प्रि. गोपाळराव आगरकर** यांचें चरित्र, पोस्टेजकरितां फक्त अर्ध्या आण्याची तिकीट पाठविली असतां, फुकट पाठविलें जाईल.

**पुनाळेकर आणि मंडळी,**
ठाकूरद्वार, मार्केट पोष्ट, मुंबई.

---

**पोंच.**

**( तिसरे वर्षाबद्दल )**
३ रा. रा. सदाशिव विष्णु भागवत.

**चौथे व पांचवे वर्षाबद्दल.**
६ रावसाहेब अनंत रघुनाथ मोडक.

**चवथे वर्षाबद्दल.**
३ रा. रा. अनंतशास्त्री रानडे.

**तिसरे व चवथे वर्षाबद्दल.**
६।८।१ रा. रा. बाळाजी सदाशिव पोष्टमास्तर.

**चवथे वर्षाबद्दल.**
३ रा. सा. गणेश पांडुरंग अगटे.

**चवथे वर्षाबद्दल.**
३ रा. रा. विठ्ठल अनंत ओक.

**महामारी**

हें प्रत्येक कुटुंबांत ठेवण्यायोग्य पुस्तक असून, विशेषतः जेथें चांगल्या वैद्याची मदत नाहीं अशा गांवांत सांथीचे दिवसांत तर फारच उपयोगी आहे. ह्यामधील उपाय अगदीं साधे व पाहिजे तेथें करतां येण्याजोगे आहेत. ह्या पुस्तकावर डा. भालचंद्र, डा. विश्राम, वगैरे विद्वान लोकांचे व वर्तमानपत्रकर्त्यांचे फार चांगले अभिप्राय आले आहेत. पुस्तकाची किंमत ८१० आहे. मुद्दाम टपाल हंशील माफ केलें आहे.

**म्यानेजर भिषग्विलास,**
डा. रानडे यांचा दवाखाना, सोलापूर.

## जी. बी. नाईक कंपनीच्या

### विजेच्या आंगठ्या, कडीं, लेखण्या व गळपट्टे.

प्रत्येक वस्तूवर G. B. N. मार्क पाहून घेत जा.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याने हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

### रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे.




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग, अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें, कंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे, काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धशिशी, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें, गळा सुजणें-सर्व प्रकारच्या मूळव्याधी, पाठींतील अशक्तता, निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे गळपट्टा- लहान मुलांचे दंतोत्पत्तीसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात. लेखणी-हातास कांपरें व स्मरणशक्ति. अशा ह्या उत्तम गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

### विजेच्या वस्तूंची किंमत

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपट्टा किं. रु. १॥ |

कमरपट्टा किंमत रु० ६.

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्हा. पे. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठीकरितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता स्पष्ट असावा. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आण. बंगी करणावळ माफ.

**जी. बी. नाईक आणि कंपनी.**

मुंबई, भायखळा, जुन्या दावणीसमोर; व पुणें, बुधवारपेठ.

पत्ता.–डा० रानडे यांचा दवाखाना, सोलापूर.

# भिषग्विलास

BHISHAGVILASA.

वैद्यकसंबंधी अनेक विषयांचें सुबोध भाषेंत मासिक पुस्तक.

A Monthly Magazine in Marathi to popularise Medicine.

आयुःकामयमानेन धर्मार्थसुखसाधनं ॥
आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः ॥ १ ॥

पुस्तक ४.     मार्च १८९६     अंक १२

विषयानुक्रम.     पान.


| विषय | पान |
|---|---|
| चित्ताकर्षणशास्त्र अथवा मोहिनीविद्या .... .... | १५ |
| शरीररचना .... .... .... .... | १६९ |
| ज्वर .... .... .... .... .... | १७३ |
| नाडी .... .... .... .... .... | १७६ |
| स्फुट लेख .... .... .... .... | १७९ |


सोलापूर

आनंदवृत्त छापखान्यांत छापिला.

वर्षाची आगाऊ वर्गणी ट. ह. सह ३ रु.

**इंदूरसंस्थान भाग १ व २**--हे त्यांचे कर्त्याकडून आमचे-कडे आले आहेत, त्यांचा आम्ही आभारपूर्वक स्वीकार करितों. भाग पहिला १५८ पृष्ठांचा असून त्याची किंमत ॥१२ आणे आहे. भाग दुसरा १८९ पृष्ठांचा असून त्याचीही किंमत तितकीच आहे. **विक्षिप्त** पत्रांतून इंदूरसंस्थानाबद्दल जो मजकूर पंचाण्णवच्या जूनपासून येत आहे त्याचा ह्या पुस्तकांत समावेश केला आहे. दोन्ही भागांतील मजकूर सर्व एकाच धोरणास अनुलक्षून आहे. ह्मणजे इंदुराधिपति **शिवाजी महाराज** ह्यांच्या वेडेपणाचें व जुलमाचें प्रदर्शन ह्या दोन्ही भागांत वाचकांपुढें मांडण्याची खटपट, आपल्या समजुतीनुसार, लेखकानें केली आहे. ही खटपट साधार आहे असेंही पुस्तक वाचतां दिसून येतें. पुस्तकांतील कोणतेंही पान उलटलें तरी महाराजांचा जुलूमच दृष्टीस पडतो. यावरून महाराजांच्या अंगीं दुसरी बाजू ( अर्थात् चांगली ) लवलेशसुद्धां नाहीं कीं काय? किंवा असल्यास लेखकानें तिकडे पहावयाचें नाहीं असा निश्चय केला असवा, अशा प्रकारचे कुतर्क प्रत्येकाचे मनांत येतात. शिवाय आमचे **कल्पतरु, धनुर्धारी**, इत्यादि बाणेदार लेखक महाराजांची तरफदारी करितात. पण ती फार त्रोटक व उडवाउडवीची अशीच दिसते. व्हीं. न. भाष्याप्रमाणें जोरदार, विस्तृत व साधार ( पुस्तकांत छटल्यावरून ) अशी ती दिसत नाहीं. तथापि हें गौड-बंगाल काय आहे व खरा भाग कोणता ह्याचा निकाल दोन्ही लेखां-वरून दूरच्या लोकांस आज करितां येणार नाहीं. तो निकाल काळ आपोआप करील. पुस्तकांत महाराजांवर कठोर शब्दांचाच प्रहार झालेला दृष्टीस पडतो. कठोर शब्द वापरल्यावांचून कार्य व्हावयाचें नाहीं अशा मताचे हे लेखक दिसतात. पण ही त्यांची चूक असावी असें वाटतें. पुस्तकाची भाषा जरी कडक व विषयाचें प्रतिपादन जरी एकाच बाजूचें आहे तरी तें अक्षरशः खरें असल्यास लेखकाचा हा इंदूर प्रजेवर मोठा उपकारच होय. एकंदरींत करमणु-कासाठीं, इंदूरच्या सांप्रतच्या राज्यव्यवस्थेचा मूर्तिमंत तसबीर पुढें उभी राहण्यासाठीं, हें पुस्तक वाचण्याजोगें आहे ह्यांत संशय नाहीं.

---

# भिषग्विलास.

पुस्तक ४ मार्च १८९६. अंक १२

## शरीररचना.

लेखकः—डा. कृष्णराव गडबोले.

### कपोलस्नायु.

२७. **चर्वकस्नायु** ( मॅसेटर ).–हा स्नायु गालांत असतो. हा कांहींसा चौकोनी असून आंखूड व मजबूत असतो. हा गंडास्थीच्या एका टोंकापासून सुरू होतो आणि हन्वस्थीच्या खालील कांठास येऊन चिकटतो.

२८. **शंखक** (टेंपरल) हा स्नायु रुंदट असतो. हा शंखस्थानीं ह्मणजे कपाळाच्या बाजूस गालांच्या वरची जी जागा ह्मणजे आंख त्या ठिकाणीं असतो. याचे तंतु शंखास्थीच्या एका टोंकापासून सुरू होऊन खालीं उतरतात, नंतर त्यांची कंडरा बनून हन्वस्थीस चिकटते. या स्नायूच्या योगानें गालांच्या वरील भागांतलि खळगी भरून येते.

२९. **वेणुवादक** (बक्सिनेटर) हा स्नायु ऊर्ध्वदंतधरास्थीपासून सुरू होऊन खालीं उतरून हन्वस्थीस चिकटतो. वाजंत्री लोकांस वाद्य वाजविण्याच्या कामीं या स्नायूचा उपयोग विशेष होतो, ह्मणून यास वेणुवादक असें नांव दिलें आहे. हा स्नायु गालांमध्यें असतो.

३० **पिष्टकस्नायु**( टेरिगॉइडियस )हे दोन असतात.एक बहिःपिष्टक व एक अंतःपिष्टक. बहिःपिष्टक जाडी व आंखूड असतो. अंतःपिष्टक चौकोनी असून जाडी असतो या स्नायूच्या योगानें तोंडाचा खालचा जबडा वरील जबड्याकडे ओढतां येतो व त्याच्या योगानें तोंडांत घातलेल्या पदार्थांचें पीठ करितां येतें.

मानेमध्यें प्रत्येक बाजूस लहान मोठे स्नायु सदतीस आहेत, तेव्हां उजव्या बाजूचे व डाव्या बाजूचे मिळून एकंदर ७४ होतात. या

स्नायूंचीं कार्यें निरानिराळीं आहेत. कित्येक स्नायु, मस्तक डावीकडे व उजवीकडे, खालीं, आणि वर, वळविण्याच्या कामीं उपयोगीं पडतात. तोंडांतील कांहीं स्नायु आहेत ते तालुस्थानचा पडदा व पडजीभ वर उचलून धरण्याचें वगैरे काम करितात. जिभेचे स्नायु पांच असतात, ते जिभेच्या अंगीं जी अनेक प्रकारची चलनवलन शक्ति असते ती उत्पन्न करण्याचें काम करितात.

## अंतराधिस्नायु.

शरीराच्या मध्यभागांतील जे स्नायु त्यांचे मुख्य चार विभाग करितां येतात ते असेः—पृष्ठस्नायु, वक्षस्नायु, उदरस्नायु, व गुह्यस्नायु.

पृष्ठस्नायु ह्मणजे पाठीचे स्नायु हे प्रत्येक बाजूस २९ असतात. तेव्हां पाठीच्या कण्याच्या उजव्या बाजूकडील व डाव्या बाजूकडील मिळून एकंदर ५८ होतात. पाठींत या स्नायूंचे एकंदर सहा थर असतात. हे स्नायु मोठे जोरदार असून कांहीं चौकोनी व कांहीं दोरी-सारखे असे असतात. या स्नायूंपैकीं कांहीं स्नायु मस्तक मागें वळवि-ण्याच्या कामीं उपयोगीं पडतात; कांहींच्या योगानें खांदे खालीं वर करितां येतात; कांहींच्या योगानें बरगड्या खालीं वर करितां येतात; कांहींच्या योगानें पाठीचा कणा ताठ राखण्याची शक्ति येते; व कांहीं स्नायु डाव्या उजव्या कुशीस वळविण्याच्या कामीं उपयोगीं पडतात.

## वक्षःस्नायु.

वक्षःस्थळांत ह्मणजे छातीच्या भागांत स्नायूंचे पांच थर अस-तात. अगदीं पुढल्या स्नायूस स्थूलौरस ( पेक्टॉरॅलिसमेजॉर ) असें ह्मणतात. स्थूलौरसाच्या खालीं जो लहानसा स्नायु असतो त्यास क्षुद्रौरस ( पेक्टॉरॅलिसमायनॉर) असें ह्मणतात.

३१. **स्थूलौरस** याचे तंतु जत्रूच्या अर्ध्या भागापासून व सर्व बरगड्यांच्या तरुणास्थींपासून सुरू होऊन आडवे जातां जातां एकवट होऊन त्यांची एक मजबूत कंडरा होते, ती भुजास्थीच्या एका कोरेस चिकटते. हाताचा रट्टा छातीकडे ओढणें हें या स्नायूचें मुख्य काम आहे.

३२. **क्षुद्रोरस** (पेक्टॉरिलसमायँनार) या स्नायूचे तंतु तिसऱ्या, चौथ्या व पांचव्या बरगडीच्या वरील कांठापासून सुरू होऊन अंसफलकाच्या एका टोंकास चिकटतात. या स्नायूचा आकार वरील स्नायुपेक्षां बराच लहान असतो. याचें काम वरील स्नायूप्रमाणेंच असून अंसफलकास छातीकडे वळविण्याचेंही आहे.

३३. **अधोजत्रु** (सब्क्लेव्हियस) हा स्नायु पहिल्या बरगडीपासून व तिच्या तरुणास्थीपासून सुरू होऊन जत्रूच्या खालच्या बाजूस चिकटतो. हा स्नायु जत्रूस खालीं व पुढें ओढण्याच्या कामीं उपयोगीं पडतो.

३४. **करपत्र** ( सिरेटस ) या स्नायूस करवतासारखे दाते असतात, ह्मणून यास करपत्र असें ह्मणतात. याचे तंतु नऊ शिखांनीं सुरू होतात. या शिखा वरील आंठ बरगड्यांपासून ह्मणजे प्रत्येकीपासून एकेक, अशा सुरू होतात, फक्त दुसऱ्या बरगडीपासून मात्र दोन शिखा निघतात. मग या सर्व शिखांचे तंतु एकत्र होऊन छातीच्या बाजूवरून मागें जाऊन अंसफलकाच्या एका कांठास चिकटतात. श्वास आंत जोरानें घेतेवेळीं बरगड्या वर उचलणें हें यांचें मुख्य कार्य आहे.

बरगड्यांच्या मधून मधून जे स्नायु आहेत त्यांस पार्शुक स्नायु असें म्हणतात. हे तीन प्रकारचे असातात. बहिःपार्शुक, अंतःपार्शुक, व अधःपार्शुक.

३५. **बहिःपार्शुक** (एक्स्टर्नल इंटर्कॉस्टल्स ) हे एकंदर अकरा असतात. वरील बरगडीच्या खालील कांठापासून सुरू होऊन जवळच्या खालील बरगडीच्या वरल्या कांठास यांचे तंतु चिकटतात.

३६. **अंतःपार्शुक** ( इंटर्नल इंटर्कॉस्टल्स ) हे स्नायूही अकराच असतात. हे वरील स्नायूच्या आंतल्या बाजूस चिकटतात. यांचा झोंक बहिःपार्शुकांच्या उलट असतो. **अधःपार्शुक** ( सब कॉस्टल्स ) हे नऊ किंवा दहा लहानसर स्नायु असतात. हे छातींत बरगड्यांच्या मागील भागांत असतात. प्रत्येक स्नायु बरगडीच्या पुढील भागापासून सुरू होतो आणि खालील एक बरगडी सोडून तिच्या खालच्या बरगडीस चिकटतो. श्वासोच्छ्वास घेतेवेळीं बरगड्या वर उचलल्या जाव्या व खालीं

दबल्या जाव्या व तेणेंकरून छातींतील अवकाश कमजास्त होण्याची सोय व्हावी ह्मणून बरगड्यांच्या मधील अवकाशांत पार्शुक स्नायूंची योजना केलेली असते, त्यांच्या योगानें वरील व्यापार चांगल्या रीतीनें चालतो.

३७. प्रागुरस्क ( ट्रांग्युलारिसूस्टर्नाय् ) हा एक त्रिकोणी स्नायु छातीमध्यें उरोवंशाच्या आंतल्या बाजूवर असतो. हा उरोवंशाच्या बाजूपासून आणि बरगड्यांच्या व उरोवंशाच्या तरुणास्थीपासून सुरू होतो आणि दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या, व पांचव्या बरगडीस चिकटतो.

उदरस्नायु प्रत्येक बाजूस नऊ असतात. त्यांपैकीं कांहीं स्नायूंचा झोंक तिरकस असतो, कांहीं पोटाच्या मध्यरेषेंत अगदीं उभे सरळ असतात, व यांपैकीं एक स्नायु तर उदरावकाशावर छत दिल्या-सारखा असतो त्याच्या योगानें छाती व उदर यांचे, आंतल्या अंगास निरनिराळे दोन विभाग होतात. हा दोहों अवकाशांच्या मध्यें असतो ह्मणून यास मध्यपटल ( डायाफ्रम ) असें ह्मणतात.

३८. मध्यपटल या स्नायूचे पुढील तंतु उरोवंशाच्या तरुणास्थीपासून व खालील सहा बरगड्यांच्या आंतल्या बाजू-पासून सुरू होतात आणि मागील तंतु कटिमण्यापासून व शेवटच्या बरगडीपासून सुरू होतात. छातीच्या मध्यभागांत हे कंड-राकृति होतात. उदरावकाशावर हा स्नायु छत दिल्यासारखा असतो असें जरी ह्मटलें आहे तरी हें छत, छाती व पोट यांच्या मध्यरेषेंत एकसारखें नसून पुढून मागें खालीं खालीं उतरत गेलेलें असतें. कारण या पड्याचे पुढील तंतु वर चिकटतात व मागील तंतु खालीं कंबरें-तील मणक्यांस चिकटतात असें पूर्वीं वर्णिलेंच आहे.

उदरस्नायु हें पोटांत असणारे जे मृदु अवयव त्यांस बाहेरील धक्का लागूं न देण्याच्या कामीं फार उपयोगीं पडतात. या स्नायूंची शक्ति पैलवान लोक इतकी वाढवितात कीं पोटावर दोन मण वजनाचा जरी दगड ठेविला तरी ते स्नायु दगडाचा भार वरच्यावर तोलून धरून आंतील आंतड्यास धक्का लागूं देत नाहींत. ही गोष्ट पैलवान लोक खेळ करून

दाखवितात त्यावेळीं पुष्कळ लोकांच्या पाहण्यांत आलीच असेल. याखेरीज उदरस्नायूचा दुसरा मोठा उपयोग असा आहे कीं, ते पोटांतील मलमूत्र, व गर्भाशयांतील गर्भ, दडपून बाहेर ढकलतात, व उच्छ्वासक्रियेस मदत करितात. .मध्यपटलस्नायु हा श्वास आंत घेण्याच्या कामीं मदत करितो. उचकी व हुंदके येणें,ही क्रिया याच्याच आकुंचनामुळें उत्पन्न होते. ( पुढें चालू. )

---

## ज्वर.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

लेखक—डा. विष्णुपंत भागवत एल्. एम्. ॲंड एस्.

ज्वराचा एक भयंकर व विलक्षण प्रकार आहे. त्याला 'अंतर्दाहसूचक संतत ज्वर' ( Hectic fever ) किंवा 'जीर्णज्वर' असें ह्मणतात. हा ज्वर पुष्कळ दिवस राहणाऱ्या अशा रोगापासून येत असतो आणि मुख्यत्वेंकरून दुःसाध्य किंवा दुश्चिकित्स्य अशा रोगांबरोबर, तसेंच गंडमाळा, पुष्कळ दिवसांचा उपदंश, किंवा पुष्कळ दिवस पू वहात असलेल्या ( क्षय, हड्यात्रण ) अशा रोगांबरोबर हा ज्वर उत्पन्न होत असतो.

या जीर्णज्वराचीं लक्षणें बहुतेक मागें वर्णन केलेल्या ज्वराच्या लक्षणांप्रमाणें असतात, परंतु त्यांत विशेष हें असतें कीं, तीं लक्षणें त्या मानानें सौम्य असून पुष्कळवेळ टिकणारीं अशी असतात. या ज्वराचीं लक्षणें एकाएकीं दृष्टोत्पत्तीस येतात, परंतु बहुधा ताप व इतर तदनुषंगिक दोष बरेच वाढलेले असतात. रोगी हळू हळू क्षीण व अशक्त होत जातो आणि कोणत्याही प्रकारचा उद्योग धंदा करूं नये असें त्याला वाटूं लागतें. सकाळच्या प्रहरीं त्याला जरासा कांटा ( थंडी ) आल्यासारखा वाटतो व संध्याकाळीं व जेवणानंतर थोडेसे हातपाय कढत व शुष्क होऊन चेहेरा लालसर होतो व सकाळीं निजून उठल्यावर रोग्याला थोडासा घाम येतो. असा प्रकार त्या रोग्यास हळू

हळू होऊं लागतो. परंतु त्याची जीभ स्वच्छ असेत, त्याची भूक बरी असते, आणि जरी त्याची नाडी जलद वहात असून त्यास जरा जास्त शोष असतो तरी त्याच्या मलमूत्रांचें चांगलें साफ विसर्जन होत असतें. अशीं लक्षणें होत असतांना जर उष्णतामापक यंत्र (Thermometer) लावून पहात गेलों तर त्या रोग्याला २° किंवा ३° अंश जास्त ताप म्हणजे १००° पासून १०१° पर्यंत ताप असतो असें दिसून येतें. परंतु आरोग्य स्थितींतील उष्णतेप्रमाणेंच हा ज्वर सकाळीं अगदीं कमी व संध्याकाळीं सर्वांत अधिक असा असून त्याच्याही थोड्याशा व्यक्त अशा थंडी, ताप, व घाम येण्याच्या तीन अवस्था असतात.

ज्या रोगाचा हा जीर्ण ज्वर हें एक लक्षण असतें तो रोग जसजसा वाढत जातो तशीं तशीं या ज्वराबरोबरचीं इतर लक्षणें ( कृशता, निःशक्तता ) वाढूं लागतात. रोगी अधिक निस्तेज होतो, अधिक कृश व अशक्त होतो आणि तापही जरा वाढतो. तो केव्हां केव्हां १०३ किंवा जरा जास्त होतो व सकाळीं केव्हां केव्हां यथाक्रमापेक्षां म्हणजे नेहमींपेक्षांही उष्णता कमी असते. अशा स्थितींत सकाळीं रोग्याला थंडी वाजते,हातपाय व नाक गार व निस्तेज होतात, संध्याकाळीं त्वचा अति गरम व शुष्क होते, हातापायांची अति आग व जळजळ,ओंठ कोरडे व लाल आणि गाल लालसर अशी स्थिति होते, पहांटेस निजून जागे होतांच सर्व अंगभर दरदरून घाम आलेला असतो. अति ताप चढण्याची वेळ ह्मणजे मुख्यत्वेंकरून संध्याकाळची व तीही एकच. परंतु कित्येकदां दिवसांतून ताप चढण्याची दुसरीही वेळ असते आणि ती दुपारीं एक दोन वाजतां ह्मणजे दुपारचें जेवण झाल्यावर तास दीड तासानें. इतर लक्षणें जशीं जशीं वाढत जातात तसे तसे नाडीचे ठोकेही जास्त पडूं लागतात, आणी जरी नाडी तीव्र वाहते अशी वाटते तरी ती बरीच अशक्त अशी असते. अशा स्थितींत देखील जीभ स्वच्छ व भूक चांगली अशी असूं शकते, मात्र तहान बरीच असून मलावरोध होऊन व मूत्र थोडें, लाल व अति

ऊन असें असतें.

पुढें पुढें ह्या लक्षणांत थोडासा फेरफार होऊन दुसरीं लक्षणें होऊं लागतात. कृशता व निःशक्तता हीं अति येतात, नाडी अगदीं अशक्त, सूक्ष्म व जलद वाहूं लागते व रुधिराभिसरण अपुरतें चालू असतें ह्मणजे सर्व भागांतील रक्त शुद्ध न होतां हातापायांच्या बोटांत तें सांचून राहातें. माकडहाडावर वगैरे क्षतें पडतात, हातांचीं बोटें निळसर व कंदाकृति अशीं होतात, त्वचा रुक्ष व वल्कलवत् अशी होते. पुढें बहुधा हगवण सुरू होऊन जीभ कोरडी होऊन कातरे पडतात किंवा तोंड येतें. भूक अगदीं मंदावते व शेवटीं अति क्षीणामुळें मृत्यु येतो.

अशा जीर्णज्वराच्या लक्षणांच्या रोगांत रोग्यास बुद्धिभ्रंश न होतां तो मरेपर्यंत निराश न होतां आनंदी असतो.

आतां या सर्व ज्वरांसंबंधीं उष्णतामापक यंत्राचा ( Thermometer ) किती व कसा उपयोग होतो हें सांगून हा ज्वरावरील लेख आटपता घेतों.

आलीकडे डाक्तर व वैद्य यांना छाती तपासण्याचें व उष्णाता मोजण्याचें यंत्र अत्यवश्यक झालें आहे. उष्णतामापक यंत्र बरेच लोक वापरूं लागले आहेत. याचा उपयोग रोगाची परीक्षा करण्याकरितांच होतो असें नाहीं, तर रोगाचा शेवट कसा होईल हेंही कळण्याचें तें एक साधन आहे. ह्मणून त्याबद्दल कांहीं माहिती देणें गैरवाजवी होणार नाहीं. रोग्याची उष्णता मोजण्याचें यंत्र ( Thermameter ) बरोबर उष्णता दाखविणारें व यत्किंचित् उष्णतेच्या मानानें त्यांतील पारा खालीं वर होणारें अशा प्रकारचें असलें पाहिजे. त्याच्या ९५° पासून ११२° पर्यंत खुणा असल्या पाहिजेत. या यंत्रांत जो पारा असतो त्याचे दोन भाग असतात. त्यांपैकीं मोठा जाडा भाग तळाशीं असून दुसरा लहान बारीक भाग जाड्यापासून वरतीं अगदीं थोड्या अंतरावर ९५° पर्यंत चढलेला असा असतो. हा लहान भाग जाड्याभागाशीं कधींही जुळलेला असतां कामा नये; किंवा लहान भागाचे पुनः

पोटभाग होतां कामा नये. पारा खालीं उतरावा ह्मणून जर ह्या यंत्रास जोरानें हिसका दिला तर लहान भाग खालील जाड्या भागाशीं भिडून जातो. ह्मणून अति जोरानें हिसका न देतां हळू हळू हालवावा. वरील लहान पाऱ्याचा भाग खालच्या जाड्या पाऱ्याशीं मिळूं नये ह्मणून या दोन भागांतील मध्यभाग आकुंचित केलेला असतो. तसेंच लहान भागाचे पोटभाग होऊं नयेत ह्मणून जाडा भाग नेहमीं खालीं करून तें यंत्र ठेवावें व तें यंत्र एकदम कोणत्याही प्रकारें थंड करितां कामां नये.

रोग्याचा ताप पाहण्याचे वेळीं लहान भाग ९५° डिग्रींपर्यंत किंवा त्याच्याही खालीं ( एखाद्या यंत्रावर ८०° पासून डिग्री मांडलेल्या असतात ) आणून ठेवून जाडा भाग खाकेंत, तोंडांत जिभेखालीं, गुदांत किंवा योनींत ठेवावा किंवा धरावा. मुख्यत्वें खाकेंत किंवा जिभेखालीं ५ मिनिटेंपर्यंत धरणें चांगलें. केव्हां केव्हां हें यंत्र अत्युत्तम असलें तर १ मिनिटही बस्स होतें. जाडा भाग खाकेंत धरिला असतां तो घट्ट धरून त्याला हवेचा किंवा कापडाचा संपर्क होतां कामा नये दिवसांतून एखादे वेळेला देखील या यंत्रानें उष्णता पाहण्यापासून फायदा होतो. निरनिराळे ताप व दाहांमध्यें व दुसऱ्या कित्येक तीव्र रोगांमध्यें दिवसांतून ४-५ दां ४ तासांच्या अंतरानें पाहणें चांगलें. केव्हां केव्हां सकाळ संध्याकाळ फक्त उष्णता पाहिली ह्मणजे कामापुरती बस्स आहे. (ह्यासंबंधी विस्तृत माहिती भिषग्विलास पु. १ पान १७ ह्यामध्यें आकृतीसह दिली आहे, ती पहा. )

---

## नाडी ( पल्स ).

( अंक ८ पान १३७ वरून पुढें चालू. )

२१. परंतु ही गोष्ट लक्षांत बाळगली पाहिजे कीं, कांहीं लोकांची नाडी फार विलक्षण असते. विशेष कांहीं कारण नसतां ती फार जलद होते. अशा मनुष्यास ताप आला तर तिचे ठोके

प्रकृतिवैचित्र्य व त्याचा नाडीवर परिणाम.

१३०-१५० पर्यंत होतात, परंतु ह्या तीव्रतेपासून भीति वाटण्याचें मुळीं कारण नसतें. अशा प्रसंगीं नाडीचें महत्व समजण्यास रोग्याची पूर्वीची माहिती असली पाहिजे. पुनः अशीही गोष्ट आपल्या पाहण्यांत येते कीं, एखाद्या मनुष्यास ताप येतो परंतु त्याच्या तापाच्या मानाप्रमाणें नाडी जलद नसते; परंतु फार सूक्ष्म व दबणारी अशी असते. तर रोग्याचें भविष्य ठरविणें तें त्याच्या नाडीच्या जलदपणावर ठरवावें कीं तिच्या सूक्ष्मतेवर आणि दबण्यावर ठरवावें? पुष्कळ वेळां नाडीच्या जलदपणावरच ठरविणें बरोबर होणार आहे. कारण, निरोगी अवस्थेंत असतां पुष्कळांची नाडी दबण्यांत व सूक्ष्मपणांत फार भिन्न असते. कांहीं लोकांची तर ते पूर्ण निरोगी असतां आणि फार प्रयासाचीं कामें करण्यास क्षम असतां सुद्धां त्यांची नाडी फार सूक्ष्म असते, ती इतकी कीं, तीस सुताएवढी ह्मणतां येईल. अशी नाडी पुष्कळदां एकाच कुटुंबांत पुष्कळांची असते. अशा एकाद्या मनुष्यास ताप आला असतां त्याची नाडी जलद होते आणि ती पूर्वींचीच हृदय चांगलें सशक्त असतांनांसुद्धां फार दबणारी व सूक्ष्म असते. अशा प्रसंगीं नाडीच्या जलदपणाकडे लक्ष्य न देतां केवळ तिच्या दबण्यावर आणि सूक्ष्मतेवर आपण लक्ष्य दिलें असतां रोग्याच्या चिकित्सेसंबंधानें व त्याच्या भविष्य-कथनासंबंधानें आपली चूक होणार आहे. आतां अशा रोग्याची पूर्वीची माहिती असल्यास अशी चूक आपल्याकडून बहुशः होणार नाहीं हें उघड आहे. परंतु असला मनुष्य ताप आलेला आपल्या पाहण्यांत पहिल्यानेंच आला आणि त्याच्या नाडीच्या जलदपणाकडे लक्ष्य न देतां तिच्या दबण्यावर आणि सूक्ष्मतेवरच केवळ आपण लक्ष्य दिलें तर निःसंशय पुष्कळ अंशीं आपली चूक होणार आहे. आतां नाडी जर पूर्वींची चांगली आहे आणि ती जर दबणारी आणि सूक्ष्म झाली तर मात्र हा फरक महत्वाचा आहे. परंतु हा फरक जेव्हां होतो त्यावेळीं नाडीच्या जलदपणांत फरक होत नाहीं अशी गोष्ट सहसा घडत नाहीं.

२२. आतां हें खरें आहे कीं, केव्हां केव्हां दुसऱ्याच इंद्रियां-

दुसरें इंद्रिय बिघडल्यामुळें नाडींतही तदनुसार फरक होतोच.

तून संकट उद्भवतें; कदाचित् मेंदूच बिघडतो आणि रोग्यास झोंप येत नाहीं, भ्रम होतो, अशीं चिन्हें होतात. परंतु जोंपर्यंत नाडी शाबूत आहे तोंपर्यंत रोग्यास बहुशः धोका नाहीं असें आपणास वाटतें. पण जर मज्जाविकार आपोआप किंवा उपचारानें बरा होत नाहीं, तर परिणामीं नाडी क्षीण होते आणि रोगीही गळतो.

काहीं विशेष रोगांत नाडी स्वभावतःच मंद होते.

२३. काहीं रक्तदोषांत नाडी मंद होते; उदाहरणार्थ कावीळ व मूत्रघ्नदोष या रोगांत ती मंद असते. या रोगांत रोग्याची उष्णताही नेहमींपेक्षां कमी असते. हृदयावरणदाह झाला असतां त्याचे आरंभीं नाडी मंद होते. संधिवातांत उष्णतेमध्यें विशेषसा फरक न होतां नाडीमध्यें एकाएकीं विनाकारण मोठा फरक पडला तर हृदयावरणदाह खात्रीनें होणार असें समजावें. हृदयाची वसामय विकृति झाली असतां नाडी मंद होते. बृहन्नाडीच्या अथवा महाधमनी ( एआरट ) द्वाराचा संकोच होऊन त्यांतून रुधिराभिसरणास अडचण झाली असतां नाडी मंद होते. व्हेगस मज्जातंतूचा ( हा मानेंत असतो ) क्षोभ झाला असतां ती मंद होते. अथवा मस्तिष्कांत गांठी होऊन किंवा मस्तिष्कावरणदाह होऊन व्हेगस मज्जातंतूच्या मूळांचा क्षोभ झाला असतां नाडी मंद होते. ताप उतरून पुष्कळ घाम येत असतो तेव्हांही नाडी मंद होते.

नाडीच्या आकारांत होणारा बदल.

२४. रोगांत नाडीचा आकारही बदलतो- तापाच्या आरंभीं ती स्थूल असते. बृहन्नाडींतून रक्त पुढें वाहण्याचें तें मागें उलटतें त्या रोगांत, ज्या वेळेस हृदयाचें आकुंचन होतें तेव्हां नाडी फार स्थूल असते आणि जेव्हां हृदयाचा विकास होतो त्या वेळेस फार सूक्ष्म असते. शरीर अगदीं कृश झालें असतां रक्तसंचय फार कमी झाल्यामुळें नाडी सूक्ष्म होते. हृदयाच्या डाव्या बाजूच्या विभागांमधील पडद्याच्या विकृतीमुळें रक्तप्रवाहाचा अवरोध किंवा परावर्तन होत असतां नाडी फार

सूक्ष्म असते. आणखी बृहन्नाडीच्या द्वाराचा संकोच होऊन हृदय क्षीण झालें असतांही ती सूक्ष्म होते. ( पुढें चालू )

---

## स्फुट लेख

**पोक्त स्त्रियाही मुलास पाजूं शकतात.**—मूल झाल्यावांचून स्तनांत दूध उत्पन्न होत नाहीं हा नेहमींचा क्रम खरा, पण त्याला अपवादही आढळतात. पन्नास साठ वर्षांच्या बाया आपल्या नातवा पणतवांस पाजतांनाही केव्हां केव्हां पाहण्यांत येतात. प्रथम मुलाची समजूत ह्मणून त्या कोरडा स्तन त्याचे तोंडांत देतात. असा क्रम कांहीं दिवस चालला असतां स्तनांतून थोडथोडें दूध येऊं लागतें व पुढें पुढें लेंकरूं जसें पीत जाईल तसें दूध अधिकाधिक येतें. अशा रीतीनें पुढें मुलाचा निर्वाह त्याच दुधावर चालतो. ज्या मुलाच्या आईस दूध नाहीं किंवा ज्याची आई आजारी आहे अथवा निवर्तली आहे अशा लेंकराची कींव येऊन घरांतील वृद्ध बाया, कीं ज्यांना मुलें होण्याचें बंद होऊन दहा किंवा वीस सुद्धां वर्षें झालीं आहेत, त्या वर सांगितल्याप्रमाणें मुलास पाजूं शकतात.

**दांत किडण्याचीं कारणें.**—१ मुख्य कारण दांत स्वच्छ न घांसणें; टांचण्या, सुया, इत्यादि टोंचणाऱ्या पदार्थांनीं दांतांवरील मजबूत आच्छादनास होणारी इजा; ३ सुपाऱ्या, बर्फाचे तुकडे, इत्यादि कठिन पदार्थ दांतांनीं फोडतांना दांताचा तुकडा निघणें; ४ दांतांस इजा करणारीं औषधें—आम्लपदार्थ, पारा—इत्यादिक फार दिवस घेणें; ५ वाईट दंतमंजनाचा उपयोग करणें; ६ दांतांस कांहीं इजा होऊन अथवा हिरड्यांस गळूं होऊन उत्पन्न झालेली सूज; ७ मूळची अशक्त प्रकृति अथवा वंशपरंपरेची दांत किडण्याची संवय; ८ कांहीं स्त्रिया गरोदर राहिल्या कीं त्यांच्या दांतांस कीड लागते; ९ नेहमीं चहा वगैरे कढत पदार्थ पिणें.

**हृद्रोग व मुष्टिमैथुन.**—तरुण मुलांच्या ह्या वाईट संवयीं-

पासून त्यांच्या हृदयाची क्रिया बिघडते. त्यामुळें हृदयाचे जागीं दुखूं लागतें, हृदय धडधड करूं लागतें व रोगी चिंताग्रस्त होतो. हृदयाची क्रिया बहुधा मंद न चालतां अधिक जलद, जोराची व कमजास्ती होते. सारांश, तिला कांहीं धरबंध राहत नाहीं. कर्णनलिका लाऊन पाहिलें असतांही अशीच स्थिति हृदयाच्या आवाजाची झालेली ऐकूं येते. हृदयाचे दोन्ही आवाज केव्हां चांगले असतात, केव्हां एक स्पष्ट व एक अस्पष्ट असे आवाज ऐकूं येतात. अशा रोग्याच्या नाडींतही हृदयाच्या क्रियेप्रमाणेंच अव्यवस्थितपणा दृष्टीस पडतो. ह्मणजे केव्हां मंद, केव्हां जलद, केव्हां सूक्ष्म, केव्हां जोराची, अशी नाडी वाहते. ह्यावर उपचार ह्मटला ह्मणजे ती दुष्ट संवय सोडून देऊन पौष्टिक औषधाचा उपयोग करावा.

**अकरा वर्षांच्या आंतील मुलीस मूल होणें.**— म्हणजे नेहमींच्या नियमास अपवादच होय. पण असा प्रकार क्वचित् ऐकिवांत येतो. नुक्तेंच असें वाचण्यांत आलें आहे कीं, एका ११ वर्षें २ महिन्यांच्या वयाच्या मुलीस पूर्णमास होऊन लेंकरूं झालें. वयांत आल्याचीं चिन्हें ह्या मुलीवर दिसत नव्हतीं. परंतु पांच वर्षांपासून तिला विटाळ मात्र जात असे. बाळंत होतांना तिला कांहीं त्रास झाला नाहीं व पुढेंही ती हुषार होती. स्तनांत दूध नव्हतें. लेंकरूं एक आठवडाभर जीवंत होतें, तोंपर्यंत त्याची आजी त्यास पाजीत होती.

**तीन वर्षांपासून विटाळ येणें.**—वरील हकीकतीवरून पुष्कळ वर्षांमागें आह्मीं मिरजेस एक मुलगी पाहिली होती तिचें स्मरण होतें. या मुलीस तीन वर्षांपासून विटाळ येत होता. तेव्हांपासून तिचे स्तनही वृद्धि पाऊन आठ दहा वर्षांचे वयांत ते चांगले वयातीत बाईप्रमाणें दिसत होते. मुलगी चांगली सुदृढ होती.

**उचकीवर उपाय.**—कोणत्या इतर उपायांनीं उचकी राहिली नाहीं तथापि थोडी कस्तुरी किंवा कस्तुरीचा अर्क दिल्यानें ती राहते असा अनुभव आहे. कागद जाळून त्यांची वाफ घेतली असतांनाही उचकी राहते.

# आर्यौषधालय.

अलीकडे वर्त्तमानपत्रांत भपकेदार व कर्णमधुर परंतु अनुभवांतीं कुचकामाच्या अशा वैद्यकांच्या जाहिरातीस इतका ऊत आला आहे कीं, त्यांच्यापुढें खरें नाणें अगदींच बाजूस राहून गेलें आहे. जाहिरातींतील मनमोहक वर्णनास भुलून गरजू मनुष्यें अरोग्य होण्याच्या इच्छेनें औषधें मागवून तीं घेतात परंतु त्याजपासून बहुतेक प्रसंगीं औषधांचा गुण न येतां उलट बहुधा औषध घेणाराच्या प्रकृतीला अपाय झाल्यावांचून राहत नाहीं, असेंच आढळून येतें. याचें मुख्य कारण असें दिसतें कीं, ज्यांनीं ज्यांनीं हा औषधांच्या जाहिरातींचा धंदा काढिला आहे त्यापैकीं पुष्कळ अशिक्षित व केवळ पैशाकरितां धंदा करणारे असून कित्येक केवळ एकमेकांचें अनुकरण करणारे आहेत. ह्या कारणानें रुग्ण जनांस चांगलीं औषधें मिळेनातशीं जाहल्यामुळें जाहिरातीवरील त्यांचा विश्वास उडून कित्येकांस आर्यवैद्यकाच्या चांगुलतेबद्दलही संशय वाटूं लागला आहे. ही शोचनीय स्थिति लक्षांत आणून अतःपर ह्या स्थितींत कांहीं तरी फरक करावा व आर्यवैद्यकांविषयीं लोकांच्या मनांतील संशय नाहींसा करावा अशाविषयीं कित्येक विद्वान् लोकांचा विचार ठरून सदरहू कंपनीची स्थापना करण्यांत आली आहे.

ह्या कंपनीचा उद्देश देशी औषधें शुद्ध व शास्त्रोक्त रीतीनें तयार केलेलीं खात्रीचीं मिळत नाहींत, तीं तयार करावीं हा आहे; शिवाय गोरगरिबांसही तीं घेतां यावींत, याकरितां तीं जितकीं स्वस्त विकितां येतील तितकीं विकण्याचाही तिचा निश्चय आहे. हे उद्देश सिद्धीस नेण्यास शास्त्रज्ञ व अनुभविक अशा निवडक व विद्वान् व नांवाजलेल्या वैद्यांची औषधें तयार करण्याच्या कामीं नेमणूक केली आहे. शिवाय औषधांस लागणारे पदार्थ ताजे व मूळच्या ठिकाणाहून

आणविण्याची तजविज केली आहे. या कारणानें सदर्हू कंपनींत अगदीं शास्त्रोक्त व बिनचूक गुणकारी औषधें तयार होत असतात. ह्या करितां ग्राहकांनीं अन्यत्र पैशाचा व्यर्थ व्यय करून प्रकृती नादुरुस्त करून घेऊं नयेत. खरीं औषधें लोकांस मिळावींत व आर्य वैद्यकाचा जीर्णोद्धार व्हावा, ह्या करितां मुद्दाम स्थापन केलेल्या सदर्हू कंपनींतील औषधें मागवून उपयोग करून घ्यावा. रोगाचें निदान कोणी करून मागितल्यास तेही करण्याची व्यवस्था सदर्हू कारखान्यांत केली आहे.

## औषधांची यादी.

### वीर्यस्तंभक, रक्तशोधक, धातुवर्धक, अत्यंत पौष्टिक कस्तुर्यादि मिश्र कामोद्दीपनी गुटिका.

अनेक अमूल्य औषधें मिळवून तयार केलेल्या ह्या गोळ्यांच्या योगानें शरीराची त्वरित व उत्तम सुधारणा होऊन शरीर पुष्ट व रोगरहित होतें. ह्यांच्या सेवनानें इंद्रियशिथिलता, नपुंसकत्व, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, अशक्तता, स्वप्नजन्य व मूत्रमिश्र धातुस्राव लहान मुलांची खर हे विकार अगदीं त्वरित नाहींसे होतात सर्व प्रकारच्या धातुविकारांवर हें अगदीं प्रतिज्ञेचें औषध आहे. जुनाट व अवशेष राहिलेले गर्मी व पर्मा हे रोगही या औषधानें हटकून बरे होतात. धातु व रक्त ह्यांची शुद्धि व वृद्धि होते. मृदु प्रकृतीच्या मनुष्यांस अगर अति मानसिक व शारीरिक श्रम करणारास शरीरप्रकृति समतोल राखण्यास ह्या गुटिका उत्तम प्रकारच्या पौष्टिक ( Tonic ) आहेत. ह्यांच्या सेवनानें स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक गर्भाशयस्थ रोग अगदीं नाहींसे होऊन अग्नि व शक्ति वाढून गर्भवृद्धि होते. अशा प्रकारच्या रोगांवरील सर्व औषधें एकत्र करून त्यांत वारंवार सुधारणा करून तयार केलेल्या ह्याच गोळ्या आहेत. किंमत १६ गोळ्यास १ रुपाया, २ रुपयांस ३६ आणि ४ रुपयांस ८० गोळ्या मिळतील.

**उपदंशः**– सदहू रोग कोणत्याही स्थितींत असला तरी आमच्या औषधानें त्यास हटकून गुण येतो. गर्मी संबंधीं चट्टे, गांधी पुरीळ वगैरे विकार सर्व जाऊन कांति हिऱ्यासारखी सतेज होते. नेत्रस्राव, दाह तिडिक, सूज वगैरे व इतर सर्व तदंगभूत विकार त्वरित बरे होतात. डबी एक किंमत रुपये २

**कर्णरोग** :— कर्णनाद, ठणका, पू, वगैरे सर्व रोगांवर किं.रु. १

**मूळव्याधि** :— समूळ नाहींशी होतें, असें शेंकडों लोकांच्या अनुभवास आलें आहे. १ डबीस किंमत २ रुपये.

**परमा** :— ह्या संबंधाचें तिडिक, पू, दाह, मूत्रसंकोच वगैरे सर्व रोग व विकार अति त्वरेनें व खात्रीनें बरें होतात. असें पुष्कळ वर्षांच्या अनुभवावरून सिद्ध झालें आहे. घेण्यास सुलभ असून खटाटोप विशेष नाहीं. डबी एक किंमत रुपया १

**धुपणी** :— पुरुषांचे जसे धातुविकार त्याप्रमाणें स्त्रियांची धुपणी आहे. योग्य वेळीं उपचार न केल्यास या रोगापासून हानि होण्याचाही संभव असतो. सदरहू रोग पांढरा व तांबडा ह्या दोन प्रकारचा असतो. ह्या दोन्ही प्रकारांवर आमच्या गोळ्या आणि पूड रामबाणाप्रमाणें लागूं पडतात. १४ गोळ्यांस १ रुपया डबी १ किं० १ रुपया.

**पटकी** :--हा रोग इतका चमत्कारिक व एकाएकी येणारा आहे कीं, प्रसंग पडल्यावर आयत्या वेळीं औषध आणवून उपयोग करण्याची आशा कोणी ठेवूं नये. आमच्या गोळ्यांची एक डबी मागवून ठेविली असतां प्रसंगीं उपयोगीं पडून एक रुपयांत अनेक जीव वाचविल्यासारखें होईल. या औषधानें शंभरापैकीं पंचाण्णव इसमांस गुण आल्यामुळें मुद्दाम हें औषध तयार करून ठेविलें आहे. एक डबी किंमत १ रुपया. एक डबी ४ इसमांस पुरतें.

**अमांश** :– आमांशापासून होणारे सर्व विकार तिडिक, मुरडा वगैरे विकरांवर हटकून लागूं पडणारें यासारखें औषध मिळणार नाहीं. असें प्रतिज्ञेनें सांगतों. एक डबीस किंमत १ रुपया.

**नेत्ररोग** :– सहरा, लाली, पू, ठणका, गळ, वगैरे सर्व रोगांवर अति उत्तम किंमत रुपया १.

**मुलांचे पोटांतील सर्व प्रकारचे रोग :**—आमच्या कडील सदहू गोळ्यांनीं डबा, तुणतुणी, अपस्मार, खोकला, एकृत, ज्वर वगैरे रोग पांच वर्षांच्या आंतील मुलांचे अगदीं खात्रीनें व बिनचूक बरे होतात. डबी किंमत रुपया १.

**केंसांचा कल्प :**—ह्या कल्पानें कसेही पांढरे केंस काळेभोर होऊन त्यांस उत्कृष्ट तजेला येतो. एकदां लाविला असतां दोन महिने लावण्याची जरूर नाहीं. डबी किंमत १ रुपया.

या शिवाय दंतरोग, क्षयकास, कासश्वास, बालज्वर, जीर्णज्वर, वृश्चिकदंश, अग्निमांद्य, अजीर्ण, शूल, आम्लपित्त, वगैरे रोगांवर उत्तम प्रकारचीं औषधें तसेच सर्व प्रकारच्या मात्रा रसायनें, भस्में, तैलें, घृतें, आसवें, अरिष्टें, आमचेकडे तयार आहेत. गरीब छोटेखानी वैद्यलोकास विशेष सवलतीन औषधें दिलीं जातील.

या आमच्या कारखान्यांत होमियोपाथिक औषधांचाही संग्रह केलेला आहे. ग्राहकांस तीं खात्रीचीं व माफक दरानें मिळतील.

**आम्ही सर्व प्रकारचीं औषधें :**—नागार्जुन, करवालभैरव, रसेंद्रतिलक. रससंहिता, भालुकी, लंकेश, मांडव्य, वाग्भट इत्यादि ७१ ग्रंथचीं व र. तंत्रकारांचीं मतें एकत्र करून त्यांतून उत्तम ठरलेले पाठानें तयार करित असतों, हें लक्षांत ठेवावें. अनुपानपत्रक औषधासोबत मिळेल.

**काव्यरत्नावली :**—या प्रसिद्ध मासिक पुस्तकांत हल्लींच्या नामांकित कवींचीं नवीन काव्यें प्रसिद्ध होतात. काव्यें तपासण्याचें काम रा. सा. महाजनी एम. ए., रा. सा. ओक, रा. सा. पंडित वगैरे विद्वान् व मार्मिक कमेटीकडे आहे. याचे मागील ८ वर्षांचें अंक किंवा चालू अंक आमचेकडे विक्रीस तयार आहेत वार्षिक मूल्य ट. ख. सह १॥ रुपया.

☞ **पत्ता :— गंगाधर वासुदेव शास्त्री वैद्य चोपडेकर**
**आणि कंपनी, प्रबोधचंद्रिका प्रेस,**
**जळगांव--खानदेश.**

टिळक ग्रंथसंग्रहालय
दा. क्र.
19815
056

## कृष्णशास्त्री चिवलकर वैद्य मु॰ आंजलें ता॰ दापोली जि॰ रत्नगिरी यांचीं जगत्प्रसिद्ध, सर्वोपयोगी, निर्दोष व रामबाण औषधें.

या जाहिरातीचे खालीं " विशेष सूचना " केली आहे ती वाचकांच्या अवश्य लक्ष्यांत असावी.

### १ वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साह- बुद्धि कांतिवर्धक व धातुपौष्टिक, सुवर्णमाक्षिक- मौक्तिक- कस्तूरीमिश्र अपूर्व गुटिका.

१ शरीराची उत्तम सुधारणा करणारीं अत्यंत महत्वाचीं जीं औषधें आहेत, त्यांत या गुटिका अगदीं पहिल्या प्रतीच्या ठरल्यामुळें त्यांचे अपूर्व गुण थोड्याच काळांत या देशाच्या सर्व भागीं व त्याच्या आसमंतात् अतिशय पसरले आहेत. या सेवन केल्यानें नपुंसकत्व, इंद्रियशिथिलता, कडकी, जीर्णज्वर, अग्निमांद्य, कोणत्याही कारणांनीं आलेली अशक्तता, स्वप्नजन्य किंवा इतर धातुपात, उन्हाळे, छातींतील रोग, मस्तकशूळ, मेंदूचे विकार, पांडुरोग, क्षय, मूळव्याधि, भगंदर, मूत्रसंकोच किंवा मूत्रातिरेक, कटिशूळ, कटिवात, वातरोग, निद्रानाश, चक्कर, कफातिरेक, उपदंशसंबंधी सुरलेले विकार, सूतिकारोग, व्रण, हात, पाय, मूत्रमार्ग व शरीर यांचा दाह, ठणका, ग्लानि, अरुचि, मूत्राश्मरी व चित्तभ्रम इत्यादि अनेक विकार कितीही वयाच्या मनुष्यास कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले, नवीन किंवा जुनाट असले तरी अगदीं खात्रीनें बरे होतात. धातु व रक्त यांची शुद्धि व वृद्धि होऊन रक्तदूषणजन्य अनेक रोग हटकून बरे होतात. वीर्यस्तंभन व कामोद्दीपन होऊन अग्नि व शक्ति भरपूर वाढते. स्त्रियांची धुपणी व संततीस अपायकारक जे गर्भाशयस्थ रोग त्यांचें त्वरित निवारण होऊन कांति, स्मरणशक्ति, व बुद्धि हीं वाढतात. ज्यांस फिरण्याचे, अभ्यास करण्याचे लिहिण्याचे व शिकविण्याचे श्रम फार पडतात त्या सर्वांच्या अंगीं यांणीं

अतिशय शक्ति येऊन मनास उत्साह प्राप्त होतो व सुस्ती जाते. ज्यांस दूध व जडान्न पचत नाहीं त्यांस तें भरपूर पचूं लागतें. कोष्ठशुद्धि होते. कोष्ठांतील अनियमित व्यापारांपासून होणारे दुष्ट परिणाम टळतात. या अप्रतिम गुटिका अत्यंत उपयुक्त शोधानें केल्या असून यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें आहेत, सबब जास्त वर्णन येथें करीत नाहीं. यांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस या अत्यंत उपयोगी आहेत. वरील सर्व रोग जाऊन उत्तम गुण प्राप्त होण्यास या गुटिकांसारखें अप्रतिम औषध नाहींच असें स्पष्ट ह्मणतों. यांस पथ्यसेवनाची गरज नसतां पाहिजे त्या दिवसांत घेतल्या तरी हटकून गुण करितात, यामुळें यांचा अतिशय खप सुरू आहे. हल्लीं या गोळ्यांत अंतर्वेदी, नेपाळ, काश्मीर इ० देशांतील अत्यंत शुद्ध, ताजे, महत्वाचे व मौल्यवान असे अनेक पदार्थ आणखी घालून त्यांची विशेष सुधारणा केली आहे आणि लोकाग्रहावरून केवळ परोपकारार्थ ह्मणून गोळ्यांचा दर फारच स्वस्ता केला आहे. गोळ्या रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्यांहून कितीही जास्त गोळया घेणारांस बंगीचा सर्व ट. खर्च माफ आहे. अनुपान ख० सोबत देऊं. एकदम १६ गोळ्यांस १ रु., ३६ गो० २ रु., ८० गो० ४ रु., व १३० गो० ६ रु.

## ३. थंडगार नेत्रांजन.

हें परम गुणकारक अंजन स्तुतीस अत्यंत पात्र आहे, हें सतत दहा वर्षांच्या पूर्ण अनुभवानें कळवितों. यानें डोळ्यांचे साधारण विकार तर सहजच, परंतु दृष्टीचा समूळ नाश करणार तिमिरांध्य,वडस, बिंदु, फुलें, कांच, सारा, भोर, गळती, खाज्या, जळजळ, कंड, फूट, चिकटा, ठणका, व लाली, इ. अनेक विकार तत्संबंधी मस्तकशूलादि विकारांसह कितीही वयाच्या मनुष्यांस कोणत्याही कारणांनीं प्राप्त झालेले नवीन किंवा जुनाट असले तरी नाजूक रीतीनें कोणतीही इजा बिलकूल न होतां बरे होतात.

दृष्टि तीव्र व थंडगार राहते. शिवाय जागरण, उन्हांत फिरणें

अग्नीचा शेक, उपदंशविकार, अतिवाचन, अतिव्यायाम, अतिमैथुन, अतिमद्यपान, अत्युष्ण व विदाही पदार्थ भक्षण, इ० कारणांनीं ज्यांचे डोळे बिघडतात त्यांस याचा फारच मोठा उपयोग आहे. हें चांगल्या दृष्टीच्या मनुष्यांनींही डोळ्यांत घातल्यास वरील विकार बिलकुल होणार नाहींत. लहान मुलांस तर हें अत्यंत उपयोगीं आहे. २ तो० ड० १॥ रु०

### ४. कर्णस्त्रावनाशक अप्रतिम तेल.

हें उत्तम तेल कानांत घातल्यानें कानांतून पू वाहणें, तत्संबंधीं ठणका, कंडू, दाह. रक्तस्राव, इ. विकार तत्काळ बरे होतात. कानांतील कोणत्याही प्रकारचे साधारण व्रण तर तत्कालच, परंतु कानाचा समूळ नाश करणारे जुनाट किंवा हाडीं खिळून बसलेले कितीही वयाचे मनुष्याचे व कोणत्याही कारणानें प्राप्त झालेले अनेक प्रकारचे असाध्य व्रण कोणतीही इजा किंवा आग वगैरे बिलकुल न होतां अगदीं खात्रीनें बरे होतात. बाटलीस रु० १ शिवाय प्या० ख० दोन आणे. रोखीनें किंवा व्हॉ. पे. पार्सलनें खालील पत्यावर मागविल्यास पाठवूं. अनुपान खर्डा बाटलीसोबत.

**५. पर्म्यावर अपूर्व मिश्रण.**—कोणत्याही प्रकारचा नवीन किंवा जुनाट पर्मा, तत्संबंधी दाह, तिडीक, मूत्राची विवर्णता, संकोच किंवा मूत्रातिरेक इ. विकारांसह या मिश्रणापासून इजा बिलकुल न होतां व पथ्यसेवनाची खटपट नसतां तावडतोब बरा होतो. पर्म्यावर इतकें प्रतिष्ठेचें औषध दुसरें नाहींच. बा. १ रु.

**६. दंतरक्षक पूड.**— ही चोळिल्यानें दंतसंबंधी सर्व विकार हिड्यांचा रक्तस्राव व व्रण, पू, कीड इ. फारच त्वरित व नाजूक रीतीनें बरे होऊन दांत स्वच्छ व फार मजबूत होतात. ड. ६ आणे.

७. गजकर्ण, नायटे, खरूज इ. विकार ३ दिवसांत बरे होतात. ड. ६ आणे.

८. विंचवाचें विष हें औषध लावतांच उतरतें. ड. ८ आणे. इतकें औषध ४० मनुष्यांस पुरतें.

वरील औषधें अत्यंत खात्रीचीं आहेत. त्यांणीं हजारों लोकांस गुण आला व नित्य येत आहे. अनुभवानंतर पक्की खात्री होईलच. याशिवाय आमच्या येथें कस्तूरीच्या उत्तम कातगोळ्या, तमाखूच्या अर्काच्या कस्तुरीमिश्र गोळ्या, उत्तम सुगंधी अत्तरें व प्रयोक्त रसायनें, धातूंचीं भस्में, पाक, तैलें, चूर्णें, गोळ्या, घृतें, आसवें, द्राव, क्षार हेमगर्भादि रसायनें इ. औषधें माफक किंमतीस मिळतील. पाहाण्यासाठीं सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. अनुपान पत्रक औषधासोबत पाठवूं. पत्ता सवाच्य. कोणीं प्रकृतिमान कळविल्यास रोगाचें निदान व योग्य चिकित्सा कळवूं. औषधें रोखीनें किंवा व्ही पी. नें विकत मिळतील. टपालखर्च वेगळा पडेल. गरीब लोकांस स्वस्त दरानें औषधें देऊं. जाहिरातीच्या खालील किंवा वरील पत्यावर मिळतील. या औषधांत अपायकारक पदार्थ बिलकूल नसून त्यांच्या अप्रतिम गुणकारित्वाबद्दल हजारों सर्टिफिकिटें मिळविल्या आहेत व नित्य मिळत आहेत.

**विशेष सूचना**:— आलीकडे वर्तमानपत्रांतून आंजर्लें व नजीकच्या मुर्डी वगैरे गांवांतील औषधांच्या नवीन बऱ्याच जाहिराती सुरू झाल्या आहेत व त्यांपैकीं कांहीं जाहिरातींच्या खालीं किंवा वर ज्या सह्या आहेत त्या बहुतेक आमच्याच नांवासारख्या ग्राहकांस भासण्याचा संभव आहे, यामुळें कदाचित् ग्राहकांचा घोटाळा होईल. तरी अशा लोकांशीं व त्यांच्या जाहिरातींशीं आमचा कोणत्याही प्रकारं अगदीं संबंध नाहीं हें ग्राहकांनीं अवश्य लक्षांत ठेऊन, आमचीं औषधें मागणें तीं "**कृष्णशास्त्री चिवलकर वैद्य मु० आंजर्लें ता० दापोली जि० रत्नागिरी**" या अगदीं बिनचूक सही व पत्यावर मागवावींत.

**कृष्णशास्त्री चिवलकर.**

**पत्ता**— मु० आंजर्लें, ता० दापोली, जिल्हा रत्नागिरी.

**भिषग्विलासाच्या आश्रयदात्यांस विनंति**— चौथ्या वर्षाच्या हा शेवटला अंक वाचकांचे हातीं पडत आहे हें त्यांनीं ध्यानांत आणून, ज्यांचेकडे अद्याप बाकी आहे त्यांनीं ती लागलीच धाडावी. ज्यांजकडे व्ही. पी. केलीं आहेत किंवा पुढें करूं त्यांस आतां घुस्सा मानण्यास यत्किंचित्ही जागा नाहीं. आश्रयदात्यांनीं आपली वर्गणी वेळेवारी पाठविल्यास भिषग्विलासाचें काम अधिक उमेदानें करण्यास याचे चालकास उमेद येणार आहे.

---

**सव्वा रुपया खर्च करून 'ज्ञानसिंधु' पुस्तकास वर्गणीदार होणारांस**

## पांचशें रुपये बक्षीस मिळतात !

### हें पक्कें लक्षांत ठेवा कीं, अशी उत्तम संधि पुनः येणार नाहीं.

**ज्ञानसिंधु**— या नांवाच्या नवीन तयार होणाऱ्या सर्वोपयोगी गद्यपद्य विषयांनीं भरलेल्या ३०० वर पृष्ठांच्या पुस्तकाला ता० ३० एप्रिल १८९६ चे आंत रोख १।४ पाठविणारांस किंवा ३०।४।९६ पर्यंत फक्त सही देऊन ज्ञानसिंधु पुस्तक हातांत पडल्यावर व्ही. पी. खर्चासह १॥ रुपया देणारांस ५००, २५०, १५०, १००, ५०, २५, १५, १०, ५, २, १॥, १ यांपैकीं रोख रुपयांचें, किंवा रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप, लोकमित्र, भक्तविजय, पानपतचा घनघोर संग्राम, राम आणि रावण, इंडियन पिनलकोड, अरेबियन नाईट्स वगैरे. आठ रुपयांचे आंतील उपयुक्त पुस्तकांचें, यांतून कोणतेंहा एक बक्षीस हक्कानें प्रत्येकास मिळणार आहे. कारण, या पुस्तकाच्या दहा हजार प्रती छापवीत असून त्यांवर तितकींच बक्षिसें ठेविलीं आहेत. त्यांत २६९३ बक्षिसें रोख पांच हजार रुपयांचीं व

७ ५ ७ वरील पुस्तकांचीं हीं दहाहजार बक्षिसें एकत्र मिळंदून आगाऊ मुदतीपर्यंत वर्गणीदार जमतील तितक्यांच्या नांवच्या चिठ्या घालून दहा हजारांच्या प्रमाणानें वांटून देण्यांत येतील. दहा हजारांपेक्षां वर्गणीदार जास्त झाल्यास याच प्रमाणानें बक्षिसें वाढविण्यांत येतील. जास्त माहिती पाहिजे असल्यास ०॥ चें टिकिट ठेवून पूर्ण पत्यासह पत्रव्यवहार करावा, म्हणजे मोटी जाहिरात पाठवूं.

लोकमित्र कचेरीचे मालक
**दत्तात्रय गोविंद सडेकर.**

पत्रें पाठविण्याचा पत्ता—
व्यवस्थापक ज्ञानसिंधु.
पोष्ट खानापूर जिल्हा बेळगांव

---

**शके १८१८ चें पंचांग.**— निर्णयसागर छापखान्याच मालक यांजकडून सालाबादप्रमाणें त्यांचे छापखान्यांत छापलेल्या सुंदर पंचांगाची एक प्रत आमचेकडे आली आहे तिचा आम्ही मोठ्या आनंदानें स्वीकार करितों. पंचांग नेहमींप्रमाणें जाड कागदावर सुंदर खिळ्यांनीं छापलेलें असून अवश्य तेवढ्या माहितीनें भरलेलें आहे. अर्थात् वर्षभर घरांत बाळगण्यास अगदीं योग्य आहे.

---

## महामारी

हें प्रत्येक कुटुंबांत ठेवण्यायोग्य पुस्तक असून, विशेषतः ज्यां वैद्याची मदत नाहीं अशा गांवांत सांथीचे दिवसांत तर उपयोगी आहे. ह्यामधील उपाय अगदीं साधे व पाहिजे तेथें करता येण्याजोगे आहेत. ह्या पुस्तकावर डा. भालचंद्र, डा. विश्राम, वगैरे विद्वान लोकांचे व वर्तमानपत्रकर्त्यांचे फार चांगले अभिप्राय आले आहेत. पुस्तकाची किंमत ०१० आहे. मुद्दाम टपालहंशील माफ केलें आहे.

**म्यानेजर भिषग्विलास,**
**डा. रानडे यांचा दवाखाना, सोलापूर.**

---